UNIVERSAL LIBRARY
OU_192214
UNIVERSAL LIBRARY

**Osmania University Library**

all No. M923.254 H41N    Accession No. PUM 5978

uthor [illegible]

Title [illegible]

This book should be returned on or before the date last marked below; [illegible]

# नेताजी सुभाषचंद्र बोस

## महान कार्य आणि समर्पण

Netaji Subhashchandra Bose
His Struggle & Martyrdom
by Tatsou Hayashida
या पुस्तकाचा अनुवाद

अनुवाद : गौतम पंडित

मीनल प्रकाशन, कोल्हापूर

Originally Published
by Allied Publishers
Pvt. Ltd.
13/14 Asaf Ali Road
New Delhi 110001
India

प्रकाशक
संजय लिमये
मीनल प्रकाशन
३११७ ए, कपिलतीर्थ
कोल्हापूर ४१६००२

मुद्रक
चि. स. लाटकर
कल्पना मुद्रणालय
'शिव-पार्वती'
टिळक रोड, पुणे

सर्व हक्क प्रकाशकाकडे
प्रथमावृत्ती मार्च १९७८
प्रकाशन क्रमांक सतरा
मुखपृष्ठ
जोशी आर्टस् पुणे

किंमत वीस रुपये

# प्रस्तावना / टाटसो हयासिद

नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्याबद्दल भाष्य करताना कोणी त्यांना "ते राज द्रोही क्रांतिकारक होते किंवा ते समझोत्याचे राजकारण तुच्छ मानणारे ध्येय-वादी हुकुमशाहा होते." असेही म्हणू शकतील. दुसरे कोणी त्यांना 'आत्म निष्ठ आढ्यतेखोर होते.' असेही म्हणतील; परंतु यां पैकी एकही भाष्य त्यांच्या बद्दल तंतोतंत सादृश्य दाखवून त्यांचा खरेपणा व्यक्त करणारे नाही. सुभाष-चंद्र बोस खरे काय होते, याचा निवाडा त्यांच्या पितृभूमीच्या स्वातंत्र्यानंतर करता आला असता. त्यांनी आपल्या दृढविश्वासावर निग्रहीपणाने धर्मश्रद्धेवर आधारित भारताच्या स्वातंत्र्याकरिता लढा दिला. त्यांनी जागतिक स्थैर्य आणि सहज समझोता झिडकारून टाकला. त्यांच्या व्यक्तित्वाबद्दल, विचाराबद्दल व राजकीय क्षमतेबद्दल म्हणण्याचा माझा काहीही मनोदय नाही. त्यांच्या गुणवत्तेबद्दल किंवा अवगुणाबद्दल फक्त भारतीय जनतेने म्हणावे. तथापि नेताजी हे फार मोठे होते, असे माझ्यासारख्या साध्या जपानी माणसाला वाटते.

फोर्मोसा ( तैफी ) या ठिकाणी झालेल्या अपघातात नेताजींना मृत्यू आला. त्या अपघाताच्या प्रसंगी जे हजर होते त्यांपैकी मी एक आहे. माझ्या स्मृति-पटलावर त्यावेळचे दृश्य दिसू लागले म्हणजे मला माझे अश्रू दाबून ठेवणे अशक्य होते. त्यांच्या अकाली मृत्यूने त्यांना त्यांचे ध्येय साकार झालेले पाहण्यापासून दूर नेले. दुसरे म्हणजे नेताजींच्या अखेरच्या क्षणाचे सत्य बाहेर येण्यासाठी मला पाचारण करण्यात आले. तथापि त्या सर्व प्रसंगाच्या स्मृती शरणागतीच्या झालेल्या गोंधळामुळे विस्मृतीत बुडाल्या आहेत आणि या सर्वांमुळे माझ्या भावना दुखावल्या आहेत.

नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या मृत्यूनंतर जवळ जवळ वीस वर्षांनी भारतीय लोक अद्यापही त्यांच्या शेवटच्या क्षणाला घडलेल्या प्रसंगाचा शोध घेत आहेत,

हे पाहून मी आश्चर्यचकित झालो. मी स्वतः सत्य गोष्ट म्हणून काढण्याचा प्रयत्न केला आहे आणि ही गोष्ट विस्मृतीत पुरून गेली असली तरी भारतीय लोकांच्या करिता एखादे रत्नभांडार शोधून काढण्यापेक्षाही महत्त्वाची आहे.

नेताजींनी आपल्या अखेरच्या क्षणापर्यंत भारताच्या स्वातंत्र्याची स्वप्ने रंगवली. त्या महान नेत्याच्या पवित्र अस्थी टोकिओतील जुनाट रंकोजी मंदिरात अद्यापही पडून आहेत. नेताजींना भारताच्या स्वातंत्र्याचे राष्ट्रपिता समजून त्यांना सन्मानाने वागवले पाहिजे आणि त्यांच्या अस्थी भारतात मोठ्या अभिमानाने, भव्यतेने, समृद्ध परिस्थितीने परत आणल्या गेल्या पाहिजेत. मी नुसत्या भावना उद्दीपित करीत नसून, या कार्याला गती मिळावी अशी माझी इच्छा आहे.

वेळ तर निघून गेलीच आहे. नेताजींच्या शेवटच्या क्षणी जे लोक प्रत्यक्ष हजर होते ते वर्षावर्षाने नाहीसे होत आहेत. कालहरणामुळे त्यांच्या स्मृती अंधुक होत आहेत. गेल्या दोन वर्षांत मी नेताजींच्या निकटवर्ती असलेले भारताच्या स्वातंत्र्यासाठी काम केलेले पूर्वीचे लष्करी अधिकारी, काही जनरल्स, दुभाषे आणि ज्यांनी आझाद हिंद फौजेला सहकार्य केले आहे अशा जपानी व्यक्ती यांच्या नेताजींच्या संबंधी माहिती जमा करण्याच्या दृष्टीने मुलाखती घेतल्या आहेत. नेताजींच्या शेवटच्या वेळेची सत्य माहिती जमा करताना या लोकांपैकी अनेकांनी जे लेख लिहून दिले आहेत त्याचा फार मोठा उपयोग मला झाला आहे. हे पुस्तक खालील चार विभागांत विभागले आहे :

( १ ) नेताजींचे जीवित आणि व्यक्तिमत्त्व योग्य त्या दृष्टिकोणातून लिहिण्याचा प्रयत्न करताना भारताच्या मुक्तीकरिता त्यांनी पंचवीस वर्षे जो लढा दिला त्याचा मागोवा घेण्याचा प्रयत्न मी केला आहे. हा प्रयत्न त्यांच्या मृत्यू पूर्वी आणि मृत्यूनंतर तावडतोब घडलेल्या प्रसंगांच्या साखळीवर भर देऊन केला आहे.

( २ ) त्यांच्या मृत्यूच्या खरेपणाला आणि त्यांना जे वीर-मरण आले त्याला भक्कम पुरावा म्हणून ज्या इस्पितळात नेताजींनी अखेरचा श्वास घेतला त्या इस्पितळातील डॉक्टर आणि नेताजींच्या मृत्युशय्येशेजारी असलेले दुभाषे यांचा संपूर्ण अहवाल मी येथे सादर केला आहे.

( ३ ) त्याच कारणासाठी नेताजी ज्या विमानात होते त्याचा अपघात घडला त्याबद्दलचा-ज्या जपानी लष्करी अधिकाऱ्याने नेताजींना विमान दिले, जे त्यांच्याबरोबर त्याच विमानात होते व जे मरता मरता थोडक्यात बाचले त्यांचा सविस्तर अहवाल मी सादर केला आहे.

( ४ ) नेताजींचा विशाल दृष्टिकोण आणि त्यांच्या व्यक्तित्वाइतकीच उच्च

अशी त्यांची विचारसरणी याकडे लक्ष वेधावे म्हणून त्यांच्या निकटवर्तीयांचे आणि नेताजींच्या ' खास वर्तुळातील ' आणि ज्यांनी भारतीय स्वातंत्र्य लढ्यास सहकार्य केले आहे; अशा व्यक्तींचे लेख व आठवणी दिल्या आहेत.

या पुस्तकामुळे जपान व भारत यांचे ऐक्य व स्नेहभाव निर्माण होण्यास थोडीशी मदत झाली तरी मला धन्यता वाटेल. नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्याविषयीचे हे पुस्तक प्रकाशित करण्यासाठी भारतातील व जपानमधील ज्यांनी सहकार्य दिले आणि साहाय्य केले, त्या सर्वांचे आभार.

# आदरांजली / गौतम पंडित

भारतीय महान देशभक्त नेताजी सुभाषचंद्र बोस यांचे संपूर्ण जीवित-कार्य अत्यंत रोमांचकारी प्रसंगांनी भरलेले आहे. आधुनिक भारताचे राष्ट्रपुरुष म. गांधी, पं. जवाहरलाल नेहरू, मौलाना आझाद, वल्लभभाई पटेल यांच्या पेक्षाही नेताजी सुभाषचंद्र बोस यांचे कार्य प्रखर देशभक्तीचे होते आणि ते निश्चित पणे भारताच्या स्वातंत्र्यासाठीच होते. तडजोडीच्या मवाळ राजकारणाने निष्ठुर व लुच्च्या ब्रिटिश सरकारकडून देशाचे स्वातंत्र्य मिळू शकणार नाही, ते त्यांच्याकडून हिरावून घेणेच अगत्याचे आहे, अशी त्यांची श्रद्धा होती आणि त्यासाठी त्यांनी मार्ग काढण्याचा प्रयत्न केला.

जगातल्या कोणत्याही राष्ट्रपुरुषापेक्षा त्यांची देशसेवा, राष्ट्रभक्ती, त्याग कमी होता असे म्हणता येणार नाही किंबहुना ते या सर्वांत अधिक समर्पित झालेले दिसतात.

त्यांच्या जीवितकार्याचे चार खंड होतील. त्यांच्या बालपणापासून त्यांचे शिक्षण पूर्ण होऊन राजकारणात प्रवेश केल्यापर्यंतचा एक भाग, दुसरा राजकारणात प्रवेश केल्यापासून ब्रिटिशांच्या कडक पहाऱ्यातून निसटून जर्मनीत प्रवेश केल्याचा काळ, तिसरा जर्मनीतील वास्तव्य व राजकारण आणि चौथा म्हणजे आग्नेय आशियात येऊन भारताच्या स्वातंत्र्यासाठी आझाद हिंद सरकार (I. I. L.) व आझाद हिंद फौज (I. N. A.) तयार करून भारताच्या तिरंगी झेंड्याखाली ब्रिटिश साम्राज्यशाहीबरोबर केलेले युद्ध आणि समर्पण. या पुस्तकात त्याचा शेवटचा म्हणजे चौथा भाग आलेला आहे. आग्नेय आशियात येऊन भारताच्या स्वातंत्र्यासाठी स्वतंत्र सरकार व स्वतंत्र फौज जपानच्या मदतीने तयार करण्यासाठी त्यांना अविश्रांत परिश्रम घ्यावे लागले. भारताबाहेर पूर्व आशियात राहणाऱ्या भारतीयांना त्यांनी उत्स्फूर्त केले.

जपानचे आपल्यावर वर्चस्व होऊ नये म्हणून ते सतत दक्ष असत. त्याबरोबर जपानशी स्नेहसंबंध बिघडू नयेत याबद्दलही काळजी घेत.

आझाद हिंद सरकार स्थापनेच्या वेळी झालेले मतभेद, कॅ. मोहनसिंघ व ले. क. गिल प्रकरण, रासबिहारी बोस यांच्यावर होणारे आरोप, दुफळी आणि विरोध या सर्वांतून मार्ग काढून त्यांनी स्वतंत्र भारताच्या हंगामी सरकारची स्थापना करून कार्यवाही केली. अपुऱ्या शस्त्रबळावर, पण खंबीर नेतृत्वाने आणि वज्रकठोर मनाने ब्रिटन–अमेरिकेसारख्या शस्त्रसज्ज बलाढ्य शत्रूबरोबर प्रत्यक्ष युद्ध करणे हे सामान्य पुढाऱ्याचे काम नव्हे!

जपानच्या पराभवाबरोबर आझाद हिंद सेनेचा पराभव होणे साहजिकच होते; पण त्यातूनही काही मार्ग काढण्यासाठी नेताजींनी अखेरची धडपड केली. रशियाचा आश्रय घ्यावा ही त्यांची कल्पना होती, पण ते शक्य झाले नाही आणि त्या शेवटच्या क्षणीच मृत्यूने त्यांना गाठले.

नेताजींना आयुष्यभर एकच ध्यास लागलेला होता आणि तो म्हणजे भारताचे संपूर्ण स्वातंत्र्य. स्वातंत्र्योत्तर भारताबद्दल त्यांचे विचार निश्चित होते, पण त्यांस मूर्त स्वरूप देणे दूरचे होते. भारत स्वतंत्र झाल्यानंतर ते जर हयात असते तर त्यांनी आपल्या विचारांना आणि कार्यपद्धतीला निश्चित निराळे वळण दिले असते आणि देशात लोकशाही आणि समाजवादही त्यांनी आणला असता, संपूर्ण देश त्यांनी क्रियाशील बनवला असता. पाकिस्तान निर्माण होऊ दिले नसते आणि हिंदु-मुसलमानांचे ऐक्यही उत्तम तऱ्हेने साधले असते. आजची भारताची स्थिती पाहता असे म्हणावेसे वाटते, की भारत अधिक सुसंपन्न व बलाढ्य झाला असता व जनता अधिक सुखी व समृद्ध झाली असती; पण दुर्दैवाने तो योग आलाच नाही.

नेताजी सुभाषचंद्र बोस फोर्मोसाच्या तैफी विमानतळावरील विमान अपघातात मृत्युमुखी पडले. त्यांच्या मृत्यूची बातमी जपान सरकार शरणागतीच्या गडबडीत असल्यामुळे त्याच क्षणी प्रसिद्ध झाली नाही आणि यामुळे पुढे अनेक वार्ता निर्माण होऊन नेताजी अद्याप जिवंत आहेत ही कल्पना भारतीय जनमनात घर करून राहिली. आता भारताला स्वातंत्र्य मिळून तीस वर्षे होऊन गेली, तरी नेताजींच्या आगमनाकडे काहींचे आशाळभूत डोळे लागून राहिले आहेत. हे पाहून त्यांच्या अपार श्रद्धेचे कौतुक वाटते व दया येते.

"Last Days of Netaji" या नेताजींच्या मृत्यूचा ऊहापोह करणाऱ्या पुस्तकाचे लेखक श्री. जी. डी. खोसला शेवटच्या परिच्छेदात लिहितात—

"श्री. गुहा यांच्या हरकतीचा अवमान न करता किंवा श्री. त्रिखा यांच्या गर्जनेचा अव्हेर न करता उस्मान पटेल यांच्यासारख्या माणसाचा भ्रम

असताना काही लोकांचा श्री. बोस यांचा तर्फे येथे घडलेल्या विमान-अपघाती निधनाबद्दलच्या कथेवर विश्वास बसत नाही. अनेक निःपक्षपाती साक्षीदारांनी पुरावे दिले असल्यामुळे त्यांना ते नाकबूल करणे कठीण आहे. त्यांपैकी चार व्यक्ती श्री. बोस यांच्या दुर्दैवी विमान अपघातात सहप्रवासी होत्या व गंभीर दुखापतीत सापडल्या होत्या. आज ३० वर्षे होऊन गेल्यावर नेताजींसारखा आपल्या देशबांधवासाठी सतत अस्वस्थ असणारा, स्फोटक व्यक्तिमत्त्वाचा, कोणत्याही संकटास न जुमानणारा व आपल्या देशबांधवांसाठी नमते घेऊन समझोता न करणारा सच्चा देशभक्त कोठे तरी अज्ञातवासात राहील यावर विश्वास बसण्यासारखा नाही. निष्क्रियता त्यांच्या रक्तातच नव्हती. आपण नेताजींच्या मृत्यूची वस्तुस्थिती खेदाने स्वीकारली पाहिजे व त्यांचा देह देशासाठी धारातीर्थी पडला या घटनेने आपण आपले सांत्वन केले पाहिजे. 'तुम्ही ज्यावेळी मायदेशी परत जाल तेव्हा माझ्या देशबांधवांना सांगा, की नेताजी अखेरपर्यंत देशस्वातंत्र्यासाठी लढले. तुम्हीसुद्धा हा लढा तसाच चालू ठेवा. आपला देश लवकरच स्वतंत्र होईल. भारताला अधिक दीर्घकाळपर्यंत कोणतीही शक्ती बंधनात ठेवू शकणार नाही, असा मला विश्वास वाटतो.' हे नेताजींचे हबीबूर रेहमान यांच्याजवळ काढलेले अखेरचे उद्गार होत."

नेताजींच्या मृत्यूबद्दल आता संभ्रमात न राहता भारतीयांनी पुढील कार्यास लागले पाहिजे. पहिले महत्त्वाचे कार्य म्हणजे जपानमध्ये रंकोजी मंदिरात असलेली त्यांची रक्षा मोठ्या सन्मानाने भारतात आणली पाहिजे. दिल्लीच्या लाल किल्ल्यासमोर त्यांचे अतिभव्य स्मारक उभे केले पाहिजे. सत्ताधिष्ठित राजकारणाच्या वरचढपणामुळे भारताच्या या महान पुढाऱ्याच्या स्मारकाला बुद्धिपुरस्सर मागे ठेवले तर गेले नसेल ना, असे वाटल्याखेरीज राहत नाही. जपानमधील रंकोजी मंदिरात ठेवलेल्या नेताजींच्या रक्षेस १३ ऑक्टोबर १९५७ रोजी पं. जवाहरलाल नेहरू यांनी भेट दिली. या स्मारकाला श्रद्धांजली वाहताना पं. नेहरू लिहितात– 'I Pray that the Mission of Buddha will bring peace to Humanbeings' पण नेताजींच्याबद्दल त्यांनी काहीही लिहू नये हा केवढा दैवदुर्विलास! त्यानंतर ४ ऑक्टोबर १९५८ रोजी डॉ. राजेंद्रप्रसाद यांनी भेट दिली होती आणि २६ जून १९६९ रोजी श्रीमती इंदिरा गांधी यांनी भेट दिली होती. या सर्व नेत्यांना ती रक्षा नेताजींची असेलच कशावरून, असे तर वाटले नसेल ना?

नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्यावर इंग्रजीतून निरनिराळे रिपोर्टस, माहिती व चरित्र आणि राजकारण यांवरील एकूण ५२ पुस्तके असून मराठीत फक्त १० पुस्तके आहेत व तीही अत्यंत अपुरी आहेत. नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्यावर

मराठीतून एक समग्र व विस्तृत असा जीवनग्रंथ प्रसिद्ध होणे जरूर आहे; पण विचारवंतांना अद्यापही जाग आलेली दिसत नाही. हे एक निष्ठेचे काम आहे व त्याबरोबर खूप खर्चाचे पण आहे. तरीपण हा प्रयत्न झालाच पाहिजे.

मी हे पुस्तक नेताजींचा मृत्यू कोठे, केव्हा व कसा घडला या वादाकरता अनुवादित केले नसून, नेताजींचे पूर्व आशियातले महान कार्य मराठी जनतेपुढे यावे हा त्या मागील प्रधान हेतू आहे. मला शक्य झालेल्या भाषेत मी हे पुस्तक मुक्त अनुवादित केले आहे. असे करताना ज्या ठिकाणी अर्थबोध होणे कठीण वाटले त्या ठिकाणी अधिक शब्द वापरले आहेत. नकळत काही चुका राहून गेल्या असल्यास क्षमस्व. वाचकांनी प्रतिसाद द्यावा ही नम्र विनंती.

२३ जानेवारी १९७८
नेताजी सुभाष जयंती

*जयहिंद*

| | | |
|---|---|---|
| १ | सुभाषचंद्र बोस | १ |
| २ | भारतातील शेवटचे पर्व | ६ |
| ३ | नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या खंडातील परिस्थिती | ११ |
| ४ | जपानमध्ये आगमन | २४ |
| ५ | जपानची प्रतिक्रिया | ३३ |
| ६ | कार्याचा प्रचंड उठाव | ४१ |
| ७ | नेताजी म्हणजे एक प्रबंधच | ५३ |
| ८ | पहाट | ५८ |
| ९ | अरुणोदय | ६५ |
| १० | माध्यान्ह : चलो दिल्ली | ७८ |
| ११ | संध्याकाळ | ९९ |
| १२ | सूर्यास्त | १०६ |
| १३ | कभिन्न अंधार | १०८ |
| १४ | खजिना प्रकरण | १२५ |
| १५ | आझाद हिंद फौजेची कथा | १३० |
| १६ | आदरांजली | १३३ |
| १७ | निकटवर्तीयांच्या काही आठवणी | १३६ |

# एक / सुभाषचंद्र बोस

## व्यक्तिरेखा

सुभाषचंद्र बोस यांचा जन्म २३ जानेवारी १८९७ रोजी कटक येथे झाला. कुटुंबातले ते सहावे होते. त्यांना नऊ भाऊ व पाच बहिणी होत्या. वडील ॲडव्होकेट होते व ते एक नावाजलेले सरकारी वकील होते. आई गुणसंपन्न व हुशार होती. धार्मिकतेबरोबरच शिक्षणाची त्यांना आवड होती. वडील आपल्या व्यवसायात इतके गुंतलेले असावयाचे, की त्यांना आपल्या कुटुंबाकडे लक्ष द्यायला सवडच नसे आणि त्यामुळे त्यांच्या घरात थोडा असंतोषच असे.

मुलाचे पाय पाळण्यात दिसावेत त्याप्रमाणे आई-वडिलांना हा मुलगा पाळण्यात असतानाच मोठी आस्था वाटे. भारताच्या इतिहासात हा मुलगा आपले नाव अजरामर करील, असे अनामिक विचार त्यांच्या मनात येत असत. इतर सर्व भावंडांपेक्षा किंवा इतर शेजाऱ्या-पाजाऱ्यांच्या मुलांपेक्षा याच्यात निश्चित काहीतरी नवे व निराळे आहे, असे त्यांना वाटे.

बंगालमध्ये बोस कुटुंबाला फार मान होता व हे एक अमीर कुटुंब आहे असे सर्वांना वाटे. त्यांच्या नातलगांपैकी काही लोक नौदल व सैन्यात वरच्या हुद्द्यांवर होते. ब्रिटिश राजवट चालू झाल्यापासून त्यांच्या कुटुंबातली बरीच मंडळी वरच्या हुद्द्यावर चढली होती आणि त्यांनी आपली स्थिती फारच उत्तम केली होती.

वयाच्या पाचव्या वर्षापासून सुभाषचंद्र बोस कटक येथील इंग्रजी प्राथमिक शाळेत जाऊ लागले आणि हे सात वर्षांचे शिक्षण त्यांनी प्रत्येक वर्षी पहिल्या क्रमांकाने संपविले. तथापि या शालेय जीवनात त्यांना अनेक उद्दिष्टांची समर्पक उत्तरे मिळाली नाहीत. त्यांना केवळ ते भारतीय आहेत म्हणून 'स्पोर्टक्लब' मध्ये प्रवेश नाकारण्यात आला. युरोपियन अभ्यास-क्रमामध्ये 'स्पोर्ट क्लब' मध्ये प्रवेश असणे आवश्यक

होते, त्यामुळे ' युरोपियन स्कूल 'मध्ये त्यांना पुढील शिक्षणासाठी जाता आले नाही. त्याचप्रमाणे ते केवळ भारतीय आहेत, म्हणून त्यांना ' बॉईज व्हॉलंटरी कॉप्स 'मध्येही प्रवेश नाकारण्यात आला. इतकेच नव्हे, तर स्कॉलरशिपसाठी बाहेरून कोणत्याही परीक्षेस बसण्यास परवानगीही देण्यात आली नाही आणि म्हणूनच त्यांच्या बाल-मनावर भारतात निर्माण केलेल्या ' दोन जगांचा ' परिणाम झाला. त्यानंतर त्यांना भारतीय माध्यमिक विद्यालयात प्रवेश घेणे भाग पडले. या विद्यालयाच्या प्राचार्यांनी त्यांच्या मनात देशप्रेमाची ज्योत जागृत केली. जगात जर कोणती महत्त्वाची गोष्ट असेल, तर ती आपल्या मातृभूमीची सेवा करणे, ही होय. या ठिकाणी मिळालेल्या शिक्षणामुळे त्यांच्या मनात ' स्वातंत्र्याच्या चळवळीत आपण समर्पित व्हावे, ' असे प्रक्षोभक विचार निर्माण व्हावयास प्रारंभ झाला. स्वातंत्र्यप्रेमाच्या विचारांनी त्यांना इतके ग्रासले की शाळेचा अभ्यास, व्यायाम, खेळ यांकडे त्यांचे दुर्लक्ष होऊ लागले.

याच वेळी प्राचार्यांची अचानक दुसऱ्या शाळेकडे बदली झाली. या बदलीमुळे सुभाषचंद्र बोस यांना धक्काच बसला. थोर व पवित्र विचारांचे मार्गदर्शन करणारे त्यांचे गुरूच निघून गेले, त्यामुळे त्यांच्या मनाला तीव्र वेदना व दुःख झाले. व त्यांनी आपल्याला आमूलाग्र बदलून घेतले. आईवडिलांच्याबद्दल असलेला त्यांचा आज्ञाधारकपणाही पार बदलून गेला. आपल्या स्वतःच्या मनाप्रमाणे मार्ग काढावयाचा झाल्यास, आपण दंगेखोर झाले पाहिजे, असे त्यांना वाटू लागले. या सर्व वातावरण व परिस्थितीमुळे त्यांचे लक्ष अभ्यासातून उडाले. समवयस्क मुलांच्या बरोबर वाद-विवाद व चर्चा करण्यात त्यांचे मन रमू लागले. भटकण्यातही त्यांनी आपला वेळ घालवला. या काळातच स्वामी विवेकानंदांच्या वाङ्मयाचा त्यांच्या मनावर फार परिणाम झाला आणि विवेकानंदांचे वाङ्मय ते आवडीने वाचू लागले. यामुळे जीवना-कडे पहाण्याच्या त्यांच्या दृष्टिकोणात क्रांतिकारक बदल झाला. या सर्वांची परिणती म्हणजे मातृभूमीशी एकनिष्ठ राहाणे व मानवाच्या उत्क्रांतीसाठी झटणे हेच त्यांचे जीवन-उद्दिष्ट ठरून गेले. आध्यात्मिक आणि दिव्य जीवनानंद घ्यावयाचा झाला, तर स्वतः आत्मसंयमन करावयास शिकले पाहिजे. अध्यात्मासाठी त्यांच्या मनात निर्माण झालेले वादळ अशा प्रकारे शांत झाले. आपल्या जीवनाची परिपूर्ती मानवाच्या कल्याणासाठी व्हावी म्हणून त्यांनी आपल्या ऐहिक सुखाचा त्याग करण्याचे ठरविले. त्यांच्या माता-पित्यांनी त्यांच्यावर खूप दडपण आणण्याचा प्रयत्न केला; पण त्याचा प्रतिकार तितक्याच जिद्दीने सुभाषचंद्रांनी केला. अध्यात्मासाठी त्यांनी आपला बहुतेक वेळ, मातापित्यांचा विरोध असता घालविला आणि अखेर जीवनाची परिपूर्ती कशात असेल, तर मानवजातीच्या कल्याणासाठी कार्य करीत राहाणे यातच आहे, असे त्यांना वाटू लागले. स्वतःला अधिक ज्ञान प्राप्त करून घ्यावे म्हणून आपल्या विद्यार्थी मित्रांच्या बरोबर ते वादविवाद करीत. शालेय शिक्षणाबरोबरच त्यांनी स्वतः-

हून ग्रामीण जनतेची सेवा आरंभली. त्यात त्यांना अनेक गोष्टींचे ज्ञान होई आणि त्यामुळेच त्यांना आध्यात्मिक समाधान होत असे. आपल्या मित्रांनाही ते अध्यात्म केंद्रावर घेऊन जात असत. धर्म आणि राजकारण या दोन तत्वज्ञानांत त्यांना विशेष उत्सुकता होती. स्थानिक यात्रेत, जत्रेत ते जात व तेथे आलेल्या ग्रामीण लोकांची ओळख करून घेत. त्यामुळे मानवी स्वभावधर्माचे अनेक पैलू त्यांना दिसून येत असत. एखाद्या उच्च शैक्षणिक संस्थेत जाऊन त्यांनी जे शिक्षण घेतले असते, त्यापेक्षा मानवी जीवनाचे अधिक शिक्षण त्यांनी यातून मिळविले. त्याबरोबरच अनेक तीर्थ-यात्रा करून आपले जीवन हे एखाद्या ऋषीसारखे बनविले. एखाद्या धार्मिक भिक्षेकऱ्या-प्रमाणे वाटेवर जाता जाता जी भिक्षा मिळेल, त्यावरच उदरनिर्वाह करणे, उघड्या-वरच झोपणे, याबरोबरच अध्यात्माची वाढ होण्यासाठी काही बंधनेही त्यांनी आपल्यावर लादून घेतली होती. त्यांची नैमित्तिक वागणूकही त्यांच्या मातापित्यांच्या चिंतेचीच एक बाब होऊन बसली. त्यांची लहान भावंडेही धार्मिक कृत्यात गुरफटून राहू लागली आणि त्यामुळे त्यांचे शाळेतील अभ्यासाकडे दुर्लक्ष होऊ लागले. त्यांच्या या चमत्कारिक वागणुकीमुळे त्यांच्या पालकांनी कदाचित ते या वातावरणातून गेल्या मुळे, त्यांच्या वागण्यात सुधारणा होईल म्हणून, त्यांना कलकत्त्याला पाठविण्याचा निर्णय घेतला.

सुभाषचंद्र कलकत्त्याला गेले त्यावेळी त्यांचे वय अवघे पंधरा वर्षाचे होते. १९१३ साली ते कलकत्ता विद्यापीठाची प्रवेश परीक्षा सर्व उमेदवारांत दुसऱ्या क्रमांकाने उत्तीर्ण झाले. यामुळे त्यांच्या पालकांना फारच आनंद झाला आणि त्यांनी त्यांना कलकत्त्याला ठेवण्याचे निश्चित केले. सुभाषचंद्र बोसांना अध्यात्मसुखाचा अत्यानंद उपभोगावयाचा होता व ते त्या मार्गाने जाण्यासाठी पुन्हा प्रवृत्त झाले. मानवाच्या विकासासाठी आपले सुंदर जीवन अर्पित करण्याची त्यांची प्रबळ इच्छा पुनःपुन्हा त्यांच्या मनात उफाळून येत होती. मानवी जीवन हे काही विशिष्ट कर्तव्याकरिता आहे असे त्यांना वाटे व त्याच्या पूर्ततेसाठी मानवी शरीर व मन सदैव कोणत्याही क्षणी शिस्तीने तयार असले पाहिजे, अशी त्यांची मनोधारणा होती. नंतरच्या आयुष्यातही त्यांच्या अंगी असलेल्या या शिस्तीचा व दृढनिश्चयाचा चांगला उपयोग झाला. त्यांचे कॉलेज हे सरकारी कॉलेज होते. तथापि एक ध्येयवादी तरुण म्हणून ते ठळक-पणे सर्वत्र ओळखले जात आणि अशा ध्येयवादी तरुणांच्यामध्ये ते आपले प्रमेय सोडवण्यात रंगून जात. त्यांची सर्व वागणूक 'सुधारक व ध्येयवादी' असल्याने एकदा त्यांच्या निवासस्थानाची पोलिसांनी झडती घेतली. कॉलेजच्या सुट्टीत ते आपला वेळ समाजकार्यात घालवीत. जसजसे दिवस जाऊ लागले तसतसे ते कट्टर 'सुधारक व ध्येयवादी' बनू लागले, ते वर्गात अभ्यासू विद्यार्थी म्हणून ओळखले जात नसत. तथापि वर्गात शिकविणारे प्राध्यापक या विद्यार्थ्यात काहीतरी चमक असल्याचे मान्य

करीत व त्याची त्यांच्यावर छाप पडे. 'सुधारणा' वाद्यांच्या चळवळीसाठी सर्व विद्यार्थ्यांना एकत्र करून ते त्यांचे पुढारी होत. ते क्रियाशील व्यक्तिमत्त्वाचे होते.

जवळच्याच एका खेडेगावी कॉलरा सुरू झाला तेव्हा त्यांनी स्वतःच एक उपचार केंद्र उघडून ते रुग्णसेवा करण्यासाठी गेले. एकदा तर ते कोठेतरी नाहीसे झाले. पालकांनी तक्रार केल्यावर त्यांना शोधण्यासाठी खास पथक पाठवण्यात आले. त्यानंतर ते जे परत आले, ते विषमज्वराने आजारी पडले.

याच वेळी पहिल्या महायुद्धाची सुरुवात झाली आणि परिस्थितीत खूपच बदल झाला. ब्रिटिशांच्या भारताविषयीच्या धोरणातला फसवेपणा त्यांना जाणवू लागला. भारतीय लोकांचे दुःख आणि दारिद्र्य पाहून त्यांना फार वाईट वाटे. दररोजच्या जीवनातही भारतीयांना दुज्याभावाने वागविले जात होते. ब्रिटिश सरकार भारतीय जनतेशी अन्यायाने व बेकायदेशीरपणे वागत होते.

पहिल्या व दुसऱ्या महायुद्धापासून त्यांना असे दिसून आले, की कोणतेही राष्ट्र योग्य त्या शस्त्रसामग्रीशिवाय आपल्या स्वातंत्र्याचे रक्षण करू शकत नाही किंवा स्वातंत्र्य मिळवू शकत नाही. प्रत्येक चळवळीत त्यांच्या नेतृत्वामुळे व कर्तव्यदक्षतेमुळे त्यांना पुढारी होण्याचा मान मिळत असे. प्रत्येक चळवळीत नेतृत्वासाठी त्यांची निवड होत असे. विद्यार्थी संपाच्यावेळीही त्यांना त्याचे नेतृत्व घेणे भाग पडले. विद्यार्थ्यांनी संप करताच कॉलेज प्रमुखांनी कॉलेजला कुलपे ठोकली व सुभाषचंद्रांचे नाव कॉलेजमधून काढून टाकले. त्यांच्यासाठी त्यांच्या थोरल्या बंधूंनी विद्यापीठाच्या अधिकाऱ्यांच्याकडे जाऊन खूप रदबदली केली. त्यामुळे त्यांना पुन्हा कॉलेजमध्ये घेण्यात आले. या सर्वांचा परिणाम त्यांच्या मनावर होऊन ते एक गंभीर प्रवृत्तीचे विद्यार्थीजीवन जगू लागले. काही काळ ते विद्यापीठ युनिटच्या इंडियन टेरिटोरिअल आर्मीमध्ये सामील झाले. त्या ठिकाणी त्यांना खास वागणूक देण्यात आल्यामुळे त्यांच्या मनावर परिणाम झाला. या लष्करी शिक्षणाचा उपयोग पुढे ते आय. एन. ए. चे कमांडर झाल्यावर झाला.

१९१९ साली ते तत्त्वज्ञान हा विषय घेऊन उच्च श्रेणीत कला शाखेचे पदवीधर झाले. त्या बरोबरच त्यांनी प्रायोगिक तर्कशास्त्राची पदवीही मिळवली. एकदा त्यांचे वडील कलकत्त्याला आले आणि त्यांनी त्यांना ब्रिटनमध्ये जाऊन 'इंडियन सिव्हिल सर्व्हिस' परीक्षेस बसण्याबद्दल आग्रह केला. ही परीक्षा पास होणे म्हणजे तरुणांच्या जीवनात फार मोठे यश मिळविण्यासारखे होते. वडिलांच्या म्हणण्याप्रमाणे त्यांनी ब्रिटनला जाण्याचे ठरविले व ते १५ सप्टेंबर १९१९ रोजी ब्रिटनला गेले. परीक्षेला फक्त आठच महिने अवकाश होता. पाच आठवड्यानंतर ते ब्रिटनला जाऊन पोहोचले व त्यांनी केंब्रिज युनिव्हर्सिटीत यशस्वीपणे प्रवेश मिळविला. नोव्हेंबरच्या पहिल्या आठवड्यापासून ते आपले धडे घेऊ लागले. ते भारतातून जाण्याच्या सुमारास

जालियनवाला बागेचे हत्याकांड झाले होते व संपूर्ण पंजाब लष्कराच्या ताब्यात देऊन 'मार्शल लॉ' पुकारण्यात आला होता. सर्वत्र झडतीचे सत्र चालू झाले. बंगालमध्ये अफवा उठू लागल्या, की लाहोर आणि अमृतसरमध्ये महाभयंकर प्रकार घडले आहेत. पंजाबमध्ये घडलेल्या घटनांबाबत गुप्तता ठेवण्यात आली होती, लोकांना काहीही समजू शकत नव्हते. अशा गंभीर परिस्थितीत व द्विधा मनःस्थितीत त्यांनी भारत सोडला होता.

त्यांच्या अभ्यासाचे विषय होते;—सिव्हिल सर्व्हिस रुल्स, इंग्लिश कांपोझिशन, तत्त्वज्ञान, ब्रिटिश कायदा, पोलिटिकल सायन्स, आधुनिक युरोपचा इतिहास, अर्थशास्त्र व भूगोल. जुलै १९२० मध्ये त्यांची परीक्षा झाली. ते उत्तम तऱ्हेने पास झाले इतकेच नव्हे, तर पहिल्या चार नंबरांमध्ये त्यांचा नंबर होता. अत्यंत सन्मानाने ते ही परीक्षा उत्तीर्ण झाले. परीक्षा पास झाल्यानंतर पुढील मार्गाची निवड करणे, हा अत्यंत अवघड प्रश्न होता; पण त्यांनी निर्धाराने सरकारी नोकरी न करण्याचे ठरविले व राजकारणातच पडण्याचे निश्चित केले.

१६ जुलै १९२१ रोजी ते केंब्रिज युनिव्हर्सिटीचे पदवीधर होऊन परीक्षेत लौकिक यश मिळवून मुंबईस परत आले. या वेळी त्यांचे वय अवघे चोवीस वर्षांचे होते. बोटीवरून उतरताच ते तडक महात्मा गांधीच्या दर्शनासाठी त्यांच्या निवासस्थानी गेले. सुभाषचंद्र बोस यांनी म. गांधींना अनेक प्रश्न विचारले. वयाच्या पंचविसाव्या वर्षापासून त्यांची प्रत्यक्षपणे राष्ट्रसेवा चालू झाली. सरकारी मोठ्या हुद्द्यावर लाथ मारुन त्यांनी देशसेवेला स्वतःला वाहून घेतले. त्यांचे त्या पुढील राजकारणातील जीवन हे एखाद्या वादळाप्रमाणे प्रवाहित झाले ते कलकत्त्याचे मेयर झाले आणि त्यानंतर त्यांनी 'इंडियन नॅशनल काँग्रेस'चे अध्यक्षपदही भूषविले. त्याबरोबरच देशासाठी त्यांनी तुरुंगवासही भोगला. भारतातील सर्वश्रेष्ठ देशभक्त म्हणून ते हिंदी जनांच्या हृदयसिंहासनावर विराजमान झाले. फोर्मोसा येथील थंफीच्या अपघातात त्यांना वीरमरण आले व त्यांनी आपली राष्ट्रसेवा समर्पित केली.

# दोन / भारतातील शेवटचे पर्व

## भारताबाहेरून चळवळ

दुसऱ्या महायुद्धाच्या सुरुवातीसच भारतीय काँग्रेसने पुनश्च भारताच्या संपूर्ण स्वातंत्र्याची मागणी केली. यापूर्वी पहिल्या महायुद्धाच्या वेळी ब्रिटनने या मागणीची परिपूर्ती केली नाही, त्या वेळी ब्रिटनला भारतातून सैन्याचा मोठा पुरवठा झाला होता व त्या बदल्यात त्याच वेळी ब्रिटनने भारताला स्वातंत्र्य देण्याची मागणी मान्य केली होती; परंतु पुढे तिला वाटाण्याच्या अक्षता लावल्या. त्यानंतर भारतीय काँग्रेसने स्वातंत्र्याची सतत मागणी केली असता तिच्याकडे समजून-उमजून दुर्लक्ष केले. भारतातील शांततावादी नेते मोहनदास करमचंद गांधी यांनी ब्रिटनच्या या विश्वासघातकी धोरणाचा अनेक वेळा कठोरपणे निषेध केला होता.

दि. १७ आक्टोबर १९३९ रोजी गव्हर्नर जनरल लिनलिथगो यांनी एक 'श्वेत पत्रिका' प्रसिद्ध करून "भाकरी मागणाऱ्याला दगड देऊ केले." श्वेतपत्रिकेचा हा फोलपणा पाहून २२ ऑक्टोबरला काँग्रेसने एक ठराव करून सर्व प्रांतांतल्या मंत्रिमंडळावर असलेल्या काँग्रेसच्या लोकांनी आपल्या जागेचे तत्काळ राजीनामे देण्याचा आदेश दिला आणि पाठोपाठ ब्रिटिश सरकारविरुद्ध सर्वत्र चळवळीचा संदेश देण्यात आला. काँग्रेसच्या आदेशाप्रमाणे मद्रास मंत्रिमंडळातील, मध्यवर्ती मंत्रिमंडळातील आणि मुंबई प्रांताच्या मंत्रिमंडळातील काँग्रेस सदस्यांनी आपले राजीनामे तत्काळ सादर केले.

१ डिसेंबर रोजी काँग्रेस पक्षाचे नेते म. गांधी, डॉ. राजेंद्र प्रसाद आणि मुंबई मुस्लिम लीगचे नेते बॅ. जिना या प्रमुख त्रयींची खास बैठक भरून देशातल्या सर्व नागरिकांनी ब्रिटिश सरकारविरुद्ध लढा देण्यास सज्ज व्हावे असे ठरविण्यात आले. याच वेळी काँग्रेस पक्षात मतभेद होऊन 'जहाल' व 'मवाळ' असे दोन तट पडले.

मवाळांनी ब्रिटिश सरकारबरोबर शांततामय व अहिंसक मार्गांनी वाटाघाटी कराव्यात, असा आग्रह धरला होता. जहाल मतवाद्यांत पं. नेहरू व सुभाषचंद्र बोस होते. मवाळांच्या 'वाटाघाटीच्या' राजकारणावर सुभाषचंद्र बोस सतत कडक टीका करीत असत. गोगलगाईच्या चालीचे राजकारण नेताजींना मुळीच पसंत नव्हते. अशा प्रकारच्या राजकारणातून ब्रिटिश सत्तेवर काहीही परिणाम होणार नाही, असे त्यांचे मत होते. ब्रिटिश धोरणाविरुद्ध ते अत्यंत जहाल बोलत असत.

सन १९३८ व ३९ सालांत सुभाषचंद्र बोस काँग्रेसच्या अध्यक्षपदावर असताना त्या जागेचा त्यांनी राजीनामा द्यावा म्हणून काँग्रेसच्या प्रमुख नेत्यांनी सक्ती केली आणि त्यांच्यावर शिस्तभंगाचा ठराव पास करून त्यांनी तीन वर्षे कोणत्याही सार्वजनिक राजकारणात भाग घेऊ नये, असे ठरविण्यात आले.

नेताजींनी अधिक वेळ न घालविता जहाल मतवाद्यांची आघाडी ताबडतोब स्थापन केली. काँग्रेसमधल्या तरुण लोकांना आवाहन करून भारताला तत्काळ स्वातंत्र्य मिळाले पाहिजे, म्हणून चळवळीस प्रारंभ केला.

हिंदू आणि मुसलमान जनतेच्या मागणीनुसार ६ जून १९४० रोजी नेताजींनी एक आश्चर्यकारक घोषणा केली, की प्रत्येक प्रांतात एक भारतीय स्वतंत्र सरकार स्थापन करण्यात येत असून, या सरकारला सार्वभौमत्वाचे अधिकार असतील. या घोषणेमुळे मवाळांना आणि ब्रिटिश सरकारला भयंकर गोंधळात टाकले. ब्रिटिश सरकारने कठोर धोरण स्वीकारून दडपशाही करण्यास सुरुवात केली आणि याचाच परिणाम म्हणून एकापाठोपाठ अनेक लोकनेत्यांची धरपकड करण्यास सुरुवात केली. २ जुलै १९४० रोजी नेताजींना त्यांच्या घरीच अटक करून तुरुंगात पाठवण्यात आले.

काँग्रेस अध्यक्ष मौलाना अबुलकलम आझाद यांना १९४१ च्या जानेवारी महिन्यात अटक करून, त्यांना अठरा महिन्यांची शिक्षा ठोठावून नैनीच्या तुरुंगात डांबून टाकले. या दरम्यान हजारो लोकांनी कायदेभंगाच्या चळवळीस आरंभ केल्यामुळे सरकारला त्यांना अटक करणे भाग पडले. मुंबईत आणि दिल्लीमध्ये दहशतवाद्यांच्या चळवळीस ऊत आला. याच वेळी नेताजींनी तुरुंगातच उपोषणास सुरुवात केली आणि याचा परिणाम म्हणून त्यांची तब्येत फार खालावून गेली. मग सरकारवर त्याचा बरा-वाईट परिणाम होऊ नये, म्हणून त्यांना त्यांच्या राहत्या घरातच नजरकैदेत नेऊन ठेवण्यात आले.

या घरच्या बंदिवासातून आकस्मिक सुटून जाण्याची एक योजना सुभाषचंद्रांनी जानेवारी महिन्यात तयार केली आणि त्याप्रमाणे ते एके दिवशी निसटून भूमिगत झाले. त्यांच्या नाहीसे होण्यामुळे ब्रिटिश अधिकारी अवाक् झाले. त्यांचा शोध घेण्यासाठी त्यांनी आपल्या जिवनाचे रान केले; पण नेताजींना हुडकून काढण्यात त्यांना यश मिळाले नाही- नेताजी यशस्वीपणे ताबडतोब भारताबाहेर पडले आणि अफगाणी-

स्थानामधून, रशियन हद्दीतून त्यांनी अखेर जर्मनीमध्ये प्रवेश केला. या अकरा महिने मुदतीत ब्रिटिशांना त्यांच्याबद्दल काहीच समजू शकले नाही. नोव्हेंबर १९४१ मध्ये मात्र, नेताजी बाहेरच्या देशात गेल्याचे समजताच त्यांना हात चोळीत स्वस्थ बसावे लागले. भारताला स्वातंत्र्य मिळवून देण्याकरिता नेताजी स्वयंसैनिक जमा करीत आहेत व ब्रिटिश सरकार-विरुद्ध प्रचार करण्याकरिता ते शत्रुराष्ट्राची मदत घेत आहेत, अशा बातम्या सर्वत्र फैलावल्या.

जपानमध्ये असलेले श्री. रासबिहारी बोस या बातमीने आनंदून गेले. आपल्या भावना व्यक्त करताना ते म्हणाले, "शस्त्रबळाशिवाय भारताला स्वातंत्र्य मिळणे शक्य नाही. माझ्या मनातल्या कल्पनेप्रमाणेच नेताजी कार्य करीत आहेत, याचा मला हर्ष होत आहे." त्यांनी ताबडतोब नेताजींना तार पाठवून "जपानमध्ये असणाऱ्या सर्व भारतीय लोकांचा आपल्याला व आपल्या कार्याला पाठिंबा आहे." असे आपले मनोगत व्यक्त केले.

१९४१ मध्ये पॅसिफिक युद्धास प्रारंभ होण्यापूर्वीच ब्रिटिश अधिकाऱ्यांनी आपले दडपशाहीचे धोरण थोडे शिथिल केले. असहकाराच्या चळवळीत पकडलेल्या ८००० लोकांपैकी ५०० लोकांची त्यांनी मुक्तता केली. त्यांमध्ये पं. नेहरू, आझाद वगैरेंचा समावेश होता. तथापि एकंदर भारताची परिस्थिती चिंताजनकच होती आणि याच वेळी बंगालमध्ये मोठा दुष्काळ पडला. सर्वत्र धान्य टंचाई निर्माण झाली. सर्व देशभर हाहाकार उडाला. महागाई एकदम वाढली आणि त्यामुळे मजुरांनी मजुरी वाढविण्यासाठी संप करण्यास सुरुवात केली. लोकांची शारीरिक क्षमता ही इतकी विकोपास गेली, की शेतात धान्य पेरून ते उगवून येईपर्यंतचे कष्टही त्यांचेकडून होईनात. त्यामुळे समाजात असंतोषाची तीव्र लाट पसरू लागली. संत्रस्त ब्रिटिश सरकारने भारतीय नेत्यांबरोबर वाटाघाटी करण्यासाठी सर स्टॅफर्ड क्रिप्स यांना भारतात पाठविले व वाटाघाटी चालू ठेवल्या. भारताची ही परिस्थिती पाहून त्या वेळी जर्मनीमध्ये असलेले सुभाषचंद्र बोस यांनी ११ मार्च रोजी भारतीय लोकांना उद्देशून रेडिओवरून भाषण करून फोल आश्वासन देणाऱ्या ब्रिटिश सरकारचा तीव्र निषेध केला व भारतीय जनतेला सावध राहण्याचा इशारा केला. ते आपल्या भाषणात म्हणाले की, ब्रिटिश साम्राज्याचा संपूर्ण नाश झाल्यामुळेच भारताला स्वातंत्र्य मिळेल. ब्रिटिशांच्या विजयामुळे भारताची गुलामगिरी अधिक काळ राहील, हे भारतीय लोकांनी लक्षात ठेवले पाहिजे. जे भारतीय ब्रिटिशांशी सहकार्य करून कामे करीत आहेत, ते देशद्रोही आहेत. ते आपल्या राष्ट्राची हानी करीत आहेत. भारतीय लोक केवळ ब्रिटिश सत्तेबरोबर झुंज घेतील असे नव्हे, तर ब्रिटिश साम्राज्यशाहीच्या पाठीराख्यांबरोबरही भारतीय जनता लढ्यास उभी राहील. मित्रहो! ज्या ब्रिटिश राजवटीचा या पृथ्वीतलावरून लवकरात लवकर अंत होणार आहे, त्या ब्रिटिशांच्या वाटाघाटीवर विश्वास

ठेवण्यात काय अर्थ आहे ? प्रत्येक भारतवासीयाला ही गोष्ट समजली पाहिजे. ब्रिटिश प्रधानमंत्री मि. चर्चिल यांनी पार्लमेंटपुढे केलेल्या आपल्या भाषणात ते म्हणाले आहेत, " हे युद्ध संपताच भारताला लौकरात लौकर वसाहतीचे स्वराज्य देऊ. " या घोषणेनंतर मिस्टर क्रिप्सना भारतात पाठवून येथील राजकीय परिस्थिती व सर्व पक्षांची दिलजमाई होते अगर कसे, ते पाहण्याचे त्यांनी ठरविले. भारतीय लोकांना आता निश्चित समजून चुकले आहे, की वसाहतीचे स्वराज्य देण्याची ब्रिटिशांची जी इच्छा आहे त्यामध्ये काही अर्थ नाही. ही एक भ्रामक कल्पना आहे. भारतीयांना माहीत आहे, की ब्रिटिश सरकार अनेक तांत्रिक अडचणी निर्माण करून आपले धोरण तसेच पुढे चालू ठेवीत आहे व आपले अस्तित्व अबाधित ठेवीत आहे. आपल्या ' फोडा व झोडा ' तत्त्वाचा ते अगदी पद्धतशीर अवलंब करून, भारतीय जनतेला आहे त्याच स्थितीत ठेवीत आहे. मि. चर्चिलना हे निश्चितपणे समजून चुकले आहे, की एखादा चतकोर भारतापुढे टाकून त्याला आपल्या काबूत ठेवता येणार नाही. अनेक साम्राज्ये लयाला गेली त्याप्रमाणे ब्रिटिश साम्राज्यही लयाला जाणारच आहे. ब्रिटिशांच्या ऱ्हासांतूनच भारताचा उदय होईल आणि म्हणूनच क्रिप्स अगर कोणत्याही ब्रिटिश राजकीय मुत्सद्द्याला भारतात ब्रिटिशांचा पाया स्थिर करता येणे शक्य नाही. "

जर्मनीमधून ११ मार्चला झालेल्या सुभाषचंद्र बोस यांच्या भाषणानंतर लगेच दोन दिवसांनी जोखा (टोकिओ) रेडिओ स्टेशन वरून " विशाल पूर्व एशिया"चे ' भारतीय जनतेचे प्रतिनिधी ' म्हणून श्री. रासबिहारी बोस यांनी त्यास पूरक असे भाषण केले.

भारताच्या स्वातंत्र्याकरिता भारतीयांनी देशभक्त बनून आपल्या प्रिय मातृभूमीसाठी कोणत्याही त्यागास तयार व्हावे, असे त्यांनी आपल्या भाषणात आवाहन केले. लगेच दोन महिन्यांनंतर बँकॉकमध्ये पूर्व एशियाच्या प्रतिनिधींची बैठक भरून श्री. रास बिहारी बोस यांना ' इंडियन इंडिपेंडेंटस लीग 'चे अध्यक्ष म्हणून घेण्यात आले. जपानमधील भारतीय प्रतिनिधी श्री. सह्या यांचे मुख्य भाषण होते. मलायामधील भारतीय प्रतिनिधी श्री. राघवन, कॅ. मोहनसिंग, सैगल आणि ले. क. गिल हे आझाद हिंद फौजेचे (Indian National Army) प्रतिनिधी म्हणून या सभेस उपस्थित होते. त्यांच्या भावनापूर्ण भाषणानंतर या सभेस निरनिराळया परराष्ट्र प्रतिनिधींच्या कार्यालयांकडून आलेले अभिनंदनाचे संदेश, त्याचप्रमाणे जपान सरकारचे मुख्य अधिकारी, रोममधील इंडियन फ्रेंडशिप असोसिएशनचे सेक्रेटरी जनरल मि. शिडये यांचे संदेश, तसेच सुभाषचंद्र बोस यांचा बर्लिनमधून आलेला संदेश, असे सर्वांचे संदेश वाचून दाखवण्यात आले. सुभाषचंद्र बोस आपल्या संदेशात म्हणतात, "इंडियन इंडिपेंडट्स लीग ( I.I.L. ) ची स्थापना करून त्याच्या अध्यक्षपदी देशभक्त रासबिहारी बोस यांची नियुक्ती झाल्याने आणि त्याचप्रमाणे या लीगची स्थापना सर्व क्रांतिकारक देशभक्तांनी एकत्र येऊन केल्यामुळे मला फार आनंद झाला. दुर्दैवाने या सभेस मी

प्रत्यक्ष उपस्थित राहू शकत नाही; तथापि मी वैयक्तिक व इंडियन इंडिपेंडन्स लीगच्या युरोप शाखेतर्फे साभिनंदन सदिच्छा व्यक्त करीत आहे. माझ्या अठरा महिने भारता-बाहेरील वास्तव्यात मला असे दिसून आले आहे, की ब्रिटिश साम्राज्यशाहीच्या विरोधी लढ्यात जपान, जर्मनी आणि इटली हे आमचे सहकारी मित्र आहेत; तथापि भारताचे स्वातंत्र्य भारतीय जनतेनेच मिळविले पाहिजे. आमच्या स्वातंत्र्यलढ्यात शेवटच्या क्षणी आम्हास शस्त्र उचलावे लागेल, असे वाटते आणि ही शेवटची वेळ येईल, त्या वेळी मला भारतात जाण्यापासून कोणीही अडवू शकणार नाही. माझी निश्चित खात्री आहे, की या युद्धात भारत स्वातंत्र्य मिळविल्याखेरीज राहणार नाही. भारताचे स्वातंत्र्य म्हणजे ब्रिटिश व अमेरिकन साम्राज्यशाहीचा अंत होय आणि हेच ध्येय जपानच्या सशस्त्र सैन्याचे आहे. आपल्या सभेचे उद्देश सफल होवोत म्हणून सदिच्छा व्यक्त करून, ही सभा आपल्या स्वातंत्र्य मार्गावरील एक प्रगति-दर्शक स्मारक व्हावे अशी इच्छा व्यक्त करतो."

नेताजींचा संदेश वाचून होताच हॉलमध्ये जमलेल्या शेकडो लोकांनी 'भारत चिरायू होवो !' 'इन्किलाब झिंदाबाद' अशा घोषणा करून हॉल दुमदुमून सोडला.

पूर्व आशियामध्ये राहणाऱ्या दोन लक्ष भारतीय जनतेच्या उत्स्फूर्त भावना बँकॉकच्या या सभेत व्यक्त होत होत्या आणि त्यांच्या मनामध्ये भारताच्या स्वातंत्र्याची ज्योत प्रज्वलित होत होती. या सभेमध्ये पास झालेल्या ठरावाप्रमाणे 'इंडियन इन्-डिपेंडन्स लीग' चांगली संघटित झाली आणि लगेच एक कृतिसमिती नेमली गेली, त्याचप्रमाणे प्रातिनिधिक कमेटी, स्थानिक कमेट्या आणि शाखा स्थापण्यात आल्या. प्रतिनिधिमंडळाने एक विधिमंडळ नेमून त्यामध्ये ४० लोकांना प्रतिनिधित्व देण्यात आले आणि त्याच्या शाखा जपान, फिलिपाईन्स, थायलंड, पूर्व ब्रह्मदेश, मलाया, फ्रेंच-इंडोचायना, शांघाय, हॅांगकॉंग, कॅन्टोन, ॲमॉय आणि अंदमान या देशांत सुरू करण्यात आल्या. त्याचबरोबर 'आझाद हिंद फौजे'चेही प्रतिनिधी नियुक्त करण्यात आले. बँकॉकला तात्पुरते मुख्य ठाणे ठेवण्यात आले. बँकॉकमधून आय. आय.एल. ने रेडिओद्वारा भारतावर सतत प्रचार करण्याचे सत्र चालू ठेवले. ब्रह्मदेशातल्या जपानच्या कारवाईबरोबर आय. आय. एल. चे मुख्य ठाणे सिंगापूरला नेले गेले.

# तीन / नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या आगमनापूर्वी दक्षिणपूर्व आशिया खंडातील परिस्थिती

सिनो-जपान यांच्या मधील शत्रुत्व नाहीसे होत गेल्यानंतर ब्रिटन व संयुक्त अमेरिकेबरोबरचे जपानचे संबंध दिवसेंदिवस अधिकच गुंतागुंतीचे होऊ लागले. भारताबाहेर राहणाऱ्या भारतीयांच्या चळवळीकडे जपानी अधिकारी खास लक्ष देऊ लागले. त्या वेळी, लांबून त्यांच्या चळवळीला साहाय्य करणे अवघड होत असल्यामुळे यासंबंधी निश्चित असे काही खास धोरण व कार्यक्रम ठरविणे जरुरीचे झाले.

डिसेंबर १९४० मध्ये एके दिवशी कोबे या ठिकाणी गुप्तपणे तिघा भारतीयांना आणण्यात आले. या भारतीयांनी ब्रिटिशांविरुद्ध काही कारवाई केल्यामुळे त्यांना हाँगकाँगच्या तुरुंगात डांबण्यात आले होते; पण तेथून ते पळून जाऊन कॅन्टोनमधील जपानी सैन्याच्या आश्रयाला आले होते. मलाया, बर्लिन व भारतात ब्रिटिशांच्या विरुद्ध भूमिगत उठाव करणाऱ्या सहक्रांतिकारकांबरोबर त्यांना संबंध जोडावयाचा होता. जपानचे ' इंपीरिअल जनरल हेडक्वार्टर्स ' यांनी त्यांच्या म्हणण्याला मान्यता देऊन त्यांना योग्य ती मदत करण्यासाठी एस. एस. मिट्स्युयामा-मारू यांच्याबरोबर बँकॉकला पाठविण्यात आले. तेथील जपानी अधिकाऱ्यांनी त्यांच्याशी विचार विनिमय करून त्यांना पाहिजे ती मदत देण्याचे मान्य केले. यामुळे या क्रांतिकारकांना फारच आनंद झाला. क्रांतिकार्यासाठी बाहेरच्या देशात जात असता वाटेत त्यांना ब्रिटिश किंवा थाई सैन्याने पकडले, तरी ते जपानी अधिकारी धोक्यात येतील असे काहीही सांगणार नाहीत; प्रसंग फारच बिकट आला तर ते स्वतः आत्महत्या करून घेतील, अशी त्यांच्याकडून प्रतिज्ञापूर्वक खात्री करून घेण्यात आली. बँकॉकमध्ये ज्यावेळी त्यांना पाठविण्यात आले होते, त्या वेळी ' थामुरा ' या जपानी सेनाधिकाऱ्याने त्यांचे स्वागत करून त्यांना चांगली वागणूक दिली व त्यांचा विश्वास संपादन केला. भारताच्या स्वातंत्र्यासाठी चाललेल्या भूमिगत चळवळीच्या संघटनेस बँकॉकमधून सर्व प्रकारचे साहाय्य करण्याचे ठरविण्यात आले. या संघटनेस ' आय. आय. एल. ' असे

संबोधण्यात येत होते. या संघटनेचे प्रमुख अमरसिंग होते व त्यांचे मदतनीस म्हणून प्रीतमसिंग हे काम पाहत होते. आय. आय. एल. ही संघटना 'भारताची मुक्ती व स्वातंत्र्य' याकरिता स्थापन केली गेली होती. हाँगकाँग, शांघाय, टोकिओ व बर्लिन या प्रदेशांमध्ये अशा विचारसरणीचे लोक एकत्र येऊन ही संस्था चालवीत होते. लवकरच बँकॉकला आलेले हे तिघे देशभक्त आपल्या कार्यासाठी निघून गेले.

प्रीतमसिंग यांनी थामुराची भेट घेतली. प्रीतमसिंग हे एखाद्या भव्य प्रीस्टसारखे दिसत. त्यांच्या काळ्याभोर मागे वळलेल्या केसांवर पांढरा पंजाबी फेटा फारच सुंदर दिसे. त्यांचा हा ठसा जपानच्या सैन्याधिकाऱ्यांवर ते एक आय. आय. एल. चे प्रतिनिधी म्हणून लक्षात राहिला. त्यानंतर थामुरा हे अनेक वेळा प्रीतमसिंग व अमरसिंग यांना भेटत असत. पुढे आंतरराष्ट्रीय परिस्थिती गंभीर होऊ लागल्यामुळे त्यांच्या भेटी गुप्तपणे होत व त्यांचे बोलणेही गुप्त ठेवले जाई. वारंवार होणाऱ्या गुप्त बैठकीत जपानी अधिकाऱ्यांनी आय. आय. एल. या संघटनेचे टोकिओ, हाँगकाँग, दक्षिण थायलंड, मलाया, भारत आणि बर्लिन या ठिकाणी पसरलेले आपले जाळे खंबीरपणे विणून तयार ठेवले होते. प्रसंग विशेषी या संघटनेचे संघटक आपली ताकद दाखवू शकत होते. या संघटनेमार्फत जपानी अधिकाऱ्यांना भारत व मलायामधील सैनिकी हालचालींची संपूर्ण माहिती मिळू शकत होती. वेळोवेळी होणाऱ्या जपानी अधिकाऱ्यांच्या बैठकीवरून प्रीतमसिंग व अमरसिंग यांना पुढील उज्ज्वल भवितव्याचा पडताळा येत होता आणि जसजसे दिवस जात होते तसतशी जपान व आय. आय. एल. यांच्या मित्रत्वात अधिक दृढता येत होती.

मध्यंतरीच्या काळात सुभाषचंद्र बोस भारतातून परदेशात ब्रिटिशांना चुकवून गुप्तपणे निघून गेल्याची बातमी जनतेस समजताच ती आश्चर्यचकित व आनंदित झाली. बोस यांच्या पलायनाची बातमी 'इंपीरिअल जनरल हेडक्वार्टर्स' यांना समजताच त्यांनी त्या बातमीची सत्य परिस्थिती समजावी म्हणून आय. आय. एल. च्या प्रमुखांबरोबर बोलणी केली. ही जुलै १९४१ मधली घटना आहे. याच वेळी जपान सरकारने आपल्या बर्लिनमधील प्रतिनिधीला तार पाठवून तेथील भारताच्या रहिवाश्याच्या हालचालीवर लक्ष ठेवण्यास सूचना दिल्या.

मध्यंतरी दक्षिणपूर्व आशियातील परिस्थिती फारच बिकट व तंग होऊन राहिली. ऑगस्टमध्ये ब्रिटन, संयुक्तराष्ट्र आणि हॉलंड यांनी दक्षिण इंडोचायनामध्ये जपानच्या चढाईला अत्यंत प्रखरतेने प्रतिकार केला. या परिस्थितीवर तत्काळ मात करण्याकरिता जपानला काही तरी मार्ग काढणे भाग होते. सप्टेंबरमध्ये 'इंपीरिअल जनरल हेडक्वार्टर्स्' यांनी जपान व ब्रिटनमध्ये निर्माण झालेल्या तीव्र युद्धावर उपाययोजना करण्यासाठी हुशार, तर्कतज्ज्ञ व युद्धतज्ज्ञ अधिकाऱ्यांची एक तुकडी बँकॉकला थामुरा यांच्याबरोबर काम करण्याकरिता पाठवली. या तुकडीचे नेतृत्व मेजर फूजीवारा

करीत होते. त्यांच्या हाताखाली पाच ते सहा दुय्यम अधिकारी देण्यात आले होते. या पुस्तकाचे मूळ लेखक टाटसो ह्यासिद् यांचे ते मित्र होते. या तुकडीला ' शिटा किकान ऑर्गन ' असे संबोधण्यात येत असे.

थामुरा यांच्या मार्फत आय्. आय्. एल्. व शिटा किकान ऑर्गन यांचे संबंध जवळचे व एकमेकांच्या सहकार्याचे झाले. शिटा किकान ऑर्गन यांनी आय्. आय्. एल्. ला सर्व प्रकारचे साहाय्य देण्याचे ठरविले. सुभाषचंद्र बोस हे त्या वेळी बर्लिन-मध्ये होते. त्यांच्याबद्दल व भारतीय स्वातंत्र्य चळवळीबद्दल त्यांना फार मोठी सहानु-भूती व पाठिंबा होता. भारतीय स्वातंत्र्य चळवळीबद्दल भारतीय काँग्रेस नेते जे भाष्य करीत ते प्रीतमसिंग यांनी अनेक वेळा बोलून दाखविले. " इंडियन नॅशनल काँग्रेसच्या नेत्यांना भारताबाहेरील कोणतीही सशस्त्र शक्ती भारतीय स्वातंत्र्य चळवळी-करिता नको आहे. दारात असलेल्या कोल्ह्याला हाकलून देण्यासाठी मागील दाराने वाघ घरात घेणे बरोबर होणार नाही. कोणत्याही बाह्य देशाचे बंधन न स्वीकारता भारत संपूर्ण स्वातंत्र्याकरिता लढत आहे. ज्या वेळी बाह्य देशाची मदत आम्हाला लागेल त्या वेळी आम्हास समजून चुकेल, की आम्ही काहीतरी राजकीय तारण देत आहोत आणि मग कदाचित राष्ट्र-स्वातंत्र्याकरिता चाललेल्या चळवळीस भारतीय जनतेची साथ मिळणार नाही. तथापि खरी गोष्ट अशी, की आमचे इच्छित साध्य करून घेण्यासाठी आम्ही असमर्थ असल्यामुळे आम्हाला बाह्य मदत घेणे जरुरीचे आहे आणि खरो-खरच ही एक मोठीच डोकेदुखी आम्हाला सहन करणे भाग आहे. " या त्यांच्या वक्तव्यावरून असे दिसून येते, की सुभाषचंद्र बोस यांच्या विचारांशी हे विचार जुळून येतात. भारताच्या स्वातंत्र्यासाठी जपानने कोणतीही मदत करण्याचे ठरविले होते.

ग्रेटर ईस्ट एशियाच्या युद्धाला सुरुवात होण्याच्या सुमारास आय्. आय्. एल्. चे प्रीतमसिंग व जपानी सेनाधिकारी थामुरा यांच्यात जो करार झाला त्या करारा-तील काही कलमांकडे लक्ष गेल्यावाचून राहत नाही. माझ्या मते तर या कलमांना अधिक महत्त्व होते. कारण यातील सूचनांनी व कलमांनी इंडो–जपान सहकार्याचा पाया घातला गेला. याच आधारभूत तत्त्वांवर सुभाषचंद्र बोस यांनी चळवळीचे नेतृत्व घेण्यासाठी बर्लिनमध्ये प्रगट झाल्यावर आपली चळवळ पुढे चालू ठेवली. या सूचनांची व कलमांची टिपणी खालीलप्रमाणे आहे—

' आम्ही अशी प्रतिज्ञा करीत आहोत, की आमच्या चळवळीच्या पायाभूत असलेल्या तत्त्वांचा आम्ही अंगीकार केला असून, त्याकरिता आम्ही सर्वथैव बद्ध-परिकर आहोत. '

( १ ) ग्रेटर ईस्ट एशिया खंडात शांतता, स्वातंत्र्य आणि विकास या कार्यासाठी संपूर्णपणे स्वतंत्र, मुक्त आणि समान पायावर असलेले जपान व भारत यांचे एकमेकांस साहाय्य राहील.

( २ ) आय्. आय्. एल्. ही संघटना ब्रिटिशांविरुद्ध भारताला संपूर्ण स्वातंत्र्य शक्य तितक्या त्वरित मिळविण्यासाठी लढा देत राहील. त्यासाठी जपानकडून सदिच्छापूर्वक भरीव मदत दिली जाईल. ही मदत देत असताना जपान भूभागाची, लष्करी, राजकीय, वाणिज्य, सांस्कृतिक किंवा धार्मिक कशा कोणत्याही प्रकारची भारताकडून अभिलाषा धरणार नाही, अगर निर्बंध घालणार नाही.

( ३ ) ब्रिटिशांकडून स्वातंत्र्य मिळण्याकरिता आय्. आय्. एल्. चे सर्व सभासद आणि भारतीय लोक हे आपल्या जाती, धर्म, राजकीय मतप्रणाली बाजूला ठेवून लढा देतील.

यांतील कलम १ मध्ये नमूद केल्याप्रमाणे ज्या ज्या ठिकाणी लढा सुरू होईल, त्या सर्व ठिकाणी लोकांच्या मध्ये सख्य निर्माण करून सर्व प्रकारचे साहाय्य देण्यात येईल.

( ४ ) ज्या वेळी अँग्लो–जपान युद्धास सुरुवात होईल त्या वेळी आय्. आय्. एल्. खालीलप्रमाणे कार्य करीत राहील.

( अ ) आय्. आय्. एल्. हे जपानी सैन्याच्या बरोबरीने आघाडीवर राहील. दक्षिण थायलंड आणि मलायामध्ये राहणाऱ्या सर्व भारतीयांना किंवा ब्रिटिश इंडियन आर्मी-मध्ये नोकरी करणाऱ्या भारतीयाना आवाहन करून ब्रिटिशांच्या विरुद्ध चाललेल्या चळवळीत सहभागी होण्यासाठी त्यांचे मन वळविण्याचा शिकस्तीचा प्रयत्न करावा, त्याचबरोबर या भारतीयांमध्ये जपानबद्दल सहानुभूती निर्माण होईल याकडे लक्ष द्यावे.

( ब ) आय्. आय्. एल. ने तत्काळ ब्रिटिश-इंडियन आर्मी मधील व मलाया-मध्ये राहणाऱ्या भारतीयांना एकत्र करून त्यांना ' इंडियन इंडिपेंडन्स व्हॉलंटरी आर्मी 'मध्ये सामील करून घ्यावे व आगामी होणाऱ्या भारतीय स्वातंत्र्यलढ्यासाठी तयार करावे.

( ५ ) ( अ ) जपानी लष्कराकडून आय्. आय्. एल् ला सर्व प्रकारची मदत उपलब्ध करून दिली जाईल. यामुळे जपानच्या युद्धक्षेत्रात स्वयंपूर्णपणे आपल्या कार्याचा मुक्तपणे व्याप वाढवता येईल.

( ब ) मेजर फुजीवारा यांनी सुचवून दिल्याप्रमाणे जपानी सैन्यात व आय्. आय्. एल. यांच्यामध्ये स्नेहभाव वाढविण्यासाठी ' F ' हे अक्षर एक साधन म्हणून वापरण्यात यावे. यामुळे प्रत्यक्ष देवाण-घेवाणीच्या वेळी व कार्य करताना आय. आय. एल्. ला त्याचा उपयोग व्हावा.

( क ) जपानच्या युद्धक्षेत्रात राहणाऱ्या भारतीय लोकांबरोबर जपानी सैनिक शत्रू म्हणून वागणार नाहीत. जे लोक शरण आले आहेत किंवा जे लोक युद्धकैदी होते, अशा लोकांनाही शत्रू समजणार नाही. इतकेच नव्हे, तर त्यांचे जीवित, वित्त,

स्वातंत्र्य आणि सन्मान यांचे रक्षण करून, त्यांना आवाहन करून ते आपले मित्र आहेत असे समजले जाईल. धार्मिक स्वातंत्र्याची हमी देण्यासाठी जपानी लष्कर मंदिराचे रक्षण करील व त्यांचा लष्करी कामासाठी उपयोग केला जाणार नाही.

( ड ) जपानी लष्कर ' टोकिओ ब्रॉडकास्टिंग स्टेशन ' हे आय आय. एल. च्या प्रचारासाठी सहकार्य म्हणून वापरण्यास दिले जाईल. त्याचप्रमाणे ' बँकॉक ब्रॉडकास्टिंग स्टेशन ' व इतर जपानी लष्कर प्रदेशावरील नभोवाणी केंद्रे प्रचारासाठी उपलब्ध करून दिली जातील. इतकेच नव्हे, तर शत्रुग्रस्त हद्दीत विमानांतून प्रचारपत्रके टाकण्यासाठी विमानांचा वापर करण्यास आय. आय. एल. ला परवानगी देण्यात येईल.

( इ ) बर्लिनमध्ये असलेले सुभाषचंद्र बोस यांच्याशी संपर्क साधण्यासाठी आय. आय. एल. ला जपानी लष्कराची मदत होईल.

( फ ) आय. आय. एल. चे कार्य चालण्यासाठी त्यास लागणारी सर्व सुविधा, साहित्य, फंडस प्रीतमसिंग यांच्या विनंतीवरून मिळू शकतील. जपानी लष्कराच्या कार्यक्षेत्रात असणाऱ्या भारतीय लोकांकडून स्वयंस्फूर्तीने दिलेल्या देणग्या घेण्याचे संपूर्ण स्वातंत्र्य राहील.

याबरोबरच ' F ' हे चिन्ह आय. आय. एल. ला रणक्षेत्रावर ओळखण्यासाठी म्हणून वापरण्यात येईल व जपानी लष्कराच्या सर्व छावण्यांतून ' F ' चिन्हाबद्दलची दखल देण्यात येईल.

' F ' चिन्हाची ही कल्पना प्रीतमसिंगांच्या डोक्यातून निघाली असली तरी F हा ' फ्रेंडशिप ' ' फ्रीडम ' यांचे प्रतीक असून त्यामध्ये मेजर फुजीवारा यांच्या नावाचे आद्याक्षर येते.

आणि अशा प्रकारे आय. आय. एल. चे पायाभूत कार्य जपानच्या सहकार्याने सुरू झाले.

८ डिसेंबर १९४१ रोजी जपानने ब्रिटन आणि संयुक्त राष्ट्रे यांच्याबरोबर युद्ध जाहीर केले. लगेच 'इंपीरिअल जनरल हेडक्वार्टर्स' यांनी सर्व सशस्त्र लष्करांना तारा पाठवून जोरदार चढाई करण्याचा आदेश दिला. तत्काळ ' एफ्. किकान ' यांनी आपले लक्ष्य मलाया ठरवून त्यावर झडप घातली. प्रीतमसिंग यांच्या नेतृत्वाखाली आय्. आय्. एल्. ने दक्षिण थायलंडमध्ये जोरदार मुसंडी मारली. १० डिसेंबर रोजी मलाया व थाई सरहद्दीवर असलेल्या यजयी या शहरावर लोकांचे लक्ष वेधण्यासाठी एक भव्य भारतीय राष्ट्रनिशाण फडकवले गेले. जपानी व भारतीय भाषेत मोठे मोठे फलकही लावले गेले. त्यावर जाहीरपणे लोकांना कळण्यासाठी ' आय्. आय्. एल्. हे भारताच्या मुक्तीकरिता व स्वातंत्र्याकरिता लढा देत आहे. ' असे लिहिले होते. तोपर्यंत हे सत्य गुप्तच होते. ते आता प्रथमच लोकांना जाहीरपणे कळत होते. त्यानंतर दक्षिणेकडे

सरकणाऱ्या जपानी फौजेला अनेक भारतीय व मलायी नागरिक आणि तरुण प्रचार करण्यात गुंतलेले दिसले. असे करण्यात आपल्या स्थानिक लोकांचे जीवित व मालमत्ता वाचविण्याचा केवळ हेतू होता. त्यांपैकी कित्येक लोक ब्रिटिश लष्करांशी संबंधित होते; पण नंतर ते 'एफ. किकानचे' सभासद झाले. आय्. आय्. एल्. ज्या ज्या ठिकाणी जाईल त्या त्या ठिकाणी स्थानिक लोकांची सभा भरवून त्यांना आपले ध्येय व धोरण सांगे. या सभेस आय्. आय्. एल्. चे अध्यक्ष हजर राहून लोकांना एशिया खंडातील ऐक्य, शांततामय प्रगती आणि स्वातंत्र्य व त्याबरोबरच भारताच्या स्वातंत्र्याकरिता जपानचे सहकार्य या गोष्टी लोकांना समजावून सांगत. ते ज्या ज्या ठिकाणी जात त्या त्या ठिकाणी त्यांचे उत्साहपूर्वक स्वागत होत असे. या सुमारास आरोलुअत्राच्या पूर्वेस तीस मैलांवर रबराच्या जंगलात एक संपूर्ण ब्रिटिश–इंडियन बटालियन जपानी लष्कराने घेरली. या बटालियनचे नेतृत्व एक ब्रिटिश लेफ्टनंट कर्नल करीत होता. १४ डिसेंबर रोजी या बटालियनने संपूर्ण शरणागती पत्करली. कोणत्याही अटी न घालता शरण आलेल्या बटालियनबद्दल त्वरित निर्णय घेण्याचे काम 'एफ. किकान' कडे आले. युद्ध सुरू झाल्यापासून मोठ्या संख्येने ब्रिटिश लष्कर शरण येतच होते. आझाद हिंद फौजेच्या संस्थापकांपैकी कॅ. मोहनसिंग हे आपले निर्णय इतिहासात नमूद करण्यासारखे घेत असत आणि त्यामुळे लवकरच या हुशार तरुण माणसाची एफ. किकानवर वैयक्तिक छाप पडली. त्यांच्याबद्दल सहानुभूती निर्माण झाली. भारतास स्वातंत्र्य मिळविण्याबद्दलच्या कार्याचा विचारविनिमय कॅ. मोहनसिंग व कॅ. प्रीतमसिंग बरोबरीने करू लागले. कॅ. मोहनसिंग तर भारत स्वतंत्र होण्यासाठी आत्मीयतेने विचार करीत. तथापि जपानी लष्कराच्या हालचालीवर ते सतत दक्षतेने लक्ष ठेवीत होते. जपानी धोरण व लष्करी कारवाई यांकडे भारतीय लोकांचे लक्ष असून ते संशयी वृत्तीनेच पाहत होते. कॅ. प्रीतमसिंग या मताचे होते, की इंडियन नॅशनल काँग्रेसच्या साहाय्याशिवाय आणि सहकार्याशिवाय स्वातंत्र्याची चळवळ फळास येणार नाही. या संदर्भाच्या वादविवादातून एकमेकांच्या विचारांचे ऐक्य होण्यास मदत होऊ लागली व सर्व कार्यात ते एकमेकांचे सहकार्य घेऊ लागले. या युद्धामुळे भारतीय वसाहतीत राहणाऱ्या लोकांना स्वातंत्र्याची स्फूर्ती मिळून ते लढण्यास तयार झाले पाहिजेत आणि त्याकरिता नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्यासारख्या महान क्रांतिकारकाची पूर्व एशियात फार जरुरी असल्यामुळे भारतीय स्वातंत्र्याचा लढा ऐक्याने व तीव्रतेने लढविला जाईल, याबद्दल त्या दोघांची खात्री होती. तसेच सुभाषचंद्र बोस यांच्यावर भारतीयांचा पूर्ण विश्वास होता व त्यांच्यावर त्यांची भक्तिपूर्ण श्रद्धा होती. ३१ डिसेंबर १९४१ रोजी एफ. किकान हेडक्वार्टर्स यांनी कॅ. मोहनसिंग यांना काही महत्त्वाची बोलणी करण्याकरिता बोलावून घेतले. बऱ्याच चर्चेनंतर भारतीय अधिकाऱ्यांनी एकमताने असे ठरविले, की जर जपानी लष्कराने आपणास योग्य ती मदत देण्याचे

मान्य केले तर भारतीय स्वातंत्र्याचा लढा चालू ठेवावयाचा. त्यानंतर लगेच कॅ. मोहनसिंग यांनी आपली एक योजना जपानी अधिकाऱ्यांना सादर केली.

( १ ) कॅ. मोहनसिंग व त्यांचे सहकारी 'इंडियन नॅशनल आर्मी' निर्माण करण्याचे काम सुरू करतील.

( २ ) जपानी लष्कराने त्यांच्या योजना पार पाडण्यासाठी त्यांना योग्य ते सर्व प्रकारचे साहाय्य केले पाहिजे.

( ३ ) आय्. आय. एल्. व आय. एन्. ए. ह्या एकमेकांस पूरक व साहाय्यकारी राहतील.

( ४ ) जपानी लष्कराने कॅ. मोहनसिंग यांना भारतीय युद्धकैद्यांची तपासणी करण्याकरिता अधिकृत प्रतिनिधी म्हणून मान्यता दिली पाहिजे.

( ५ ) जपानी लष्कराने, कॅ. मोहनसिंग यांना व भारतीय युद्धकैद्यांना आपले मित्र म्हणून समजले पाहिजे व जर ते स्वखुषीने आझाद हिंद फौजेमध्ये सामील होण्याची इच्छा दर्शवतील, तर त्यांना तसे करता आले पाहिजे.

( ६ ) जपानी लष्कराने आझाद हिंद फौजेला सन्मित्र म्हणून वागविले पाहिजे.

कॅ. मोहनसिंग यांनी खास सूचना मांडून, लष्कराला यापूर्वी 'इंडियन व्हॉलंटरी आर्मी' असे संबोधण्यात येत असे, ते बदलून 'इंडियन नॅशनल आर्मी' (I.N. A.) म्हणजेच 'आझाद हिंद फौज' असे संबोधण्यात यावे म्हणून, मान्यता घेतली. तत्पूर्वी त्यांनी या लष्कराला 'क्रांतिकारी लष्कर' अगर तत्सम काही म्हणण्यात आल्यास लोक कोणत्याही प्रकारचे साहाय्य करणार नाहीत व त्यांचा विश्वासही संपादन करता येणार नाही, असे स्पष्ट केले. जपानचे आर्मी कमांडंट जनरल यामाटा यांच्याबरोबर मतैक्य झाल्यानंतर कॅ. मोहनसिंग यांनी, कोणत्याही परिस्थितीत तयार केलेल्या योजना यशस्वी करण्याची, प्रतिज्ञा घेतली.

एफ किकानचा निरोप घेताना कॅ. मोहनसिंग म्हणाले, "माझे नुकतेच लग्न झाले असून, मी माझी पत्नी भारतात सोडून आलो आहे. ब्रिटिश सरकारला मी त्यांच्या विरुद्ध लढण्यास उभा आहे असे जेव्हा समजेल, तेव्हा ते माझ्या पत्नीवर खटला चालवतील. त्याचप्रमाणे आम्हा सर्व भारतीय मंडळींची कुटुंबे भारतात आहेत. त्या सर्वांवरच हा प्रसंग निर्माण होणार आहे; तरी पण स्वातंत्र्यासाठी लढण्याचा आमचा निर्धार कायम आहे. मग त्यासाठी आमच्या कुटुंबियांना समर्पण करावे लागले तरी हरकत नाही. या प्रसंगी मला असे म्हणावयाचे आहे, की भारतीय जवान ब्रिटिश लष्करात असताना जितक्या शौर्याने लढत होते त्याच्या कितीतरी अधिक वीरश्रीने ते आझाद हिंद फौजेमधून लढतील, हे जपान्यानी समजून घेतले पाहिजे." प्रीतमसिंग आणि आय. आय. एल. च्या सर्व अधिकाऱ्यांना जे कल्पनेत वाटत होते ते युद्ध सुरू होताच एक महिन्यातच खरे झाले. मलाया आघाडीवर इंडो-जपान सहकार्य उत्तम

प्रकारे होत असल्याचे ‘ इंपीरिअल जनरल हेडक्वार्टर्स ’ यांच्या नजरेस आले. पूर्व आशियामध्ये चालू असलेल्या युद्धात जपानी अधिकाऱ्यांना भारतीय पूर्ण तन्मयतेने लढत असताना जेव्हा दिसून आले तेव्हा भारतीयांच्याबद्दल त्यांचा ग्रह चांगला झाला. टोकिओमधील आपल्या प्रमुखाना वृत्तांत सादर करताना ते म्हणतात, “ भारताच्या बाजूने कार्य करीत असता हेतू आणि मार्ग हे नीट समजावून घेतले पाहिजेत ” लष्करी अधिकाऱ्यांनी आपले वरील विचार का व्यक्त केले हे खालील परिच्छेदावरून समजून येईल.

“ भारतातील ३५० दशलक्ष लोकांचे सहकार्य मिळवल्याशिवाय ग्रेटर ईस्ट एशियाची नवी घडी बसवण्याची योजना सिद्धीस जाणार नाही. प्रथम ब्रिटिश दडपणाखालून त्यांची सुटका झाली पाहिजे. तथापि युद्ध चालविण्याच्या आमच्या कुवतीवरही काही मर्यादा आहे. आम्ही सतत युद्ध करून ते जिंकत राहणार नाही. फार फार तर आम्हास ब्रह्मदेश मिळेल. तथापि दूरवरच्या भारतात आम्ही पोहोचू शकणार नाही. आपण जरी ब्रिटिश फौजेचा पाठलाग करीत दूरवर भारतात पोहोचलो, तरी भारतीय लोकच आमच्याविरुद्ध राहतील. त्यामुळे या बाबतीत उत्तम मार्ग म्हणजे भारतीय लोकांना त्यांचे स्वातंत्र्य मिळविण्यासाठी मदत करणे.

या हेतूंचा उच्च पातळीवरून विकास करण्यासाठी बर्लिनमध्ये सुभाषचंद्र बोस यांच्याशी निकट संबंध ठेवणे आवश्यक आहे. त्यामुळे आपणाला पूर्वेकडे आणि पश्चिमेकडेही हालचाल करणे सुलभ होईल. पूर्वेकडील आघाडी ही अधिक महत्त्वाची आहे आणि म्हणून सुभाषचंद्र बोस हे इकडे आल्यास फार चांगले होईल. ”

८ फेब्रुवारी रोजी जपानी लष्कराने जनरल यामिष्टा यामाटा यांच्या हुकमतीखाली सिंगापूरवर जोरदार हल्ले करण्यास प्रारंभ केला. ब्रिटिशांच्या बाजूने लढणाऱ्या हिंदी सैनिकांची मने वळवून त्यांना ब्रिटिशांच्या बाजूने लढण्यापासून परावृत्त करून त्यांनी आपली बाजू बदलावी म्हणून आझाद हिंद फौजेचे प्रचारकेंद्र विकसित करून ते आघाडीवर हिंदी लोकांचा संबंध यावा म्हणून पाठवण्यात आले होते.

१७ फेब्रुवारी रोजी ४५००० भारतीय युद्धकैदी एकत्र जमवून एक सभा घेण्यात आली. त्यांच्यासमोर एफ किकानच्या संचालकांनी आपली भाषणे केली. आपल्या भाषणात भारताच्या स्वातंत्र्यलढयात जपानचे फार मोठे साहाय्य होत आहे, असे त्यांनी सांगितले. “ आता ब्रिटिश साम्राज्य मोडकळीस आले असून त्यांच्या लोखंडी साखळदंडांतून मुक्त होण्याची वेळ आली आहे. आपले स्वातंत्र्य लवकरच उदयास येणार आहे.” आणि या भाषणाने प्रभावित होऊन जमलेल्या सर्व युद्धकैद्यांनी स्वेच्छेने भारतीय स्वातंत्र्याच्या गगनभेदी घोषणा दिल्या.

आपल्या भाषणाच्या समारोपात त्यांनी सांगितले, की ‘ जर युद्धकैद्यांनी स्वेच्छेने भारताच्या स्वातंत्र्याकरिता लढण्याची प्रतिज्ञा केली तर त्यांना ‘ युद्धकैदी ’ म्हणून

समजण्यात येणार नाही.' त्यांच्या भाषणानंतर प्रीतमसिंग व मोहनसिंग यांची प्रभावी भाषणे झाली. त्यांचे भाषण संपण्याच्या वेळी तर श्रोत्यांचा आत्मनिर्भर अत्यंत उत्कटतेला पोहोचला आणि त्यांनी आपल्या अंगीकृत कार्यात आपल्या पुढाऱ्यां-बरोबरीने कोणतेही दिव्य करण्याची सिद्धता केली.

या वेळी मेसर्स गोहो आणि मेनन हे सिंगापूरला भारतीय राष्ट्रीय नागरिक म्हणून राहत होते. ते आय. आय. एल. मध्ये सामील झाले. याच सुमारास आपल्या मंत्रि-मंडळापुढे भाषण करताना टोजो यांनी आपले धोरण जाहीर केले, की पूर्व आशिया-मधील लोकांना स्वातंत्र्य देण्याबद्दल त्याचप्रमाणे फिलिफाईन्सला स्वातंत्र्य मिळविण्या-साठी मदत आणि भारत स्वतंत्र होण्यासाठी चाललेल्या चळवळीस साहाय्य करण्याचे जपान घोषित करीत आहे.

या अवधीत आय. आय. एल. ची सूत्रे सिंगापूरहून हलविण्यात येत असत. मग आझाद हिंद फौजेचा तळ कॅ. मोहनसिंग यांनी सिंगापूरला हलविला. आझाद हिंद फौजेची गुणवत्ता वाढविण्यासाठी व विस्तार करण्याकरिता त्यांनी रात्रंदिवस परिश्रम केले. याचे सुपरिणाम मलायाच्या युद्धात दिसून आले. आझाद हिंद फौजेचा विकास होऊन ती अधिक वरच्या पातळीवर गेली, आणि त्यानंतर नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या नेतृत्वाखाली संपूर्ण लष्करी पद्धतीची संघटना तयार झाली.

आपल्या मातृभूमीच्या स्वातंत्र्याचा विचारविनिमय करण्याकरिता मार्च १९४२ मध्ये रासबिहारी बोस आणि पूर्व आशिया खंडातील इतर पुढारी टोकिओमध्ये जमा झाले. पूर्व आशिया खंडातील पुढाऱ्यांची ही पहिलीच सभा होती आणि या सभेचे फार मोठे महत्त्व होते. तथापि हे लक्षात घेतले पाहिजे, की जपानमध्ये राहणारे भारतीय आणि दक्षिण भागात राहणारे लोक यांच्यामध्ये फार मोठ्या प्रमाणात मतभेद झाले. दक्षिण भागात राहणारे पुढारी म्हणत, की भारतीय स्वेच्छेने बोलण्यास व कृती करण्यास स्वतंत्र नसून त्यांना जपानी साहाय्य घेऊन बोलावे लागते. तथापि त्यांनी जपानी बाहुल्या बनून आपली कृती करू नये. यामुळे सर्वस्वांचा ऱ्हास होईल. रासबिहारी बोस यांच्यावरही दोषारोप करून ते भारतीय म्हणून घेण्यास पात्र नाहीत, असे ते आरोप करीत. याविरुद्ध दुसरी बाजू पाहता जपानमध्ये राहणाऱ्या भारती-यांना दक्षिण भागात राहणाऱ्या लोकांच्या कृतीमुळे संताप येत असे. फार कालापासून त्यांनी ब्रिटिश राजवटीशी एकनिष्ठ राहण्याची प्रतिज्ञा केली होती आणि म्हणून ते क्रांतिकारक म्हणवून घेण्यास पात्र नाहीत. म्हणूनच ह्या भागाकडे स्वातंत्र्याच्या चळवळीसाठी दुर्लक्षित केले होते.

टोकिओ मीटिंग मधून काहीही चांगले निष्पन्न झाले नाही. आय्. आय्. एल. आणि आझाद हिंद फौज यांच्याबद्दल केवळ सहानुभूतीही निर्माण झाली नाही. तथापि त्यांचे मनोधैर्य मात्र कमी झाले नाही. कॅ. मोहनसिंग यांनी मोठ्या उत्साहाने

आझाद हिंद फौजेच्या कार्याला लागण्याचे ठरवून ते सिंगापूरला परत आले. पण त्यांना अत्यंत दुखःदायक अशा दोन बातम्या समजल्या. एकतर कॅ. प्रीतमसिंग हे एका विमान अपघातात ठार झाले होते. आणि दुसरे म्हणजे आझाद हिंद फौजेवर पितृतुल्य प्रेम करणारे मेजर फुजीवारा हे बदलून दुसरीकडे गेले होते. यामुळे त्यांना मानसिक धक्का बसल्यावाचून राहिला नाही. या सर्व प्रसंगाची दुख द छाया त्याच्या पुढील सर्व कार्यावर पडली होती.

मेजर फुजीवारा यांच्या जागी कर्नल इवॅक्युरो हे हजर झाले. त्यांनी असे ठरविले, की पूर्व आशियातील चळवळ चालवण्यासाठी व त्याला चालना देण्यासाठी सुभाषचंद्र बोस यांना पाचारण करावे व त्यांना या लढ्याचे पुढारी करावे. नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या नेतृत्वाखाली पूर्व आशियात राहणाऱ्या भारतीय लोकांना स्वातंत्र्याच्या लढ्यासाठी मदत करावी म्हणजे ते चांगल्या प्रकारे आपले कार्य करतील. जपानने या पूर्वीच मान्य केलेल्या तत्त्वाप्रमाणे पुढील कार्य सुव्यवस्थित करण्याकडे त्यांनी भर दिला. प्रथमतः इवॅक्युरो यांनी अतिपूर्वेकडील भारतीय प्रतिनिधींची एक मोठी सभा आयोजित केली. यापूर्वी टोकिओत भरलेल्या सभेच्या ठरावाप्रमाणे ही सभा घेण्यात येणार होती. अतिपूर्वेकडील भारतवासीयांच्या स्वातंत्र्य चळवळीच्या इतिहासात ही एक फार महत्त्वाची सभा होणार होती. यात पास होणारे ठराव, मुद्दे व आराखडा एक महत्त्वाचा टप्पा म्हणून मानला जाणार होता. ही सभा सिव्हर कॉर्न रॉयल थिएटर समोरच्या चौकात मे १५ रोजी भरणार होती. या सभेस अतिपूर्वेकडील २००० भारतीय प्रतिनिधी उपस्थित राहणार होते. या सभेचे प्रमुख पाहुणे म्हणून टयूसबोगामी हे जपान, जर्मनी आणि इटालियन मिनिस्ट्रीचे परराष्ट्र वकील हजर होते. टोकिओ, सिंगापूर, हँगकाँग, मलाया, शांघाय, बोर्निओ, जावा आणि फिलि-पाईन्स येथील भारताचे प्रतिनिधी म्हणून आलेले पुढारी दोन लक्ष लोकांच्या बाजूने भावनापूर्वक बोलले. भारताच्या स्वातंत्र्याकरिता ब्रिटिशांच्या विरुद्ध निर्धाराने लढण्याची किती आवश्यकता आहे हे त्यांनी सांगितले. या सभेचे अध्यक्ष रासबिहारी बोस होते. मि. सह्या हे जपानमध्ये राहणाऱ्या भारतीयांच्या वतीने बोलले. सर्व प्रतिनिधींची भाषणे चांगली व आवेशपूर्ण झाली. जपान सरकार व लष्करी अधिकारी यांचे सभेला आलेले संदेश वाचून दाखवण्यात आले. शेवटी सुभाषचंद्र बोस यांचा संदेश वाचून दाखवण्यात आला. या संदेशाबद्दल जमलेल्या लोकांच्यामध्ये फारच उत्सुकता होती. आपल्या संदेशात नेताजी म्हणतात, "गेल्या अठरा महिन्यांच्या अनुभवावरून ब्रिटिशांच्या विरुद्ध लढण्यासाठी जपान, जर्मनी आणि इटली यांचे साहाय्य मिळत आहे, तथापि भारताचे स्वातंत्र्य आम्ही आमच्याच शक्तीने मिळवले पाहिजे. ह्या स्वातंत्र्यासाठी लढ्याच्या अगदी शेवटच्या क्षणी आम्हाला शस्त्रांची मदत घ्यावी लागेल. भारताचे स्वातंत्र्य म्हणजे ब्रिटिश साम्राज्यशाहीचा अंत होय. आणि

नेमकी हीच गोष्ट जपानी लष्कराने आपले 'लक्ष्य' ठरविली आहे. मी आपल्या सभेला सदिच्छा व्यक्त करतो व ती यशस्वी व्हावी अशी प्रार्थना करतो. आमच्या लढयाचा विजयस्तंभ म्हणून ही सभा इतिहासात नमूद होईल." या सभेनंतर तीन दिवसांची एक गुप्त मीटिंग होऊन जपान सरकारला सादर करण्यांसाठी साठ कलमी योजना तयार केली गेली. जपान सरकारला ती सादर केल्यानंतर त्याचे लेखी प्रत्युत्तर त्यांच्याकडून येणार होते. हंगामी सरकार स्थापन करण्यासाठी पैशाची फारच गरज होती व हे पैसे जपानने, भारत स्वतंत्र झाल्यावर परत करण्याच्या अटीवर द्यावेत, अशीही एक मागणी त्यामध्ये होती. भारत स्वतंत्र झाल्यावर आझाद हिंद फौजेला स्वतंत्र राष्ट्रातील सैन्याइतका दर्जा प्राप्त होईल व ती जपानी सैन्याबरोबरीने सुसज्ज होईल.

इंपीरिअल जनरल हेडक्वार्टर्स यांना व जपानी अधिकाऱ्यांना वरील योजनेचे उत्तर देणे म्हणजे एक डोकेदुखी झाली. विशेष करून मुख्यप्रधान टोजो व इतर सरकारी प्रमुख त्यांच्या या विनंतीमुळे नाराज झाले. भारतीय लढ्यावर सतत नियंत्रण ठेवण्याचा त्यांचा उद्देश होता. भारताची बाजू उघडपणे घेणाऱ्या अधिकाऱ्यांना त्यांनी दोष दिला. यामुळे जपानकडून समाधानकारक उत्तर न येता टोलवाटोलवी होऊन कालहरण होऊ लागले व त्याला फारच जुजबी उत्तरे मिळू लागली. भारतीय आपल्या स्वातंत्र्याचा लढा काळजीपूर्वक लढवीत होते याबद्दल संतोष व्यक्त केला जात होता. यामुळे भारतीयांना जपानच्या हेतूबद्दल किंतू निर्माण होऊन जपान व भारतीय यांच्यामधील एकोप्यास थंडपणा येऊ लागला. आणि अशा प्रकारे भारतीय आणि जपान यांच्यामध्ये दुरावा निर्माण झाला आणि त्यानंतर नेताजी सुभाषचंद्र बोस हे आझाद हिंद सरकारचे प्रमुख झाल्यानंतरही हा दुरावा आझाद हिंद फौजे-मधून दूर झाला नाही. एकाद्या जाहीर कार्यक्रमातही हा दुरावा दिसून येत असे. यातील प्रमुख कारण म्हणजे जपानी विचारसरणी व भारतीय विचारसरणी यात तफावत होती हे होते.

बँकॉकमध्ये भरलेल्या मीटिंगनंतर दि. १२ ऑगस्ट रोजी रंगून येथे एक मेळावा घेण्यात आला. या मेळाव्यास मलायामधून २५०० हिंदी लोक उपस्थित राहिले. त्यानंतर १० एप्रिल रोजी आय. आय. एल्. च्या ब्रम्ही शाखेतर्फे पुन्हा रंगूनमध्ये मेळावा घेण्यात आला. ब्रिटिश सरकारने या मेळाव्याच्या विपर्यस्त बातम्या प्रसृत केल्या. आय. आय. एल्. ला नालायक ठरविण्यासाठी व ती हिंदी जनमनातून उतरविण्यासाठी ब्रिटिश सरकार दिल्ली रेडिओकेंद्रावरून खोट्या व अप्रस्तुत बातम्या प्रसृत करू लागले. इतकेच नव्हे, तर रासबिहारी बोस हे जपानचे बाहुले बनले असून ते चाकरा-प्रमाणे जपान सरकारचे राज्य स्थापू पाहत आहेत अशा कंड्या पिकविल्या; परंतु हा युक्तिवाद फार काळ टिकू शकला नाही. उलट ब्रिटिश सरकार विरुद्ध भारतात

चाललेल्या चळवळीस अधिक गती प्राप्त झाली. भारतात चाललेल्या शांततामय व अहिंसक चळवळीस निराळेच स्वरूप येऊन लोकांनी हिंसक चळवळीस सुरुवात केली. सरकारी इमारती नष्ट करणे, आगगाड्या बंद पाडणे, वाहतूक विस्कळित करणे यामुळे ब्रिटिश पोलिस व लष्कराला लोकांच्यावर गोळीबार करावा लागला आणि त्यामध्ये ४००० लोक ठार झाले.

पूर्व आशियामध्ये राहणाऱ्या लोकांच्या बँकॉक मीटिंगनंतर इंडो-जपान एकीकरणाची एक शाखा विकसित केली गेली. त्याचे कारण असे, की पूर्व आशियामध्ये राहणाऱ्या लोकांची अशी समजूत झाली होती, की रासबिहारी बोस हे जपानचे बाहुले बनून जपानी राज्याकरिता हिंदी लोकांना राबवीत आहेत. ब्रिटिश सरकारच्या प्रचाराचा हा परिणाम होता. या सर्व परिस्थितीचा परिणाम होऊन कॅ. मोहनसिंग यांनी नोव्हेंबरच्या अखेरीस आपली जागा सोडली. त्यांचे व जपानी लष्करप्रमुखांचे खटके उडू लागले. त्यामुळे त्यांना अटक करून बंदिवासात ठेवणे भाग पडले. त्यांच्याबरोबर आझाद हिंद फौजेच्या अनेक प्रमुखानी आपल्या जागा सोडल्या. त्यामुळे नवे कमांडर लेफ्टनंट कर्नल जगन्नाथ भोसले यांची नियुक्ती झाली. आय. आय. एल्. च्या सर्व पदाधिकाऱ्यांनी स्वातंत्र्याची चळवळ अधिक चांगल्याप्रकारे पुढे चालावी म्हणून आपल्या जागा सोडल्या. त्या ठिकाणीही सिंगापूरमध्ये राहाणारे पुढारी कुर्यान सुर्मि व हरियान सुर्मि यांच्या नेमणुका झाल्या. आणि अशाप्रकारे आय. आय. एल व आय. एन्. ए. हे तिसऱ्या प्रकरणातून पार पडले. पुन्हा त्यांनी आपला धडा नव्याने नव्या पाटीवर गिरविण्यास सुरुवात केली.

आझाद हिंद फौजेचा मागोवा घेतल्यास तिच्या विरुद्ध आवाज उठवण्याचे कारण असे होते, की ती जपानधार्जिणी असून तिला जपानसाठी लढावयाचे आहे, असा सतत प्रचार केला आणि याचा परिणाम म्हणून भारतीय लोकांना जपानच्या हेतूबद्दल शंका राहून जात असे. भारतीयांचे आणि जपानचे प्रथमपासून घनिष्ठ संबंध नव्हते, जपाननेही भारत आणि भारतातील लोक नीट समजून घेतले नव्हते, इतकेच नव्हे, तर भारताबद्दलचे निश्चित धोरणही त्यांनी आखले नव्हते. यामुळे ते भारताशी हार्दिक सहकार्य करीत नव्हते. भारतीयांनाही त्यांच्याबद्दल आत्मीयता वाटत नव्हती. या बरोबरच या स्वातंत्र्य लढयास बलवत्तर नेताही नव्हता. आय. आय. एल. व आय. एन्. ए. या संघटनांना योग्य दिशा दाखवून योग्य मार्गाने घेऊन जाणाऱ्या बलवत्तर नव्या नेत्याची फारच जरुरी होती. आणि खरोखरच हे स्वप्न महत्‌भाग्याने खरे झाले. पूर्व आशियामध्ये देदीप्यमान असा नवा सूर्य सुभाषचंद्र बोस यांच्या रूपाने उगवला.

एफ. किकानचे पूर्वीचे संचालक मेजर फुजीवारा साऊदर्न आर्मी कमांडट यांनी भारतीय स्वातंत्र्यलढयाबद्दलचे आपले योग्य ते धोरण आखून त्यास योग्य त्या

मार्गास लावले होते. १९४३ मध्ये कर्नल इव्हाकुरो यांची बदली होऊन त्या जागी कर्नल साटोसी यामोटो यांची नेमणूक झाली. कर्नल यामोटो हे जर्मनीमध्ये जपानी दूतावासाच्या सैन्यात होते व त्यांचा आणि सुभाषचंद्र बोस यांचा वैयक्तिक परिचय झाला होता. यामुळे सुभाषचंद्र बोस यांनी पूर्व आशियांत येऊन चळवळीची सर्व सूत्रे हाती घ्यावीत या विचारास अधिक चालना मिळाली. कर्नल यामोटो यांनी सुभाषचंद्रांना जपानमध्ये आणण्याची सर्व सिद्धता केली.

# चार / जपानमध्ये आगमन

२० एप्रिल १९४३ रोजी जपानची एक पाणबुडी पेनांग येथील आपला तळ शांतपणे सोडून आफ्रिकेच्या दक्षिण टोकाकडे निघाली. हिंदी महासागरातल्या मादागास्कर बेटाच्या आग्नेय दिशेच्या एका ठराविक ठिकाणी ती जर्मन पाणबुडीला भेटून तिथून काही व्यक्तींना घेऊन येणार होती. त्या व्यक्ती म्हणजे सुभाषचंद्र बोस व त्यांचे सहकारी. फेब्रुवारी १९४३ मध्येच सुभाषचंद्र बोस जर्मनीमधून नाहीसे झाले होते. शत्रूला ही बातमी समजू नये म्हणून या गोष्टीची फारच गुप्तता ठेवण्यात आली होती. २६ एप्रिल रोजी जपानी पाणबुडी आपल्या स्थानापाशी ठरलेल्या वेळे-पूर्वीच म्हणजे दहा तास अगोदर आली व ती जर्मन पाणबुडीचा चोहोबाजूने शोध घेऊ लागली. रात्रीच्या काळोखातच जर्मन पाणबुडी तिच्या दृष्टीस पडली. पण एक-मेकांची खात्री करून घेण्यात रात्र संपली व दिवस उगवला. आता समुद्राच्या लाटा उंचावल्या होत्या व पाण्याची फारच खळबळ चालू होती. म्हणून या पाणबुडीतून त्या पाणबुडीत उतरून जाण्यासाठी समुद्र शांत होईपर्यंत वाट पाहणे जरुरीचे होते. दोन्ही पाणबुड्या एकमेकींच्या जवळून सोबत देत ईशान्येकडे समुद्र शांत असेल म्हणून सरकू लागल्या. दोन प्रहरनंतर समुद्राच्या उंच लाटा शांत होऊ लागल्या. जर्मन पाणबुडीतून एक जर्मन ऑफिसर व निवेदन अधिकारी आपला जीव धोक्यात घालून जपानच्या पाणबुडीत आले. यामुळे दोन्ही पाणबुड्या एकमेकींच्या संबंधी झाल्या. जर्मन पाणबुडी इंधनावर चालू असल्यामुळे ती पुढे ईशान्येकडील प्रवासास असमर्थ होती. तथापि समुद्राच्या लाटा अद्यापही एकमेकाकडे उतरून जाण्याइतपत शांत झाल्या नव्हत्या. म्हणून पुढे प्रवास न करता समुद्र शांत होण्याची आणखी वाट पाहण्याचे त्यांनी ठरविले. पहाटे पहाटे लाटा थोड्या शांत झाल्या. दोन्ही पाण-बुड्या जवळजवळ आणून त्यांनी त्या दोरखंडाने जोडल्या व त्याच्या साहाय्याने एक रबर–बोट सोडली. जर्मन पाणबुडीतून दोन व्यक्ती आपले साहित्य घेऊन दोरखंडास

धरून रबर-बोटीत उतरल्या व तिच्या द्वारा जपानच्या पाणबुडीत पोहोचल्या. हे काम मोठे धोकादायक होते. या ठिकाणी शॉर्कमासे होते व ते रबरबोट गिळंकृत करण्यासाठी तिच्यावर खाल्लून प्रखर हल्ला करीत होते. सुभाषचंद्र बोस व त्यांचे ए, डी. सी. ( मि. रेहमान ) जर्मन पाणबुडीतून जपानी पाणबुडीत एक तासाच्या खटपटीनंतर व सर्व धोके टाळून चिंब भिजलेल्या स्थितीत पोहोचले. जपानच्या पाणबुडीवर जपानचे नौदल अधिकारी व कमांडर इझ्यू यांनी त्यांचे हार्दिक स्वागत केले आणि अशा प्रकारे सुभाषचंद्र बोस यांनी जपानमध्ये आपले पहिले पाऊल टेवले. जपानला भेट देण्याचे त्यांचे अनेक दिवसांचे स्वप्न अशाप्रकारे साकार झाले.

जर्मन पाणबुडी निरोप घेऊन मागे फिरली व जपानी पाणबुडी सुभाषचंद्र बोस यांना घेऊन पेनांग येथे न थांबता थेट सबानकडे निघाली. सुभाषचंद्र बोस येणार असल्याबद्दल पूर्वीच सर्वत्र वार्ता पसरल्या होत्या. एका आठवड्याच्या सागरी प्रवाहात सुभाषचंद्र बोस यांनी जपानच्या पाणबुडीतील कॅप्टनच्या खोलीवरच मुक्काम ठोकला होता. त्यांच्या जेवणाची खास सोय पूर्वीच करून ठेवली होती. अत्यंत त्रासदायक, कंटाळवाण्या व सागराच्या तळातून झालेल्या प्रवासाचा त्यांच्यावर फारसा वाईट परिणाम झाला नव्हता किंवा त्यांना अशक्तपणाही आला नव्हता. आपल्या तब्येतीबद्दल ते दक्ष असत. नियमित व्यायाम व नियमित जेवण ते घेत. पाणबुडीतून, समुद्राच्या अथांग पाण्यातून, गुप्तपणे प्रवास करताना अशा प्रकारची सवय नसलेल्या व्यक्तीला हा प्रवास असह्य होतो; पण सुभाषचंद्र बोस हे अशा प्रवासातही आनंदी व उत्साही वृत्तीने वावरत. पाणबुडीचे वरिष्ठ अधिकारी व इतर कर्मचारी यांच्या बरोबर ते खेळीमेळीने वावरत. त्यांच्या मनात दुर्दम्य आशा-आकांक्षा होत्या आणि त्यामुळेच ते कोणतेही कष्टप्रद कार्य तडीस नेत. जपानमध्ये उतरताच पाणबुडीच्या कर्मचाऱ्यांच्या बरोबर त्यांनी आपला फोटो काढण्यास परवानगी दिली. आपल्या प्रवासाबद्दल ते म्हणतात, " पाणबुडीतून प्रवास करणे हा एक प्रकारचा मोठा आनंद आहे. जपानच्या इंपीरिअल गव्हर्नमेंटने ही शक्यता निर्माण केल्याबद्दल मी त्यांचा फार आभारी आहे. माझ्या सर्व प्रवासात कप्तानांनी मला व माझ्या ए. डी. सी. ना चांगली वागवणूक दिली. त्यामुळेच प्रवासात आम्हाला आमच्या घरीच असल्यासारखे वाटत होते. कप्तान व पाणबुडीच्या सर्व कर्मचाऱ्यांचे मी मनःपूर्वक आभार मानतो. हा प्रवास आयुष्यभर आठवणीत ठेवण्यासारखा सुखमय झाला आहे. आम्ही विजयासाठी व शांततेसाठी लढत असताना, मला या प्रवासाची नेहमी आठवण राहील."

६ मे १९४३ रोजी सुभाषचंद्र बोस सबान येथे तीन महिन्यांच्या प्रवासानंतर सुखरूपपणे उतरले. सबान बेटावर त्यांनी आपली खरी ओळख करून न देता ते " मॅस्यूदा " या जपानी नावाने वावरू लागले. तात्पुरते ते जपानी नौदलाच्या वतीने तेथील कॅंपवर राहू लागले.

कर्नेल यामामोटो हे तेव्हा ‘ हिकारी किकान ’चे डायरेक्टर होते आणि सुभाषचंद्र बोस यांना गुप्तपणे मदत करण्याचे काम त्यांच्याकडे होते. कर्नेल यामामोटो यांना दोन साहाय्यक देण्यात आले होते, एक श्री. मारुतारो सन्डा आणि दुसरे श्री. टाडा-मोटो निगीशी. यांनी आपल्या आयुष्याची बरीच वर्षे भारतात काढली होती व त्यांना भारताबद्दल बरीच माहिती होती. विशेषतः मि. निगीशी यांना इंग्रजी उत्तम बोलता येत होते. त्यामुळे सुभाषचंद्र बोस यांचे दुभाषी म्हणून त्यांनी काम केले आणि सुभाषचंद्र बोस यांचा त्यांच्यावर पूर्ण विश्वास बसला होता.

सुभाषचंद्र बोस यांना घेऊन जाणारे विमान ‘ इंपीरिअल जनरल हेडक्वार्टर्स ’ यांच्याकडून यावयास बराच अवधी लागत होता. म्हणून त्यांनी सबाना सोडण्याचा निर्णय ११ मे रोजी घेतला व पेनांग, सैगाव, मनिला, तैफा आणि हामामातसवरून सहा दिवसांचा प्रवास करून ते १६ मे रोजी टोकिओत आले आणि ‘ इंपीरिअल हॉटेल ’मध्येयेऊन राहिले. तेथूनच त्यांनी आपल्या पुढील कार्यास प्रारंभ केला. या वेळेपासून ते पूर्व आशियायी स्वातंत्र्यलढ्याचे नेते झाले.

रासबिहारी बोस हे आय. आय्. एल. चे काम पाहत होते तरी, त्यामध्ये व्हावी तितकी प्रगती होऊ शकली नाही. भारतात त्यांचे म्हणावे तितके वजन पडत नव्हते. ३० वर्षांपूर्वी त्यांनी भारतात क्रांतिकारक पक्षाचे खूपच काम केले होते. हे जरी खरे असले, तरी त्यांनी पुढील आयुष्याची बरीच वर्षे जपानमध्ये काढल्यामुळे, भारतातील नव्या तरुणांना त्यांच्याबद्दल फारशी आस्था निर्माण झाली नव्हती. जपानच्या लष्करी अधिकाऱ्यांना असे वाटत होते, की सुभाषचंद्र बोस हे भारतात स्वातंत्र्याच्या चळ-वळीत काम करीत होते व भारतातील सर्व प्रांतांतील लोकांना ते आपले एक महान पुढारी आहेत असे वाटत होते. ते काँग्रेसचे अध्यक्ष झाल्यामुळे सर्व जनतेशी त्यांचा संपर्क आला होता व ते नुकतेच तेथून आले असल्याने त्यांच्याबद्दल भारतीयांच्या मनात निश्चित आदर असून, ते या ठिकाणाहून स्वातंत्र्यलढ्याचे काम उत्तम प्रकारे करू शकतील, असे वाटत होते. या बाबत रासबिहारी बोस यांचे काय विचार आहेत हे समजण्यासाठी त्यांची व सुभाषचंद्र बोस यांची भेट घडवून आणून पुढील लढ्या-बद्दल नंतरच विचार-विनिमय करावा असे त्यांनी ठरविले. कर्नेल इव्हाकुरो यांना अशी शंका होती, की जर रासबिहारी बोस यांनी सुभाषचंद्र बोस यांच्या नेतृत्वाबद्दल काही शंका व्यक्त केल्या तर, किंवा नापसंती दर्शविली तर, प्रश्न कठीण होणार होता, पण तसे काही न होता रासबिहारी बोस हे त्यांच्या नेतृत्वाला मान्यता देतील किंवा नाही या विचाराने कर्नेल इव्हाकुरो फारच अस्वस्थ झाले होते. रासबिहारी बोस यांच्या बरोबर कशी बोलणी करावी, या विचारात कर्नेल इव्हाकुरो होते; पण त्यांच्या सर्व शंका त्वरित नाहीशा झाल्या व त्यांना फार मोठा आशेचा किरण दिसू लागला. रास-बिहारींशी वरील संदर्भावरून बोलताच ते अत्यंत खुषीने व आनंदाने त्यांच्याशी सहमत

झाले व म्हणाले, " ही कल्पना फार चांगली आहे. सुभाषचंद्र बोस हे जन्मतःच पुढारी आहेत ते पुढारीपण घेत असतील तर मला फारच आनंद होईल. देशाचे स्वातंत्र्य मिळवणे हे आमचे ध्येय आहे. आजपर्यंत मी शक्य तेवढे प्रयत्न केले व पुढे सुभाषचंद्र बोस यांनी कार्य करावे ही माझी इच्छा आहे. ते तरुण व उमदे आहेत." कर्नल इव्ह्याकुरो यांनी समाधानाचा व सुटकेचा श्वास सोडला व आनंदाने ते पुढील कार्याला लागले.

खूपच कालानंतर बोस-द्वय एकमेकांना भेटत होते. दोघेही एकाच ध्येयाने प्रेरित होऊन कार्य करीत होते. तथापि ते एकमेकांपासून खूपच दूर होते. त्यांची भेट ही एक नाट्यमय घटना होती. ते एकमेकांना भेटताच खूप उशिरापर्यंत त्यांनी हस्तांदोलन केले आणि भारताच्या स्वातंत्र्याकरिता तीव्रतेने लढण्याची प्रतिज्ञा केली. मि. बिन यामामोटो हे बोस द्वयांच्या भेटीबद्दल आपल्या वृत्तांतात लिहितात, " १२ किंवा १३ जून रोजी हे दोघे प्रथमच परस्परांना ' इंपीरिअल हॉटेल, टोकिओ 'मध्ये भेटले. माझ्याकडे एकमेकांचा परिचय करून देण्याचे काम होते. रासबिहारी बोस व सुभाषचंद्र बोस हे आपल्या तरुणपणात आपल्या मातृभूमीच्या स्वातंत्र्याकरिता कार्य करीत होते. त्यांचा एकमेकांना परिचय असणारच. या नाट्यमय भेटीत एकमेकांना पाहताच त्यांची हृदये उचंबळून आली. सद्‌गदित झाल्यामुळे ते काही क्षण बोलू शकले नाहीत. पण हा क्षण संपताच ते अत्यंत परिचित असलेल्या जुन्या मित्राप्रमाणे एकमेकांबरोबर आपल्या भाषेत बोलू लागले. मग मी त्यांना सोडून दूर झालो. जवळजवळ एक तास ते बोलत होते. त्यांच्या या भेटीनंतर रासबिहारी बोस मला म्हणाले, ' मला आता मोकळे झाल्यासारखे वाटते. आता मी त्यांना सोडून जात आहे. तथापि टोकिओमध्ये त्यांना जितके दिवस राहण्याची इच्छा असेल तितके दिवस कृपया राहू द्या. ' असे म्हणून ते निघून गेले. मी त्यांना इतके आनंदी यापूर्वी केव्हाच पाहिले नव्हते. "

सिंगापूरच्या आय. आय. एल. च्या सभेत रासबिहारी बोस यांनी सुभाषचंद्र बोस यांचे नाव अध्यक्ष म्हणून सुचविले व ते स्वतः लीगचे सुप्रीम कन्सल्टंट झाले. या दोन महान पुढाऱ्यांचे अशा प्रकारे कोणतेही मतभेद न होता एकमत झाले.

१६ मे १९४३ रोजी सुभाषचंद्र बोस आपल्या हॉटेलच्या खोलीत विचारमग्न होते. या इंपीरिअल हॉटेलच्या पलीकडे जपानची राजधानी पसरली होती. ब्रिटिशांच्या विरुद्ध मरण-मारणाच्या जिद्दीने लढण्यासाठी सज्ज झालेल्या शहरात सुभाषचंद्र बोसही सामील झाले होते. जपानला येण्यापूर्वी त्यांच्या मनात अनेक योजना येत होत्या व त्याचाच ते विचार करीत होते. जपानच्या प्रमुखांना भेटण्याची त्यांना फार घाई झाली होती. मातृभूमीच्या मुक्तीसाठी त्यांनी केलेल्या खूप मोठ्या व कष्टप्रद प्रवासाचा शीणही त्यांना वाटत नव्हता. त्यांना एकच निदिध्यास लागला होता. ' चीफ ऑफ आर्मिस्टाफ ', ' मिनिस्टर ऑफ नेव्ही, ' ' चीफ ऑफ द नॅव्हल

ऑपरेशन ' आणि परराष्ट्रमंत्री सिगॅमीटस्यू या सर्वांची भेट घेण्याचा. या सर्वांना भेटण्यात त्यांना काहीच अडचण आली नाही. पण प्रिमिअर टोजो यांना भेटण्यासाठी मात्र दगडी भिंतीला धडक देण्यापेक्षाही अधिक प्रयत्न करावा लागला. मि. टोजो कामातून सवड मिळत नसल्याची लंगडी सबब पुढे करून भेट घेण्याचे टाळत होते. कर्नल यामामोटो हे संपर्क अधिकारी म्हणून काम पाहत होते; पण या परिस्थितीमुळे दोन दगडांच्या कपचीत सापडल्यासारखी त्यांची स्थिती झाली होती. आणि म्हणूनच त्यांनी आपल्या या जागेचा राजिनामा देऊन टाकला. मि. टोजो सुभाषचंद्र बोस यांची भेट घेण्याचे का टाळत होते ? एक कारण असे असू शकेल, की काही लष्करी अधिकारी भारतीय स्वातंत्र्यलढ्याकडे संशयितपणे पाहत होते आणि ते या मार्गात आडवे उभे होते. आणि अधिक महत्वाचे कारण असे, की बँकॉक येथे भरलेल्या सभेमुळे आणि मोहनसिंग यांच्या प्रकरणामुळे स्वतः मि. टोजो हे भारताच्या स्वातंत्र्यलढ्याच्या सर्व प्रश्नांबाबत अत्यंत संशयित व पूर्वग्रहदूषित मनाने वरील प्रकरणाकडे पाहत होते. आर्मी चीफ ऑफ दि स्टाफ व परराष्ट्रमंत्री हे मध्यस्थीची शिकस्त करीत होते; परंतु मि. टोजो हे वज्रासारखे कठीण होते. अखेर १० जून रोजी त्यांनी सुभाषचंद्र बोस यांची भेट घेण्याचे कबूल केले. म्हणजे सुभाषचंद्र बोस टोकिओत आल्यापासून २० दिवसांनंतर त्यांची भेट होणार होती. आणि अखेर मि. टोजोंनी बोस यांची भेट घेतली. या भेटीत त्यांच्या मनातले पूर्वग्रह पार नाहीसे झाले व विशाल पूर्व आशियाच्या युद्धाचा एक महान पुढारी म्हणून ते सुभाषचंद्र बोस त्यांच्याकडे बघू लागले. या भेटीत टोजो यांनी अत्यंत आस्थापूर्वक भाग घेतला. सुभाषचंद्र बोसांच्या बोलण्याने आणि वागण्याने ते प्रभावित झाले. सुभाषचंद्र बोस यांचे व्यक्तिमत्त्व त्यांच्या मनावर ठसले गेले. त्यांची एकाग्रता, हुषारी, योजना सांगण्याची पद्धती, उत्तर देण्याचा एकसूत्रीपणा या गुणांमुळे मि. टोजो यांना बोस यांच्याबद्दल खूपच आदर वाटू लागला. भारत आणि भारतीय लोक यांच्याबद्दलचे त्यांचे सर्व पूर्वग्रह दूर झाले. सुभाषचंद्र बोस यांची पुन्हा भेट घेण्याचे त्यांनी आपणहून मान्य केले. बोसही त्यांच्या कृतज्ञतेने भारावून गेले.

१४ जून रोजी बोस आणि टोजो दुसऱ्यांदा भेटले. या भेटीत दोघांच्या विचारांची देवाणघेवाण झाली व विशाल पूर्व आशियाच्या नव्या उभारणीची मोठी रूपरेषा दोघांच्या समान सहकार्याने तयार करण्यात आली. त्याबरोबरच भारताची पुनर्रचना करण्याचेही एकमताने ठरविण्यात आले. या भेटीच्या वेळी परराष्ट्रमंत्री सिगॅमीटस्यू आणि इतर प्रमुख सरकारी अधिकारी हजर होते. या दुसऱ्या भेटीने सुभाषचंद्र बोस यांची मि. टोजो यांच्यावर आणखी गडद छाप पडली. १६ जून रोजी चालू झालेल्या ' डाएट ' ( जपानी पार्लमेंट ) चे सुभाषचंद्र बोस यांना आमंत्रण होते. त्या प्रसंगी टोजो यांनी केलेल्या ऐतिहासिक भाषणात प्रत्येक राष्ट्राबद्दलचे धोरण, आणि विशाल

पूर्व आशियाच्या सह-उत्कर्षाबद्दल आपले विचार सांगताना त्यांनी सुभाषचंद्र बोस यांच्याकडे दृष्टिक्षेप टाकला, त्यावेळी ते टोजो यांचे ते भाषण अत्यंत लक्षपूर्वक, एकही शब्द न चुकता एकाग्रतेने ऐकत होते. त्या वेळी टोजो आशियाच्या सह उत्कर्षाचे व भारताला स्वातंत्र्य मिळवून देण्याचे कार्य किती निकडीचे व महत्त्वाचे आहे हे सांगत होते. भारत अद्यापही इंग्रजांच्या अमानुष सत्तेखाली भरडला जात असून, त्याकरिता चाललेल्या स्वातंत्र्याच्या तीव्र लढ्यास आम्ही शक्य तेवढी मदत करण्याचा निश्चय केला आहे, असे निश्चयपूर्वक सांगून ते पुढे म्हणाले, की "भारत मुक्त होण्याची वेळ आता दूर नाही. स्वतंत्र भारत आपला उदय आणि विकास करून घेईल, असा आम्हाला विश्वास वाटतो. विशाल पूर्व आशियाचे युद्ध जिंकल्याशिवाय त्याची मुक्तता होणार नाही व जगातल्या एवढ्या मोठ्या भागाचा उत्कर्ष व अभ्युदय होणार नाही. यासाठी विशाल पूर्व आशियाच्या सह-उत्कर्षाची इमारत भक्कमपणे उभी करणे जरूर आहे."

त्या वर्षीच्या मेमध्ये भरलेल्या 'डाएट'मध्ये मुख्य प्रधान टोजो म्हणाले होते, की "भारतीय लोकांना त्यांच्या स्वातंत्र्याच्या लढ्यासाठी उभे करण्याची सुवर्णसंधी लाभत आहे." जानेवारीत त्यांनी जाहीरपणे असे सांगितले होते, की "काही भारतीय लोक ब्रिटिशांच्या विरुद्ध जपानच्या सहकार्याने लढत आहेत." पुढे त्यांनी प्रतिज्ञापूर्वक असे सांगितले, की "हे प्रयत्न पूर्ण यशस्वी होण्यासाठी लागेल त्या सर्व प्रकारची मदत दिली जाईल." सुभाषचंद्र बोस यांच्या व्यक्तिमत्त्वाने व भारताच्या स्वातंत्र्याकरिता ते करीत असलेले निस्वार्थी कार्य पाहून टोजो प्रभावित झाले व त्यांनी पाहिजे ती सर्व मदत भारतीयांना देण्याचे पुन्हा एकदा आश्वासन दिले. अणि यामुळे भारतीय स्वातंत्र्यलढ्यास जपानकडून मिळणाऱ्या मदतीत निर्माण झालेली गुंतागुंत नाहीशी झाली.

याच वेळी सुभाषचंद्र बोस स्वतः लोकांच्यामध्ये प्रगट झाले आणि त्यांनी १९ जून रोजी पहिली 'प्रेस कॉन्फरन्स' बोलाविली. या प्रेस कॉन्फरन्सला साठ जपानी व परदेशी वार्ताहर हजर राहिले होते. एका वृत्तपत्रात त्यांच्याबद्दल माहिती आली होती की "ते उंच आणि सशक्त असून लढवय्या प्रवृत्तीचे आहेत." आणि त्यांचे वक्तव्य आपल्या भाषेत त्यांनी छापले होते, की "बोस म्हणतात, 'मला जपानी भाषेत बोलता येत नाही, तथापि आमच्या शत्रूच्या भाषेत इंग्रजीत मी बोलू शकतो, क्षमस्व!" आणि याप्रमाणे त्यांनी दिलेली निवेदने वाचून दाखविली. त्यांचे पूर्व आशियामध्ये आगमन झाल्यापासूनची ही निवेदने, प्रथमच अधिकृतपणे प्रसिद्ध होत होती. आणि म्हणून या निवेदनांना फारच महत्त्व होते. ही निवेदने खूपच मोठी होती, तथापि त्यांचा खरा हेतू व त्यांचे म्हणणे याची खरी कल्पना यावी म्हणून त्याचा सारांश आम्ही या ठिकाणी उद्धृत करीत आहोत. त्यांच्या निवेदनात आपणाला भविष्य-

काळातील जागतिक परिस्थितीबद्दलचे अचूक निर्णय व त्याचबरोबर त्यांचे राजकीय तत्त्वज्ञानसुद्धा समजून येते.

"भारतात आणि ब्रह्मदेशात ब्रिटिशांचे तुरुंग हेच कित्येक वर्षे माझे घर होऊन राहिले होते. तथापि भारताच्या तुरुंगाच्या गुहेत खितपत पडण्याऐवजी मी आता आपल्यामध्ये, जपानच्या राजधानीत, उभा आहे. भारताच्या स्वातंत्र्याची चळवळ आता विस्तार पावली आहे. माझ्या देशबांधवांच्या सदिच्छेप्रमाणे मी दोन वर्षांपूर्वीच माझा देश सोडला आहे आणि त्या दिवसापासून मी जे कार्य करतो आहे ते सर्व त्यांच्या विचारांस अनुसरूनच करीत आहे. गेल्या महायुद्धाच्या वेळेपासून लुच्चे ब्रिटिश मुत्सद्दी आमच्या पुढाऱ्यांची फसवणूक करीत आहेत. गेली वीस वर्षे आम्ही ब्रिटिशांकडून फसविले जात आहोत. आता यापुढे आमच्या पिढीतील सर्व भारतीय ब्रिटिशांच्या बरोबर स्वातंत्र्याकरिता झगडत आहोत. आणि आम्ही ज्या संधीची वाट पाहत आहोत, ती आता प्राप्त झाली आहे. आणि म्हणूनच आम्ही या संधीचा जास्तीत जास्त फायदा घेणार आहोत. वारंवार ब्रिटिशांच्याकडून असे म्हटले जाते, की चालू युद्ध हे स्वातंत्र्य आणि लोकशाही टिकविण्यासाठी चालू आहे; परंतु तुम्हा सर्वांना माहीत आहे, की अँग्लोसॅक्शन स्वातंत्र्य आणि लोकशाहीबद्दल खूप बोलतात आणि ते प्रत्यक्षात देण्याचे नाकारतात. माझ्या देशबांधवांची मतेही अशीच आहेत. जगातल्या मानवजातींपैकी एक पंचमांश लोकांना ते फसवतात आणि त्यांच्यावर अमानुष, क्रूर, निर्दय अम्मल आणि भीतिदायक दडपशाही करतात."

"आध्यात्मिक अधःपतन, सांस्कृतिक ऱ्हास, भीषण दारिद्र्य आणि राजकीय गुलामगिरी यांव्यतिरिक्त ब्रिटिश साम्राज्यवाद्यांनी भारताला काहीच दिले नाही. आणि म्हणून भारतातील लोकांनी ब्रिटिशांच्या साखळदंडातून आपली मुक्तता होण्यासाठी एकत्र येऊन त्यावर प्रहार केला, तर ती आश्चर्याची गोष्ट नव्हे. भारतीय दृष्टीतून पाहिले तर युद्ध दोन ध्येयवाद्यांच्यामध्ये चालू आहे. ज्या बाजूकडून आमची स्थिती बदलण्याचा प्रयत्न होईल त्या बाजूला आम्ही होणे हेच इष्ट होईल व त्याबद्दल आम्हाला कोणीही नावे ठेवणार नाही. आमची हार्दिक सहानुभूती नव्या विचारांनाच असेल. सद्यः स्थितीत आमचे मनःपूर्वक साहाय्य आणि सहानुभूती आमच्या कल्पनेप्रमाणे असणाऱ्यांनाच आहे."

"अँग्लो-अमेरिकेचा कितीही अपप्रचार झाला, तरी भारतीयांच्या स्वातंत्र्याच्या ध्येयाची आस धरणाऱ्यांनाच विजय प्राप्त व्हावा, अशी आमची प्रार्थना आहे, आणि जर आमच्या ध्येयाची आस धरणाऱ्या 'ॲक्सेस पॉवर्स' चा विजय झाल्यास जुलमी अँग्लो-अमेरिकन साम्राज्यवाद्यांना नाहीसे व्हावे लागेल. ब्रिटिश साम्राज्यवाद्यांचे तुकडे तुकडे होऊन जातील आणि भारत पुन्हा आपले हरण केलेले स्वातंत्र्य मिळवू शकेल."

" आमच्या शत्रूबरोबर युद्ध जाहीर करताना या ' ॲक्सेस पॉवर्स'ने भारत स्वतंत्र व्हावा म्हणून फार मोठी मदत केली आहे. केवळ सहानुभूती दर्शवून गप्प न बसता त्यांनी तत्परतेने फार मोठ्या प्रमाणात मदत दिली आहे. आणि म्हणून आम्ही त्यांचे मनःपूर्वक ऋणी आहोत. तथापि आमचे स्वातंत्र्य आम्ही स्वतःचे रक्त सांडूनच मिळविले पाहिजे. आमच्या त्यागातून, श्रमातूनच आम्हाला स्वातंत्र्य मिळवले पाहिजे, तरच ते आम्ही जतन करू शकू. "

" म्हणून आम्हाला असे वाटते, की आमच्या समाईक शत्रूंच्या विरुद्ध आम्ही या युद्धात सामर्थ्यपूर्ण भाग घेणे जरुरीचे आहे. जर शत्रू आमच्याबरोबर तलवारीने युद्ध खेळत असेल, तर आम्हीही तलवार उपसली पाहिजे व ती आम्ही जरूर उपसू. मग अहिंसक लढ्याचे रूपांतर आपोआपच हिंसक बनल्याशिवाय राहाणार नाही; आणि बहुसंख्य भारतीय जनतेने जर या पद्धतीचा स्वीकार केला तर ही लढाई ते जिंकू शकतील व स्वातंत्र्याचे बक्षीसही मिळवू शकतील. "

" तथापि जरी युद्ध लांबणीवर पडले तरी माझी खात्री आहे, की या 'तीन शक्ती' खात्रीने जय मिळवू शकतील. युरोपमध्ये दुसरी आघाडी उघडण्याची पोकळ वल्गना मी करीत नाही. केवळ पोकळ वल्गना करून मागच्या युद्धात आमच्या शत्रूने जय मिळविला आहे. गेल्या महायुद्धाच्यावेळेस ॲंग्लो–अमेरिकन्सना जी परिस्थिती अनुकूल होती, ती आता राहिली नाही. वॉशिंगटन्‌मध्ये मि. चर्चिल यांनी अशी परिस्थिती असल्याचे जाहीरपणे मान्य केले आहे. आणि म्हणूनच ' ॲक्सेस पावर्स 'ला विजय मिळेलच, यात मला संदेह वाटत नाही. "

" जपानबद्दल भारतीयांच्या काय भावना आहेत हे समजण्यास आपण उत्सुक आहात. जपान हा असा एक देश, आहे की त्याने आशिया खंडावर परकीयांचे आक्रमण होऊ दिले नाही. १९०५ मध्ये जपानने रशियावर विजय मिळवला व ते आशियन शांततेचे अग्रदूत झाले होते. आणि म्हणून भारतीयांना वाटते, की जपानचे सामर्थ्यवान अस्तित्व आशियाच्या पुनर्रचनेसाठी आवश्यक आहे. "

" जपानच्या चीनमधील कृत्यामुळे भारताच्या दृष्टिकोणात काही थोडा बदल होणे शक्य आहे; परंतु पूर्व आशियाबरोबर युद्ध सुरू होण्याच्या सुमारास परिस्थिती फार निराळी होती. आज जपान आमच्या संयुक्त शत्रूबरोबर युद्ध लढवत आहे. चौंकिंग आमच्या शत्रुपक्षाकडे सामील झाले आहेत. कोणताही भारतीय भारताच्या मुक्तीसाठी चाललेल्या लढ्यात सहभागी होतो, तो आपल्या ध्येयपूर्तीसाठी लढणाऱ्या देशांबरोबर मित्रत्वाच्या नात्यानेच वागेल. भारतीय असे विचारतात, की चँग कै शेक सन्माननीय तडजोडीसाठी जपानकडे का गेले नाहीत ? जपानने चीनबद्दल आपले नवे धोरण जाहीर केल्यानंतरही ते ॲंग्लो-अमेरिकन यांचे हस्तक बनून त्यांच्यावर विसंबून राहिले.

गेली चारशे वर्षे भारत व जपान यांचे सांस्कृतिक संबंध असून ते घनिष्ठ राहिले आहेत. भारतात ब्रिटिशांचे राज्य चालू असल्याने हे संबंध अधिक दृढ होतील आणि सहाजिकच भारत-जपान सहकार्याने वागून आपआपल्या देशांत संपूर्ण सुखात व वैभवात राहतील व आपल्या देशाच्या उभारणीसाठी स्वयंपूर्णपणे प्रयत्न करतील."

"मार्च १९४२ पासून मुख्य प्रधान टोजो यांनी भारताबद्दल केलेल्या वक्तव्यात असे दिसून येते, की भारतीयांच्या मनावर त्यांचा खोलवर परिणाम झाला असून, भारताच्या स्वातंत्रलढ्यासाठी त्यांच्यात शक्ती निर्माण झाली आहे."

"जपानी जनतेच्या शौर्यामुळे मला फार आनंद वाटतो. फील्ड ॲडमिरल यामामोटो यांच्या सारख्या शूरवीरांचे उदाहरण म्हणून देता येईलच; पण त्यांचे अर्थव्यवस्थापन आणि इतर क्षेत्रे यांत ते सामर्थ्यवान झाले आहेत."

"शेवटी मला असे म्हणावयाचे आहे, की 'ॲक्सेस पावर्स'च्या विजयावर माझा निश्चित विश्वास आहे आणि यामुळेच ४० कोटी भारतीय जनता गुलामगिरीच्या जोखडातून मुक्त होईल."

# पाच / जपानची प्रतिक्रिया

## बोस आगमनाचा जागतिक वार्तालाप

'फुकुओका क्युश्यु' येथे प्रसिद्ध होणाऱ्या 'निसबिनीपानसिंब्रन' या वृत्तपत्राच्या २० जून १९४३ च्या अंकात नवे वृत्त छापण्यात आले होते. यावरून बोस यांच्या आगमनाची प्रतिक्रिया आपणास समजून येईल.

### (१) मि. सुभाषचंद्र बोस यांचे जपानमध्ये आगमन

मि. सुभाषचंद्र बोस हे मुख्य प्रधानांना आणि इतर सरकारी महत्त्वाच्या पुढाऱ्यांना भेटून त्यांनी भारताच्या प्रश्नाबद्दल महत्त्वपूर्ण चर्चा केली. मि. सुभाषचंद्र बोस हे एके वेळी 'इंडियन नॅशनल कॉंग्रेसचे' अध्यक्ष होते आणि ते भारताच्या स्वातंत्र्य-लढ्याचे प्रमुख पुढारी आहेत. जर्मनीत काही दिवस वास्तव्य करून ते पूर्वआशिया-मध्ये आले असून जपान आणि इतर देशांची मदत घेऊन विशाल पूर्व आशियामध्ये स्वातंत्र्याचा लढा उभा करणार आहेत. १४ जून रोजी ते टोकिओमध्ये येऊन मुख्य प्रधान टोजो यांची त्यांनी नुकतीच भेट घेतली आहे आणि याच वेळी त्यांनी सरकारी नेते व लष्करी प्रमुख अधिकारी यांच्याबरोबर भारताच्या स्वातंत्र्यलढ्याबद्दल चर्चा केली.

### (२) मि. बोस वृत्तपत्रप्रतिनिधींची उद्या भेट घेणार !

दि. २० जून रोजी दुपारी २ वाजता इंपीरियल हॉटेलमध्ये मि. सुभाषचंद्र बोस व त्यांचे सेक्रेटरी हे वृत्तपत्रप्रतिनिधींना भेटतील व त्यांच्यासमोर ते भारताच्या स्वातंत्र्यलढ्याबद्दलचे आपले विचार बोलून दाखवतील. दिनांक २१ रोजी ते भारताला उद्देशून रेडिओवर इंग्रजी, हिंदुस्थानी व बंगाली मधून ते बोलतील. त्यामध्ये ब्रिटिशांची भारतातील दडपशाही आणि स्वातंत्र्यलढा; लढवण्याचा त्यांचा निर्धार ते

बोलून दाखवतील. दिनांक २२ रोजी ते रेडिओवर जर्मनी व हिंदुस्थानीमधून बोलतील.

## ( ३ ) सर्व भारतीय लोकांकडून सुभाषचंद्र बोस यांचे भव्य स्वागत

सुभाषचंद्र बोस यांचा जन्म १८९७ मध्ये कलकत्त्यापासून लांबच्या एका गावी झाला. ते विद्यार्थीदशेत असतानाच केंब्रिज युनिव्हर्सिटीतून ' इंडियन सिव्हिल सर्व्हिस परीक्षा पास झाले. पदवीधर होऊन ते त्याच वर्षी परत आले. त्याच वेळी भारतात ' असहकाराची ' चळवळ म. गांधींच्या नेतृत्वाखाली चालू झाली होती. देशभक्तीने प्रभावित होऊन ते त्या चळवळीत सामील झाले. वयाच्या चोविसाव्या वर्षी ते कॉंग्रेस पार्टीच्या वर्किंग कमिटीवर निवडून गेले. पंचविसाव्या वर्षी ते कलकत्त्याच्या सिटी कौन्सिलवर निवडून आले. मवाळ लोकांचे राजकारण सोडून ते कॉंग्रेसमधल्या ' जहाल मतवादी ' गटात सामील झाले. पं. जवाहरलाल नेहरूही याच गटात होते, तथापि पं नेहरूंच्यापेक्षा ते जहाल मतवादी होते. बंगालमध्ये त्यांना फार मान देत असत. देशातल्या तरुण वर्गाचे ते पुढारी होते व त्यांना म. गांधी पं. नेहरू यांच्या बरोबरीने भारतीय जनतेचे, विशेषतः तरुण वर्गाचे पाठबळ होते. ब्रिटिश सरकारची त्यांच्यावर अत्यंत कडक नजर होती व त्याने त्यांना कित्येकदा अटक करून तुरुंगातही टाकले होते.

१९२७ मध्ये मंडालेच्या तुरुंगात असताना ते आजारी पडले आणि त्या सबबीवर त्यांना मुक्त करण्यात आले. १९३१ मध्ये ते ज्या वेळी कलकत्त्याचे मेयर होते त्या वेळी देशाच्या स्वातंत्र्य मागणीच्या चळवळीचे नेतृत्व करीत असताना ब्रिटिश पोलिसांनी त्यांच्यावर लाठी हल्ला करून, मारझोड करून त्यांना तुरुंगात डांबले. तुरुंगात असूनही ते मेयरचे सर्व कामकाज पाहत होते, हे सर्वश्रुत आहेच. १९३२ मध्ये त्यांची सुटका झाली आणि लगेच पुन्हा अटक झाली. १९३३ मध्ये ते बाहेरच्या देशांत जाणार आहेत या सबबीवर त्यांना मुक्त करण्यात आले. ते प्रथम नॉर्वेमध्ये गेले पण ब्रिटिश भारत सरकारने भारतात परत येण्याबद्दल ताकीद दिल्यामुळे ते मुंबईस परतले आणि त्यांना लगेच अटक करण्यात आली. तुरुंगात असताना ते आजारी पडल्यामुळे पुन्हा त्यांची सुटका करण्यात आली. त्या नंतर पुढच्या काळात ते युरोपच्या प्रवासास निघाले. प्रवासात असताना ब्रिटिश सरकार भारताबद्दलच्या आपल्या धोरणात बदल करीत आहे असे त्यांना वाटले व ते भारतात परत आले. १९३८ मध्ये ते ' इंडियन नॅशनल कॉंग्रेस 'चे अध्यक्ष म्हणून प्रचंड बहुमताने निवडून आले. त्यांचे राजकीय तत्त्वज्ञान हे जहाल मताचे होते व त्यांच्या अंगी लढाऊ वृत्ती होती; आणि म्हणून १९३९ च्या निवडणुकीसाठी कॉंग्रेसची परंपरा मोडून ते उभे राहिले. आणि अखेर ते त्यात विजयी झाले. तथापि मवाळ गटाच्या तीव्र विरोधामुळे त्यांना दोनच महिन्यांत राजीनामा देणे भाग पडले. कॉंग्रेस पक्षात असताच त्यांनी ' फॉरवर्ड ब्लॉक,

गट स्थापन केला आणि ब्रिटिश सरकार बरोबरच्या तडजोडीस सक्त विरोध करण्याचे त्यांनी जाहीर केले. इतकेच नव्हे, तर सर्व उपाय खुंटले तर हिंसेचाही मार्ग अवलंब करण्यात येईल असे त्यांनी सांगितले. १९४० मध्ये त्यांनी 'फॉरवर्ड ब्लॉक'च्या वतीने असहकाराची चळवळ चालू केली आणि लगेच सरकारने त्यांना अटक करून तुरुंगात टाकले. तुरुंगात असतानाच ते सेंट्रल लेजिस्लेटिव्ह असेंब्लीचे सभासद म्हणून निवडून आले. १९४१ मध्ये तुरुंगातून आपली मुक्तता करावी म्हणून त्यांनी उपोषणास आरंभ केला आणि शेवटी त्यांचे म्हणणे मान्य करावे लागले; पण त्यांच्या हालचालींवर सक्त नजर ठेवण्यात आली. अखेर ब्रिटिश सरकारच्या कडक नजर कैदेतून सुटका करून घेऊन ते भारताबाहेर निघून गेले व काबूल मार्गे बर्लिनमध्ये पोहोचले. बर्लिनमधून त्यांनी भारतीय जनतेला स्वातंत्र्याची चळवळ चालू ठेवण्या-बद्दल आवाहन केले. भारतीय जनतेमध्ये सुभाषचंद्र बोस हे फार लोकप्रिय होते. त्यांच्या लोकप्रियतेचे एक उदाहरण म्हणजे, एकदा ते अपघातात निधन पावले अशी खोटीच बातमी प्रसिद्ध झाल्यामुळे देशभर एकच गडबड उडाली. लोक अत्यंत शोकाकुल झाले. म. गांधींनी त्यांच्या कुटुंबियांकडे शोकसंदेश पाठवून दिला; पण ही बातमी खोटी ठरली व लोकांनी आनंदोत्सव साजरा केला आणि म. गांधीनी परत त्यांच्या कुटुंबियांकडे हार्दिक अभिनंदनाची तार केली. म. गांधींच्या सर्व लिखाणात सुभाषचंद्र बोस यांच्याबद्दल लिहिताना ते त्यांना ' भारतीय लढवय्ये ' असे संबोधत.

२० जून रोजी त्यांनी ' इंपीरिअल हॉटेल, टोकिओ 'मध्ये प्रेस कॉन्फरन्स बोलावून एक मोठे निवेदन सादर केले. त्यामध्ये ' ॲक्सेस पावर्स ' ही सध्याच्या परिस्थितीचा शेवट करील अशी घोषणा करून त्यांनी असे प्रतिपादन केले, की अडतीस कोटी भारतीय स्वातंत्र्याकरिता लढत आहेत. जर ही सुवर्णसंधी भारतीयांनी गमावली तर आत्तापर्यंत त्यांनी स्वातंत्र्याचे जे स्वप्न उराशी बाळगले आहे ते केव्हाच खरे होणार नाही. या युद्धात ब्रिटिश साम्राज्यशाहीचा नाश होईल व अमेरिकेचा पराभव होण्याची शक्यता आहे. आणि म्हणून भारतीय जनतेच्या ज्या आकांक्षा आहेत व भारतीय जनता स्वातंत्र्य मिळवण्याकरिता एकाच ध्येयाने प्रेरित झालेल्या ' ॲक्सेस पावर्स ' बरोबरीने रक्त सांडण्यासाठी उत्सुक आहे. ' ॲक्सेस पावर्स ' लाच शेवटी विजय प्राप्त होईल व त्याबरोबरच ब्रिटिश साम्राज्यशाही कोलमडून पडेल आणि भारत स्वातंत्र्य मिळवू शकेल असे त्यांनी घोषित केले. आपल्या निवेदनाच्या शेवटी त्यांनी चँग कै शेक यांच्यावर प्रखर टीका करून चालू असलेल्या इंडो जपानच्या सध्याच्या व भविष्यातल्या संबंधाबाबत आपले विचार मांडले.

## (४) मि. बोस यांची निवेदने वृत्तपत्रांना सादर

सुभाषचंद्र बोस यांनी मागील निवेदने सादर करण्याकरिता प्रेस कॉन्फरन्स

बोलाबली होती. या निवेदनावर झालेल्या देशातील व बाहेरील प्रतिक्रिया खालीलप्रमाणे होत्या.

स्टॉक होम, जून १९ दोमिई—

मि. बोस यांच्या मागील निवेदनास ब्रिटन महत्त्व देत असून, मि. सुभाषचंद्र बोस यांच्या जपान भेटीला फार महत्त्व देत असून त्यांच्या पुढील हालचालींवर लक्ष ठेवीत आहे. तथापि त्यांनी आत्तापर्यंत काहीच निवेदन केले नाही.

बर्लिन, जून १९ दोमिई

ब्रिटिशांना भारतात लष्करी अम्मल अपरिहार्य

सुभाषचंद्र बोस यांच्या जपान भेटीबद्दल व लॉर्ड वेव्हेल यांची गव्हर्नर जनरल म्हणून नेमणूक केल्याबद्दल डी. एन्. बीचे परराष्ट्र घडामोडीचे लेखक डॉ. बोर्न लिहितात—

" भारतीय परिस्थिती माहित असणाऱ्या कोणाही व्यक्तीला हे समजून येईल, की गव्हर्नर जनरलचा बदल म्हणजे ब्रिटिशांची भारतीय जनतेवर लष्करी सत्ता लादणे असेच आहे. आता प्रश्नच राहिला नाही, की वेव्हेल, एक लष्करी मनुष्य हा त्या जागेला भारतीय जनतेवर लष्करी दडपशाही करण्यास अगदी योग्य अशीच व्यक्ती आहे. वेव्हेल यांची गव्हर्नर जनरल म्हणून ब्रिटिश सरकारने नेमणूक केली याचाच अर्थ म्हणजे भारतीय लोकांच्यावर दडपशाही करण्याचा त्यांचा पुढील उद्देश दिसून येतो. मि. सुभाषचंद्र बोस हे जपानमध्ये आले यावरून हे दर्शविले जाते, की ब्रिटिशांच्या विरुद्ध भारतीय स्वातंत्र्यलढ्याला फार मोठी चालना मिळेल. या सर्व परिस्थितीवरून असे वाटते, की जपानचे मुख्य प्रधान टोजो हे आपल्या " डायेट "मध्ये आपले धोरण हे भारताबरोबर सहकार्य करण्याचे आहे, आणि यामुळे जगाची दृष्टी भारतीयांच्या प्रश्नाकडे वळली आहे असे म्हणतात. "

२१ जून रोजी सुभाषचंद्र बोस हे भारतीय लोकांना उद्देशून म्हणाले, " ब्रिटिश शरण येतीलच. आपण बाहेरून आणि आतून लढू या. "

मि. बोस यांचे भारतीयांसाठी नभोवाणीवर भाषण.

भारतीय स्वातंत्र्य लढ्याचे नेते सुभाषचंद्र बोस यांचे जपानमध्ये आगमन झाले असून २१ जून रोजी रात्री १० वाजता टोकिओ रेडिओवर भारतीय जनतेला उद्देशून त्यांनी निवेदन केले : " भारतीय स्वातंत्र्यासाठी प्रत्यक्ष लढ्याची आम्हा सर्वांवर आता वेळ आली आहे. "

२२ जून रोजी सायंकाळी ६–१५ वाजता पुन्हा त्यांचे जर्मन लोकांच्यासाठी भाषण झाले आणि त्याच दिवशी ६–४० वाजता इटालियन लोकांना उद्देशून त्यांचे भाषण झाले. आपल्या भाषणात ते म्हणाले, " ॲक्सेस पॉवर्सच्या खांद्याला खांदा लावून भारतीय लोक आपल्या स्वातंत्र्याचा विजय व्हावा म्हणून लढतील. "

२३ जून रोजी दुपारी २ वाजता सुभाषचंद्र बोस यांचे 'भारत : माझी मातृभूमी' यावर मोठे हृदयस्पर्शी भाषण इंपीरिअल रूल ॲसिटन्स असोसिएशनच्या ४०० सभासदांपुढे झाले. या सभेचे अध्यक्ष ऐब होते. या सभेचे उद्घाटन सॅट्रो नागाकी यांनी केले. त्यांनी मि. बोस यांच्याबद्दल प्रास्ताविक माहिती दिली व भारताच्या स्वातंत्र्याबद्दल चाललेल्या लढ्यास प्रोत्साहन दिले. मि. बोस हे भाषणासाठी व्यासपीठावर येताच जमलेल्या श्रोतृवर्गाने प्रचंड घोष व टाळयांचा गजर केला. आपल्या दोन तासांच्या भाषणात त्यांनी ब्रिटिशांकडून चाललेल्या भारतातील दडपशाहीचा पूर्ण वृत्तांत सांगून भारतीय जनता काय सहन करीत आहे हे निवेदन केले. स्वातंत्र्य लढ्याचा अर्थ व लढयाची माहिती त्यांनी सांगितली. जपानी जनतेलाही त्यांनी सहकार्य करण्याबद्दल विनंती केली. भारतीय स्वातंत्र्याबद्दलच्या त्यांच्या हार्दिक तळमळीने श्रोतृवर्ग भारावून गेला. भारतीय स्वातंत्र्यलढयाबद्दल सर्वत्र फार मोठी उत्सुकता प्रत्येकाच्या मनात निर्माण झाली, हे त्या भाषणाचे महत्त्व होय. त्याच दिवशी आय. आय. एल. चे अध्यक्ष श्री. रासबिहारी बोस हे दक्षिण पूर्व आशियामधून एक वर्षानंतर प्रथमच टोकिओत येत होते. त्यांनी 'सायनो हॉटेल'मध्ये वृत्तपत्र प्रतिनिधींची सभा बोलावली होती आणि त्यात त्यांनी एक जाहिरनामा सादर केला. त्यामध्ये ब्रिटिशांच्या विरुद्ध चाललेल्या लढयात त्यांच्या स्थानाचे स्पष्टीकरण त्यांनी केले. पूर्व आशियातील सर्व भारतीयांच्या ऐक्यावर त्यांनी अधिक भर दिला आणि आशियन जनतेच्या मुक्ततेकरिता जपानची भूमिका त्यांनी स्पष्ट केली.

लिसबर्न, जून २६ दोमिइ

सुभाषचंद्र बोस यांच्या जपान आगमनामुळे

ब्रिटिश सरकारपुढे पेच प्रसंग.

२२ जूनच्या दि टाईम्स ऑफ लंडनच्या अग्रलेखात खालील मजकूर प्रसिद्ध झाला. " सुभाषचंद्र बोस यांचे जपानमध्ये आगमन. ॲक्सेस पॉवर्सच्या क्षेत्रातील वृत्तपत्रे अपेक्षा करीत आहे, की यापुढे त्यांच्या कार्यापासून फार मोठे यश प्राप्त व्हावे. त्यांनी बर्लिन रेडिओवरून केलेल्या भाषणापेक्षा टोकिओ रेडिओवरील त्यांची भाषणे फारच परिणामकारक आहेत. टोकिओमधील त्यांची चळवळ म्हणजे त्यांची वैयक्तिक चळवळ नव्हे, तर भारतीय स्वातंत्र्यलढ्याचे ते बर्लिनहून टोकिओस नेलेले केंद्र आहे. जर्मनी आणि इटली हे भारतीय स्वातंत्र्यलढ्यास साहाय्य करण्यास भौगोलिक व अन्य कारणांमुळे असमर्थ ठरले आहेत. आतापासूनच ते जपानची लष्करी मदत घेण्याचा प्रयत्न करण्यास व त्याचा प्रचार करण्यास सुरुवात करतील."

त्यानंतर काही वृत्तपत्रांत काही गतगोष्टींचा पडताळा आला. त्यांपैकी एक उदाहरण खालीलप्रमाणे.

'एका ब्रिटिश प्राध्यापकाला बोस यांचेकडून मारहाण.'

बातमी अशी आहे की, सुभाषचंद्र बोस टोकिओत आले असून ब्रह्मदेशातील भारतीयांना या आनंददायक बातमीने आश्चर्यचकित केले. या भारतीयांमध्ये ५१ वर्षांचे मि. सतीशचंद्र चणगिरी हे गृहस्थ असून ते मि. बोस यांच्याशी पुन्हा संघटन करणार आहेत. हे यापूर्वी बर्मामधील 'इंडियन इंडिपेंडंट कमिटी'चे माजी अध्यक्ष होते. सध्या ते या कमिटीत आहेत. मि. चणगिरी हे कलकत्त्यातील प्रेसिडेन्सी कॉलेज मध्ये असताना सुभाषचंद्र बोस यांच्या पुढील वर्गात होते व ते त्यांचे मित्र होते. सुभाषचंद्र बोस हे कॉलेजमधील सर्व विद्यार्थ्यांचे प्रमुख व एकमेव पुढारी होते. चणगिरी हे त्यांच्या स्मृती सांगताना म्हणतात, "मि. सुभाषचंद्र बोस हे आपल्या महाविद्यालयीन जीवनातही एक देशभक्त होते. ते सदैव यशस्वी व्हावेत अशीच आम्हा सर्वांची सदिच्छा असे. आणि आता तर ते युरोपमध्ये भारतीय स्वातंत्र्याचे नेते म्हणून उदय पावत आहेत."

त्यांची एक विशेष आठवण मि. चणगिरी सांगतात, की "१९१६ साल चालू होते, त्या वेळी पहिले महायुद्धही चालू होते. आणि मी 'प्रेसिडेन्सी कॉलेज' मध्ये तिसऱ्या वर्षाला होतो. मि. बोस हे १ वर्षाने मागे असून त्यावेळीं त्यांचे वय अठरा वर्षांचे होते. मधल्या सुट्टीच्या वेळी सर्व विद्यार्थी एखाद्या वर्गात गप्पा मारण्याकरिता जमत. मि. बोसही त्यात सहभागी होत. त्यांच्या प्रतिभेने कॉलेजमधील सर्व विद्यार्थी भारावून जात. आणि ते त्यांना आपले पुढारी मानीत. एकदा कॉलेजतर्फे एक चहा-पानाचा कार्यक्रम आयोजित केला होता व त्यास सर्व विद्यार्थ्यांनाही बोलावण्यात आले होते. त्या प्रसंगी एक ब्रिटिश प्राध्यापक मिस्टर इ. एफ. ऑटन् हे भाषण देण्यासाठी उभे राहिले आणि त्यांनी उद्धटपणे भारतातील लोकांच्या चारित्र्याबद्दल अत्यंत तिरस्क-रणीय उद्गार काढले. सर्व विद्यार्थी त्यांचे बोलणे दुरुत्तर न करता मुकाट्याने ऐकत होते. परंतु सुभाषचंद्र बोस हे या सर्वांहून निराळेच होते. मि. ऑटनच्या अपमानकारक उद्गारांनी ते क्रोधाविष्ट झाले आणि मागून येऊन त्यांनी काही एक न बोलता प्राध्यापक ऑटन यांना मारहाण केली व यांना खालच्या मजल्याकडे ढकलून दिले. या प्रकारा मुळे प्राध्यापक ऑटन संतप्त झाले आणि ते कॉलेजमधून बाहेर पडले. या प्रकरणांमुळे सर्व परिसर अवाक् झाला. प्राचार्य जामेस यांनी तत्काळ कॉलेजचे फाटक बंद करण्याचा हुकूम सोडला आणि सर्व विद्यार्थ्यांना कोंडून ठेवले व हल्लेखोर कोण आहे ते शोधून काढण्यास विद्यार्थ्यांना बजावले. शेवटी खालच्या वर्गातील एका विद्या-र्थ्याच्या साक्षीने बोस यांना या प्रसंगाचे हल्लेखोर ठरवण्यात आले. या प्रसंगातून दुसराच एक प्रसंग उद्भवला. गव्हर्नमेंट सुपरिटेंडेंट ऑफ एज्युकेशनने या प्रसंगाला फारच गंभीर स्वरूप दिले आणि या प्रकरणाच्या मुळाशी कोण कारणीभूत आहेत याचा तपास सुरू झाला. त्यांनी प्राचार्यांना शोध घेण्याचा हुकूम सोडला. प्राचार्यांनी या हुकुमाविरुद्ध आपले मत व्यक्त केले. महाविद्यालयाच्या परिसरात

घडणाऱ्या कोणत्याही प्रसंगाबद्दल शोध घेण्याचे व चौकशी करण्याचे काम प्राचार्यांचे असून, त्यांना सुपरिटेंडेंट यांच्या हुकमाची जरुरी नाही असे त्यांनी प्रतिपादन केले. यामुळे दोघांच्यामध्ये क्रोधाविष्ट पत्रोपत्री व वादावादी झाली. यावर हे प्रकरण न थांबता एकदा प्राचार्य जामेस यांचा राग भडकला व त्या भरात त्यांनी सुपरिटेंडेंट यांना चोप दिला आणि मग या सर्वांची परिणती प्राचार्यांच्या बडतर्फीत झाली. सुपरिटेंडेंट यांची चौकशी कमिटीचे प्रमुख म्हणून नेमणूक झाली. या सर्वांचे फळ म्हणून मि. बोस यांना कॉलेमधून काढून टाकण्यात आले. मि. बोस हे कॉलेज सोडून निघाले त्या वेळी त्यांना निरोप देण्यासाठी कॉलेजमधील सर्व विद्यार्थी प्रवेशदारापर्यंत हजर राहिले व त्यांनी शुभेच्छा व्यक्त केल्या आणि हा दिवस म्हणजे 'भारतीय स्वातंत्र्य चळवळीच्या दिनाची सुरुवातच' म्हणावी लागेल. २७ वर्षांपूर्वी भारतीय लोकांचे व्यक्तित्व डागळणाऱ्या एका ब्रिटिश माणसाला मि. बोस यांनी मारले व ठोकरले, आणि आपण आता असे म्हणूया की, मि. बोस यांनी भारतातील सर्व इंग्रज आणि अमेरिकन लोकांना ठोकरून लावावे.

सुभाषचंद्र बोस हे जपानमध्ये आल्यानंतर त्यांनी भारताबद्दल अकस्मात आणीबाणी पुकारल्यामुळे जपानी जनतेची अशी भावना झाली की, '४०० दशलक्ष भारतीय लोकांची वसाहतवाद्यांच्या जोखडाखालून स्वातंत्र्यासाठी लढण्याची आता वेळ आली आहे.' जपानी जनतेमध्ये असे पुष्कळ लोक होते, की ज्यांना भारत स्वतंत्र होण्याची उत्कंठा लागली होती, त्यांपैकी एक जुने लफ्टनंट जनरल हिसीतानी हे त्रेपन्न वर्षांचे गृहस्थ होते. ते फूजीकीचो नाकानोवार्ड टोकिओ येथे राहत होते. भारतात त्यांनी लष्करी दुय्यम परराष्ट्र मंत्री म्हणून बरीच वर्षे काढली होती. ब्रिटिश सत्तेखाली लोकांची स्थिती कशी होती, हे त्यांनी प्रत्यक्ष पाहून आणि ऐकून अनुभवले होते. भारतीय पुढाऱ्यांचा ते एक विश्वसनीय व्यक्ती म्हणून त्यांनी विश्वास संपादन केला होता. त्यांच्या भारतामधील वास्तव्याच्या वेळी ब्रिटिश सरकारने काही गोष्टी कशा होत्या व त्यांनी त्या कशा घडविल्या याबद्दल सांगताना ते म्हणाले,

"मी दोन वर्षे भारतात लष्करी दुय्यम परराष्ट्रमंत्री म्हणून राहिलो होतो. १९२५ ते १९२६ या काळात मी लेफ्टनंट कर्नल होतो. त्यावेळी सर्व भारतभर असंतोषाची लाट पसरली होती आणि या ना त्या ठिकाणी लहानमोठ्या चळवळी सुरू होत्या. ब्रिटिश सत्ताधारी या चळवळी अत्यंत निर्दयपणे दडपशाही करून अयोग्य कायद्याने दडपून टाकत असत. भारतीय लोक सभ्य व शांत प्रवृत्तीचे आहेत. भारत हा निसर्गसौंदर्याने नटलेला आहे. असा हा देश ब्रिटिशांचे भक्ष्य झाला आहे. म. गांधींनी देशभक्तीची ज्योत १९३० पासून प्रज्वलित केली आहे आणि तिने सर्व देशभर वडवाग्नी पेटविला आहे. आणि त्याचे रूपांतर ब्रिटिश वसाहतवाद्यांच्या पासून भारताची मुक्तता होण्यासाठी मोठ्या चळवळीत होत आहे. प्रथमतः ब्रिटिशांनी

लष्करी सामर्थ्याने भारत जिंकला नसून, भारतीय लोकांच्या दुफळीमुळे ब्रिटिशांना वाव मिळाला. आता भारतातील लोकांना सर्व परिस्थितीचे आकलन झाले असून, त्यांची ब्रिटिशांच्या अंमलातून सुटका करून होण्यास फार विलंब झाला आहे. आणि म्हणून म. गांधींनी असहकाराच्या चळवळीस प्रारंभ केला आहे. जपानच्या सहकार्याने ब्रह्मदेश, शांतता आणि सुव्यवस्था पुन्हा प्रस्थापन करण्याकरिता स्वातंत्र्याच्या उंबरठ्यावर उभा आहे, त्याप्रमाणे भारतही उभा राहील, यात शंका नाही.

" सुभाषचंद्र बोस जर्मनीमध्ये काही दिवस राहून जपानमध्ये आले आहेत. मला असे वाटते, की त्यांच्या जपानमधील आगमनामुळे भारतीय स्वातंत्र्याची वेळ जवळ आली आहे. आमच्या सहकार्याने पूर्व आशिया खंडातील हजारो, लाखो भारतीय स्वातंत्र्य प्राप्त करून घेण्यासाठी जोरदार तयारी करीत आहेत आणि आता प्रत्यक्ष उठाव करण्याची वेळ आली आहे. "

# सहा / कार्याचा प्रचंड उठाव

## जपानी जनतेला संदेश : सिंगापूरला आगमन

नेताजी सुभाषचंद्र बोस यांनी अत्यंत काळजीपूर्वक तयार केलेली स्वतंत्र भारताच्या हंगामी सरकार स्थापनेची योजना जपानी नेत्यांना जपान सोडण्याच्या शेवटच्या दिवशी सादर केली. या गोष्टीला अत्यंत महत्त्व होते. तथापि जपानने या कल्पनेस तत्काळ प्रतिसाद दिला नाही. तरी पण त्यांनी शांतपणा दाखवून त्यांच्या-वर कोणत्याही प्रकारचे दडपण आणले नाही. जपानमधील चाळीस दिवसांच्या वास्तव्यानंतर ते टोकिओहून प्रयाण करणार होते. प्रयाणापूर्वीच दि. २८ जून १९४३ रोजी त्यांनी जपानी जनतेसाठी ध्वनिक्षेपित करण्याकरिता खालील संदेश तयार करून ठेवला होता.

" चाळीस वर्षांपूर्वी मी ज्यावेळी प्राथमिक शाळेत जात होतो त्यावेळी जपान हा एक आशियाखंडात अत्यंत बलाढ्य देश आहे, अशी मला जपानची प्रथम ओळख करून देण्यात आली होती. जपानने रशियन देशांबरोबर युद्ध खेळून त्यात त्यांचा पराभव केला होता व जपानच्या विजयाची वार्ता सर्व भारतभर पसरताच भारतीयांना आनंदमिश्रित आश्चर्याचा धक्का बसला होता. मुकडन, पोर्ट ऑर्थर येथे आणि जपानी समुद्रात झालेल्या युद्धाबद्दल भारतीय लोक कौतुकाने बोलत होते. त्या वेळेपासून भारतीय तरुणांच्यामध्ये जपानचे ॲड. टोजो आणि जननोगी यांच्या प्रतिमा लक्षात राहिल्या आहेत. तेनसिन् ओखाकुरा यांच्या भारतभेटीमुळे ' जपानसह सर्व आशिया खंडाचे रक्षण करा ' या तत्त्वज्ञानाला चालना मिळाली. 'आशिया एकच आहे ' या तत्त्वाचे ते अग्रेसर पुरस्कर्ते होते.

" मी जपानमध्ये आल्यापासून ज्या ज्या ठिकाणी गेलो तेथे तेथे माझे हार्दिक स्वागत झाले. हे स्वागत म्हणजे ब्रिटिशांच्या जोखडाखाली भरडणाऱ्या आणि

स्वातंत्र्यासाठी लढणाऱ्या ४०० दशलक्ष भारतीयांच्याबद्दल जपानी जनतेने दाखवलेली सहानुभूती होय. आणि या दाखवलेल्या सहानुभूतीबद्दल मी आपल्या सर्वांचा अत्यंत आभारी आहे. भारतीय जनतेच्या वतीने मी आपणांस आश्वासन देतो, की जपानी जनतेने दाखवलेली आमच्या स्वातंत्र्यलढ्याबद्दलची सहानुभूती आम्ही कधीही विसरणार नाही. जपानने आमच्या संयुक्त शत्रूंचा पराभव करून भारतीय स्वातंत्र्य-लढ्याची सुवर्णसंधी आम्हाला मिळवून दिली आहे. भारतीय जनता त्याबद्दल फार दक्ष आहे, आणि योग्य ती जाण त्यांना आहे. आम्ही ही संधी दवडली तर पुन्हा अशी संधी शंभर वर्षांतही येणार नाही. आम्ही या वेळेचा फायदा घेण्यात कुचराई करता कामा नये. आम्ही विजय मिळवू व त्याबरोबर भारताचे स्वातंत्र्यही मिळवू. मी तुम्हाला सांगू इच्छितो, की भारतीय जनता ब्रिटिश सरकारच्या पाशवी अत्याचाराने भरडली जात असून त्यांच्या फसव्या प्रचाराने काही लोक अयोग्य मार्गाने जात आहेत. तुम्ही सर्वांनी ब्रिटिशांच्या प्रचारावर अतिशय दक्षतेने नजर ठेवली पाहिजे व त्यात फसता कामा नये. आज भारतात जात अथवा धर्म यामुळे दुजाभाव निर्माण होणार नाही. नव्या भारताच्या सर्व जनतेला स्वातंत्र्य हवे आहे. हा नवा भारत आपल्या संयुक्त शत्रूबरोबर लढण्यासाठी जपानबरोबर सहकार्य करीत आहे."

टोकिओ सोडण्यापूर्वी दि. २१ जून रोजी सुभाषचंद्र बोस यांना डॉ. बा. माव यांची ब्रह्मदेशातून एक तार आली, त्यामध्ये म्हटले होते, की "आपण जर्मनीहून पूर्वेस परत आल्याबद्दल मी आपले हार्दिक अभिनंदन करतो. आपण टोकिओहून जे पहिले निवेदन प्रसिद्ध केले. त्यामुळे येथील भारतीय लोकांच्यामध्ये धैर्य आणि आशा निर्माण झाल्या आहेत. भारतीय आणि ब्रह्मदेशाची जनता या संबंधीची फार दिवसा-पासून वाट पाहत आहे. आम्हीही सिद्ध होण्याची वेळ आता आली आहे. स्वातंत्र्या-करिता आणि राष्ट्रीय सन्मानाकरिता ब्रह्मदेश आपल्या बरोबरीने व आपल्या बाजूने लढण्याची प्रतिज्ञा करीत आहे."

नेताजींनी बरीच वर्षे ब्रह्मदेशाच्या तुरुंगात काढली होती आणि त्यामुळे त्यांच्या मनात ब्रह्मदेशाबद्दल सहानुभूतीचा किरण होता. डॉ. बा. माव यांच्या संदेशाने नेताजी भावनाविवश झाले. बा. माव हे नेताजींच्या विचारांशी सहमत झाल्याने ते अत्यंत उल्हसित झाले व दक्षिण पूर्व आशियाकडे रवाना झाले.

(अ) आय्. आय्. एल. चे अध्यक्ष म्हणून कार्यास सुरुवात.

२७ जून रोजी नेताजी सुभाषचंद्र बोस हे रासबिहारी बोस यांच्यासह सिंगापूर मध्ये आले. ब्रिटिशांचे पूर्वीचे ते एक फार महत्त्वाचे स्थान होते. त्यांच्या स्वागता-करिता आय्. आय्. एल. चे प्रमुख पुढारी, आय. एन्. ए. चे अधिकारी आणि शहरात राहणारे भारतीय रहिवासी मोठ्या संख्येने हजर होते. त्याचबरोबर जपानी

लष्कर प्रमुख आणि ‘ हिकारी किकान ’ हेही हजर होते. बोस यांचे उत्स्फूर्त स्वागत झाले. ४ जुलै रोजी आय. आय. एल. ची सभा सिंगापूर येथील ग्रेट ईस्ट एशिया थिएटरमध्ये भरविण्यात आली. त्यावेळी सदिच्छा दर्शविण्यासाठी सात भारतीय मुलींनी त्यांना पुष्पगुच्छ अर्पण केले. सर्व लोकांनी उभे राहून भारतीय राष्ट्रगीत म्हटले. त्यानंतर भारतीय गायिका कु. सरस्वती यांनी ‘ सुभाषजी ! सुभाषजी ! ’ हे नवे काव्य म्हणून दाखवले. या समारंभाची सुरुवात रासबिहारी बोस यांच्या भाषणापासून झाली. त्यांनी व्यासपीठावर येऊन श्रोतृवर्गाला उद्देशून भाषण केले. त्यांनी आपल्या भाषणात जपानमध्ये असताना सर्वतोपरी मदत मिळाल्याचे सांगून ते पुढे म्हणाले, “ आय. आय. एल. मध्ये अत्यंत महत्त्वाचे बदल घडून आले आहेत. आय. आय. एल. चा मी स्वखुशीने व आनंदाने राजीनामा दिला असून, मि. सुभाषचंद्र बोस हे नवे अध्यक्ष झाले आहेत, असे मी जाहीर करतो. ” श्रोत्यांनी टाळयांच्या गजरात या गोष्टीचे हार्दिक स्वागत केले व आपले हात उंचावून आपले संपूर्ण सहकार्य असल्याचे दर्शविले. सुभाषचंद्र बोस व्यासपीठावर आले व त्यांनी श्रोत्यांना आपले भाषण ऐकविले. ते म्हणाले, “ मि. रासबिहारी बोस पूर्व आशियातील भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील नेते यांनी नवा पुढारी म्हणून माझे नाव सुचविल्याबद्दल मी आभार मानतो. मी ही जबाबदारी स्वीकारली आहे. आता स्वातंत्र्यप्रेमी भारतीयांनी उठाव आणि कृती करण्याची वेळ आली आहे. पूर्व आशियातील आमच्या सर्व देशबांधवांना मी आवाहन करीत आहे, की त्यांनी एकत्र येऊन कठीण अशा लढ्यासाठी नव्या पुढाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली सिद्ध व्हावे. ब्रिटिश सरकार आपल्या स्वार्थाकरिता भारतीय लोकांच्या माना युद्धात आणि युद्धानंतरही आवळल्या वाचून राहणार नाही. वेव्हेल यांची गव्हर्नर जनरल म्हणून नेमणूक केल्यावरूनच त्यांचे धोरण समजते. नवे गव्हर्नर जनरल लष्कराची दडपशाही करून भारतावर हुकूमशाही लादणार आहेत. ब्रिटिश सरकार भारताला ब्रिटनबरोबर समझोता करण्यास भाग पाडेल १९४२ मध्ये याची पुनरावृत्ती झाली आहे. विशेष प्रतिनिधी मि. क्रिप्स यांनीही अशा प्रकारची एक योजना आणली होती. त्यांनी हे समजून घेतले नाही, की गेल्या पंच्याऐंशी वर्षापूर्वीच भारताचे स्वातंत्र्ययुद्ध सुरू झाले आहे. गेल्या वर्षी मोहनदास करमचंद गांधी यांना ब्रिटिश सरकारने पकडून तुरुंगात टाकले आहे. ऑगस्ट १९४२ हे भारतीय स्वातंत्र्यचळवळीच्या इतिहासातील एक मोठे अविस्मरणीय महापर्वच झाले आहे. स्वातंत्र्य लढा हा अहिंसेच्या तत्त्वाने चालू झाला आणि पुढील पर्वात त्यास असहकाराच्या चळवळीचे स्वरूप प्राप्त झाले. ब्रिटिश साम्राज्यशाहीच्या विरुद्ध आता सशस्त्र उठाव करण्याचा नव्या संघटनेचा उद्देश आणि ध्येय आहे, आणि हे शक्य होण्यासाठी आमचा सर्व उत्साह व शक्ती आम्ही एकत्रित करीत आहोत आणि स्वतंत्र भारताचे एक हंगामी सरकार बनविण्याच्या योजना तयार

करीत आहोत. जर आम्ही आमच्या क्रांतीने ब्रिटिशांना आणि अमेरिकेला भारता-बाहेर हाकलून लावण्यात यशस्वी झालो, तर आमच्या हंगामी सरकारचे कार्य संपले असे समजून आम्ही ते बरखास्त करू. त्यानंतर भारतीय जनतेच्या इच्छेप्रमाणे कायम स्वरूपाचे सरकार स्थापन करू आणि त्यानंतर या हंगामी सरकारची सर्व सूत्रे नव्या सरकारकडे सुपूर्द करू."

जपान, जर्मनी आणि इटली यामधील सहकार्याचा उल्लेख करून ते म्हणाले, "जेव्हा आमच्या स्वातंत्र्य लढ्याची शेवटची तयारी पूर्ण होईल तेव्हा आम्ही जपान, जर्मनी व इटली यांच्या बरोबरीने आम्हा सर्वांचे शत्रू असलेल्या ब्रिटन अमेरिका यांच्या बरोबर लढण्यासाठी संयुक्त आघाडी निर्माण करू. या संयुक्त आघाडीत भाग घेतल्यामुळे आम्ही मुक्ती व स्वातंत्र्य मिळविण्यास पात्र ठरणार आहोत. केवळ आमच्या प्रयत्नाने व त्यागाने आमच्या शक्तीचा विकास करून आम्ही आमचे स्वातंत्र्य टिकवावयाचे आहे."

नेताजींनी मोहिमेला सुरुवात करताना स्पष्ट सांगितले, की "भारतीय स्वातंत्र्यलढा हा स्वेच्छेने व स्वयंसिद्ध विकसित झाला आहे आणि तो 'ॲक्सेस पावर्स' बरोबर स्वयंप्रेरणेने आपल्या संयुक्त शत्रूशी लढण्यासाठी सहकार्य करीत आहेत. कोणत्याही स्थितीत तो दुसऱ्या राष्ट्राचे बाहुले बनणार नाही."

समारोप करताना ते म्हणाले, "खरी गोष्ट सांगायची, तर आमचा शत्रू प्रबळ आहे आणि तो निर्दय असून मुर्दाड आहे, म्हणून त्याच्याबरोबर लढण्यासाठी आम्हाला आमची तयारी जोरदार व भक्कम केली पाहिजे. आपल्या अखेरच्या स्वातंत्र्य-लढ्यासाठी आपणाला अत्यंत कठीण परिस्थितीत तहानभूक, कष्ट, हालअपेष्टा या सर्वांना तोंड दिले पाहिजे. मला खात्री आहे, की तुम्ही सर्व या परिस्थितीला खंबीरपणे तोंड द्यालच आणि आपल्या पितृदेशाला स्वातंत्र्य व प्रगती मिळवून द्याल."

आपल्या वक्तृत्वाने आणि प्रामाणिकपणे दिलेल्या भाषणाने त्यांनी सर्व श्रोतृवर्गाची मने जिंकली.

नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या भाषणाबद्दल मुख्यप्रधान टोजो यांनी अभिनंदनाची तार पाठविली. मुख्य प्रधान टोजो यांना उत्तरादाखल आभाराची तार पाठवण्यापूर्वी रासबिहारी बोस यांची आय्. आय्. एल. चे 'सुप्रिम कन्सलटंट' म्हणून नेमणूक केल्याबद्दलचा ठराव पास करून घेतला आणि या कामकाजानंतर सभा बरखास्त केली.

त्याच दिवशी दोन प्रहरी नेताजी सुभाषचंद्र बोस यांना रासबिहारी बोस यांच्या समवेत जनरल तेराउछी साऊदर्न आर्मि कमांडर इन् चीफ यांचे त्यांच्या निवास-स्थानी भेटण्यास आमंत्रण आले. हे निवासस्थान दीडएक वर्षांपूर्वी ब्रिटिश गव्हर्नर जनरल वापरीत असे. प्रवेशद्वाराजवळील पायऱ्या चढताना नेताजी मोठ्या उत्साहाने

भराभर चढून वर गेले. जनरल तेराऊछींनी नेताजींचे आपले बाहू पसरून स्वागत गेले, रासबिहारी बोस यांच्या पाठीवर थोपटून त्यांचेही स्वागत केले व त्यांनी पुढील कार्यात यशस्वी व्हावे म्हणून सदिच्छा प्रगट केली. तेराऊछींनी आपल्या अपेक्षा थोडक्यात पण असंदिग्धपणे सांगून नेताजींच्यावर आपला विश्वास व्यक्त केला. नेताजी व जपानचे जनरल जुन्या मित्राप्रमाणे वागले. नेताजींनी या विश्वासू जनरल-पासून स्फूर्ती घेतली आणि भारतीय स्वातंत्र्याकरिता अखेरपर्यंत लढा देण्याबद्दलचा आपला निर्धार व्यक्त केला.

नेताजी सुभाषचंद्र बोस यांनी भारतीय स्वातंत्र्यलढ्याचा पुढाकार घेतल्यानंतर ५ जून रोजी ' सिटी हॉलच्या ' पुढील भव्य चौकात आझाद हिंद सेनेची मानवंदना घेतली. कमांडर भोसले यांच्या नेतृत्वाखाली हजारो भारतीय लष्करी तुकड्या आपल्या नव्या नेत्यावर निष्ठा दाखवून वचनबद्ध होत होत्या. प्रखर उन्हात लष्करी आवेशात उभे राहून नेताजींनी लोकांना आणि लष्कराला उद्देशून स्फूर्तिदायक भाषण केले. ते म्हणाले, " आजचा दिवस माझ्या आयुष्यात मोठ्या अभिमानाचा आहे. आज भारतीय मुक्तिसैन्य प्रत्यक्ष अस्तित्वात येत आहे, हे जगाला सांगण्याचे अदभुत भाग्य मला लाभत आहे या बद्दल देवाचे आभार मानायला पाहिजेत. ह्या फौजेचे रूपांतर सिंगापूरच्या रणक्षेत्रावर जाण्यापूर्वी मोठ्या लष्करांत केले जाईल, आणि हे वीर ब्रिटिश साम्राज्यापुढे भव्य तटबंदीप्रमाणे उभे ठाकतील. केवळ ब्रिटिशांच्या जोखडाखालून भारताची मुक्ती करण्याकरिता हे लष्कर नसून, ते स्वतंत्र भारताचे संस्थापक लष्कर व राष्ट्रीय लष्कर होऊन राहणार आहे, प्रत्येक भारतीयाला हे लष्कर म्हणजे त्याच्या स्वतःच्या राष्ट्राचे सैन्य असे वाटेल. ही संपूर्ण लष्करी संघटना भारतीय पुढाऱ्यांच्या हाती असेल आणि ज्यावेळी ऐतिहासिक युद्धाचा क्षण निर्माण होईल त्यावेळी ती भारतीय अधिपत्याखाली युद्धास सिद्ध होईल.

" एके काळचे लोक असे म्हणत की ब्रिटिश साम्राज्यावरील सूर्य केव्हाच मावळत नाही, ते राज्य नष्ट होणार नाही. पण ही गोष्ट साफ खोटी आहे. अशा गोष्टीवर मी विश्वास ठेवीत नाही. इतिहासाने मला असे शिकवले आहे, की प्रत्येक साम्राज्याला मोडून नष्ट होणे अपरिहार्य आहे. मी असे प्रत्यक्ष पाहिले आहे की नष्ट झालेल्या साम्राज्याची मोठी शहरे, किल्ले आणि त्यांच्या भव्य तटबंद्या यांच्या स्मशानभूमी झाल्या आहेत. ब्रिटिश साम्राज्याच्या थडग्यावर उभे राहून एकादे लहान मूल सांगेल, की ब्रिटिश साम्राज्य ही एक इतिहासकालीन गोष्ट आहे.

" १९३९ मध्ये जेव्हा फ्रान्सने जर्मनीबरोबर युद्ध पुकारले आणि मोहिमेला सुरुवात झाली, त्यावेळी जर्मन सैनिकांनी एकच घोष केला " चलो पॅरिस ! चलो पॅरिस ! " त्याचप्रमाणे ब्रह्मदेशाच्या निप्पॉनचे शूर सैनिक युद्धासाठी बाहेर पडले त्या वेळीही ' चलो सिंगापूर ! ' ही घोषणा त्यांनी उच्चारली. सैनिक भाई हो, तुमची युद्धघोषणा

'चलो दिल्ली' 'चलो दिल्ली' ही आसमंतात घुमवा. या युद्धात आपल्यापैकी मागे किती जिवंत राहतील ते मला माहीत नाही; परंतु मला हे माहीत आहे, की अखेर विजय आमचाच आहे. एवढे करून आमचे समाधान होणार नाही, तर आमच्यातील जे मागे राहिले आहेत ते ब्रिटिश साम्राज्याच्या पुरातन दिल्लीतील लाल किल्याच्या थडग्यावर विजयाची मानवंदना घेतील.

" माझ्या सर्व सार्वजनिक कार्यात मला नेहमी वाटत असे, की भारत स्वातंत्र्यासाठी सर्व बाजूंनी तयार झाला असला, तरी एका गोष्टीची उणीव आहे आणि ती म्हणजे 'मुक्तिलष्कराची!' अमेरिकेचे जॉर्ज वॉशिंग्टन यांनी लढून स्वातंत्र्य मिळविले. कारण त्यांच्या पाठीमागे सशस्त्र सैनिक होते. गॅरीबाल्डी यांनी आपल्या स्वयंसेवकांच्या जोरावर इटलीचे स्वातंत्र्य मिळविले. भारताची पहिली राष्ट्रीय लष्करी संघटना करण्यात तुम्ही पुढे झालात हा तुमचा हक्क आणि सन्मान आहे. यामुळे तुम्ही तुमच्या स्वातंत्र्याच्या मार्गातील अडथळे दूर केले आहेत. एका थोर आणि भव्य कारणासाठी आघाडीच्या पहिल्या रांगेत तुम्ही अग्रेसर झालात याबद्दल तुम्हाला स्वाभिमान आणि सौख्य वाटेल.

" मी तुम्हाला स्मरण देत आहे, की तुम्हाला दुहेरी कार्य करावयाचे आहे. तुम्ही तुमच्या शस्त्रबळावर आणि रक्त सांडूनच स्वातंत्र्य मिळविले पाहिजे. आणि जेव्हा भारत स्वतंत्र होईल तेव्हा तुम्ही स्वतंत्र भारताची कायम स्वरूपाची लष्करी संघटना करावयाची आहे आणि सदैव देशाच्या स्वातंत्र्याचे रक्षण करावयाचे कामही तुमचेच आहे. आणि म्हणून आम्ही आपले राष्ट्रीय संरक्षण अतूट व भक्कम पायावर उभे केले पाहिजे. पुढील इतिहासकाळातही आमचे स्वातंत्र्य कोणीही हिरावून घेता कामा नये. सैनिक म्हणून तुम्ही तीन उद्देश सतत लक्षात ठेवले पाहिजेत आणि ते आचरणात आणले पाहिजेत. आजचे आपल्यापुढील उद्देश असे : देशाबद्दल अत्यंत प्रामाणिकपणा. नेमून दिलेले कर्तव्य अत्यंत चोख व आपली शक्ती एकवटून पार पाडणे. आणि अंतिम त्याग. जे सैनिक आपल्या राष्ट्राशी नेहमी प्रामाणिक राहतात, जे सदैव त्यागाला तयार असतात, तेच अजिंक्य होतात. तुम्हाला सुद्धा अजिंक्य व्हावयाचे असेल, तर ही तीन वचने तुम्ही तुमच्या मनात खोल कोरून ठेवली पाहिजेत.

" खऱ्या सैनिकाला लष्करी शिक्षणाबरोबर अध्यात्मिक शिक्षणही दिले पाहिजे. तुम्ही सर्व स्वतः आणि तुमचे अधिकारी यांनी आपल्यात अमर्याद आत्मविश्वास निर्माण केला पाहिजे व तसे करण्यास स्वतः शिकले पाहिजे. यामुळे तुम्ही शत्रूपेक्षा कितीतरी वरचढ असल्याचे तुम्हास वाटेल. तुम्ही मृत्यूपुढे निर्भय व्हाल आणि जेव्हा एकादा आणीबाणीचा क्षण निर्माण होईल त्यावेळी तुम्ही स्वतः निर्णय घेण्यास समर्थ व्हाल. या चालू युद्धाच्या काळात तुम्ही स्वतः तुमच्या डोळयांनी पाहिले आहे, की शास्त्रीय चमत्कारिक शिक्षण, धैर्य, निर्भयपणा हे सर्व तुम्हाला आत्मसात करावे

लागतेच; पण तुम्हाला जे जे शक्य असेल ते सर्व शिक्षण तुम्ही घेतले पाहिजे आणि आपल्या भारत देशासाठी एक उत्तम, निर्विवाद, आधुनिक आणि पहिल्या नंबरचे लष्कर तयार करावयास पाहिजे.

" तुमच्यापैकी काहीजण अधिकारी आहेत. त्यांची जबाबदारी फार मोठी आहे. जगातल्या सर्व लष्करी अधिकाऱ्यांची जबाबदारी खरोखर फार मोठी असली, तरी त्यापेक्षाही मोठी जबाबदारी तुमच्याबाबत आहे. याचे कारण आपली राजकीय गुलामगिरी होय. आम्हाला स्फूर्तिदायक असे ' मुखडेन ' ' पोर्टऑर्थर ' किंवा ' रोडन ' अशासारखे प्रसंग झाले नसले, तरी ब्रिटिशांनी आम्हाला शिकवू नयेत अशा काही गोष्टी आम्हाला शिकविल्या आहेत. काहीही असो, मला पूर्ण विश्वास वाटतो की योग्य वेळी तुम्ही उभे ठाकालच. तुमच्या देशबांधवांनी तुमच्या शूर खांद्यावर ठाकलेली जबाबदारी तुम्ही पूर्णपणे पेलू शकाल. हे लक्षात ठेवा की लष्करी अधिकारी काहीही करू शकतो अगर न करू शकतो, आणि हेही लक्षात ठेवा, की ब्रिटिशांनी अनेक ठिकाणी त्यांच्या नालायक अधिकाऱ्यांमुळे मोठे पराजय पत्करले आहेत. स्मरणात असू द्या, की तुमच्यातूनच भावी स्वतंत्र भारताचा ' जनरल स्टाफ ऑफ आर्मी ' निर्माण होणार आहे.

" तुम्हा सर्वांना मला असे सांगावयाचे आहे, की या युद्धातूनच तुम्हाला अनुभव घ्यावयाचे आहेत. विजय मिळवावयाचे आहेत आणि या सर्वांतूनच तुमची राष्ट्रीय परंपरा निर्माण होणार आहे. ज्या सैन्याला धैर्याची, निर्भयपणाची आणि अजिंक्यपणाची परंपरा नाही, ते सैन्य प्रबल शत्रूपुढे ठिकाव धरू शकणार नाही.

" भाई हो ! तुम्ही स्वयंस्फूर्तीने हे कार्य अंगीकारले आहे ते मानवी मनाचा थोरपणा दाखवणारे आहे. या पवित्र कार्याच्या परिपूर्तीसाठी कोणताही त्याग विशेष नाही. आज तुम्ही भारताच्या मानबिंदूचे रक्षक आहात. तुम्ही स्वतः तुमच्या वर्तनाने तुमच्या देशबांधवांचे आशीर्वाद मिळवा आणि पुढील पिढीला तुमच्याबद्दल अभिमान वाटेल असे वागा.

" मी आत्ताच म्हणालो, की आजचा दिवस माझ्या आयुष्यातील अभिमानाचा आहे. गुलामगिरीतून मुक्त झालेल्या लोकांना मुक्ती लष्करातील पहिला सैनिक होण्याचा आनंद कोणत्याही अभिमानापेक्षा, कोणत्याही सन्मानापेक्षा मोठा आहे. परंतु या सन्मानाबरोबरच फार मोठी जबाबदारीही येते आणि याची मला पूर्ण जाणीव आहे.

" मी तुम्हाला असे आश्वासन देतो, की मी तुमच्याबरोबर अंधःकारात आणि प्रखर सूर्यकिरणांत, दुःखात आणि सुखात, कष्टात आणि विजयात असेनच; पण आता या स्थितीत मी तुम्हाला भूक, तहान, उपासमार, सक्तीची चढाई आणि मृत्यू याखेरीज काहीही देऊ शकत नाही, आणि जर तुम्ही माझ्या पाठीमागून जीवनमृत्यू बरोबर झगडून याल, तर आणि मला विश्वास वाटतो, की तुम्ही यालच. आणि मी

तुम्हाला विजय आणि स्वातंत्र्याप्रत घेऊन जाईन. भारताचे स्वातंत्र्य पाहण्यास आम्ही कोणी जगू किंवा मृत्यू पावू हा प्रश्नच नाही. भारताला स्वतंत्र होण्यासाठी आमच्या जवळ असलेले सर्व काही आम्ही मुक्तपणे देण्यास सिद्ध आहोत. ईश्वर आमच्या लष्कराला चैतन्य देवो आणि चालू युद्धात आम्हाला विजय मिळो !

जय–हिंद ! जय–हिंद ! जय–हिंद ! ”

६ जुलै रोजी मुख्य प्रधान टोजो हे दक्षिण दौऱ्यावर मलाया व थायलंडला जात असता वाटेत सिंगपूरला उतरले. नेताजींनी मुख्य प्रधान टोजो यांना भेटण्याची संधी घेतली. जपानच्या पहिल्या भेटीपासून त्यांचे मित्रत्वाचे संबंध होते.

आझाद हिंद सेनेची मानवंदना घेण्यासाठी टोजोंना नेताजींनी आमंत्रण दिले. तत्पूर्वी ही मानवंदना त्यांनी घेतलीच होती. त्याच वेळी आझाद हिंद सेनेला सुसज्ज करण्यासाठी पुढे सर्वतोपरी सहकार्य देण्याची त्यांनी विनंती केली होतीच.

९ जुलै रोजी एक शिबिर आयोजित करण्यात आले. त्यामध्ये सिंगापूर येथे राहणाऱ्या सर्व भारतीयांनी भाग घेतला. त्यावेळी आपल्या भाषणात नेताजी सुभाषचंद्र बोस म्हणाले, “ भारताबाहेरील सर्व भारतीय लोक, विशेषतः जे पूर्व आशियांत राहत आहेत ते, ब्रिटिशांच्या ज्या लष्करी तुकड्या भारतात आहेत त्यांच्याबरोबर लढत देण्यासाठी बलाढ्य असे लष्कर निर्माण करीत आहेत, आणि त्याचबरोबर एक हंगामी सरकारही निर्माण करीत आहेत. त्यांचे एक महत्त्वाचे काम असे असेल, की भारतीय जनतेने उपलब्ध करून दिलेल्या प्रत्येक गोष्टी एकत्र करून भारतातील ब्रिटिशांच्या लष्करीं तुकड्यांना नामोहरम करणे व ब्रिटिश सत्ता भारतातून नष्ट करणे. ” आपल्या भाषणाचा समारोप करताना ते म्हणाले, “पूर्व आशियामधील तीन लक्ष भारतीयांच्यापैकी प्रत्येकाच्या लक्षात हे आलेच असेल, की आपण एकत्र येऊन आपल्याकडे उपलब्ध असलेल्या साधनांचा उपयोग करण्याची वेळ आता आली आहे. मी आपणाकडे मागणी करीत आहे, की ‘ तुम मुझे खून दो मै तुम्हे आझादी दूँगा ! ’ आपणाकडे जे जे असेल ते एकत्र करा. संपत्ती, जवान, शस्त्रे जे असेल ते एकत्रित करा. कारण युद्ध आपले भविष्य व आपले नशीब ठरवणारे निर्णयात्मक आहे. माझी अपेक्षा आहे, की ३००,००० लष्करी तुकड्यांबरोबर ३०० ००० पौंड. मी जरूर असे म्हणतो, की भारतीय स्त्रियांनी आता निर्भय बनून लष्करी तुकडी उभी करून शस्त्र हाती घेऊन स्वातंत्र्याकरिता लढले पाहिजे. १८५७ च्या स्वातंत्र्य युद्धात झाशीची राणी अश्वारूढ होऊन उघड्या लढाईत शस्त्रवरजून रणांगणात उतरली. त्याप्रमाणे महिलांनीही लष्करी शिक्षण घेऊन युद्धसज्ज व्हावयास पाहिजे. आपण युरोप मधल्या दुसऱ्या आघाडीवरील अनेक शौर्यकथा ऐकल्या आहेत. पण ही ‘ भूतांची दुसरी आघाडी ’ आहे. भारतातील लोक निर्दयतेने ब्रिटिशांकडून भरडले जात आहेत. आता आपली दुसरी आघाडी भारतीय स्वातंत्र्या-

साठीच उभी करावयाची आहे. "

या भाषणाचा दूरवर परिणाम झाला. भारतीय लोकांना त्याचा खरा अर्थ समजला. नेताजींनी आपल्या भाषणातून जे आवाहन केले होते त्यास तत्काळ प्रतिसाद मिळाला.

सिंगापूर मधल्या त्यांच्या अल्प वास्तव्याच्या काळात त्यांनी तेथील भारतीय लोकांची मनेही जिंकली व तेथील आझाद हिंद सरकारचे ( आय्. आय्. एल्. ) नेतृत्वही केले. या कार्यात त्यांनी जे यश मिळविले ते काही क्लृप्त्या करून नव्हे, तर भारतीय लोकांची मनेही त्यांनी जिंकली. सद्गुणी व्यक्तिमत्त्व आणि कर्तृत्व यांवरच भारतीय लोकांकडून त्याना आदर आणि कौतुक मिळाले. भारतीय जनतेकडून जरी त्यांना आदर मिळाला असला तरी त्यांच्याबद्दल बरेच गैरसमजही होते. एका अर्थी ते हुकूमशहा सारखेच वागतात असे लोकांना क्वचित प्रसंगी वाटत होते. तथापि आपल्या वागण्यात त्यांनी एक धोरण ठरविले होते आणि ते म्हणजे, कोणतीही गोष्ट करण्यापूर्वी त्याबद्दलच्या त्यांच्या कल्पना सर्वांना ते समजावून सांगत व त्यांची त्याला पूर्ण अनुमती घेत. याकरिता त्यांना त्यांच्या योजनेस फार प्रसिद्धी द्यावी लागत असे. काही असंतुष्ट लोक याचा गैर फायदा घेऊन त्यांना 'राज्यद्रोही म्हणण्याचा प्रयत्न करीत; पण नेताजी सुभाषचंद्र बोस अशा प्रकारचे केव्हाच नव्हते.

## ( ब ) पूर्व आशियातील कार्यक्रम

पूर्व आशियात परतल्याबरोबर नेताजी सुभाषचंद्र बोस यांनी हंगामी सरकार स्थापन करून आझाद हिंद सेनेला नवजीवन प्राप्त करून दिले. बर्लिनमध्ये असताना ते अशा प्रकारचे स्वप्न रंगवीत होते. जपानमधून निघण्यापूर्वीच त्यांनी स्वतंत्र भारताचे हंगामी सरकार स्थापन करण्याची आपली कल्पना काही जपानी अधिकाऱ्यांना सांगितली होती. याबद्दल त्यांची मुख्यप्रधान टोजो यांच्याशी आणि इतर जपानी सरकारचे लष्करी अधिकारी यांच्याशी बोलणी झाली होती. याबद्दल जपानी प्रतिक्रिया अशी होती, की " तत्त्वतः आमची त्याला हरकत नाही, तथापि नजीकच्या काळात मुख्य प्रधान टोजो सिंगापूरला येतील व ते तुम्हाला निर्णयात्मक सांगतील." नेताजींनी सिंगापूरला आल्याबरोबर हंगामी सरकार स्थापनेबद्दलच्या आपल्या योजना व त्यामागील आपली भूमिका भारतीय लोकांना—जे भारतात आहेत व जे भारताबाहेर आहेत त्यांना—जाहीर केल्या. हंगामी सरकारच्या त्यांच्या कल्पनेला पूर्वीच स्थापन झालेल्या आय. आय. एल ची अनुमती मिळणार नाही असे त्यांना वाटत होते; पण खरोखरच त्यांच्या अपेक्षेपेक्षाही त्यांस यश मिळाले. या नव्या घोषणेने भारतात चेतना मिळाली. पूर्व आशियामध्ये राहणाऱ्या भारतीयांना स्वातंत्र्यलढ्याबद्दल आपुलकी व प्रेरणा मिळाली.

आपल्या योजना जाहीर केल्यानंतर त्यांना दोन वादग्रस्त मुद्दे हाताळावयाचे होते.

एक म्हणजे सरकारची रचना करणे व दुसरे म्हणजे त्याला जपानी सरकारची अधिकृत मान्यता मिळवणे. पहिल्या प्रश्नाबद्दल, म्हणजे संघटना फारच दुर्बल होती व एकमुखी निर्णय घेण्यास ती एकमताची नव्हती यामुळे नेताजी मोठ्या कठीण परिस्थितीत सापडले होते. हंगामी सरकार व ' हिकारी किकान ' यांचे परस्पर जमणार नव्हते. त्याशिवाय नेताजींना हंगामी सरकारामार्फत भारतातील लोकांकडून देणग्या जमा करण्यास अडचण येण्यासारखी होती. काही लोक हंगामी सरकारवर रुष्ट होणार होते आणि काही व्यापारी धनलोभी असून काहीही सबबीवर देणग्या देण्यास तयार नव्हते.

या अडचणींवर मात करण्यासाठी भारताच्या सरहद्दीजवळच नेताजींना तळ देऊन राहणे भाग होते. त्यांना मुख्यतः ब्रह्मदेशात हंगामी सरकारची स्थापना करावयाची होती, कारण भारतात प्रत्यक्ष हालचाली करणे त्यामुळे सोपे होणार होते. तथापि ब्रह्मी सरकारने परवानगी नाकारल्यामुळे नेताजींना आपल्या हंगामी सरकारा-साठी सिंगापूर हेच ठिकाण निश्चित करणे भाग पडले. प्रसिद्धी व प्रचारासाठी त्यांनी याचा चांगलाच उपयोग करून घेतला. दळणवळण व वाहतूक यांच्या सोईमुळे हे ठिकाण त्यांना जपानच्या लष्करी हेडक्वार्टरबरोबर संबंध ठेवण्यासाठी उपयुक्त झाले. जपानी लष्कराने इंफाळच्या आघाडीवर कूच करताच नेताजींनी लष्करी चढाईत सहभागी होण्याचे ठरविले. आपल्या हंगामी सरकारची छावणी त्यांनी रंगून येथे नेली. तत्पूर्वी त्यांनी ब्रह्मी सरकारची, अंतर्गत घडामोडीत भाग न घेण्याच्या अटीवर, परवानगी घेतली. ब्रह्मदेशात शिरण्याच्या पाठीमागे त्यांचा एक मानसशास्त्रीय उद्देश असा होता, की भारतीय लोकांच्यावर त्याचा परिणाम व्हावा व त्याचप्रमाणे आझाद हिंद सेनेला चेतना व चालना मिळावी.

स्वतंत्र भारताच्या हंगामी सरकारला जपानची संमती मिळणे जरूर होते. त्याप्रमाणे जपानने त्यांनी घेतलेल्या जबाबदारीचा सन्मान करून मुख्य प्रधान टोजो यांच्या सिंगापूर भेटीत होकारात्मक उत्तर दिले आणि अधिकृत संमती ऑक्टोबरमध्ये पाठवून दिली. नेताजींच्या टोकिओ भेटीच्या वेळीच या प्रश्नाचा ऊहापोह झाला होता. जपानच्या सरकारवर व लष्करी प्रमुखांवर अनुकूल छाप पडल्यामुळे त्यांच्या पूर्ण पाठिंब्यावर सर्व काही व्यवस्थित चालू झाले. आता नेताजींनी आपले लक्ष आय. एन्. ए. ला मान्यता मिळवून घेण्याच्या प्रश्नाकडे केंद्रित केले. ' इंडियन नॅशनल आर्मी 'ची सुरुवात नेताजी अध्यक्ष होण्यापूर्वीची होती आणि यामध्ये विशेषतः मेजर व कर्नल्स यांच्या पदावरची माणसे कनिष्ठ दर्जाची होती. कारण लष्कराची संघटना करण्याच्या गडबडीत निवडा निवड न करता त्यांची भरती केली गेली होती. आणि म्हणून वरच्या दर्ज्याचे काही अधिकारी तत्त्वशून्य व संधिसाधू होते. विशेषतः मेजरच्या दर्जावरील पुष्कळ वरिष्ठ दर्जाचे अधिकारी लष्कराच्या कार्यक्षमतेला न्यूनता आणीत होते. त्यांना

तथाकथित 'दिवाणखान्यातले अधिकारी'. म्हणत आणि त्यांच्या कृत्यांमुळेच ते नेताजींच्या मनातून उतरले होते. त्यांचा लष्करी दर्जा कमी करण्यात आला. नव्या आझाद हिंद फौजेचे नेताजींनी नेतृत्व घेतले तेव्हा त्यात १२००० जवान होते. गनिमी युद्धासाठी हे लष्कर संघटित व सुसज्ज असे होते. जेव्हा ते सिंगापूरला आले होते तेव्हा त्यांना आझाद हिंद फौज संख्येने फारच कमी वाटली होती व त्यात अधिक भर पडणे जरूर वाटत होते. त्यांची इच्छा ५०,००० सैन्य करण्याची होती; पण जपानी लष्कर प्रमुख ३०,००० पेक्षा अधिक सैन्यास सुसज्ज करण्यास तयार नव्हते. नेताजींनी त्यांना न जुमानता पात्रतेत जरी कमी पडले तरी सैन्य वाढवण्याचे ठरविले होते. शेवटी त्यांनी १०,०००चे प्रत्येकी तीन असे लष्करी विभाग व त्याशिवाय २०,००० बळकट स्वयंसिद्ध लष्कर संघटित करण्याचे ठरविले होते. पूर्व आशियामध्ये राहणारे भारतीय तरुण व युद्धकैद्यांमधून आलेले सैनिक व अधिकारी यांची भरती करण्याचे त्यांनी ठरविले होते.

नेताजींनी आझाद हिंद फौज अधिक सामर्थ्यवान करण्याबद्दल जपानला विनंती केली. मुख्य प्रधान टोजो यांनी त्यांना तत्काळ मान्यता दिली व बजावले, की आझाद हिंद फौज म्हणजे 'बेशिस्त लोकांचा थवा' असता कामा नये.

मुख्य प्रधान टोजो यांना प्रत्यक्ष काय म्हणावयाचे आहे हे दुभाष्याच्या सांगण्यामुळे न समजल्याने नेताजींचा वरील शब्दांबद्दल गैरसमज झाला. दोघांच्या बाजूने झालेला गैरसमज नंतरच्या काळात इंडो-जपानच्या होणाऱ्या सहकार्यात बाध आणारा ठरला. 'हिकारी किकान'च्या कामावर नेताजी असंतुष्ट राहिले. त्यावेळी तरी त्यांनी असा गैरसमज करून घेतला, की जपानने वचन दिल्याप्रमाणे आझाद हिंद फौजेला सुसज्ज करण्याच्या आड 'हिकारी किकान' येत आहे. जरी आझाद हिंद फौजेची वाढ करण्यात आली आणि पुर्नरचना करून तीन विभाग केले तरी त्यांचे मुळ उद्देश "गोरीला वॉर फेअर"चेच होते आणि त्यांतील कोणताही विभाग लष्करी दृष्ट्या संपूर्ण उपयुक्त नव्हता. खरी वस्तुस्थिती म्हणजे आझाद हिंद फौजेच्या पुनर्रचना करण्यामागील त्यांचा हेतू 'प्रसिद्धीचा' होता. त्यांना असे म्हणावयाचे होते, की "भारतामधील लष्करी तुकड्यांबद्दल ब्रिटिश सरकार ते आहेत त्यापेक्षा दहापट अधिक असल्याचा प्रचार करते आणि भारतीय लोक या प्रचाराला बळी पडून भिऊन जातात. ब्रिटिशांच्याच पुस्तकातील पान घेऊन त्याचप्रमाणे आम्ही म्हणतो की स्वतंत्र भारताचे हंगामी सरकारचे तीस लष्करी विभाग आहेत. अखेर त्यांच्याप्रमाणेच आम्ही शक्य असतील तेवढे लष्करी विभाग संघटित करीत आहोत." प्रत्यक्ष व डावपेचाचे आणि प्रचाराचे बोलणे यांत फरक दिसून येतो. यामुळे नेताजींचे काहीच समाधान झाले नाही.

प्रथमतः आझाद हिंद फौजेची संघटना केली जात होती त्यावेळी ती आय. आय.

एल. च्या हुकमतीखाली होती; पण जेव्हा स्वतंत्र भारताचे हंगामी सरकार स्थापन झाले, तेव्हा सर्व सरकारी उच्च अधिकाऱ्यांना या सरकारच्या हुकमतीखाली काम करणे क्रमप्राप्त झाले. यानंतर नेताजी सुभाषचंद्र बोस हे आझाद हिंद फौजेचे कमांडर इन् चीफ झाले.

# सात / नेताजी म्हणजे एक प्रबंधच

## हे पवित्र युद्ध जिंकलेच पाहिजे

भारतीय स्वातंत्र्य लढ्याचे एक नेते म्हणून सिंगापूर येथील ठाण्यावर येऊन राहिल्यानंतर नेताजींनी आपल्या योजना स्वतःच्या हिमतीवर राबविण्याचे ठरविले. त्यांनी आय. आय. एल. चे पुढारीपण स्वीकारून त्यास आझाद हिंद सरकार किंवा स्वतंत्र भारताचे हंगामी सरकार म्हणून ते अस्तित्वात आणले. आझाद हिंद फौज भरभक्कम केली आणि पूर्व आशियात निरनिराळ्या ठिकाणी असणाऱ्या भारतीय राष्ट्रवाद्यांशी संबंध प्रस्थापित करण्यासाठी त्यांनी खूप प्रवास केला. त्यांना केव्हाच विश्रांती मिळाली नाही. १ ऑगस्ट रोजी ब्रह्मदेशाच्या स्वातंत्र्यउत्सवासाठी उपस्थित राहण्याची नेताजींना संधी मिळाली. या प्रसंगाची ते आतुरतेने वाट पाहत होते. कारण भारतात हालचाली करण्यासाठी त्यांना या ठिकाणी पाया तयार करावयाचा होता.

### (१) ब्रह्मदेशाला भेट

२९ जुलै रोजी नेताजी सुभाषचंद्र बोस रंगूनमध्ये उतरले. त्यांना पाहण्याकरिता लक्षावधी भारतीय वाट पाहत थांबले होते. विमानतळावर इं. इ. लीगचे ब्रह्मदेशातील शाखेचे अध्यक्ष मि. गन्नी हे स्वागतासाठी आले होते. जपान आणि ब्रह्मदेशचे प्रतिनिधीही हजर होते. नेताजींच्या दर्शनासाठी जमलेल्या लक्षावधी लोकांनी त्यांचे तुफानी जयघोषांनी स्वागत केले. ब्रह्मदेशातील भारतीय तरुणांनी त्यांची एक सभा आयोजित केली. या सभेपुढे त्यांनी एक तास भाषण केले. १ ऑगस्ट रोजी नव्याने स्वातंत्र्याचा पाया घालणाऱ्या ब्रह्मदेशाच्या स्वातंत्र्य समारंभास ते हजर राहिले. ब्रिटिशांच्या जोखडाखालून बऱ्याच वर्षांनंतर ब्रह्मदेश आपला स्वातंत्र्य-दिन समारंभ साजरा करताना पाहून नेताजींचे मन विवश झाले व ते सद्‌गदीत झाले.

ब्रह्मदेशाच्या स्वातंत्र्य समारंभ प्रसंगी भारतीय लोकांना उद्देशून त्यांनी भाषण

केले. " १९२५ ते १९२७ या काळात मी मंडालेमध्ये तुरुंगात असता मला असे वाटत होते, की हे राष्ट्र केव्हा स्वतंत्र होईल? मी तुरुंगाच्या खिडकीतून वारंवार बाहेरील ब्रह्मी राजवाड्याकडे पाही व निराश होत असे. अखेर तो दिवस आला आणि ब्रह्मदेशाला विजयी स्वातंत्र्य प्राप्त झाले. या मुक्त आणि स्वतंत्र देशाच्या मुक्त वातावरणाचे मी अभिनंदन करतो. १९४१ च्या नोव्हेंबरमध्ये ब्रह्मदेशाच्या मुख्य प्रधानांनी ब्रिटिश सरकारकडे मर्यादित स्वायत्तता मिळावी म्हणून कैफियत मांडली होती. त्यांच्या विनंतीला ब्रिटिश सरकारने वाटाण्याच्या अक्षता लावल्या आणि त्यानंतर ब्रह्मदेशाच्या लोकांनी ब्रिटिशांच्या विरुद्ध शस्त्रे हाती घेतली. अखेर जपानी लष्कराच्या सहकार्याने ब्रिटिशांना आपल्या देशातून हाकलून लावण्यात त्यांनी यश मिळविले. त्यांनी जे पेरले त्याचे फळ त्यांना आज मिळत आहे. खरी गोष्ट म्हणजे इतिहासाच्या या अशा घडामोडीच्या वेळी त्यांनी स्वातंत्र्य मिळविले आहे, की त्यापासून आम्ही दोन धडे घेतले पाहिजेत. एक म्हणजे निर्माण झालेल्या सुवर्णसंधीचा यशस्वीपणे कसा काय फायदा घेता येईल व दुसरे म्हणजे एकोणिसाव्या शतकात ब्रिटिशांनी जेव्हा ब्रह्मदेशावर आक्रमण केले त्यावेळी त्यांनी भारताच्या भूभागाचा व आपल्या साम्राज्याचा उपयोग जसा करून घेतला; त्याच प्रमाणे आझाद हिंद फौज ब्रिटिश लष्करावर हल्ले चढवील तेव्हा नव्यानेच स्वातंत्र झालेल्या ब्रह्मदेशाचा आम्ही तरफेसारखा उपयोग करून घेता येण्यासारखा आहे. भारतावर राज्य करताना ब्रिटिश सरकारने भारताला दिलेली वचने पाळली नाहीत. सध्याचे युद्ध भडकल्यानंतरही अशा प्रकारची फोल व खोटी, तीच ती अभिवचने पुन्हापुन्हा दिली आहेत. त्यांनी दिलेल्या वचनांकडे वळून पाहता ब्रिटिशांनी असा मुत्सद्दीपणा दाखवला आहे, की चालू युद्धाची सबब सांगून सद्यःस्थितीत भारताकडे काही अधिकार देणे योग्य होणार नाही. या उलट ब्रिटिशांच्या पोकळ आश्वासनाऐवजी जपानने युद्ध चालू असताना ही जी आश्वासने दिली होती त्याची त्यांनी पूर्तता केली. आपल्याकडे एक म्हण आहे की ' ज्या ठिकाणी इच्छा त्या टिकाणी मार्ग हा सापडतोच. ' थोडक्यात म्हणजे ब्रिटिशांचे धोरण आणि भारताबाबतचे प्रश्न हाताळण्याची सचोटी या विरुद्ध जपानची राजनीती आणि औदार्य, राष्ट्रीय धोरण यावरून आपणांस सर्व काही समजून येते. ब्रह्मदेशाच्या पाठोपाठच फिलिपाइन्सचेही स्वातंत्र्य येत आहे. आता इतिहासात आशिया एका नव्या युगाच्या उंबरठ्यावर उभा राहिला आहे. आशियामधील सर्व दडपल्या गेलेल्या जनतेने आपल्या मुक्तीसाठी आता उभे राहून लढा देण्याची वेळ आली आहे. विशेषतः भारतीय जनतेने आपल्या हृदयात साकार करून ठेवलेले स्वातंत्र्याचे स्वप्न खरे करण्यासाठी या संधीचा पुरेपूर फायदा घेतला पाहिजे. भारताच्या स्वातंत्र्याखेरीज आशिया स्वतंत्र झाला असे म्हणता येणार नाही, आणि म्हणून भारतीय जनतेने ब्रिटिशांच्या जोखडाखालून मुक्त होण्यासाठी स्वतः उभे राहिले

पाहिजे व हालचाल केली पाहिजे. आणि ही जबाबदारी त्यांच्यावर पडली आहे, त्या बरोबरच आशियातील ब्रिटिशांच्या सत्तेखाली असणाऱ्या राष्ट्रांना मुक्त करण्यासाठी मदत केली पाहिजे. कोणत्याही प्रसंगात जपानने भारताला देऊ केलेल्या हाताबरोबरच हातमिळवणी केली पाहिजे. इतकेच नव्हे, तर दडपल्या गेलेल्या इतर आशियन लोकांनाही मदत केली पाहिजे.

खरी गोष्ट पाहता नेताजी ज्यांना ज्यांना माहीत आहेत त्यांना हे कळून येईल, की पुढे घडणारी घटना ते गृहीत धरूनच त्यांनी सर्व व्यवस्थापन करण्यास स्वतः सुरवात केली होती. जपानी सरकारवर त्यांच्या प्रामाणिकपणाची छाप पडून त्याने त्यांना योग्य त्या प्रकारची मदत देऊ केली होती आणि ही गोष्ट मुख्यप्रधान टोजो अनेक वेळा व्यक्त करून दाखवीत. नवीन स्थापन झालेल्या आझाद हिंद सरकारसाठी जपानने अंदमान आणि निकोबार बेटे ताब्यात घेऊन कोणतीही अट न घालता स्वाधीन केली होती.

## ( २ ) बँकॉकला पुन्हा भेट

४ ऑगस्ट रोजी नेताजी सुभाषचंद्र बोस यांनी बँकॉकला पुन्हा भेट दिली. पहिल्या भेटीच्या वेळी थायलंडच्या मुख्य प्रधानांची त्यांना भेट घेता आली नव्हती. कारण दोघांच्याही भेटीची चुकामूक झाली होती. दुसऱ्या भेटीच्या वेळी मात्र थाई मुख्य प्रधानांबरोबर मनःपूर्वक बोलण्याची त्यांना संधी मिळाली. जुने मित्र असल्याप्रमाणे त्यांनी आपली बोलणी केली. येथे असताना त्यांनी राजकारणी मुत्सद्दी व 'ॲक्सेस पावर्स'चे थायलंडमध्ये असलेले लष्करी प्रतिनिधी यांच्याशी आपले संबंध जोडले.

९ ऑगस्ट रोजी ब्रिटिशांनी भारतीय स्वातंत्र्यचळवळीवर केलेल्या अत्याचाराच्या पहिल्या सार्वजनिक स्मरणोत्सव प्रसंगी त्यांनी थायलंडमध्ये राहणाऱ्या भारतीय नागरिकांची एक सभा, तेथील विद्यापीठाच्या सभामंडपात आयोजित केली. त्या प्रसंगी त्यांनी ब्रिटिशांच्या विरुद्ध तीव्रतेने लढा देण्याबद्दल प्रोत्साहन दिले. त्याच दिवशी नेताजी बँकॉकहून रंगूनला गेले. तेथे त्यांनी जपानचे परराष्ट्र वकील योत्साझावा आणि इतर लष्करी प्रमुख यांची भेट घेतली. रंगून येथील भारतीय लोकांनी त्यांचे उत्साहपूर्व व प्रचंड जयघोषांनी स्वागत केले व त्यांची एक सभा आयोजित केली. या सभेस हजारो भारतीय उपस्थित होते.

## ( ३ ) सिंगापूरला परत

१४ ऑगस्ट रोजी नेताजी सिंगापूरला परत आले. म. गांधींच्या अटकेच्या पहिल्या सार्वजनिक स्मरणउत्सव प्रसंगी ते एका मेळाव्याला हजर राहिले. यादिवशी सिंगापूर येथील मुख्य रस्त्यावरून "राष्ट्रीय महिला पलटन" चे संचलन आणि शाळेतील युवक व नागरिक यांची भव्य मिरवणूक काढण्यात आली होती. शहरातील

एका चौकात सार्वजनिक सभा भरविण्यात आली व त्या सभेत नेताजींचे हृदयस्पर्शी भाषण झाले.

## ( ४ ) हिनांनमध्ये देणग्यांचा वर्षाव

हिनांन येथे ३ सप्टेंबर रोजी एक मेळावा भरवण्यात आला. या मेळाव्यास १५,००० लोक उपस्थित होते. श्रोतृवर्गापुढे नेताजींचे अखंड दोन तास व्याख्यान झाले. त्यांच्या भाषणामुळे लोक मंत्रमुग्ध झाले. या प्रसंगी २ लक्ष पौंड देणग्या जमविण्यात आल्या. लोकांनी ब्रिटिशांविरुद्ध लढण्याची व आपल्या मातृभूमीशी प्रामाणिक राहण्याची प्रतिज्ञा केली.

पूर्व आशियातील बऱ्याच राष्ट्रांचा दौरा करून तेथे राहणाऱ्या भारतीयांचा स्वातंत्र्यासाठी स्वयंस्फूर्तीने किती उपयोग होईल याचा आढावा घेतला आणि नव्याने स्थापन झालेल्या आझाद हिंद सरकारला किती पाठिंबा आहे हे पण पाहिले. यासाठी त्यांनी सर्वांचे एक अधिवेशनही आयोजित केले होते. याच कालावधीत इटलीमध्ये ब्रिटिश-कॅनेडियन लष्करी तुकड्या उतरवण्यात येऊन बार्डोरिओ रेजिमी यांना शरणागती पत्करावी लागली. याबद्दलही लोकांना काही सूचना देणे भाग आहे असे नेताजींना वाटले. निरनिराळ्या ठिकाणच्या भाषणात त्यांनी सांगितले, की " मला दुःखाने असे कबूल करावे लागते, की काही भारतीय लोकांच्यावर ब्रिटिश सरकारची इतकी प्रचंड छाप पडली आहे, की त्यांना ब्रिटिशच विजय मिळवतील असे अद्यापही वाटते. ब्रिटन आज दुसऱ्याच्या मदतीवरच अवलंबून आहे. अमेरिकेच्या सूचनेप्रमाणे व अमेरिकेच्या मदतीने तो युद्ध खेळत आहे व काही विजय मिळवीत आहे. आम्हाला निश्चित माहिती आहे, की सध्या चालू असलेले युद्ध ब्रिटिशांना कोणत्याही प्रकारे फायदेशीर नाही. ब्रिटिशांचा यापुढे निभाव लागणार नाही. सध्याचे युद्ध हे एका बाजूला जपान व जर्मनी व दुसऱ्या बाजूला संयुक्त अमेरिका यांच्यामध्ये खेळले जात आहे. या युद्धाच्या शेवटी जगावर कोणाचे प्रभुत्व राहणार आहे हे ठरणार आहे आणि जरी आमच्या शत्रूने युद्ध जिंकले, तरी ब्रिटनचा त्यापासून काही एक फायदा होणार नाही. उलट संयुक्त अमेरिकेलाच त्याचा फायदा मिळेल. ' ॲक्सेस पॉवर्स 'चा विजय होवो अगर पराभव होवो, ब्रिटनला मात्र सरतेशेवटी भारताबाहेर हाकलून देण्यात येईल. प्रश्न असा आहे, की ब्रिटनला बाहेर हाकलल्यानंतर भारताची स्थिती काय होईल ? दुसरा प्रश्न असा, की आम्ही आमच्या त्यागावरच स्वातंत्र्य मिळवले पाहिजे व त्याचे रक्षण केले पाहिजे. या विजयाप्रत जाण्यासाठी आजतरी आमच्या तीन मागण्या आहेत. आय. एल. ए. ने आमचे इच्छित तडीस नेण्यासाठी खालील गोष्टींसाठी सहकार्य देऊन त्याची पूर्तता केली पाहिजे.

( १ ) आम्हाला उत्तम सैनिकांची गरज आहे.

( २ ) आम्हाला साधन संपत्ती व अनेकविध गोष्टींची ( सरकार चालवण्यास ) जरुरी आहे.

( ३ ) सुसज्ज व आधुनिक शस्त्रे, अस्त्रे, तंत्रज्ञ पाहिजेत. इतर राष्ट्रांकडून ती उधार उसनवार घ्यावी लागणार आहेत आणि यासाठी खूप द्रव्यही खर्च करावे लागणार आहे.

शक्य त्या सर्व मार्गांनी हे पवित्र युद्ध जिंकलेच पाहिजे, यावर प्रत्येक भारतीयाने लक्ष दिले पाहिजे. यासाठी खूप मोठ्या देणग्या राष्ट्रासाठी, नव्या राष्ट्र उभारणीसाठी, स्वातंत्र्य हस्तगत करण्यासाठी, स्वयंस्फूर्तीने जमा होणे जरूर आहेत. तथापि याबाबत म्हणावे तसे सहकार्य मिळत नाही. ही परिस्थिती बदलली पाहिजे. स्वतंत्र भारताचे हंगामी सरकार अस्तित्वात येण्याच्या प्राथमिक अवस्थेत अशा प्रकारची बिकट परिस्थिती निर्माण व्हावी याची चिंता वाटते. पूर्व आशियातील सर्व भारतीयांनी निर्धाराने ही परिस्थिती बदलली पाहिजे. ”

# आठ / पहाट

## स्वतंत्र भारताच्या हंगामी सरकारची व आझाद हिंद सरकारची स्थापना:

पाच महिन्यांनंतर नेताजींचे पूर्व आशियात आगमन झाले. स्वातंत्र्यलढ्याची तयारी करण्यात खूपच प्रगती झाली. झालेल्या तयारीच्या प्रगतीबद्दल ते फारसे समाधानी नव्हते. नेताजींना भारतात पाय रोवून उभ्या असलेल्या ब्रिटिशांच्याबरोबर तितक्याच प्रखरतेने युद्ध करण्याच्या त्यांच्या योजना त्वरित तडीस नेण्याची अत्यंत निकड वाटत होती. परिस्थिती अत्यंत नाजूक बनली होती व आता थोडा देखील विलंब सहन न होण्यासारखा होता. जपान सरकारच्या मतैक्याने स्वतंत्र भारताचे हंगामी सरकार स्थापन करण्याचे त्यांनी ठरवून टाकले. २१ ऑक्टोबर रोजी नेताजींनी सिंगापूर येथे आय्. आय. एल.च्या पूर्व आशियामधील प्रतिनिधींची बैठक बोलावली. या बैठकीस अंदाजे १००० भारतीय व जपानमध्ये राहत असलेले भारतीयांचे अधिकृत प्रतिनिधी उपस्थित राहिले. याशिवाय थायलंड, ब्रह्मदेश, मॅकिना आणि बोर्निओ येथील सर्व प्रतिनिधींनी एक मताने स्वतंत्र भारताचे हंगामी सरकार स्थापन करण्यास मान्यता दिली. आणि एकमताने स्वतंत्र भारताचे हंगामी सरकारचे प्रमुख म्हणून नेताजींनी शपथ घेतली. ते म्हणाले. "मी ईश्वराजवळ अशी शपथ घेतो, की मी भारताची आणि त्यांत राहणाऱ्या ३८० दशलक्ष लोकांची मुक्तता करण्यासाठी माझ्या प्रयत्नांची पराकाष्ठा करीन. मी घेतलेली ही शपथ माझ्या मृत्यूपर्यंत मला बंधनकारक राहील. मी भारतीय लोकांना स्वातंत्र्य मिळवून देण्याच्या कामी माझे संपूर्ण प्रयत्न कारणी लावीन. मी अशीही शपथ घेतो, की भारत स्वतंत्र झाल्यावरही भारताच्या उज्ज्वल भवितव्याकरिता मी स्वतःला वाहून घेईन."

नेताजींनी ही शपथ केवळ तांत्रिकता म्हणून घेतली नाही. त्यांची ईश्वराजवळ अशी प्रार्थना होती, की त्यांनी अंगीकारलेल्या पवित्र कार्यासाठी त्यांचे शरीर व मन कामी

येऊ दे. ते आपल्या शेवटच्या क्षणापर्यंत या शपथेशी एकनिष्ठ राहून कार्यरत असता त्यांना त्यांच्या वाटेवरच मृत्यूने गाठले.

नेताजींच्या नेतृत्वाखाली अस्तित्वात आलेल्या स्वतंत्र भारताच्या हंगामी सरकारकडे सर्व जगाचे लक्ष केंद्रिभूत झाले. ब्रिटिशांच्या जोखडाखालून आपली स्वतःची मुक्तता करून घेण्यासाठी भारतीय लोकांनी स्वतःच्या मुक्तविचारांनी व स्वेच्छेने स्वतंत्र भारताच्या हंगामी सरकारची स्थापना करण्याची योजना कार्यान्वित केली होती. या गोष्टीला ऐतिहासिक अर्थ होता. हा अर्थ नेताजींनी सरकार स्थापनेच्या प्रसंगी काढलेल्या परिपत्रकात स्पष्टपणे मांडला होता. या वेळी नेताजींनी केलेले भाषण हे त्यांच्या आयुष्यातील आतापर्यंत दिलेल्या भाषणांत सर्वांत श्रेष्ठ दर्जाचे झाले. मी ते या ठिकाणी देण्याचा प्रयत्न करीत आहे. या भाषणावरून त्यांचे व्यक्तिवैशिष्ट्य आणि त्यांचा उच्च ध्येयवाद दिसून येतो.

"माझ्या बावीस वर्षांच्या राजकीय जीवनात जगातल्या राज्यक्रांतीच्या इतिहासाचा एक विद्यार्थी म्हणून मला सतत असे वाटते, की भारताला स्वतःच्या स्वातंत्र्यलढ्यासाठी दोन गोष्टींची अत्यंत गरज आहे. त्या म्हणजे राष्ट्रीय लष्कर व राष्ट्रीय सरकार. सध्याचे युद्ध सुरू झाल्यापासून जपानी लष्कराने आपल्या संयुक्त शत्रूवर विजय मिळविल्याच्या परिणामामुळे पूर्व आशियातील भारतीय लोकांनी आय. आय. एल व आय. एन. ए. निर्माण करण्याचा प्रयत्न केला. थोडक्यात म्हणजे आय. एन्. ए. च्या निर्मितीमुळे भारतीय स्वातंत्र्यलढ्याला गांभीर्य व सत्यता आली. जर आय. एन्. ए. तयारच केली नसती, तर पूर्व आशियातील स्वातंत्र्य चळवळ ही एक पोकळ जाहिरातच झाली असती. आय. एन्. ए. च्या निर्मितीमुळे स्वतंत्र भारताचे हंगामी सरकार निर्माण करणे आवश्यक झाले. आता हे आझाद हिंद सरकार आय. आय. एल. मधूनच निर्माण झाले आहे; आणि भारताच्या स्वातंत्र्य लढ्याचे अखेरचे कार्य पार पाडावयाचे आहे. आझाद हिंद सरकारच्या निर्मितीमुळे आम्ही आमच्या योजना घेऊन पुढे जात आहोत आणि आम्ही आमचा ऐतिहासिक मार्ग चोखाळत आहोत. १९१६ मध्ये आयर्लंडने आपले हंगामी सरकार निर्माण केले. झेकोझने गेल्या महायुद्धात तीच गोष्ट केली. गेल्या महायुद्धाच्यानंतर तुर्कस्तानने मुस्ताफा केमालपाशा यांच्या नेतृत्वाखाली हंगामी सरकारची स्थापना केली. आझाद हिंद सरकार हे नेहमीच्या शांतता काळातील सरकारपेक्षा संपूर्णतः निराळे आहे. त्याची संस्थापनाची पद्धत आणि कार्य हे अद्वितीय आहे. त्याची व्यवस्थापना युद्धपायावर केली आहे. आणि त्याचे प्राथमिक कार्य म्हणजे भारतात असलेल्या इंग्रजांच्या बरोबर लढणे. त्याचप्रमाणे आमचे आझाद हिंद सरकार आमच्या स्वातंत्र्य लढ्यासाठी आवश्यक तेवढेच विभाग सांभाळते. आमचे मंत्रीमंडळ हे विशेषकरून लष्करी प्रतिनिधी आणि अल्पसे आणि सांस्कृतिक कार्याचे पदाधिकारी यांचे बनविले आहे. या व्यतिरिक्त

मंत्रीमंडळाचे जे सदस्य आहेत ते पूर्व आशियात राहाणाऱ्या भारतीय लोकांपर्यंत संबंध राहावेत म्हणून नेमले आहेत, त्यामुळे जेव्हा वेळ येईल त्यावेळी काही उपाय-योजना करण्याकरिता त्यांना एकत्र आणता येते. जेव्हा हंगामी सरकार भारतात जाईल तेव्हा नेहमीच्या पद्धतीप्रमाणे सदस्यांत वाढ करून व लोकमताप्रमाणे त्याची पुनर्रचना करण्यात येईल व त्यानुसार नवी खाती उघडण्यात येतील. आझाद हिंद सरकार स्थापण्यामध्ये आम्हाला आमचा स्वातंत्र्य लढा यशस्वीपणे चालवता यावा हा हेतू आहे. स्वातंत्र लढयासाठी शेवटची तयारी करण्यासाठी त्याचा आपणाला उपयोग होणार आहे. आमच्या लढयाचे शेवटचे स्वरूप म्हणजे आझाद हिंद सेना भारतात शिरून दिल्लीकडे ऐतिहासिक कूच करीत पोहोचेल आणि ब्रिटिश आणि अमेरिकेला भारताबाहेर हाकलून लावल्यानंतर गव्हर्नर जनरलच्या रेसिडेन्सीवर भारतीय तिरंगी ध्वज फडकू लागेल. तेव्हाच हे कूच समाप्त होईल. ”

आझाद हिंद सरकारची खालीलप्रमाणे रचना होती.

अध्यक्ष...सुभाषचंद्र बोस

एक लष्करी विभाग प्रमुख

एक परराष्ट्र विभाग प्रमुख

एक आर्थिक विभाग प्रमुख.

युद्धजन्य परिस्थिती हाताळण्यासाठी हे एक सर्वसामान्य मंत्रीमंडळ तयार केले होते.

स्वतंत्र भारताच्या हंगामी सरकारच्या—आझाद हिंद सरकारच्या—रचनेचे निवेदन.

“ १८५७ च्या बंडात बंगालमध्ये पराजय पत्करल्यापासून भारतीय लोक गेली शंभर वर्षे सतत लढत आहेत. गेल्या शंभर वर्षांचा भारतीय इतिहास पाहिला तर ती अद्वितीय नरश्रेष्ठांच्या सर्वस्व त्यागाच्या व बलिदानाच्या वीरकथांनी भरलेला दिसेल. विशेषतः भारतीय स्वातंत्र्याच्या लढ्यात या नरश्रेष्ठांमध्ये सिराज-उ-दौला, शेवटचा बंगाली स्वतंत्र राजा, मोहनलाल, ज्याने सिराज उ दौलासाठी अखेरपर्यंत लढत दिली, आणि दक्षिण भारतातील टिपू सुलतान यांची नावे प्रामुख्याने घेतली जातात. तथापि आमच्या या पूर्वजांनी आपल्या प्रबळ शत्रूबरोबर लढा देण्यासाठी सर्वांचे एकच ध्येय ठरविण्यात फसगत करून घेतली. या उदाहरणांवरून भारतीय लोकांचे डोळे उघडण्यास बराच कालावधी लागला आणि त्यांनी अखेर १८५७ मध्ये एकोप्याने देशातील निरनिराळ्या भागांतून ब्रिटिशांवर चढाईस प्रारंभ केला. त्या स्वातंत्र्याच्या लढाईस ब्रिटिश इतिहासकार ‘ शिपायांची दंगल ’ म्हणून संबोधतात; पण आम्ही त्याला स्वातंत्र्याचे पहिले युद्ध म्हणतो. याच लढाईत ब्रिटिशांचा निश्चित पराभव करता आला असता; पण अखेर आपल्या पराभवाला दोन महत्त्वाची कारणे घडली. भारतातील

सर्व भागांतील लोक या युद्धात सामील झाले नाहीत आणि शत्रुसैन्याच्या अधिकाऱ्यांच्याकडे जे तांत्रिक ज्ञान होते ते तांत्रिक ज्ञान आपल्या अधिकाऱ्यांकडे नव्हते. आपण यातून काही अर्थबोध घेतला पाहिजे. अठराव्या व एकोणिसाव्या शतकात युद्धतंत्रांत नेत्रदीपक प्रगती केली आहे; तथापि भारतीय लोकांनी काळाची पावले ओळखली नाहीत आणि त्याचा परिणाम म्हणजे ज्यावेळी भारतीय आणि ब्रिटिश यांच्यात युद्ध सुरू होते त्या वेळी आमचे लष्करी आधिकारी उणे पडतात. आमच्या १८५७ च्या पराभवापासून आम्ही धडा शिकला पाहिजे, की जीवनाच्या प्रत्येक पावलाबरोबर विशेषतः युद्धतंत्राबद्दल गाफील राहून चालणार नाही. भविष्यकाळात भारतीय लोकांनी या गोष्टीकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. १८५७च्या पराभवानंतर भारतीय लोकांना ब्रिटिशांनी निशस्त्र केले. निशस्त्र होण्यामध्ये भारतीयांची चूक झाली. भारतीय लोक आपली शस्त्रे त्यांच्याकडे सुपूर्त करून दुर्बळ झाले नसते, तर थोड्याच अवधीत आपल्या स्वातंत्र्याकरिता त्यांना पुन्हा एकदा संघटित उठाव करता आला असता. निःशस्त्र झाल्यामुळे भारतीय लोकांना राजकीय दृष्ट्या मानहानी व निराश होण्याची पाळी गेली अनेक वर्षे येत आहे. शेवटी लोकांमध्ये राजकीय जागृती होऊन भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस जन्माला आली. भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस हे एक नेमस्त मंडळच होते. कॉंग्रेसचे पुढारी प्रथम प्रथम संपूर्ण स्वातंत्र्याची व ब्रिटिशांपासून पृथक् होण्याची मागणी करण्यास भीत असत. वीस वर्षांच्या सूतकताई नंतर १९०५ च्या सुमारास कॉंग्रेसमध्ये नव्या रक्ताचा शिरकाव झाला. आरविंद घोष यांनी भारताच्या संपूर्ण स्वातंत्र्याची मागणी करताच आम्ही त्यांच्याभोवती जमा झालो. या स्वातंत्र्याच्या मागणीबरोबरच त्याच्या प्राप्तीसाटी अत्यंत पराकाष्ठेच्या पद्धती अवलंबण्याचे ठरविले होते. प्रांतिक विभक्ततेचा सूड म्हणून बंगालमध्ये ब्रिटिश मालावर बहिष्कार टाकण्यात आला. आणि हीच पद्धत भारतभर प्रचारात आली. केवळ आर्थिक बहिष्कारावर न थांबता भारतीय तरुणांनी बॉम्बस व रिव्हॉलवर्स यांच्या उपयोगाच्या पद्धतीही सुरू केल्या. बऱ्याच लोकांना क्रांतीसाठी विध्वंसन करण्याचे शिक्षण घेण्यासाठी पॅरिस व युरोपमधील देशात पाठवून देण्यात आले. भारतीय तरुण जगातल्या इतर देशांनी अवलंबिलेल्या, विशेषतः रशिया आणि आयर्लंडमधील क्रांतिकारी पद्धतीचा अभ्यास करू लागले.

गेल्या जागतिक महायुद्धात खऱ्याखोट्याची चाड न बाळगणाऱ्या ब्रिटिशांनी खोटी आश्वासने देऊन भारतीय पुढाऱ्यांना फसविले आणि ब्रिटिशांच्या सेवेसाठी भारताचे रक्त व वित्त ओढले. गुलामगिरीच्या शृंखला भारताभोवती आवळल्या गेल्या. तथापि आता निश्चितपणे असे म्हणावे लागेल, की भारतीय क्रांतिकारक ब्रिटिशांकडून केव्हाच फसले जाणार नाहीत आणि आपल्या देशात क्रांती घडवून आणण्यासाठी शिकस्तीचा प्रयत्न करतील. परंतु दुर्दैवाने भारतात ते अयशस्वी झाले

आहेत. गेले जागतिक महायुद्ध संपल्यानंतर भारतीय पुढारी त्यांना वचन दिल्याप्रमाणे ब्रिटिशांच्याकडे स्वातंत्र्याची मागणी करू लागले तेव्हा त्यांना प्रथमच असे समजून आले, की लुईच्या ब्रिटिश सरकारने त्यांना फसविले आहे. त्यांच्या मागणीला उत्तर म्हणून ' रौलेट ॲक्ट ' किंवा ' काळा कायदा ' लागू करण्यात आला. या कायद्याने त्यांच्याकडे जी अद्यापही थोडीफार स्वतंत्रता होती तीही हिरावून घेतली गेली. या काळया कायद्याविरुद्ध जेव्हा भारतीयांनी चळवळ सुरू केली तेव्हा त्यांना जालियनवाला बागेच्या हत्याकांडाला तोंड द्यावे लागले. जागतिक महायुद्धाच्या वेळी भारतीय जनतेने सर्वतोपरी त्याग करून ब्रिटिशांना साहाय्य केले त्याचे बक्षीस म्हणून त्यांना ' रौलेट ॲक्ट ' व ' जालियनवाला बाग ' ही दोन बक्षिसे मिळाली. १९१९ मधील या दुःखद घटनेमुळे भारतीय जनता काही काळ गोंधळून गेली व लुळी बनली. स्वातंत्र्य मिळविण्याचे कोणतेही प्रयत्न ब्रिटिश सरकार व त्यांचे सशस्त्र लष्कर यांनी मुळापासून उखडून टाकले. घटनात्मक निदर्शने, ब्रिटिश मालावरील बहिष्कार, सशस्त्र क्रांतीचा प्रयत्न हे सर्व मार्ग स्वातंत्र्य मिळविण्यास निरुपयोगी ठरले आहेत. अशा या मानसिक अवस्थेत म. गांधींनी आपल्या अद्‌भुत व विलक्षण अशा असहकारी चळवळीला व कायदेभंगाला सुरुवात केली. असे वाटते, की स्वातंत्र्याचा मार्ग दाखवण्याकरिताच त्यांना परमेश्वराने पाठविले. राष्ट्रातील सर्व जनता तात्काळ आणि स्वयंस्फूर्तीने त्यांच्या झेंड्याखाली जमा झाली. सर्व भारतीयांचे चेहरे आत्मविश्वास आणि आशा यांनी फुलून आले. आपल्या विजयाची त्यांना पुन्हा एकदा आशा उत्पन्न झाली.

" स्वातंत्र्यप्राप्तीकरिता महात्मा गांधींनी गेल्या वीस वर्षांत महान कार्य केले आहे आणि त्यांच्या बरोबरीने भारतीय जनतेनेही महान कार्य केले आहे. १९२० मध्ये महात्मा गांधींनी आपले लढयाचे शस्त्र घेऊन पुढाकार घेतला नसता, तर कदाचित भारत आत्तापर्यंत दुर्बल व पीडित राहिला असता, असे म्हणणे म्हणजे अतिशयोक्ती नव्हे, त्यांनी भारतीय स्वातंत्र्याकरिता केलेले कार्य हे अत्यंत नमुनेदार व अतुलनीय असे आहे. कोणताही एकाकी मनुष्य आपल्या आयुष्यात अशा परिस्थितीत यापेक्षा अधिक काहीही करू शकला नसता.

" १९२० पासून भारतीय जनतेने महात्मा गांधींच्या पासून दोन गोष्टी शिकल्या. त्या म्हणजे स्वातंत्र्य मिळविण्याकरिता राष्ट्राभिमान व स्वाभिमान शिकला पाहिजे. दुसरी गोष्ट म्हणजे ' संघटना '. आता देशव्यापी संघटना तयार झाली असून ती अगदी अंतर्गत भारतीय खेड्यापर्यंत पोहोचली आहे. त्यांच्या हृदयात क्रांतिकारकाची तळमळ उफाळीत आहे. आता स्वातंत्र्याचा संदेश सर्व भारतीयांच्या हृदयापर्यंत पोहोचला आहे. आणि संपूर्ण देशाचे प्रतिनिधित्व करण्यासाठी देशव्यापी राजकीय संघटना तयार झाली आहे. स्वातंत्र्याच्या लढयाच्या चळवळीची ही शेवटची पायरी

आहे. सर्व भारतीय जनतेने आपले एकच एक संयुक्त ध्येय बनविले आहे. ' राष्ट्रीय कॉंग्रेस पक्षाने ' १९३७ ते १९३९ या काळात आठ राज्यांत सरकारे स्थापन केली. या चालू युद्धाच्या पूर्ण काळातच भारताच्या स्वातंत्र्याकरिता निर्णयात्मक लढा देण्याची तयारी पूर्ण झाली आहे. जर्मनीने आपल्या संयुक्त राष्ट्रासह एक जबरदस्त टोला आमच्या शत्रूवर, ब्रिटनवर हाणला आहे. आणि जपानने पूर्व आशियामध्ये असणाऱ्या आमच्या शत्रूला चिरडून टाकले आहे, आता जागतिक परिस्थिती अशी निर्माण झाली आहे, की भारताला या संधीचा फायदा घेऊन आपले स्वातंत्र्याचे स्वप्न खरे करून दाखवता येईल. आधुनिक इतिहासातली ही पहिलीच परिस्थिती आहे, की भारताबाहेरील भारतीय लोक आपल्या देशाच्या स्वातंत्र्याकरिता एकत्र येऊन लढा देत आहेत. या भारतीयांच्या, प्रत्यक्ष भारतात असलेल्या लोकांप्रमाणेच भावना आहेत आणि ते एकत्र येऊन लढा लढवीत आहेत. विशेषतः पूर्व आशियामध्ये दोन लक्ष भारतीय स्वातंत्र्याकरिता शेवटचा लढा लढविण्यासाठी एकाच झेंड्याखाली संघटित झाले आहेत– आणि " चलो दिल्ली " " चलो दिल्ली "चा उद्घोष करीत पुढे संचलन करीत आहेत.

" या संचलनाला योग्य त्या मार्गाने घेऊन जाण्याचे कर्तव्य ' मुक्तिलष्कराचे ' आहे. एकदा का हे ' मुक्तिलष्कर ' भारतात शिरले, की भारतीय जनता उत्स्फूर्तपणे त्यांना सहकार्य करील इतकेच काय, पण ब्रिटिशांच्या हाताखाली नोकरीस असलेले भारतीय लष्करी सैनिकही आम्हाला सामील होतील.

" भारतीय मुक्तिलष्कराला आपल्या सामर्थ्याचा पूर्ण आत्मविश्वास आहे, की ' ॲक्सेस पावर्स ' ला आपल्या सहकार्याने या महान ऐतिहासिक कार्यासाठी पूर्णत्वाला जाता येईल. सत्य परिस्थिती पहाता भारत मुक्तीचा दिवस जवळ येत आहे, आणि म्हणून आपण शेवटपर्यंत मुक्तीकरिता अखेरचा लढा देण्यासाठी स्वतंत्र भारताचे हंगामी सरदार स्थापन केले पाहिजे. भारतीय मुक्तिलष्कर म्हणजेच आय. एन्. ए. ( आझाद हिंद फौज ) च्या मदतीने स्वातंत्र्याचा शेवटचा लढा देणे हे आपले कर्तव्य आहे.

" स्वतंत्र भारताचे हंगामी सरकार प्रस्थापित करून आम्ही आमचे इच्छित कर्तव्य पार पाडण्याचा निश्चय करून जबाबदारी स्वीकारली आहे. स्वतंत्र भारताच्या सरकारची, आझाद हिंद सरकारची अशी भूमिका आहे, की ब्रिटिशांबरोबर युद्ध खेळून त्यांचा पराभव केल्यानंतरही स्वतंत्र भारताचे कायमचे सरकार प्रस्थापित होण्यापर्यंत सतत आपले कार्य चालू ठेवले पाहिजे. सर्व भारतीय जनतेने स्वतंत्र भारताच्या हंगामी सरकारशी एकनिष्ठ राहणे हे त्यांचे कर्तव्य आहे व त्यासाठी ते वचनबद्ध आहेत. सर्व भारतीयांच्या कडून आमची ही मागणी आहे. हे सरकार लायक असून ते भारतीय जनतेला अभिवचन देत आहे, की धार्मिक स्वातंत्र्य, सर्व थरांतील जनतेला समान

हक्क आणि संधी देण्यात येईल. सरकार सर्वांना सारख्याच पद्धतीने वागवील. गृहकलहावर योग्य ती उपाय योजना करील. अखिल भारतीय जनतेसाठी ‘ बहुजन-हिताय बहुजन सुखाय ’ असे धोरण ठेवील. सर्वांच्या प्रगतीसाठी प्रयत्न करील. लोकांच्या जीवनात सुख व समाधान निर्माण करील. भारतातील ब्रिटिशांच्या विरुद्ध आपण लढा सुरू करीत आहोत. आम्ही हे युद्ध मोठ्या धैर्याने, चिकाटीने आणि आत्मविश्वासाने लढवणार आहोत. हे युद्ध ब्रिटिशांना भारताबाहेर हाकलून लावून भारतीयांना पुन्हा स्वातंत्र्य मिळवून देईपर्यंत चालू राहील. जय हिंद. ”

या भाषणाचा इच्छित परिणाम झाला. ब्रिटिशांचे व भारतात राहणाऱ्या जनतेचे लक्ष वेधले गेले.

स्वतंत्र भारताचे हंगामी सरकार स्थापन झाल्यानंतर जपान सरकारने आपल्या कॅबिनेट मीटिंगमध्ये एकमताने त्याला मान्यता देण्याचे ठरविले व त्याप्रमाणे त्यांनी जाहीर केले. लगेच जपानी सरकारने खालीलप्रमाणे एक परिपत्रक प्रसिद्ध केले.

“ मिस्टर सुभाषचंद्र बोस प्रमुख असलेल्या स्वतंत्र भारताच्या हंगामी सरकारा-संबंधी जपानी सरकारला असा विश्वास वाटतो, की भारतीय स्वातंत्र्याच्या पूर्ततेसाठी एक महान पाऊल टाकण्यात आले आहे. ज्याबद्दल भारतीय जनता फार दिवसांपासून आपल्या कल्पना रंगवीत होती. आम्ही या स्वतंत्र भारताच्या हंगामी सरकारला मान्यता देत आहोत आणि त्यांचे इच्छित ध्येय साध्य होण्यासाठी सहकार्य आणि शक्य ती मदत देण्याचे आश्वासन सद्इच्छेसह देत आहोत. ”

# नऊ / अरुणोदय

२४ आक्टोबर १९४३ रोजी सकाळी नेताजींनी युनायटेड स्टेट्स् आणि ब्रिटन यांच्याबरोबर युद्ध घोषित केले. भारताच्या स्वातंत्र्यासाठी नेताजींनी आपले पहिले पाऊल उचलले. स्वतंत्र भारताच्या हंगामी सरकारने जाहीर केलेली युद्ध घोषणा जपान सरकारने लगेच नमूद करून ठेवली.

आझाद हिंद सरकारने स्वतंत्रपणे स्वतः युद्ध पुकारण्याची ही पहिलीच वेळ होती.

२४ आक्टोबर १९४३ या दिवशी सकाळी १० वाजता नेताजी सुभाषचंद्र बोस लष्करी गणवेशात सिंगापूरच्या सिटीहॉल समोरच्या चौकातील व्यासपिठावर जाहीर भाषणाकरिता उभे राहिले. स्वतंत्र भारताच्या हंगामी सरकारचे अध्यक्ष झाल्यानंतर त्यांचे हे पहिलेच भाषण होते. मोठ्या संख्येने जमलेल्या जनतेपुढे भाषणासाठी लष्करी गणवेशात सिंगापूरच्या सिटी हॉल समोरील व्यासपीठांवर त्यांनी प्रवेश करताच जनतेत उत्स्फूर्त उन्मादाची एक मोठीच लाट निर्माण झाली.

भारताने युनायटेड स्टेट्स् आणि ब्रिटन यांच्याबरोबर युद्ध जाहीर करताच जपानचे दक्षिण आर्मी कमांडर, फिल्डमार्शल तेरुची यांनी एक निवेदन काढून भारतातील ब्रिटिश व त्यांच्या पाठीराख्यांशी युद्ध करण्याकरिता इं. नॅ. आर्मीला शक्य असेल त्या सर्व प्रकारची मदत करण्याची प्रतिज्ञा जाहीर केली. त्यांनी जाहीर केले, की “ जपानला कोणतीच प्रांतिक सत्ता अथवा आर्थिक लाभ या कशाचाही बिलकूल हव्यास नाही. आणि भारतीय जनतेला हे पूर्णपणे माहीत आहे. ” या जपानी लष्करी निवेदनामुळे ज्या भारतीयांच्या मनामध्ये काही शंका होत्या त्या नाहीशा होण्यास मदत झाली. स्वतंत्र भारताचे हंगामी सरकार प्रस्थापित करण्यास आणि युनायटेड स्टेटस व ब्रिटनबरोबर युद्ध पुकारायला लावण्यात जपानचे प्रोत्साहन आहे अशी शंका भारतीयांच्या मनामध्ये ब्रिटिशांनी प्रचारतंत्राने पेरून ठेवली होती. खरे तर स्वतंत्र भारताचे हंगामी सरकार स्थापन केल्यामुळेच नेताजी सुभाषचंद्र बोस यांना

स्वातंत्र्याची चळवळ चालवण्यास सोईचे झाले. यामागील सर्व कल्पना पहिल्याप्रथम स्वतः पुढाकार घेऊन नेताजींनीच पुढे मांडल्या होत्या. याबाबत जपानने कोणतेही टुमणे लावले नव्हते. स्वतंत्र भारताचे हंगामी सरकार हे कोणत्याही बाबतीत जपानचे बाहुले बनले नव्हते, याबाबत अधिक पुरावे उपलब्ध आहेत. नेताजी असे नव्हते की कोणीही त्यांच्या शक्तीचा गैरवापर करावा. नेताजींनी स्वातंत्र्याची चळवळ इतक्या उच्च स्थानी नेऊन ठेवली होती व अत्यंत पवित्र व उदारतेने चालविली होती, की ती यशस्वी व्हावी अशी सर्वांची सदिच्छा होती.

स्वतंत्र भारताचे हंगामी सरकार स्थापन करण्यात नेताजींनी जी घाई केली त्याला अनेक कारणे होती. ब्रिटिशांच्या विकृत प्रचारामुळे भारतातील व भारताबाहेरील लोकांसमोर अनेक समस्या उभ्या राहिल्या होत्या. या मुदतीतच जपानने गुडाल कॅनॉल या ठिकाणी माघार घेतल्यामुळे त्याचे जाहीर परिणाम त्यांना पाहावे लागले. त्याचप्रमाणे इटलीसुद्धा कोलमडून पडण्याची चिन्हे दिसू लागली. प्रसंग उलटे फिरू लागलेल्या या परिस्थितीत नेताजींनी काय करावे? डोक्यात राख घालून हे कठीण व दग्ध प्रसंग पाहत स्वस्थ बसावे, की माथेफिरूपणे चढाई करावी? याचे उत्तर आहे, "नाही." या वातावरणाला एक अद्भुत कलाटणी मिळाली म्हणून त्यांनी आपला पवित्रा घेण्याची घाई केली. प्रिमियर टोजो यांच्या निवासस्थानी भरलेल्या 'ग्रेटर ईस्ट आशिया कॉन्फरन्स'चा प्राथमिक स्वरूपाच्या वाटाघाटी आलेल्या प्रतिनिधींच्या देशांवर आणि त्यांच्या प्रतिनिधींच्या दृढनिश्चयावर आणि प्रामाणिकपणावर पूर्ण भरवसा होता. ब्रह्मदेशाचे प्रधानमंत्री बा माव हे नेताजींना थोडे परकेच होते, तथापि मांचूरियाचे प्रधानमंत्री छी कै कै, चीनचे अध्यक्ष ओसेइई, फिलिपाइन्सचे प्रेसिडेंट लुवेल आणि थायलंडचे राजपुत्र वोनवाई या सर्वांना नेताजींच्या व्यक्तिमत्त्वाचा परिचय होता.

५ नोव्हेंबर रोजी ठरलेल्या वेळेप्रमाणे कॉन्फरन्सला सुरुवात झाली. एक निरीक्षक म्हणून नेताजी सुभाषचंद्र बोस आपल्या जागेवर स्थानपन्न झाले. त्यांनी निरीक्षक म्हणून भूमिका घेण्याचे कारण म्हणजे भारताचा 'ग्रेटर ईस्ट आशिया'मध्ये समावेश करता येत नाही या मताचे ते होते. त्यांच्या समवेत जनरल चतर्जी आणि जनरल भोसले व जपानचे परराष्ट्र वकील सेनटा हेही होते. प्रिमियर टोजोंनी या कॉन्फरन्सचे अध्यक्षपद स्वीकारले होते. कॉन्फरन्समध्ये अनेक प्रतिनिधींची भाषणे झाली. दुसऱ्या दिवशी 'ग्रेटर ईस्ट कॉन्फरन्स'चा संयुक्त जाहीरनामा प्रसिद्ध करण्यात आला. मी या जाहीरनाम्याच्या तपशिलात जात नाही, कारण त्याचा भारताशी प्रत्यक्ष असा काही संबंध नाही. जाहीरनामा स्वीकारल्यानंतर ब्रह्मदेशाचे मुख्य प्रधान बा माव व्यासपीठावर आले. आपल्या जोरदार भाषणात ते म्हणाले, "भारत स्वतंत्र झाल्याखेरीज आशियाची मुक्तता होणे शक्य नाही" त्यांनी अशी सूचना मांडली, की "भारताच्या

स्वातंत्र्यासाठी चाललेल्या लढ्यास संपूर्ण सहानुभूती व सर्वतोपरी साहाय्य दिले गेले पाहिजे." या सूचनेस सर्वांनी एकमुखाने पाठिंबा दिला. या ठरावामुळे या कॉन्फरन्सला एक नवे महत्त्व प्राप्त झाले. स्वतंत्र भारताच्या हंगामी सरकारला ग्रेटर ईस्ट आशिया मधील राष्ट्रांच्या बरोबर एकत्र येऊन कार्य करणे शक्य झाले. या ठरावामुळे नेताजी फारच प्रभावित झाले. या ठरावाला चालना देण्याचे काम मुख्य प्रधान बा माव यांनी केल्याबद्दल त्यांचे हार्दिक आभार मानणे जरूर होते. म्हणून नेताजी व्यासपीठावर आले. ते व्यासपीठावर आलेले दिसताच त्यांचे सर्वांनी उभे राहून उत्साहपूर्वक स्वागत केले. आपल्या भाषणाची सुरुवात त्यांनी विश्वासपूर्वक आभार मानून केली. या ऐतिहासिक कॉन्फरन्सला निरीक्षक म्हणून हजर राहण्याची परवानगी दिल्याबद्दल व भारताला संपूर्ण सहानुभूती व सर्वतोपरी साहाय्य करण्याच्या आश्वासनाबद्दल सर्व प्रतिनिधींचे व त्यांच्या देशांचे त्यांनी हार्दिक आभार मानले.

या संदर्भात नेताजी म्हणाले, "मला खात्री आहे, की या ठरावाचा आवाज या कॅपिटल बिल्डिंगच्या बाहेर पडेल आणि शेकडो, हजारो मैल दूर असणाऱ्या ब्रिटिशांच्या जोखडाखाली अवमानित झालेल्या भारतीयांच्यापर्यंत पोहोचेल आणि त्यांच्यात नवी आशा व स्फूर्ती निर्माण होईल. त्याचबरोबर जे मनोमन अपराधी आहेत त्यांची भीतीने गाळण उडेल." आपल्या पुरातन शत्रूचा निःपात करण्यासाठी आपल्या पाठीवर अजिंक्य जपानी सेना, आणि मुक्त झालेल्या पूर्व आशियातील लोकांची संघटन शक्ती निर्धाराने उभी असल्याचे त्यांनी जोरदार प्रतिपादन केले. सर्व श्रोतृवर्ग त्यांच्या भाषणाने प्रभावित झाला. ते पुढे म्हणाले, "गेल्या दोन दिवसांत कॉन्फरन्समध्ये प्रतिनिधींची जी भाषणे झाली ती ऐकून माझ्या मनःचक्षूंपुढे जगाच्या इतिहासाचा एक भव्य व समग्र देखावा उभा राहत आहे. व्हिएन्ना येथे १८१५ मध्ये भरलेल्या लीग ऑफ नेशन्सच्या कॉन्फरन्सच्या वेळेपासून घडलेल्या घटनांची एक साखळी मला स्मरते. त्यावेळी भारताचे प्रतिनिधी प्रत्येक देशाच्या प्रतिनिधींच्या दारोदार गेले होते. कोणीतरी भारताच्या स्वातंत्र्याची मागणी ऐकून घेईल. तथापि त्या वेळी तशी घटना घडली तरी आता त्यात फार मोठा बदल झालेला मला दिसतो. ही जेत्यांची परिषद नाही की ज्या ठिकाणी युद्धानंतर मिळालेल्या लुटीची वाटणी व विभागणीची चर्चा करावयाची आहे, एखाद्या लहान व निर्बल राष्ट्राला फसवून संगनमत करून त्याचे भक्ष्य करण्यासाठी ही सभा बोलावण्यात आलेली नाही. परराष्ट्रांच्या जोखडाखालून मुक्त झालेल्या राष्ट्रांची ही सभा आहे. न्यायासनावर अधिष्ठित झालेल्या राष्ट्रांची नव्या घटना घडविण्यासाठी व स्वतःचा दृढ निश्चय, अंतरराष्ट्रीय देवाणघेवाण आणि परस्पर मदत यासाठी ही सभा आहे. अशा प्रकारची एक सभा जपानमध्ये भरवली होती ती आकस्मित नव्हे, तथापि जगाने पूर्वेकडे मार्गदर्शनासाठी व प्रकाशासाठी पाहण्याची ही पहिलीच वेळ आहे असे नव्हे, तर पूर्वीच जगाच्या कोणत्यातरी ठिकाणी नव्या जगाच्या

योजना आखल्या गेल्या असतील. ज्यांनी हे नवे जग निर्माण करण्याचे पुढारीपण घेतले, त्या सर्वांचे अशा प्रकारचे प्रयत्न निष्फळ ठरले आहेत. अहंकार, द्रव्यलालसा आणि साशंकता या कारणांमुळे इतिहासाची पुनरावृत्ती होते. आता जगाचे लक्ष पुन्हा पूर्वेच्या प्रकाशाकडे लागले आहे. जपान आणि जपानी जनतेला नव्या ईस्ट आशियातील स्वातंत्र्य आणि प्रगती करण्यासाठी पुढारीपण घेणे अपरिहार्य होते, हे एक ऐतिहासिक सत्य आहे. जपान हाही एक आशियाचा प्रदेश समजल्यामुळे जपानवर आपली भूमिका नीट वठवण्याची जबाबदारी पडते. १९०५ मध्ये पश्चिम चढाईच्या वेळी आशियातील राष्ट्रांच्या बरोबरीने जपानलाही युद्धात भाग घेणे अपरिहार्य होते."
आपल्या भाषणात नेताजींनी सर्व मुद्दे स्पष्ट केले. आंतरराष्ट्रीय संबंध आणि सहकार्याने प्रगती याबद्दलही त्यांनी आपले विचार बोलून दाखवले. त्याचबरोबर सहकार्याने प्रगतीच्या, विकासाच्या आपल्या कल्पना त्यांनी मांडल्या. ते म्हणाले, "भारताने आपल्या विश्वबंधुत्वाच्या कल्पना विकसित केल्या आहेत आणि त्या भारतीय संस्कृतीच्या स्थायीभाव आहेत. तथापि मध्ययुगामध्ये त्याचा चुकीचा संदर्भ लागला गेला आहे. याची परिणती परराष्ट्राची गुलामगिरी पत्करण्यात झाली आणि दुःख, हालअपेष्टा, अपमान सहन करण्यात विश्वबंधुत्वाचा अर्थ लावला गेला." ते पुढे म्हणाले, "आशियनांच्या करिता अशिया किंवा सर्व आशियाकरिता साहाय्यक प्रगतीचा वाटा यामुळेच कदाचित आंतरराष्ट्रीय समाजाची व्यवस्थापना करण्याची वाट मोकळी होऊ शकेल. जिनिव्हा मध्ये तयार केली गेलेली 'लीग ऑफ नेशन्स' सारखी लुटारू संघटनाच त्यास विरोध करील. आपण हे लक्षात ठेवले पाहिजे, की आपले नव्या जगाचे नव्या आशियाचे आणि स्वतंत्र वैभवशाली 'ग्रेटर आशिया'चे स्वप्न साकार करण्यात आपण यशस्वी होऊ अगर होणारही नाही. भारताबद्दल म्हणावयाचे झाल्यास आमचे नशिब आणि भवितव्य हे जपानच्या आणि त्यांच्या संबंधितांच्यापेक्षा निराळे करता येणार नाही. चालू युद्धात आम्हाला विजय प्राप्त झाल्यावर स्वतंत्र भारत पाहण्यासाठी आमच्यापैकी किती लोक जिवंत राहतील, याबद्दल फिकीर नाही. तथापि भारत स्वतंत्र झाला येवढेच समाधान आम्हाला पुरे आहे. यासाठी साम्राज्यवादी ॲंग्लोअमेरिकेला झोडपून भारताबाहेर काढले पाहिजे आणि पूर्व आशियावर त्यांचे जे मीनिदायक सावट आहे ते कायमचे नष्ट केले पाहिजे. मला आशा आहे, की आजचा 'ग्रेटर ईस्ट आशिया'चा जो ऐतिहासिक जाहीरनामा एकमुखाने सर्वांनी मान्य केला आहे, तो जगातल्या सर्व लोकांना आणि पूर्व आशियातील सर्व लोकांना त्यांची सनद ठरो."
अशा प्रकारे त्यांनी आपल्या भाषणाचा समारोप केला. त्यांच्या भाषणाला श्रोतृवर्गाकडून भरगच्च प्रोत्साहन मिळाले. भरलेल्या डोळयांनी ते आपले उत्स्फूर्त भाषण देत होते. त्यांचे भारदस्त व्यक्तिमत्त्व, प्रगल्भ बुद्धिमत्ता आणि त्यांचा विशाल दृष्टिकोण यामुळे सर्व श्रोतृवर्ग मंत्रमुग्ध होऊन गेला. नेताजींच्या भाषणानंतर प्रिमियर टोजो

यांनी भारतीय स्वातंत्र्यलढ्याला मदत करण्याचा वज्रकठोर दृढनिश्चय जाहीर केला. ते आपल्या निवेदनात म्हणाले, " या पूर्वीच वेळोवेळी जाहीर केल्याप्रमाणे जपान भारताचे स्वतंत्र होण्याचे स्वप्न साकार करण्याकरिता शक्य असेल ती सर्व मदत देण्यास तयार आहे. खरे पाहता स्वतंत्र भारताचे हंगामी सरकार दृढपणे स्थापन झाले असून, भारतीय देशभक्त या सरकारांत संघटित होऊन त्यांची अभेद्य एकजूट झाली आहे आणि त्यामुळे त्यांची स्थिती बळकट झाली आहे. मला या ठिकाणी जाहीर करताना आनंद होत आहे, की अंदमान व निकोबार ही बेटे स्वतंत्र भारताच्या हंगामी सरकारकडे नजीकच्या काळात सुपूर्द करण्यास जपान तयार आहे. " या भाषणानंतर ग्रेटर ईस्ट आशिया कॉन्फरन्स समाप्त झाली.

या कॉन्फरन्समुळे नेताजी सुभाषचंद्र बोस पूर्व आशियातील लोकांच्या नजरेत भव्यपणे भरून राहिले. गेल्या दोन वर्षांच्या पूर्व आशियातील त्यांच्या वास्तव्यात आजचा दिवस महत्त्वाचा व मान सन्मानाचा म्हणून स्मरणात राहील. पुढील इतिहासकार ग्रेटर ईस्ट आशिया कॉन्फरन्सला किती महत्त्व देतात अगर देत नाहीत, याबद्दल चिंता नाही, तथापि नेताजी सुभाषचंद्र बोस हे आपल्या खांद्यावर आपल्या मातृभूमीचे भाग्य घेऊन एक भारतीय नेता म्हणून येणाऱ्या युगामध्ये सर्वांच्या चिरस्मरणात राहतील हेच त्या कॉन्फरन्सचे यश होय.

नेताजी सुभाषचंद्र बोस यांनी कॉन्फरन्सच्या प्रसंगी टोकिओ रेडिओवरून भारतातील आणि भारताबाहेर राहणाऱ्या भारतीयांना उद्देशून भाषण केले. त्यांनी 'भारतीय स्वातंत्र्याची तयारी पूर्ण झाली असून या अखेरच्या लढ्यात सर्वांनी भाग घेतला पाहिजे, असे आग्रहाने प्रतिपादन केले.

७ नोव्हेंबरच्या ' निशबिनीपॉन सिम्बन ' या फुकुओका, जपान या ठिकाणी प्रसिद्ध होणाऱ्या दैनिक वृत्तपत्रात या कॉन्फरन्सचा वृत्तांत खालीलप्रमाणे आला—

भारतीय स्वातंत्र्यलढ्यास पूर्व आशियाने संपूर्ण मदत व पाठिंबा दिला पाहिजे, असे ब्रह्मदेशाचे प्रधान मंत्री बा माव यांनी आग्रह पूर्वक प्रतिपादन केल्यानंतर, त्यांनी मांडलेल्या या ठरावाला प्रतिसाद देताना स्वतंत्र भारताच्या हंगामी सरकारचे प्रेसिडेंट म्हणून नेताजी सुभाषचंद्र बोस यांनी तीस मिनिटे भाषण केले. आपल्या भाषणात त्यांनी स्वातंत्र्याकरिता लढण्याचा कसा निर्धार केला आहे हे सांगितले. भाषणाच्या वेळी त्यांचे डोळे अश्रूंनी भरून आले होते. डॉ. बा माव त्यांच्या भाषणाने सद्गदित झाले आणि त्यांनी आपल्या समोरच्या टेबलावर भावविवशतेने मुठी आपटण्यास सुरुवात केली. यावेळी कॉन्फरन्सच्या देखाव्याने सर्वजण हेलावून गेले. मुख्य प्रधान टोजो, चीनचे प्रेसिडेंट ओसेई आ आणि फिलीपाईन्सचे प्रेसिडेंट लुवेल हे त्यांचे वक्तव्य एकाग्रतेने ऐकत होते. नेताजी बोस यांनी आपल्या भाषणाचा समारोप केल्यावरोबर टाळ्यांचा प्रचंड कडकडाट झाला. त्यानंतर मुख्य प्रधान टोजो हे व्यासपीठावर आले.

त्यांनी जपानच्या वतीने जाहीर केले, की 'स्वतंत्र भारताच्या हंगामी सरकारकडे येत्या काही कालावधीत अंदमान व निकोबार बेटे स्वाधीन केली जातील.' या जाहीर घोषणेमुळे जमलेल्या सर्व श्रोतृवर्गास आश्चर्ययुक्त आनंद झाला.

प्रिमियर टोजो व चीनचे प्रधान ओसेईआ यांच्या समारोपाच्या भाषणानंतर ही ऐतिहासिक कॉन्फरन्स दुपारी ३ वाजून १६ मिनिटांनी मोठ्या स्नेहपूर्ण वातावरणात समाप्त झाली.

ग्रेटर ईस्ट आशिया नॅशनल रॅले (राष्ट्रीय मेळावा) थोड्याच दिवसांत टोकिओच्या हिबीया पार्कच्या चौकात भरविण्यात आला. टोकिओ भेटीच्या वेळी नेताजी सुभाषचंद्र बोस बॅरन शिबुश्वा यांच्याकडे उतरले. या ठरावास आदरयुक्त उत्तर देताना त्यांनी तेथूनच एक जाहीर पत्रक काढले, की १००० लक्ष आशियनांच्या शक्तीने या पवित्र युद्धात यशस्वी होण्याचा जो ठराव पास करण्यात आला आहे, त्याबद्दल आदर व्यक्त करून त्याच्या पूर्तीसाठी दिल्लीवर धडक देण्याचा दृढनिश्चय मी व्यक्त करतो.

"अंदमान व निकोबार ही बेटे स्वतंत्र भारताच्या हंगामी सरकारकडे सुपूर्त करण्याबाबत प्रिमियर टोजो व जपान यांनी जाहीर केल्यामुळे भारतीय स्वातंत्र्य लढ्यासाठी त्याचा फार उपयोग होणार होता. जपानने दाखविलेला हा प्रामाणिकपणा जगाच्या नजरेत निश्चितपणे भरेल. जपानने दिलेला आपला शब्द खरा करून दाखविल्याबद्दल त्यांचा प्रामाणिकपणा व उद्दिष्ट जगाला दिसणार आहे. ही बेटे सुपूर्त करणे म्हणजे ब्रिटिश राज्यसत्तेतून भारताला मुक्ती मिळवून देण्याची जपानी लष्कराची पहिली पायरी आहे. आणि त्यामुळे आमच्या स्वातंत्र्याच्या लढ्यास नवीन आशा आणि मोठा आत्मविश्वास निर्माण होणार आहे.

"या बेटांना स्वातंत्र्य देण्यामध्ये एक प्रतीकात्मक विशिष्ट अर्थ आहे. कारण अंदमान हे बेट ब्रिटिशांनी राजकीय कैद्यांचा तुरुंग केला होता. ब्रिटिश सरकार उलथून पाडण्याच्या कटातील पुष्कळसे राजकीय कैदी शिक्षा भोगण्यासाठी येथे आणले जात. या बेटावर अशा प्रकारचे शेकडो कैदी बंद करून ठेवले होते. फ्रेंच राज्यक्रांतीच्या वेळी पहिल्या प्रथम पॅरिसमधील बास्ले हा तुरुंग उडवून लावला व राजकीय कैद्यांना मुक्त केले; त्याचप्रमाणे अंदमानमध्ये भारतीय स्वातंत्र्याकरिता लढलेल्या आमच्या देशभक्तांना पहिल्या प्रथम मुक्त केले जाईल. क्रमाक्रमाने भारतीय मुलुख स्वतंत्र केला जाईल. तथापि पहिल्याप्रथम स्वतंत्र झालेल्या मुलखाला विशेष अर्थ असतो. अंदमानला आम्ही हुतात्म्यांच्या स्मरणार्थ नवे नाव "शहीद बेटे" म्हणून ठेवू आणि निकोबारला "स्वराज्य" म्हणू.

"आता आमचा लढा तलवारीने सुरू करीत आहोत. मी माझ्या मित्रांना, देशबांधवांना सांगू इच्छितो, की जे जे अद्यापही ब्रिटिशांच्या जोखडाखाली भरडले जात आहेत त्या सर्वांनी आपल्या मातृभूमीच्या स्वातंत्र्यासाठी समर्पण केले पाहिजे. आता

युद्ध करून आपले स्वातंत्र्य मिळविले पाहिजे. स्वतंत्र भारताच्या हंगामी सरकारचे मुख्य ठाणे हे अंदमान-निकोबार येथे ठेवण्यापेक्षा ते ' आझाद हिंद-सेनेच्या ' संचलना-बरोबर पुढे पुढे जात राहील. ''

नेताजींची अशा प्रकारची वक्तव्ये जपानी वृत्तपत्रांतून जाहीर होत होती.

टोकिओमधील कॅपिटॉल बिल्डिंगमध्ये भरलेल्या ग्रेटर ईस्ट कॉन्फरन्सचा प्रचारही फार मोठ्या प्रमाणात झाला होता. या कॉन्फरन्समुळे पूर्व आशियाच्या इतिहासाचे नवे पान उघडले गेले. कॉन्फरन्स सुरू होण्यापूर्वी सर्व प्रतिनिधींनी टोकिओच्या मार्गावर असलेल्या ' फुकुओका क्युशुने ' या ठिकाणी काही दिवस थांबण्याची व्यवस्था होती. परदेशातील प्रतिनिधी जेव्हा जपानच्या धरतीवर प्रथम पाऊल टाकतील त्यावेळी त्यांना जपानी जीवनाची कल्पना येण्यासाठी आणि जपानी धर्तीने राहता यावे म्हणून साका-यास्पोकान फुकुओका शहरात असलेल्या अतिथिगृहात व्यवस्था करण्यात आली होती. अतिथिगृहाचे व्यवस्थापक कुरानारी यांच्या विनंतीवरून परराष्ट्रप्रमुखांनी एक संदेश लिहून खाली आपली सही केली.

| | | |
|---|---|---|
| चीनचे प्रेसिडेंट ओसेंइआ | – | एकमेकांना समजून घेणे आणि परस्पर विश्वास ठेवणे. |
| मांचूरीआचे मुख्य प्रधान छो | – | विशाल मने त्याच चाकोरीतून जातात. |
| ब्रह्मदेशाचे मुख्य प्रधान बा माव | – | एक रक्त, एक आवाज, एक नेता. |
| फिलिपाइन्सचे प्रेसिडेंट लुरेल | – | पूर्व आशियाची सुप्रभात. |
| नेताजी सुभाषचंद्र बोस | – | जग क्रांतिकारक बदल करण्यास उत्सुक आहे. आशियातील लोकांना नवा अशिया उभारण्याची सुवर्ण संधी आली आहे. |

नेताजी व इतर आशियन पुढाऱ्यांनी लिहून ठेवलेल्या या संदेशाबद्दल मिस्टर कुरानारी यांना फार अभिमान वाटतो आणि ते पुढील पिढीसाठी जतन करून ठेवले आहेत.

८ नोव्हेंबर रोजी हेबीया पार्कमध्ये भरलेल्या या मेळाव्यात नेताजींनी जपानी जनतेला भारताची माहिती मिळावी म्हणून मोठे भाषण केले. त्यांनी निर्देशित केले, की " आमच्या शत्रूच्या प्रचारामुळे आमच्यातील काही लोकांचा विपरीत ग्रह झाला आहे आणि यामध्ये आमचे काही सहानुभूतिदारही आहेत. '' त्यांच्या दीर्घ भाषणातील काही महत्त्वाचे मुद्दे असे : पहिला मुद्दा त्यांनी मांडला तो असा, " भारतीय लोकांना अद्यापही एकजुटीचे महत्त्व समजले नाही, ते नेहमी आपआपसात कलह करीत असतात. गेली १०० वर्षे ते ब्रिटिशांबरोबर लढत आहेत; पण भारतीयांनी या लढण्याचे सर्वांचे एकच ध्येय बनविले नाही. दुर्दैवाने भारतीयांना अद्वितीय असा नेता लाभला गेला नाही. आताही भारताला एक खंबीर नेतृत्व करणारा नेता लाभला

पाहिजे, की जो सर्वांना शिस्तीत ठेवू शकेल. ज्या राष्ट्राला आपला निश्चित दृष्टिकोण माहीत आहे व आत्मविश्वास आहे, ते राष्ट्र केव्हाही नष्ट होणार नाही. जे राष्ट्र दुसऱ्या राष्ट्रावर अवलंबून आहे, ते राष्ट्र नष्ट होते. ”

दुसरा मुद्दा असा, की “ ब्रिटिश भारतात धार्मिक भेदाभेद करतात. मुस्लिमांच्या विरुद्ध हिंदू असा भेदाभेद निर्माण करून आमच्यात फूट पाडतात. ”

तिसरा मुद्दा असा, की “ धार्मिक भेदाभेद करण्यात ब्रिटिश यशस्वी होत आहेत असे दिसताच त्यांनी मागसलेल्या वर्गातील लोकांना हाताशी धरून कार्यभाग साधून घेण्याचा प्रयत्न चालविला आहे. ”

चौथा मुद्दा असा, की “ ब्रिटिशांनी सत्ता गाजवण्यास सोपे पडावे म्हणून भारताचे पाच विभागांत विभाजन केले आहे. ”

पाचवा मुद्दा असा, की “ लोकांचे दारिद्र्य कायम राहून ते व्यसनाधीन होतील, याकडे लक्ष दिले जाते. ”

भारतीय समाजामध्ये ब्रिटिशांनी ज्या दुष्ट प्रथा चालू केल्या आहेत, संस्थानिकांना दलाल बनविले आहे, त्यावर प्रत्युत्तर म्हणून नेताजींनी खूप प्रचार केला. वरील एकाद्या मुद्याच्या निराकरणाकरिता खरे तर त्यांनी आपल्या बर्लिनच्या वास्तव्यापासून आपला साहाय्यक म्हणून एका मुस्लिम तरुणाला बरोबर ठेवले. त्यांनी आपला आहार धर्मनिष्ठेवर न ठेवता वेळोवेळी निरनिराळ्या पद्धतीचे भोजन घेतले आणि त्यांनी आपल्या अनिष्ट भारतीय सवयी मोडून टाकल्या होत्या. नेताजी स्वतः कडक वागत, त्यामुळे इतरांनाही तसे वागणे भाग पडे. धार्मिक, आर्थिक, सामाजिक वगैरे ज्या गोष्टी स्वातंत्र्य लढ्याला आडव्या येतील किंवा स्वतःचे आचार, विचार आणि विकार अडथळा आणतील त्या सर्वांपासून ते दूर राहत व संपूर्ण वैयक्तिक जीवनातही त्यांनी अशा गोष्टींना दुय्यम स्थान दिले होते. ते आपले उदाहरण दुसऱ्याला घालून देत, पण त्यांना पाहिजे असलेली परिस्थिती बदलली गेली नाही, हे एक कटू सत्य आहे.

टोकिओच्या वास्तव्यात दैनंदिन गर्दीच्या कार्यक्रमांतून काही वेळ काढून नेताजी आजारी असलेल्या रासबिहारी बोस यांना भेटत किंवा जपानमध्ये विद्याभ्यासासाठी वास्तव्य करणाऱ्या भारतीय विद्यार्थ्यांच्या वसतिगृहास भेटी देत; जपानमधील त्यांच्या दोन आठवड्यांच्या वास्तव्यामध्ये त्यांनी आय्. एन्. ए. च्या गुणनैपुण्यात व संख्येत भर घालण्यात जोर दिला. त्याचप्रमाणे नौदल व हवाईदलाचीही पुनर्रचना केली. या वाटाघाटीतून शेवटी त्यांनी आय्. एन्. ए. ची शक्ती वाढावी व तिने युद्धशास्त्रांत निपुण व्हावे म्हणून जपानने त्यांच्या लष्करी अधिकाऱ्यांना शिक्षण देण्याचे मान्य करून घेतले.

टोकिओत नेताजींनी आपले वास्तव्य मिस्टर बॅरन शिबुश्वा यांच्याकडे केले होते व ते आता त्यांचा निरोप घेणार होते. मिस्टर व मिसेस् शिबुश्वा यांनी त्यांना फारच

प्रतिष्ठेने आणि अत्यंत भावपूर्ण असा निरोप दिला. नेताजींसारखा दयाळू, विशाल-हृदयाचा मनुष्य त्यांच्या सबंध आयुष्यामध्ये त्यांना भेटला नव्हता. नेताजींनाही अत्यंत निर्मळ अंतःकरणाची व सहानुभूती दाखवणारी माणसे भेटली होती.

ग्रेटर ईस्ट आशिया कॉन्फरन्सच्या पुढाऱ्यांच्याबद्दल नेताजींची खालीलप्रमाणे मते बनली होती.

प्रिमियर टोजो–' लष्करी सैनिक, राजनीतिज्ञ, मुत्सद्दी. निग्रही वृत्तीने ते कॉन्फरन्सला हजर होते. त्यांची निवेदने व वक्तव्ये स्पष्ट शब्दांत सांगितलेली अचूक आणि बिनतोड असत. त्यांचे सिद्धान्त संक्षिप्त व मुद्यास धरून होते. '

मांचूरियाचे मुख्य प्रधान छो–' मला ते एक अनुभवी, मुरलेले राजनीतिज्ञ असे वाटले. त्यांच्याकडे पाहिल्यावर असे वाटते, की ते एक सागरी वयोवृद्ध कप्तान असून आपली नौका अनेक वादळांतून बंदराकडे सुरळीतपणे घेऊन जात आहेत. '

चीनचे प्रेसिडेंट ओसेइआ–' ते एक विद्वान, हिकमती आणि अनुभवी राजनितिज्ञ आहेत. त्यांना स्वतःला ते कोठे आहेत हे माहीत आहे. खोल पाणी शांत दिसते त्याप्रमाणे ते शांत आहेत, तथापि ते करारी आहेत. ते मोठमोठ्या गोष्टी बोलत नाहीत, परंतु ते दुसऱ्याचे म्हणणे ऐकून घ्यावयास तयार असतात.'

फिलिपाइन्सचे प्रेसिडेंट लुरेल–' ते एक वक्तृत्वपूर्ण आवेगाने बोलणारे तुफानी वक्ते आहेत. त्यांच्या प्रामाणिक आणि भावपूर्ण भाषणामुळे श्रोत्यांच्या डोळ्यांत अश्रू उभे राहतात. '

थायलँडचे राजपुत्र वोनवाई–' ते अतिशय सभ्य, विनयशील, सुसंस्कृत व थोर मनाचे आहेत. जगातील कोणत्याही सामाजिक गटात ते आपले स्वतःचे अस्तित्व विसरणार नाहीत. '

ब्रह्मदेशाचे मुख्यप्रधान बा माव–'त्यांच्याच शब्दांत सांगायचे म्हणजे ते आघाडीच्या दुसऱ्याच रांगेत असलेल्या सैनिकाप्रमाणे आहेत. शत्रूला जोरदार ठोसा मारावा अशी त्यांची तयारी व इच्छा आहे. मुक्त संयुक्त पूर्व आशियाच्या उभारणीसाठी त्यांनी स्वतःला समर्पित केले आहे. '

या कॉन्फरन्सच्या कामकाजाच्या प्रगतीबद्दल नेताजींना म्हणावयाचे आहे, की " बऱ्याचशा आंतरराष्ट्रीय परिषदांमध्ये एखाद्या पुढाऱ्याकडून किंवा पुढाऱ्यांच्या गटाकडून सर्व परिषदेवर प्रभुत्व गाजविले जाते. अशा प्रकारच्या परिषदांमध्ये जुलमी कामकाजाची जबाबदारी इतरांना अपरिहार्य म्हणून स्वीकारावी लागते. अशा परिषदांचे नित्याचेच झाले आहे, की शक्तिशाली राष्ट्रे दडपशाही करण्याचा प्रयत्न करतात. फसवाफसवी, धटिंगपणा करून लहान राष्ट्रांना दडपून ठेवतात; परंतु या सर्वांहूनही ही ग्रेटर ईस्ट आशिया परिषद निराळी आहे. कोणत्याही बलाढ्य राष्ट्राने या परिषदेत दडपशाही केली नाही. फूस देणे, दबाव आणून मन वळवण्याचा प्रयत्न

करणे, गुप्त खलबते करणे, डावपेचाने बोलून फसवणे, युक्तिवाद करणे असा काहीही प्रयत्न केला गेला नाही. "

काही भारतीय कार्यकर्ते आणि मि. बोस यांची बैठक भरली असता मी (टाटसो हयासिद ) हजर होतो. बोलण्याच्या ओघात युद्धाबद्दल बोलणे निघाले, तेव्हा नेताजी म्हणाले, " समजा, जर्मनीचा पराजय झाला तरी पण आम्हाला रशियाशी हात-मिळवणी करून संयुक्त शक्तीबरोबरच युद्ध खेळणे भाग पडेल." मि. शुकीया ओकावा हे त्यावेळी हजर होते. त्यांना नेताजी कॅम्युनिस्टांच्या विरोधी आहेत हे माहीत असल्यामुळे त्यांना काय म्हणावयाचे आहे, हे समजेना; पण नेताजी त्याबद्दल खुलासा करताना म्हणाले की, " खरी गोष्ट काय आहे ती तुम्हाला माहीत नाही. मी काय म्हणालो याबद्दल तुमच्या मनात प्रश्न उभा राहिला असेल; परंतु ज्या भारतीय जनतेने ब्रिटिशांच्या अत्याचाराखाली अनेक वर्षे काढली आहेत त्यांबद्दल त्यांना चीड येऊन त्यांनी सैतानाबरोबर हातमिळवणी केली, तरीही कोणाला काही वाटणार नाही." नेताजींच्या या स्पष्टीकरणाने ओकावा यांच्या मनातील संदेह नाहीसा होऊन त्यांना त्यांच्याबद्दल फारच सहानुभूती वाटू लागली. नेताजींच्या निवेदनावरून त्यांना तसे वाटले. खरी गोष्ट अशी, की जपानच्या पराभवानंतर त्यांनी रशियात आश्रय मिळ-वण्याचा प्रयत्न चालवला होता; पण दुर्दैव आडवे आले.

## नानकिंग, मनिला आणि जावाला नेताजींची भेट

ग्रेटर ईस्ट आशिया कॉन्फरन्स संपवून चीनचे प्रतिनिधी ओसेइआ हे परत जाताना फुकुओका येथे एक रात्र राहिले होते. त्यावेळी जपानी सल्लागार शिवायामा आणि टेराओका यांच्याजवळ नेताजींच्याबद्दल त्यांना काय वाटले ते त्यांनी सांगितले व नानकिंगला भेट द्यावी अशी इच्छा व्यक्त केली. त्यांना असे म्हणावयाचे होते, की " ग्रेटर ईस्ट आशिया कॉन्फरन्सच्यावेळी स्वतंत्र भारताच्या हंगामी सरकारचे प्रेसिडेंट सुभाषचंद्र बोस यांना भेटण्याची संधी मिळाली. कॉन्फरन्सच्या वेळी ते शांत होते; पण शेवटी ते व्यासपीठावर येऊन आपले विचार बोलून दाखवण्यासाठी उत्सुक होते. व्यासपिठावर मला त्यांचे व्यक्तिमत्त्व फारच प्रभावी वाटले. त्यांची मुद्रा भारदस्त असून ते सशक्त वाटले. ते उत्साही असून हुषार आहेत. ते उत्तम वक्ते आहेत. त्यांच्या ठिकाणी असलेल्या सर्व मोठ्या गुणांमुळे ते क्रांतिकारक बनले आहेत. त्यांना अकरा वेळा तुरुंगात ठेवले गेले, त्या वेळी त्यांना सात वेळा उपोषण करावे लागले. ते मुरलेले मुसद्दी स्वातंत्र्य सैनिक आहेत. त्यांचे शिक्षण इंग्लंड आणि जर्मनीमध्ये झाले. प्रखर आणि शांत बुद्धिमत्ता त्यांच्याकडे आहे."

नेताजी सुभाषचंद्र बोस यांची प्रिमियर टोजोप्रमाणेच ओसेइआ यांच्यावर छाप पडून ते त्यांचे अत्यंत सहानुभूतिदार झाले व मित्र बनले. त्यांनी नेताजींना नानकिंगला

भेटण्याचे आमंत्रण दिले. नेताजींनी या आमंत्रणाचा आनंदाने स्वीकार केला.

१७ नोव्हेंबर रोजी नेताजींचे टोकिओहून नानकिंगला प्रयाण झाले. त्यांच्याबरोबर तीन भारतीय होते. त्यांत कर्नल भोसले यांचा समावेश होता. ॲडमिनिस्ट्रेटर चेडा, कर्नल यामामोटो आणि फॉरेजिन सर्व्हिस ऑफिसर ओटा ही जपानी मंडळी होती.

नानकिंग सरकारने नेताजींचे भव्य स्वागत केले व त्यांच्याकरिता खास व्यवस्था करण्यात आली. सुसज्ज अतिथिगृहात त्यांची राहण्याची व्यवस्था करण्यात आली नेताजींच्या सन्मानार्थ लष्करी मानवंदना देण्यात आली व राष्ट्रीय मेळावा भरवण्यात आला. सामाजिक सन्मानार्थ त्यांच्याकरिता उपहार आयोजित केले. अशाच एका उपहाराचे प्रसंगी जर्मनीचे परराष्ट्र वकील वेलमॅन व नेताजी बोलत होते. त्या प्रसंगी प्रसिडेंट ओसेइआ यांनी त्यांना ते एकटेच कसे, असे विचारले. वेलमॅन हे पण ब्रह्मचारीच होते. नेताजींनी हास्य करून आपण अद्याप त्या बाबत बालपणातच आहोत, असे सांगितले.

चीनमधील जपानी लष्कराचे कमांडर जनरल हाटा म्हणाले, " आता या पुढील आपली भेट दिल्लीतच होईल. " नेताजींनी चटकन उत्तर दिले, " मी तुमचे तेथे मोठ्या प्रेमाने स्वागत करीन. "

सलोख्याच्या वातावरणात दोन्ही प्रेसिडेंटची बोलणी मनमोकळेपणे झाली.

नानकिंगला भेट देण्यामागील नेताजींचा उद्देश असा होता, की चुकींग सरकार व चिनी जनता यांना विश्वासात घेऊन आपले म्हणणे त्यांना समजावून देणे. २० नोव्हेंबर रोजी नेताजींनी ४० मिनिटे भाषण करून चिनी जनतेला सद्यः परिस्थितीवर आपले विचार समजावून सांगितले आणि पूर्व आशियातील शांतता प्रस्थापित करण्याबद्दल आपला विश्वास व्यक्त केला. त्याचबरोबर चिनी जनतेला सिनो–जपान संबंधावरही त्यांना काय वाटते ते त्यांनी बोलून दाखवले. रेडिओवरील त्यांची सर्व भाषणे त्यांनी स्वतः तयार केली होती. त्यांना जपानी सरकारने किंवा ओसेइआ सरकारने कोणत्याही पूर्व सूचना केल्या नव्हत्या, हे लक्षात घेतले पाहिजे.

२३ नोव्हेंबर रोजी त्यांनी नानकिंगच्या नभोवाणीवरून चुंगकिंग आमदानीबद्दल भाषण केले. त्यांनी प्रथम नभोवाणीवर केलेल्या भाषणाची तुलना केली तर ते सूचनात्मक व सौम्य शब्दांत होते. त्यांचे दुसरे भाषण चीनने ब्रह्मदेश–भारताच्या सरहद्दीवर जी लष्करी चढाई केली त्याच्या समर्थनार्थ होते आणि संयुक्त अमेरिका व ब्रिटन यांच्यावर तिखटपणे टीका करणारे व प्रखर असे होते.

नानकिंग मधील ठरल्याप्रमाणे सर्व कामे संपल्यावर भारतीय रहिवाश्यांची सभा घेण्यासाठी नेताजींनी सिंगापूरला प्रयाण केले. त्यानंतर तेथील कार्यक्रम संपवून ते मनिलाला रवाना झाले. ग्रेटर ईस्ट एशिया कॉन्फरन्सच्या वेळी भेटलेले प्रेसिडेंट लुरेल व जपानचे परराष्ट्र प्रतिनिधी आणि लष्कराचे अधिकारी यांच्या निमंत्रणावरून ते

तेथील भारतीय रहिवाश्यांच्या मेळाव्यास उपस्थित राहिले व तेथे त्यांनी भाषण केले.

शांघायमध्ये खूपच भारतीय रहिवासी असून, ते आझाद हिंद फौजेमध्ये भरती होण्यास उत्सुक होते. तथापि सिंगापूरपर्यंत त्यांना घेऊन जाण्याची व्यवस्था नसल्याने त्यांची भरती करून घेण्यात आली नाही. परंतु मनिला व रंगून येथे फार लोक भरती होण्यासाठी नव्हते. म्हणून सैनिक जमा करण्याऐवजी फंड जमा करण्यात आला.

## जावा, बोर्निओ आणि सुमात्राला भेट

जावामध्ये राहत असलेल्या आपल्या भारतीय रहिवाश्यांना आणण्याकरिता नेताजींना जावाला भेट देणे क्रमप्राप्त होते. डिसेंबरच्या १० तारखेला ते जकार्तामार्गे विमानाने रवाना झाले. जपानच्या लष्करी व नौदलाच्या अधिकाऱ्यांनी विनंती केल्यावरून तेथे त्यांनी त्यांचा मुक्काम वाढवला. या वेळी तेथील " मायको हॉटेल "मध्ये आझाद हिंद सरकारच्या स्थानिक शाखेच्या बोलावलेल्या सभेला ते हजर राहिले. दुसऱ्या दिवशी ते जकार्ता म्युनिसिपल थिएटरमध्ये भरलेल्या भारतीयांच्या मेळाव्यास हजर राहिले. सर्व भारतीयांनी भारताच्या स्वातंत्र्याकरिता आपले सर्वस्व समर्पण करण्यास सिद्ध झाले पाहिजे असे सांगितले. १२ डिसेंबर रोजी ते सुरबाय, त्यानंतर बोर्निओ व सुमात्राला रवाना झाले.

## सिंगापूरला आगमन

नेताजी सुभाषचंद्र बोस सदासर्वकाळ मोठे उत्साही असत. ग्रेटर ईस्ट आशियामधील सर्व राष्ट्रांना त्यांनी भेटी दिल्या. त्याचा परिणाम म्हणजे या भागात राहणाऱ्या दोन लक्ष भारतीयांची मने त्यांनी जिंकली. त्या लोकांचा नेताजींच्यावर संपूर्ण विश्वास होता. त्यांच्यापैकी कित्येक जवान आझाद हिंद फौजेत सामील झाले आणि त्यांनी आपले रक्त भारताच्या स्वातंत्र्याकरिता सांडले. जे फौजेत सामिल होऊ शकले नाहीत त्यांनी आर्थिक व इतर अन्य तऱ्हेने मोठी मदत केली. नेताजी चालू झालेल्या मोहिमेबद्दल संपूर्ण संतुष्ट होते आणि याच वेळी त्यांच्या खांद्यावर अधिक जबाबदारी पडत होती.

ग्रेटर ईस्ट आशिया कॉन्फरन्सने स्वतंत्र भारताच्या हंगामी सरकारचे परिवर्तन होऊन जनतेच्या दृष्टीने त्याच्यात समर्थ व परिणामकारक त्वरित वाढ झाल्याचे दिसून आले. अनेक कार्यामध्ये हंगामी सरकार स्वरूप घेऊ लागले. नेताजी आपल्या सर्व शक्तीसह त्याच्यामध्ये लक्ष घालू लागले.

त्या सर्व कार्याची यशस्वी परिपूर्ती व्हावी म्हणून अनेक लहानसहान प्रश्न व्यवस्थित सोडवणे जरूर होते. प्रथमतः आझाद हिंद फौजेला सर्व प्रकारच्या युद्धसाहित्याने ती परिपूर्ण झाली आहे व तिला युद्ध शिक्षण मिळाले आहे, हे पाहणे जरूर होते.

दुसरे म्हणजे, भारतीय जनतेच्या भावना ब्रिटिशांच्या विरुद्ध कितपत उत्कटतेला पोहोचलेल्या आहेत आणि ज्या वेळी आझाद हिंद फौज भारतात चाल करून जाईल त्या वेळी त्यांचा उठाव होईल किंवा कसे, पाहणे जरूर होते. तिसरे म्हणजे, लष्करी डावपेचाच्या दृष्टीने या भागात असलेल्या जपानी लष्कराने चालून जाण्याची आपली सर्व तयारी चांगल्या प्रकारे केली असून, ती आझाद हिंद फौजेबरोबर संयुक्तपणे चाल करून जाईल अगर कसे, याचा पण विचार करणे जरूर होते.

# दहा / माध्याह्न :
# ' चलो–दिल्ली '

**परिस्थितीत नवा बदल : स्वतंत्र भारताचे पहिले सरकार ब्रह्मदेशात आले. कोहीमा जिंकले. युद्धपरिस्थितीत प्रतिकूलता.**

७ जानेवारी १९४४ रोजी ब्रह्मदेशाची राजधानी रंगून येथे स्वतंत्र भारताचे हंगामी सरकार आणण्यात आले. भारतातल्या आपल्या शत्रूपक्षाच्या नरडीवर झेप घेण्यासाठी ब्रह्मदेशाचा उपयोग ' स्प्रिंग बोर्ड 'सारखा करता येईल अशी पूर्वीपासूनच नेताजी सुभाषचंद्र बोस यांची योजना होती. आता त्यांनी भारताच्या दिशेने आपले एक पाऊल पुढे टाकले. ब्रह्मदेशात जाण्यापूर्वी नेताजींनी अंदमान व निकोबारला भेट दिली. स्वतंत्र भारताच्या हंगामी सरकारची स्वतःची अशी तेथली एकच भूमी होती. २९ डिसेंबर रोजी सिंगापूरहून ते अंदमान बेटावर गेले. दुसऱ्या दिवशी त्यांनी सर्व अंदमान हिंडून पाहिले. या त्यांच्या वास्तव्यात त्यांनी एक बैठक घेतली व जपानी लष्करी प्रमुखांची भेट घेतली. बेटावरील रहिवाश्यांना संपूर्ण संरक्षण देण्याबद्दल व त्यांच्या पारंपरिक गोष्टी जपण्याबद्दल आणि 'हा भारताचाच हा एक भाग आहे' असे समजण्याबद्दल पुन्हा एकदा सर्वांना बजावले. ले. कर्नल ए. डी. लोकनाथन् यांची ॲडमिनिस्ट्रेटिव्ह प्रिप्रेटरी कमिटीचे अध्यक्ष म्हणून नेमणूक केली. ही बेटे ब्रिटिश साम्राज्यातून मुक्त होऊन स्वतंत्र भारतात सामील झाल्याचे प्रतीक म्हणून तिथे तिरंगी ध्वज फडकावला गेला.

ब्रह्मदेशात आपल्या सरकारचे स्थलांतर झाल्यानंतर ऑगस्टमध्ये त्याने आपले स्वातंत्र्य जाहीर केले. मध्यंतरीच्या काळात जपानी लष्कराने ब्रिटिश-चायनिज फौजेवर हल्ला चढवण्याच्या दृष्टीने स्वतः संघटन केले.

ब्रह्मदेशाच्या संरक्षणाचे हे काम जपानच्या १५ व्या लष्करी दलाचे कमांडंट ले. ज. मुटागुची यांनी आपल्याकडे सोपवून घेतले, तथापि शत्रूविरुद्ध संरक्षणफळी

निर्माण करण्याचे काम फारच अवघड होते; कारण मनुष्यबळ अत्यंत अपुरे होते, हवाई दलात हजारो प्रकारची कमतरता होती, पिछाडी भक्कम नव्हती व त्याचा कोणत्याही प्रकारचा उपयोग होण्यासारखा नव्हता. अशाही स्थितीत वरिष्ठ लष्करी अधिकारी व प्रांतिक लष्करी प्रमुख आणि ' इंपीरिअल् जनरल हेडक्वार्टर्स ' यांच्या अनेक वेळा बैठकी घेऊन सर्व दृष्टीने सुसज्ज बनवण्याचा प्रयत्न केला.

मध्यंतरीच्या काळात शत्रूचे प्रतिहल्ले होण्याच्या चिन्हात वाढ दिसू लागली. जानेवारी १९४४ च्या सुरुवातीस ब्रह्मदेशात असलेल्या ' रिजनल आर्मी कमांडंट ' यांना ' इंफाळ 'वर हल्ला चढवण्याचा हुकूम आला आणि १० मार्च ही तारीख आर्मी कमांडंटना चालून जाण्यास मुक्रर करून देण्यात आली. या ठिकाणचे हवामान फक्त दोनच महिने कोरडे असते आणि गोष्ट अशी झाली, की चढाई करण्यातच दोन महिन्यांचा कालावधी लोटला. यामुळे जी चढाई करावयाची होती त्याचा परिणाम चांगला झाला नाही व या सर्व मोहिमेचा आराखडा विस्कटून गेला. तथापि आझाद हिंद फौज व जपानी लष्कराने संयुक्तपणे ही चाल करावयाची होती व त्याबद्दल दूरदर्शीपणाने विचारपूर्वक सर्व योजना आखल्या गेल्या होत्या.

ब्रह्मदेशातले जपानचे रिजनल आर्मी कमांडंट, आझाद हिंद सरकार आणि आझाद हिंद फौज यांचे सदासर्वकाळ घनिष्ठ संबंध राखण्यात आले होते. मार्च १९४३ मध्येच रिजनल आर्मी कमांडंटची व्यवस्थापना करण्यात आली होती आणि जनरल क्वाब्वे हे त्यांचे कमांडर होते. टोकिओहून ब्रह्मदेशाकडे कमांडरच्या जागेवर हजर होण्यासाठी जाण्यापूर्वी जनरल क्वाब्वे यांना प्रिमियर टोजो यांनी बोलावून घेऊन सांगितले होते, की " ब्रह्मदेशात ज्या लष्करी हालचाली चालू आहेत त्यामागील हेतू भारतीय स्वातंत्र्य लढ्याला वाट करून देणे असा आहे. " आपल्या येथे येण्याचा हेतू व आपले कार्य समजावून घेऊन जनरल क्वाब्वे ब्रह्मदेशात आले होते. रंगूनला आल्यानंतर डायरेक्टर इवॅक्युरो किकान यांच्याबरोबर त्यांनी अनेक बैठका घेतल्या. आझाद हिंद फौजेच्या प्रतिनिधींनी त्यांची मे मध्ये भेट घेतली. या वेळेपावेतो नेताजी आघाडीवर गेले होते.

राजकीय व लष्करी दृष्टीने तयारी होत होती. जपानी प्रमुखांच्याकडे आझाद हिंद सरकारला पार्श्वभूमी तयार करून देणे व आझाद हिंद फौजेला ब्रह्मदेशातून वाव करून देणे येवढेच काम होते. ब्रह्मदेशात भारतीय फौज येण्यापूर्वीच त्यांची त्याला अनुमती असणे आवश्यक होते. डावपेचाच्या दृष्टीने जपानने आपल्या लष्करी हालचालीच्या योजना ठरविणे जरुर होते आणि त्याबरोबरच ' इंडो–जपान ' सहकार्याच्या योजना कार्यान्वित होण्यासाठी तत्काळ काही योजना तयार करणे आवश्यक होते. खऱ्या दृष्टीने पाहिल्यास भारतामधील जनतेच्या भावना जरी ब्रिटिशांच्या विरुद्ध होत्या तरी त्या जपानच्या बाजूने पूर्णपणे होत्याच असे नाही; की ज्यामुळे जपानी लष्कराला

भारतात येऊ दिले जाईल. जपानी हेच आक्रमक आहेत असा भारतीयांचा समज होईल असे जपान्यांनी करण्याचे टाळले आणि या करिताच भारतीयांच्या नेताजींच्याबद्दल व आझाद हिंद फौजेबद्दल सहानुभूतीच्या भावना असणे आवश्यक होते. भारताला स्वातंत्र्य मिळवण्याच्या कामी मदत करण्याचे धोरण जपानने ठरवले होते व त्या निश्चयाला त्याना दृढपणे चिकटून राहावयाचे होते. आणि अखेरपर्यंत भारताचा एक इंच जमिनीचा तुकडा जर त्यांनी जिंकला तरी तो भारतीयांच्याच स्वाधीन करावयाचा, असे त्यांनी आपले धोरण ठरवून टाकले होते. त्यांनी अशीही एक प्रथा ठरवून टाकली होती, की अँग्लो–जपानच्या कोणत्याही गोष्टीबद्दल— मग ती राजकीय असो अथवा लष्करी असो–त्याबाबतचा महत्त्वाचा अखेरचा निर्णय नेताजींनीच घ्यावयाचा. या बाबतचा न्यायनिवाडा त्यांनी अँग्लो-इंडियन बाबत जसा केला असता तसाच त्यांनी तो करावयाचा होता.

मध्यंतरीच्या काळात जनरल क्वाबे हे नेताजी सुभाषचंद्र बोस यांना भेटले. नेताजींचे भव्य व्यक्तिमत्त्व, विशाल दृष्टिकोण आणि स्वातंत्र्याबद्दलची महत्त्वाकांक्षा यामुळे त्यांच्यावर नेताजींची छाप पडली. भारतीय स्वातंत्र्य साकार करण्याकरिता कोणत्याही प्रकारचे सहकार्य आणि शक्य असेल त्या सर्व प्रकारची मदत करण्याचे त्यांनी वचन दिले. जनरल क्वाबेना आपल्या योजना आणि कल्पना नेताजींनी परत समजावून सांगितल्या. चालू युद्धाचा फायदा घेऊन ब्रिटिशांच्या विरुद्ध शस्त्र घेऊन लढले पाहिजे. ब्रिटन आणि संयुक्त राष्ट्रे यांना शत्रू समजणाऱ्या कोणत्याही राष्ट्राबरोबर आम्ही हातमिळवणी करण्यास तयार आहोत, असेही त्यांनी सांगितले.

त्यांनी जाहीरच केले की—

( अ ) आझाद हिंद फौज ही भारताच्या भूमीवर ज्या ज्या ठिकाणी चढाई होईल त्या सर्व ठिकाणी त्या सर्वांच्या पुढे राहील. भारतीय भूमीवर प्रथम जर कोणाचे रक्त सांडावयाचे असेल, तर ते आझाद हिंद फौजेच्या वीर देशभक्तांचेच असेल.

( ब ) चालू युद्ध खरोखरच जर लांबणीवर पडले तर मला आझाद हिंद फौजेच्या गुणवत्तेत व संख्येतही सुधारणा करता येईल.

( क ) चालू परिस्थिती जर 'ॲक्सेस पावर्स'ला अनुकूल नसेल, तर भारतीय जनतेची मने द्विधा होऊन आपण कोणत्या बाजूला मदत करावी व पाठिंबा द्यावा हे त्यांना समजणार नाही. अशा संशयी परिस्थितीत ते ब्रिटनबरोबर समझोता करण्यास तयार होतील. आणि म्हणून आता त्वरित कृती करणे आवश्यक आहे आणि या कृतीस वेळ लागला, तर भारतीय जनता शत्रूकडून जिंकली जाईल.

( ड ) या सर्वांतून बचावाचा एकच मार्ग आहे आणि तो म्हणजे भारतात निर्माण केलेल्या हंगामी सरकारने याचवेळी उठाव केला पाहिजे. आझाद हिंद फौज भारताकडे जेव्हा कूच करील तेव्हाच आमच्या राजकीय सामर्थ्याचा पुरावा पाहून क्रांतिकारक

प्रवृत्ती आमच्या बाजूने होतील आणि मग जपानही आमच्या पाठीशी उभा आहे, हे समजताच प्रचंड प्रमाणावर आम्हांस पाठबळ मिळू शकेल.

नेताजी रंगून येथे आल्यावर ७ जानेवारी रोजी स्वतंत्र भारताचे हंगामी सरकार येथे आल्याच्याप्री- .र्थ जपानच्या लष्करी प्रमुखांनी उपाहारासाठी नेताजींना निमंत्रित केले. नेताजी आपल्या लष्करी गणवेशातच या समारंभास गेले. त्यांच्या समवेत कॅ. लक्ष्मी, महिला विभागाच्या संचालिका आणि मि. सह्या, सेक्रेटरी जनरल हेही होते. जपानच्या बाजूने परराष्ट्र वकील स्वाटा हे पाहुणे होते, नेताजींनी मुख्य व इतर जमलेल्या पाहुण्यांना उद्देशून नम्र पण निश्चयी असा भारताच्या स्वातंत्र्याकरिता लढण्याचा दृढ व निग्रही विचार व्यक्त केला. शेवटी ते म्हणाले, "जर मला काही मागावयाचे असेल, तर मी ईश्वराजवळ एवढेच मागतो, की ईश्वरा! जर आमचे रक्तच सांडावयाचे असेल, तर आता अधिक विलंब लावू नको." नेताजींच्या भाषणाने सर्वजण भावविवश होऊन काही काल स्तब्ध राहिले.

नेताजींनी अनेक मार्गांनी भारतामधील जनतेच्या मनामध्ये आपण ब्रह्मदेशांत चढाईसाठी आल्याचे बिंबविण्याचा प्रयत्न केला. १७ जानेवारीच्या 'आझाद हिंद' या अंकात त्यांनी 'पुढे चला' या मथळ्याचा लेख लिहिला. या लेखास मोठी प्रसिद्धी देण्यात आली. त्या लेखात त्यांनी भारताबाहेरील स्वातंत्र्यलढ्याच्या प्रगतीचा वृत्तांत देऊन या लढ्याची हळूहळू, पण धीराने व खंबीरतेने प्रगती झाल्याचे प्रतिपादिले होते. प्रगतीचे नऊ मैल संपले असून दहाव्या मैलात आपण आलो आहोत हे सांगताना ते म्हणतात, "१० वा मैल म्हणजे स्वातंत्र्याच्या लढ्याचा होय. आणि त्यासाठी आम्ही भारताची सरहद्द ओलांडून येत आहोत. आमचा पुढील उद्देश म्हणजे दिल्लीवर चाल करून जाणे. आझाद हिंद फौज केवळ एकटीच भारताची सरहद्द ओलांडत नसून, आझाद हिंद फौजेला साहाय्य करणारी सर्व भारतीय जनता सुद्धा असेल. त्याचबरोबर हा स्वातंत्र्यलढा आम्हाला शक्य असेल त्या सर्व मार्गांनी आम्ही लढवू. आम्ही शरीराने व आत्मरूपाने अंतिम त्यागास तयार झालो आहोत आणि त्यासाठी आम्ही भारतात चाल करून आम्ही आमचे उद्दिष्ट साध्य करीत आहोत. आम्ही अनेक निरनिराळ्या मार्गांचा अवलंब करणार आहोत आणि ते सर्व मार्ग एकाच उद्दिष्टाकडे जातील–ते म्हणजे दिल्ली. भारताच्या राजधानीचे शहर. आणि म्हणून 'चलो दिल्ली' ही आमची रणघोषणा राहील."

ते पुढे म्हणाले की, "आम्ही सर्व आमच्या नियोजित योजनेप्रमाणे वागू आणि ज्यावेळी वेळ येईल त्यावेळी आमच्या सर्व शक्तींनीशी आणि आत्मविश्वासाने आमची प्रतिज्ञा पुरी करण्याकरिता पुढे जाऊ. आमच्या दोस्तांवर आमचा पूर्ण विश्वास आहे. आणि आमच्या कर्तृत्वावरही आमचा विश्वास आहे. आम्ही शेवटी विजयी होणारच!"

ब्रह्मदेशातील त्यांच्या हालचालीनंतर थोड्याच दिवसांत श्रीमती कस्तुरबा गांधी

निधन पावल्याची बातमी नेताजींना समजली. त्यांच्या निधनाबद्दल दुःख व्यक्त करण्यासाठी त्यांनी एक निवेदन केले. या मृत्यूला कारणीभूत असलेल्या ब्रिटिशांच्या विरुद्ध युद्ध करण्याचा आपला निश्चय पुन्हा एकदा त्यांनी व्यक्त केला.

ते आपल्या निवेदनात म्हणतात, "वयाच्या चौऱ्याहत्तराव्या वर्षी श्रीमती कस्तुरबा गांधी ब्रिटिशांच्या कारागृहात निधन पावल्या. माझे ३८८,०००,०००, भारतीय व भारताबाहेर असलेले देशबांधव श्रीमती कस्तुरबांच्या मृत्यूमुळे झालेल्या दुःखद वियोगात सहभागी आहेत. त्यांचा मृत्यू हा दुःखद परिस्थितींत झाला आहे; परंतु गुलामगिरीत असलेल्या देशात जगण्यापेक्षा मृत्यू हाच मोठा सन्मान किंवा वैभवपूर्ण समजला जातो. भारताला त्यांचा मृत्यूमुळे मोठी हानी सोसावी लागली आहे. कस्तुरबा गांधी या ब्रिटिशांच्या तुरुंगात मृत्यू पावणाऱ्या दुसऱ्या नंबरच्या बंदीवान होत्या. म. गांधींना वर्षा-दीडवर्षापूर्वी पुण्यामध्ये बंदीवान करून ठेवल्यानंतर महात्मा गांधींचे आयुष्यभर सहकारी असलेले त्यांचे खाजगी चिटणीस श्री. महादेवभाई देसाई यांचा प्रथम मृत्यू झाला आणि यानंतर म. गांधींना तुरुंगात असतानाच हा दुसरा दुःखद वियोग सहन करावा लागत आहे.

"भारतीय जनतेला मातृवत असलेल्या या महान महिलेस मी नम्रपणे स्तुतिसुमने अर्पण करीत आहे. गांधीजींना झालेल्या दुःखद वियोगाबद्दल मी माझी मनःपूर्वक सहानुभूती व्यक्त करतो. श्रीमती कस्तुरबा यांचा व माझा अनेकवेळा वैयक्तिक संबंध आलेला आहे. महिला जगत्मध्ये त्या आदर्श महिला असून सुदृढ, मनमिळावू, शांत व स्वयंपूर्ण होत्या. भारतातील तरुणींना त्यांच्यापासून स्फूर्ती मिळत होती आणि मातृभूमीच्या स्वातंत्र्यलढ्याची प्रेरणा त्यांच्यात निर्माण होत होती. दक्षिण आफ्रिकेच्या सत्याग्रहापासून त्या आपल्या पतीबरोबर त्यांना अनेक वेळा अटक झाली होती व हालअपेष्टा सहन कराव्या लागल्या होत्या. त्यांना तुरुंगात घातल्यामुळे त्यांच्या प्रकृतीवर फारच अनिष्ट परिणाम झाला होता. म. गांधींनी सर्वत्र कायदेभंगाची चळवळ सुरू केली होती. त्या प्रत्येक लढ्याच्या वेळी कस्तुरबा त्यांच्याबरोबर असत. भारतीय तरुणींना हे एक भव्य उदाहरणच होते.

"कस्तुरबांना हुतात्म्याचे मरण आले. चार महिन्यांपूर्वीच त्या हृदयविकाराने आजारी होत्या; पण कठोर हृदयाच्या ब्रिटिश सरकारने त्यांच्या आजारीपणाकडे कानाडोळा केला व भारतीयांच्या मानवतावादी दृष्टिकोणाला डावलून त्यांची तुरुंगातून वैद्यकीय कारणासाठी सुद्धा मुक्तता केली नाही. ब्रिटिशांना असे वाटत असेल, की म. गांधींना अशा प्रकारच्या मानसिक यातना देऊन त्यांच्या मनाला पीळ पाडल्यास ते शरणागती पत्करतील. अशा प्रकारच्या पाशवी कृत्याबद्दल मी तिरस्कार व्यक्त करतो. जे आपल्या मातृभूमींच्या स्वातंत्र्याकरिता न्यायाने आणि नैतिकतेने चळवळ करतात त्यांचा गुपचूप खून करण्याचे दुष्कृत्य ब्रिटिश सरकार करीत आहे. त्यांनी भारतीय

लोकांना समजून घेतले नाही. महात्मा गांधींची कितीही वैचारिक चिरफाड केली किंवा त्यांना कितीही शारीरिक कष्ट दिले, तरी ते किंवा भारतीय जनता एक इंचभरही आपल्या ध्येयापासून परावृत्त होणार नाही. म. गांधींनी 'चलेजाव'चा आदेश देऊन चालू युद्धप्रयत्नापासून राष्ट्राला दूर ठेवले यासाठी ब्रिटिशांनी उद्धटपणे एखाद्या सामान्य गुन्हेगारासारखे त्यांना तुरुंगात डांबले. कस्तुरबा हृदयविकाराने आपल्या पतीच्या नजरेसमोर तुरुंगातच मृत्यू पावल्या, तरी त्यांना मुक्त न करण्याचा दृढनिश्चय ब्रिटिशांनी केला होता. ब्रिटिशानी आपली गुन्हेगारी प्रवृत्ती पूर्ण करून घेतली. ही प्रवृत्ती म्हणजे खुनी प्रवृत्ती होय. आम्हा भारतातल्या व भारताबाहेरील भारतीयांना श्रीमती कस्तुरबांचे तुरुंगातील दुःखद निधन हे भयानक निर्दयपणाचे वाटते. ब्रिटिश सरकार हे आमच्या पुढाऱ्यांना एका पाठोपाठ एक मग्रूरपणे नाहीसे करण्यास कंबर कसून उभे आहे. जोपर्यंत भारतात ब्रिटिश राहणार आहेत, तोपर्यंत आमच्या राष्ट्राविरुद्ध त्यांची दुष्टनीती स्वैरपणे चालू राहील. भारतातील तरुण-तरुणींच्या पुढे कस्तुरबा यांच्या मृत्यूचा सूड घेण्याचा एकच मार्ग उरला आहे, आणि तो म्हणजे भारतातून ब्रिटिशांचे समूळ उच्चाटन करणे हाच होय. पूर्व आशियामध्ये राहणाऱ्या भारतीयांच्यावर खास जबाबदारी पडली आहे, त्यांनी भारतातील ब्रिटिश राज्यकर्त्यांविरुद्ध सशस्त्र लढा पुकारला आहे. ही जबाबदारी विशेष करून येथे असलेल्या आमच्या भगिनींनी स्वीकारली आहे. या प्रसंगी आम्ही गंभीरपणे प्रतिज्ञा करीत आहोत, की भारतातून शेवटचा ब्रिटिश बाहेर हाकलून लावण्यापर्यंत आमचा सशस्त्र लढा चालू राहील."

आझाद हिंद फौजेने इंडो-बरमा सरहद्द ओलांडली.

स्वतंत्र भारताचे हंगामी सरकार ब्रह्मदेशात येऊन थोडे दिवस झाल्यावर नेताजींच्या सूचनेवरून जपानी लष्कर एकत्रित झाले. आझाद हिंद फौज व जपानी लष्कर यांना संयुक्तपणे चढाई करण्यासाठी सोईचे व्हावे म्हणून जपान, भारत व ब्रह्मदेश यांच्या लष्कराचे ऐक्य करण्यात आले. चढाईची तयारी मुख्यत्वे करून भारताला मुक्त करण्याकरिता अनेक अडथळे व अडचणी दूर करून झपाट्याने करण्यात आली. मार्चमध्ये १५ व्या लष्करी अधिकाऱ्यांच्या हुकमतीखाली तीन विभाग पाडण्यात आले व चिंदोविन नदीच्या डाव्या तीरावर आघाडी वाढवण्यात आली. इंफाळच्या उत्तरेस असलेल्या कोहीमावर चढाई करण्याकरिता ३१ व्या फलटणीत विशेष वाढ करण्यात आली.

डाव्या बाजूला असलेली १५ वी विभागीय फौज पश्चिमेकडून इंफाळवर चढाई करण्यासाठी तयार ठेवली होती. तेहतीसावी विभागीय फौज या पूर्वीच चिंदोविन नदी पार करून आघाडी वाढवीत इंफाळवर लक्ष केंद्रित करून पुढे सरकत होती. सर्वांची चढाई करण्याची पूर्वतयारी पूर्ण होऊन सर्वजण पुढे जाण्याबद्दलच्या हुकुमाची वाट पाहत होते.

आझाद हिंद फौजेने नेताजींच्या नेतृत्वाखाली जपानी लष्कराबरोबर संयुक्तपणे चढाई करण्यासाठी आघाडी विस्तृत केली होती. जपानी लष्कराच्या ३३ व्या तुकडीच्या डाव्या बगलेस आझाद हिंद फौजेने आपली आघाडी केली होती व हाकाफालम् विभागातून लढयाला तयार ठेवली होती. या तुकडीचे नेतृत्व कर्नल क्यानी यांचेकडे होते. जपानच्या १५ व्या विभागीय फौजेबरोबरीने चढाई करण्यासाठी सिंगापूर-ब्रह्मदेश ते थेट आघाडीपर्यंतचा विभाग त्यांनी सांभाळला होता.

सैन्याच्या तुकड्यांना उत्स्फूर्त करण्यासाठी नेताजींनी रंगूनपासून ते थेट आघाडी-पर्यंत पाहणी केली. एके दिवशी एक गमतीदार प्रसंग घडून गेला. आघाडीवरच्या एका तुकडीची नेताजी पाहणी करीत होते. त्यांच्या भाषणानंतर सर्व तुकड्यांनी "जयहिंद-चलो दिल्ली"चा प्रचंड जयघोष केला आणि सर्व तुकड्या संचलनासाठी तयार झाल्या. इतक्यात हवाई हल्ल्याचा इशारा देणारा भोंगा वाजू लागला आणि लगेच शत्रूच्या विमानांचा ताफा डोक्यावर घोंगावू लागला. तत्क्षणी समारंभास हजर असलेले ब्रह्मी अधिकारी भयंकर भयाने निवाऱ्याच्या ठिकाणी पळून गेले. त्या ठिकाणी हजर असलेले जपानी लष्करी अधिकारी व हिंदी अधिकारी, ब्रह्मदेशाचे लष्करी अधिकारी भयाने संरक्षणासाठी पळून गेल्याचे पाहून, हतबुद्ध व मुखस्तंभ होऊन हे दृश्य पाहतच राहिले. त्यांची नजर जेव्हा व्यासपीठावर ताठ उभे असलेल्या नेताजींच्या कडे केली त्यावेळी त्यांना त्यांचा फार अभिमान वाटला. नेताजी आपल्या जागेवरून अधिकाऱ्यांना सूचना देत होते. त्या संपल्यानंतर ते शांतपणे व्यासपीठावरून खाली उतरले आणि चालू लागले. तोंडासमोर असलेल्या भयानक संकटाच्या वेळी नेताजींनी जे असामान्य धैर्य, खंबीरता आणि मनःशांती दाखवली हे पाहून नेताजींच्याबद्दल अत्यंत आदराची भावना निर्माण झाली. त्यांनी ते स्वातंत्र्यलढयाचे खरे निष्ठावंत पुढारी असल्याचे दाखवून दिले. भारत-जपानच्या संयुक्त चढाईमुळे शत्रू मोठ्या बुचकळयात पडला. चिंदोविन नदी पार करून त्यांनी मोठाच विजय मिळविला. या विजयामुळे त्यांचा आत्मविश्वास वाढला, आघाडीवरच्या तुकड्यांना स्फूर्ती मिळाली आणि त्यांनी भारत-ब्रह्मदेशाच्या सरहद्दीवरून दिनांक १५ मार्च १९४४ रोजी सकाळी ९-३० वाजता पुढे चाल केली.

या पूर्वीच आझाद हिंद सेना कर्नल सैगल यांच्या नेतृत्वाखाली हाका-फालम हा भाग सोडून पश्चिम भारत-ब्रह्मदेशाच्या सरहद्दीवर निघालीच होती आणि ठरलेल्या वेळापेक्षा थोड्या उशिराने का होईना, पण ती सरहद्द ओलांडून भारतीय भूमीवर पाय रोवून उभी राहिली. २२ मार्च रोजी भौगोलिक परिस्थिती व हवामान प्रतिकूल असताही जपानी लष्कराने शत्रूबरोबर लढत सरहद्द ओलांडून, युद्धमोहिमेत चाल करून इंफाळला वेढा दिला.

नेताजींनी २२ मार्च रोजी एक जाहीरनामा प्रसिद्ध केला. भारतात त्यास प्रसिद्धी

देण्यात आली.

" आझाद हिंद सेना स्वतंत्र भारताच्या हंगामी सरकारच्या हुकमतीखाली लढत आहे. जपानच्या सार्वभौम लष्कराच्या सहकार्याने ती आपल्या विशेष कार्याला प्रारंभ करीत आहे. या ऐतिहासिक वेळेला भारत-जपानच्या फौजा सरहद्द ओलांडून भारतात चाल करून जात आहेत. यावेळी आम्ही या युगारंभाकडे जाहीरनामा काढून लक्ष वेधीत आहोत.

" १८५७ मध्ये भारतीय फौजांनी अवमानित होऊन पराभव पत्करला असला, तरी ब्रिटिश साम्राज्यवाद्यांकडून भारतीय लोकांनी मनःपूर्वक शरणागती पत्करली नव्हती. भारतीय लोकांना जरी निःशस्त्र करून दडपून टाकले असले, तरी त्यांनी ब्रिटिश राजवटीविरुद्ध वेळोवेळी उठाव सुरू ठेवला होता. त्यांनी निदर्शने, प्रचार, दहशत, विध्वंस, हत्यारी बंड आणि सत्याग्रह किंवा महात्मा गांधींनी सुरू केलेली असहकारी चळवळ या मार्गांनी आपली स्वातंत्र्याची चळवळ चालू ठेवली होती. भारतीयांनी स्वातंत्र्य लढ्यात आपली जलद प्रगती केली आहे. चालू युद्ध सुरू झाल्यापासून भारतीय पुढाऱ्यांनी ब्रिटिशांच्याकडून स्वातंत्र्य मिळावे म्हणून सर्व प्रकारचे शांततामय मार्ग अवलंबिले; पण ते सर्व निरुपयोगी ठरले. ब्रिटनने आपले साम्राज्यशाहीयुद्ध चालू ठेवण्यासाठी भारतावर दडपशाही करून, स्वतःच्या स्वार्थाकरिता पाशवी अत्याचार करून त्यांना युद्धात ढकलले आहे. भारतात प्रचंड लष्करी तळ उभारून ऑस्ट्रेलियन, अमेरिकन, चुंकिंग आणि निग्रो फौजा देशात जमा केल्या आहेत आणि त्यामुळे दरिद्री झालेल्या लोकांच्यावर त्यांना पोसण्यासाठी न पेलणारी जबाबदारी टाकली आहे. राजकीय परिस्थितीने दडपून टाकण्यात आलेल्या भारतातील अनेक प्रांतांत दुष्काळी परिस्थितीचा जोर वाढत आहे. गेल्या चार वर्षांत ब्रिटनने आपल्या युद्धासाठी भारतातील अन्नधान्य घेऊन जाण्याचे निर्दयी धोरण चालविले असल्याने भारतावर अशा प्रकारची उपासमारीची भयानक परिस्थिती निर्माण झाली आहे.

" भारताला युद्धाच्या भयानक अरिष्टापासून वाचविण्याचा शेवटचा प्रयत्न म्हणून महात्मा गांधींनी भारताच्या स्वातंत्र्याची मागणी मान्य करण्यासाठी ब्रिटिशांची मनधरणी करून, कळकळीची विनंती केली. ब्रिटिशांनी या मागणीला उत्तर म्हणून म. गांधींना आणि हजारो भारतीय देशभक्तांना तुरुंगात बंदिस्त करून टाकले. श्रीमती कस्तुरबा गांधी यांच्या तुरुंगातील निधनामुळे ब्रिटिशांची बुरसट विचारसरणी कळसाला पोहोचली आहे असे म्हणावे लागेल.

" पूर्व आशियामध्ये राहत असलेले तीन लक्ष भारतीय, भारतात चाललेल्या चिंताजनक परिस्थितीने अत्यंत प्रक्षुब्ध झाले असून, भारतीय स्वातंत्र्याकरिता चाललेल्या त्यांच्या लढ्यात सहभागी होण्याची त्यांनी प्रतिज्ञा केली आहे. आणि म्हणूनच त्यांनी ' इंडियन इंडिपेंडंट लीग ' स्थापन करून आझाद हिंद फौज तयार केली आहे.

" २१ आक्टोबर १९४३ रोजी स्वतंत्र भारताचे हंगामी सरकार उदयास आले आहे. आझाद हिंद फौजेने आपल्या मातृभूमीच्या मुक्तीकरिता युद्ध करण्यासाठी ब्रह्मदेशाच्या आराकानपासून भारताकडे चाल केली आहे.

" इंडो जपान फौजेने या भागात लष्करी महत्त्वाची कृती करून यश मिळवले. आझाद हिंद फौज भारत-ब्रह्मदेशाची सरहद्द ओलांडून दिल्लीकडे चाल करीत आहे. ग्रेटर ईस्ट आशियाच्या युद्ध सुरुवातीपासून जपानी फौजेच्या विजयाला इतिहासात तोड नाही. ईस्ट आशिया मधील भारतीयांना त्यापासून स्फूर्ती मिळत आहे आणि उत्साहपूर्वक ते स्वातंत्र्याच्या लढ्यात सहभागी होत आहेत. जपान स्वसंरक्षणाकरिता आणि पूर्व आशियामधून अमेरिकन आणि ब्रिटिश साम्राज्यवादी यांना हाकलून लावण्याकरिता लढत आहे. आणि म्हणून भारताला अनिर्बंध व संपूर्ण स्वातंत्र्य मिळवण्यासाठी आम्हाला जपान मदत करीत आहे. जपानच्या सरकारने भारताच्या स्वातंत्र्य लढ्यास संपूर्ण पाठिंबा देण्याचे स्वतः अनेकवेळा मान्य केले आहे. स्वतंत्र भारताचे हंगामी सरकार स्थापन झाल्याबरोबर जपानने त्यास मान्यता देऊन, अंदमान आणि निकोबार बेटे आमच्या ताब्यात दिली आहेत.

" जपानी फौजेच्या बरोबरीने आझाद हिंद फौजही लढत आहे आणि आता ती अँग्लो-अमेरिकन फौजांबरोबर संयुक्तपणे लढत आहे. आक्रमकांना भारताबाहेर हाकलून लावल्याशिवाय पूर्व आशियामध्ये सुरक्षितता आणि भारतीय लोकांना स्वातंत्र्य अपेक्षित नाही. भारतामधून अँग्लो-अमेरिकनांना हाकलून लावल्याखेरीज साम्राज्यशाही संपुष्टात येणे शक्य नाही. जपानने भारतीयांना राष्ट्र निर्मितीसाठी मदत देण्याचे ठरविले आहे. स्वतंत्र भारताचे हंगामी सरकार जाहीर करीत आहे, की हिंदी फौजा जपानी फौजेच्या बरोबरीने भारत पूर्णपणे स्वतंत्र होईपर्यंत लढत राहतील.

" आझाद हिंद सरकार आग्रहपूर्वक विनंती करीत आहे, की भारतीय जनतेने आम्हास पूर्णपणे साहाय्य करावे. ब्रिटन-अमेरिकेचे युद्ध प्रयत्न हाणून पाडण्यासाठी त्याला विध्वंसक चळवळीने खीळ घालून ते बंद पाडावेत, कोणत्याही प्रकारे त्यांना कसलेही साह्य करू नये. नजीकच्या काळात देशव्यापी स्वातंत्र्यलढ्याला सुरुवात करावी. आझाद हिंद फौजेला साहाय्य करून हे युद्ध विजयी करावे.

" आम्ही ब्रिटिश फौजेमध्ये नोकरी करीत असलेल्या भारतीय सैनिकांना आग्रहपूर्वक विनंती करीत आहोत, की त्यांनी निर्दय राज्यकर्त्यांच्या करिता लढण्याचे नाकारून आमच्या बाजूला यावे. त्याचप्रमाणे आमची विनंती आहे, की ब्रिटिश सरकाराकरिता काम करीत असलेल्या भारतीय लष्करी अधिकाऱ्यांनी आपल्या मातृभूमीच्या पवित्र युद्धासाठी आमच्याबरोबर सहकार्य करावे. भारतीय जनतेला आम्ही असे आश्वासन देत आहोत, की जोपर्यंत ते ब्रिटिश सरकारचे हस्तक बनून त्यांच्याकरिता काम करीत नाहीत, तोपर्यंत त्यांना भिण्याचे कोणतेच कारण नाही. आम्ही हमी देत

आहोत, की ब्रिटिश राज्यसत्तेखालून मुक्त झालेल्या भारताच्या भूभागावर स्वतंत्र भारताच्या हंगामी सरकारची कचेरी ताबडतोब उघडण्यात येईल. आम्ही असा इशारा देत आहोत, की भारतीय जनतेने ब्रिटिश-अमेरिकेच्या विमानतळापासून किंवा दारू गोळ्याच्या कारखान्यापासून, अगर लष्करी छावण्या, कोठारे यांपासून दूर राहिल्यास आमच्यापासून त्यांना काहीही इजा पोहोचणार नाही.

" माझ्या भारतीय बंधू-भगिनींनो! आपल्या मनात फार पूर्वीपासून असलेले स्वातंत्र्याचे स्वप्न साकार करण्याची वेळ आता आली आहे. लढण्यासाठी जर तुमचे मनःपूर्वक साहाय्य मिळाले, तरच आम्ही लवकर स्वातंत्र्य मिळवू. अशा आणीबाणीच्या प्रसंगी भारत आपल्या जनतेला त्यांचे कर्तव्य बजावण्यासाठी आग्रहपूर्वक विनंती करीत आहे. "

नेताजी सुभाषचंद्र बोस यांनी काढलेल्या विनंतीपत्रकाच्या आदरार्थ २२ मार्च रोजी मुख्यप्रधान टोजो यांनी एक निवेदन जाहीर केले. टोजो यांनी आपल्या निवेदनात मुख्यत्वेकरून जाहीर केले, की " आझाद हिंद फौजेने मुक्त केलेला प्रत्येक भाग हा स्वतंत्र भारताच्या हंगामी सरकारच्या प्रशासकीय आधिपत्याखाली राहील. शत्रूला दडपून टाकून भारताला मदत करून भारतीय जनतेच्या ताब्यात संपूर्ण भारत स्वाधीन करण्याचा जपानचा उद्देश आहे. आझाद हिंद फौज ज्या ज्या ठिकाणी जाईल त्या त्या ठिकाणी भारतीय लोकांनी त्यांचे भव्य स्वागत केले आहे. त्यांच्या देशभक्तीच्या प्रेरणेने एका मागून एक भाग स्वतंत्र होत आहेत आणि याप्रमाणे संपूर्ण भारत स्वातंत्र्य मिळवू शकेल. "

नेताजींनी आपली कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी पुन्हा एक निवेदन काढले. भारत व जपान यांच्या पुढाऱ्यांमध्ये निघालेली निवेदने दोन्ही दृष्टीने अर्थपूर्ण होती. एक तर इंडोजपानच्या संयुक्त चढाईमधील राजकीय समझोत्याचे व लष्करी योजनेचे स्पष्टीकरण होते. दुसरी गोष्ट म्हणजे टोकिओच्या जपानी फौजा लष्करी चढाईच्या वेळी प्रत्यक्षपणे जो जो प्रदेश जिंकेल तो प्रदेश आपल्या लष्कराच्या ताब्यात न ठेवता ताबडतोब हंगामी सरकारकडे सुपूर्त केला जाण्यास मदत होत होती, यामुळे शत्रुचा 'जपान हा आक्रमक आहे' असा जो प्रचार होणार होता त्याला खीळ बसणार होती. हे सर्व दोन्ही बाजूनी फारच समजूतदारपणे चालू होते. जपान-भारत यांच्यामध्ये जो समझोता होता व जे सहकार्य होते ते अभिनंदनीय होते.

एप्रिलमध्ये जपानी फौजांनी प्रशंसापूर्वक प्रगती केली होती. ६ एप्रिल रोजी शत्रूचा कोहीमामध्ये असलेला बळकट किल्ला जपानच्या हाती आला. ३१ व्या तुकडीचे सर्वत्र अभिनंदन झाले. जपानच्या १५ व्या फौजेच्या तुकडीने इंफाळवर उत्तरेकडून आझाद हिंद फौजेच्या के. जी. तुकडीने पूर्वेकडून व जपानच्या ३३ व्या तुकडीने आझाद हिंद फौजेशी संबंध ठेवून दक्षिणेकडून हल्ला करावयाचा होता. इंडो–

जपानच्या फौजांनी इंफाळला वेढा दिला व बाहेरून कोणत्याही प्रकारची मिळणारी रसद बंद करून टाकली.

४ एप्रिल रोजी मुक्त झालेल्या विभागांतील भारतीयांना उद्देशून नेताजींनी एक जाहीरनामा काढला. या जाहीरनाम्यात स्वतंत्र भारताच्या हंगामी सरकारचे उद्देश, स्थिती आणि धोरण यांचे स्पष्टीकरण केले होते. त्यात म्हटले होते, की "स्वतंत्र भारताचे हंगामी सरकार (आझाद हिंद सरकार) हे तुमचे स्वतःचे सरकार आहे. आणि या सरकारचा संपूर्ण उद्देश म्हणजे ब्रिटिश आणि अमेरिकन सरकार आमच्या पवित्र देशातून शस्त्रबळाने हाकलून लावणे. त्यानंतर लोकांच्या इच्छेनुसार कायमचे सरकार स्थापन करणे. हंगामी सरकार हे आपला शस्त्र संघर्ष भारत संपूर्ण पणे मुक्त होईपर्यंत चालू ठेवील आणि त्यानंतर मुक्त झालेल्या विभागाची सौख्य-दायक पुनर्रचना करील. सद्यःस्थितीत स्वतंत्र भारताचे हंगामी सरकार हेच भारताचे पूर्ण कायदेशीर सरकार आहे. हंगामी सरकार भारतीय लोकांना असे आवाहान करीत आहे, की आझाद हिंद फौजेला आणि हंगामी सरकारने नेमलेल्या नागरी अधिकाऱ्यांना सर्व प्रकारचे सहकार्य देण्यात यावे. हे सरकार भारतीय लोकांचे जीवित व वित्त सुरक्षित ठेवील अशी हमी देत आहे, परंतु त्या बरोबरच इशारा देत आहे, की ब्रिटिशांच्याबरो-बर कोणत्याही प्रकारचे साहाय्य देऊन त्यांचे कार्य केल्यास कडक कारवाई करण्यात येईल. तथापि भारतीय लोकांनी हंगामी सरकारचे व आझाद हिंद फौजेचे मित्र असलेल्या जपानी फौजांना मदत करण्यास हरकत नाही. तुम्ही तुमच्या सरकारभोवती जमा व्हा व आपल्या स्वातंत्र्याचे रक्षण करण्यास मदत करा."

या सुमारास नेताजींनी लेफ्टनंट कर्नल चतर्जी यांची 'मुक्त भू-भागाचे' गव्हर्नर म्हणून नेमणूक केली. नेताजींनी काढलेल्या जाहीरनाम्याला पाठिंबा व्यक्त करण्या-साठी ब्रह्मदेशाचे मुख्य प्रधान बा मॉ यांनी एक पत्रक काढले. त्यात त्यांनी पूर्वीच्या काळात ब्रिटिश भारतीय सैन्यांनी केलेले आक्रमण आणि आझाद हिंद फौजेने मातृ-भूमीच्या मुक्तीसाठी केलेली चढाई यात फारच तफावत आहे असे प्रतिपादून ज्या पवित्र कार्यासाठी ते लढत आहेत त्याबद्दल कौतुक करून म्हटले, "जपान, भारत आणि ब्रह्मदेश यांच्या फौजा एकमेकांच्या सहकार्याने लढत असून, एक नवा इतिहास घडविला जात आहे. ब्रह्मी जनता त्यांच्या पाठीशी आहे."

यावेळी नेताजी सुभाषचंद्र बोस यांना एक विमान जपानतर्फे बक्षिस देण्यात आले.

५ एप्रिल रोजी नेताजींनी आपल्या हंगामी सरकारचे निवडक लोक बरोबर घेऊन जेथे जपानच्या १५ व्या तुकडीचा तळ होता त्या मेमॉय या ठिकाणी आगमन केले. प्रत्यक्ष आघाडीवर राहून सैन्याचे अधिपतित्व करण्याची त्यांची कित्येक दिवसां-पूर्वीची इच्छा आता पूर्णत्वाला येत होती. तथापि त्यांनी ज्या योजना आखल्या होत्या त्यात व दैनंदिन कार्यामध्ये येणारे अडथळे दूर करण्याकरिता ते त्वरेने

रंगूनला परत आले.

८ एप्रिल रोजी ब्रह्मदेशातल्या फौजेच्या सुधारणेसंबंधी जपानच्या इंपीरियल जनरल हेडक्वार्टर्स यांनी काही घोषणा केल्या.

( १ ) ६ एप्रिल रोजी आझाद हिंद फौजेबरोबरीने लढत असलेल्या आमच्या तडफदार फौजांनी कोहिमा सर केले.

( २ ) आम्ही शत्रूच्या काटा येथील हवाई अड्ड्यावर हल्ला करून सहजपणे पुढे सरकत आहोत.

दोन्ही बाजूंच्या जनतेच्या दृष्टीने या घोषणेला विशेष महत्त्व होते. एकतर जपानी फौजा भारतात गेल्या याला एक प्रकारचा ऐतिहासिक अर्थ होता. दुसरे म्हणजे आझाद हिंद फौज व जपानी फौज यांच्या ऐक्याने आपल्या मातृभूमीच्या विमोचनासाठी आक्रमण केले. जागतिक युद्ध परिस्थितीमुळे वेळ येईल तशी निभावून नेत असता जपान फारच अडचणीत येत होता. तथापि जपानी जनतेला हिंदी लोकांच्या आक्रमणाच्या बातम्या उत्स्फूर्त करीत होत्या. या आक्रमणामुळे जपानी लोकांची मनःस्थिती जागतिक परिस्थितीमुळे जोर देण्याइतकी नव्हती.

इंफाळवरील आक्रमणाची प्रगती जपानी व भारतीय लोकांना जरी आशावादी वाटत होती, तरी परिस्थितीची दाट छाया जपानी व भारतीय सैन्यात पसरत होती. जपानच्या इंपीरिअल जनरल हेडक्वार्टर्स यांनी आपल्या पत्रकात नमूद केल्याप्रमाणे शत्रूच्या हवाईदलाच्या जोरदार मुसंडीमुळे ब्रह्मी व भारतीयांच्या मानसिक परिस्थितीवर फारच विपरीत परिणाम होऊ लागला होता. परिस्थितीच्या या कलाटणीमुळे नेताजींचे मनोधैर्य डळमळीत होऊ लागले. शत्रू आपले हवाईदल केव्हाही उपयोगात आणीत होता व त्याचा समर्थ प्रतिकार करता येण्यासारखा नव्हता. याची तीव्रता मोठ्या प्रमाणावर जाणवू लागली.

मध्यंतराच्या काळात भारत-जपान आक्रमण 'जैसे थे' होऊन राहिले. मान्सूनच्या पावसामुळे लष्करी आक्रमणास अडथळे निर्माण होऊ लागले. मुसळधार पावसाने पिछाडीचे पुरवठ्याचे रस्ते पार वाहून गेले. सैनिकांचे आरोग्यही पार बिघडून गेले.

आझाद हिंद फौजेची किनी तुकडी पारेलवर चाल करून जाण्याऐवजी काही सैनिक शत्रूला शरण गेले. नेताजींना स्वतः फौजेच्या आघाडीवर जाऊन सत्य परिस्थिती काय आहे ते पाहणे आवश्यक वाटू लागले. म्हणून त्यांनी जपानी फौजेचा सल्ला घेतला. जपानी लष्करी अधिकाऱ्यांनी या गोष्टीला विरोध दर्शवला. शेवटी नेताजींनी त्यांचा सल्ला जुमानला नाही. ते आघाडीकडे निघालेच. तथापि किनी आघाडीकडे स्वतः न जाता 'हिकारी किकान'चे डायरेक्टर आयसोडा यांना व आझाद हिंद सरकारचे एक कॅबिनेटचे सभासद यांना पाठवून सत्य परिस्थितीचे संशोधन करून योग्य ती उपाययोजना करण्यास सांगितले.

परिस्थिती उलटी होत जात असल्याने जपानी लष्करी अधिकारी चिंतातुर झाले. त्यांनी काही विभागीय अधिकाऱ्यांची अदलाबदल केली व लष्करी योजनेत बदल केले. त्यांच्याकडून होईल ते सर्व प्रयत्न करून त्यांनी परिस्थिती काबूत आणण्याचा प्रयत्न केला. सरहद्दीवरील फौजेत आणि पिछाडीस असलेली फौज यांच्यात अदला बदल करून युद्ध परिस्थिती अनुकूल होईल, असा प्रयत्न केला, पण त्याचाही काही उपयोग झाला नाही. भारत-जपानची संयुक्त चढाई आता संपुष्टात येऊन नष्ट होणार अशी चिन्हे दिसू लागली.

आपल्या अंगीकृत कार्यासाठी व ते पुढे नेण्यासाठी महत्त्वाची :हालचाल करून त्याचा पाठपुरावा करणे जरूर असल्याने नेताजी हंगामी सरकारच्या कार्याची पुनर्रचना करण्याची योजना आखीत होती. ती योजना अशी होती, की आत्ताच्या कार्यक्षेत्राचे तीन विभाग पाडावयाचे. पहिला, पूर्व अशियाचा विभाग हा राजकीय व लष्करी कार्यक्षेत्राचा विभाग म्हणून राहील. दुसरा विभाग, म्हणजे मुक्त केलेल्या प्रदेशात मुलकी व्यवस्थापन सुरू करणे व त्या भागाचा पुनर्रचना कार्यक्रम आखून तो कार्यान्वित करणे. तिसरा विभाग म्हणजे शत्रूने व्यापलेला प्रदेश आझाद हिंद फौजेने मुक्त करणे व आघाडी बळकटपणे टिकवून धरणे.

मध्यंतरी, भारत-जपान फौजेची परिगणना करण्याचे दिवस जवळ येऊ लागले. कोहिमाचे संरक्षण करीत असता कोहिमा-इंफाळचा मार्ग तोडला गेल्यामुळे १५ व्या लष्कर विभागाला पूर्व नियोजित चाल करून जाण्याची मूळ योजना पूर्णपणे बदलणे जरूर होते. ब्रह्मी रिजनल आर्मीचे कमांडर जनरल कॉब्वे यांनी सिंगापूर येथे असलेल्या साऊदर्न आर्मी हेडक्वार्टर्सना परिस्थितीची साद्यंत हकिगत कळवली जाण्यासाठी कोणातरी स्टाफ ऑफिसरना पाठविण्याचा निर्धार केला.

३ जुलै रोजी साऊदर्न आर्मी हेडक्वार्टर्सकडून जनरल कॉब्वेना तारेने कळवण्यात आले, की मणीपूरपर्यंत माघार घेऊन मोर्चे बांधावेत. ही तार वाचताच कॉब्वे यांच्या डोळ्यात अश्रू उभे राहिले. त्याच दिवशी नेताजी कॉब्वे यांना भेटण्यासाठी गेले असता त्या दुःखी जनरलने नेताजींना भेटण्याचे टाळले.

५ जुलै रोजी रिजनल आर्मीकडून इंफाळवरील चाल पूर्णपणे स्थगित केल्याचे हुकूम मिळाले. त्याप्रमाणे जपानचे १५ वे लष्कर आणि आझाद हिंद सेना विजयाने चार महिने आघाडीवर लढत होती ती फौज आपली सरहद्द ओलांडून आता परत फिरत होती. यामुळे नेताजींचे आपल्या मनातील दिल्लीवर चाल करून जाण्याचे स्वप्न पूर्ण दुभंगून नष्ट झाले.

रिजनल आर्मी कमांडंटच्या चीफ ऑफ दि स्टाफनी नेताजींना बोलावून घेऊन त्यांना इंफाळवरील आघाडी रद्द केल्याचे सांगितले. नेताजींनी भारताच्या सरहद्दीनजीक न राहण्याचे व कोणत्याही परिस्थितीत मंडालेच्या दक्षिणपासून माघार घेण्याचे

नाकारले. तथापि जागतिक युद्ध परिस्थिती इतकी बिघडली, की भारत-जपानवर त्यांचे अनिष्ट परिणाम होऊन नेताजींना आपल्या म्हणण्याप्रमाणे वागता येणे शक्य नव्हते.

या भीषण परिस्थितीत काही तरी मार्ग काढणे जरूर होते. आणीबाणीच्या प्रसंगाच्या संदर्भात नेताजींनी महात्मा गांधींच्याकडे एक खास निवेदन पाठविले. ते आपल्या निवेदनात लिहितात—

" ब्रिटिशांच्या तुरुंगात श्रीमती कस्तुरबा यांच्या दुःखद निधनामुळे तुमच्या देश-बांधवांना तुमच्याही प्रकृतीबद्दल भीती वाटणे स्वाभाविकच आहे. भारताबाहेरील भारतीयांनाही तशी काळजी वाटत आहे. त्यांच्या कार्यपद्धतीत व आपल्या मतात मतभेद असले, तरी ते घरगुती मतभेद आहेत. तथापि आपल्या बद्दलचा अपार आदर त्यांच्या ठिकाणी आहे. १९२९ च्या डिसेंबरमध्ये भरलेल्या लाहोर काँग्रेसच्या अधि-वेशनात स्वातंत्र्याच्या ठरावाला आपण पाठिंबा व्यक्त केला असून, ' इंडियन नॅशनल काँग्रेसच्या ' सर्व सभासदांसमोर एकच सामुदायिक ध्येय होते आणि ते म्हणजे देशाचे स्वातंत्र्य मिळवणे हे होय. भारताबाहेरील भारतीयांच्यामध्ये स्वातंत्र्याचे पडसाद तुम्हीच उठविले आहेत. भारताबाहेरील देशभक्त आणि भारतीय स्वातंत्र्याचे परदेशा-तील सन्मित्र या सर्वांनी तुमच्या १९४२ च्या " चले जाव " ठरावाला पाठिंबा दिला त्यावेळी तुम्ही त्यांना शतशः धन्यवाद दिले.

" आपण जर ब्रिटिश सरकार व ब्रिटिश जनता यांमध्ये फरक केला नाही, तर ती आपली फार मोटी चूक होईल. भारत स्वतंत्र व्हावा असे वाटणारा ब्रिटनमध्ये ध्येय-वादी लोकांचा एक गट आहे यात शंका नाही. त्याचप्रमाणे तो अमेरिकेतही आहे. अशा ध्येयवादी लोकांना त्यांच्याच देशातील लोकांकडून ' विलक्षण ' असे संबोधले जाते. अमेरिकेच्या युद्धधोरणाबद्दल मी असे म्हणू शकेन, की सत्ताधिष्ठित वॉशिंग्टन मधील कंपूला जागतिक वसाहतीची स्वप्ने पडत आहेत. या सत्तेवर असलेल्या कंपूला आणि त्यांच्या पाठिराख्या विद्वान मंडळीला आता 'अमेरिकन युगा 'बद्दल लोक उघड उघड नावे ठेवू लागले आहेत. या चांडाळ चौकडीतले काही अतिरेकी तर ब्रिटन हे अमेरिकेचे ४९ वे राज्य आहे, असे म्हणू लागले आहेत.

" पूज्य महात्माजी, मी तुम्हाला असे आश्वासन देतो, की या धोकेबाज लोकांना भारतामधून हाकलून देण्याचे मी ठरवले आहे. मी यापूर्वीच या लोकांच्या बरोबर राहून काही दिवस, काही आठवडे, काही महिने त्यांचे म्हणणे योग्य की अयोग्य याचा नीट अभ्यास केला आहे. मी माझ्या शक्तीनुसार जनतेची सेवा केली आहे व आता पण करीत आहे. मी देशद्रोही किंवा दहशतवादी व्हावे अशी माझी इच्छा नाही किंवा इतर कोणी मला तसे संबोधतील असे वाटत नाही. माझ्या देशबांधवांच्या सौजन्या-बद्दल व औदार्याबद्दल मी फार आभारी आहे. भारतातील कोणत्याही सामाजिक कार्य-कर्त्याला जेवढा मोठा सन्मान मिळण्याची शक्यता असेल, तेवढा मला मिळाला आहे.

मी सुद्धा एक पक्ष मिर्माण केला असून, त्यामध्ये कट्टर व विश्वसनीय साथीदार असून त्यांचा माझ्यावर पूर्ण विश्वास आहे. मी देशाबाहेर जाऊन माझे जीवित आणि माझे पुढील सर्व कर्तृत्व संकटात लोटून दिलेच आहे. बाहेरच्या देशाची मदत न घेता आपण स्वराज्य मिळवू शकतो अशी मला थोडीशी जरी आशा वाटली असती, तरी असंतोषाच्या काळात मी भारत सोडून बाहेर गेलो नसतो. त्या शिवाय माझ्या हयातीत स्वातंत्र्य मिळवण्याची एकादी सुवर्णसंधी प्राप्त होण्याची आशा असती तर मी घरातून बाहेर पडलो असतो का ? सध्याच्या युद्धजन्य परिस्थितीत तशी संधी प्राप्त होत आहे.

"आता राहिलेल्या एका शंकेचे निरसन करावयाचे आहे. आणि ते म्हणजे 'ॲक्सेस पॉवर्स' संबंधीचे. या संघटित शक्तीकडून मी फसवला जात आहे की काय ? माझा विश्वास आहे, की सर्व जगांमध्ये अतिहुशार आणि फारच लुच्चे व फसवे राजकारणी कोणी आढळत असतील, तर ते ब्रिटिशच होत, असे जगाने मान्य केले आहे. एकाद्याने जर ब्रिटिश राजकारण्यांच्या बरोबर कार्य केले आणि त्यांच्या विरुद्ध लढा दिला, तर जगामध्ये त्याच्या आयुष्यात कोणतेही राजकारणी त्याला फसवू शकणार नाहीत. जर ब्रिटिश राजकारणनीतिज्ञ माझे मन वळवू शकले नाहीत किंवा मला सक्तीने तसे करणे भाग पाडू शकले नाहीत, तर मग दुसरे कोणतेही राजकारणनीतिज्ञ माझे काहीही करू शकणार नाहीत. ब्रिटिशांच्या सत्तेखाली मी खूप वर्षे तुरुंगवास भोगला आहे; अनेक छळवाद, यातना, जीव घेणारा छळ सोसला आहे; तरी पण मला ते भ्रष्ट करू शकले नाहीत आणि आता तर कोणतीच शक्ती मला भ्रष्ट करू शकणार नाही. माझ्या मानमरातबासाठी किंवा माझ्या सन्मानासाठी मी समझोता करावा काय ? माझ्या मातृभूमीच्या संपूर्ण स्वातंत्र्याशिवाय मी कोणतीही गोष्ट मान्य करणार नाही.

"एक काळ असा होता, की त्यावेळी जपान हा आमच्या शत्रूचा मित्र होता आणि जोपर्यंत ॲंग्लो–जपान तह अस्तित्वात होता तो पर्यंत मी जपानला आलो नाही. त्या वेळी या दोन देशांमध्ये राजनैतिक संबंध सलोख्याचे होते; पण त्यानंतर जपानने ज्या वेळी ब्रिटन आणि अमेरिकेबरोबर युद्ध जारी केले आणि आपले इतिहासातील महत्त्वपूर्ण पाऊल उचलले, त्यावेळी मी माझ्या मुक्त इच्छेने जपानला भेट देण्याचे ठरवले. तुम्हाला स्मरत असेल, की १९३८ साली चुंकींगला एक वैद्यकीय पथक पाठवण्याची जबाबदारी मी पार पाडली.

"पूज्य महात्माजी ! भारतातील कोणत्याही पुढाऱ्यापेक्षा तुम्ही जास्त जाणता, की भारतीय जनता केवळ ब्रिटिशांनी दिलेल्या आश्वासनाबद्दल फारच साशंक आहे. त्याउलट जपानने आपले धोरण जाहीर करून त्यापेक्षाही अधिक मदत केली. त्यामुळेच जपानची छाप पडणारा मी एक अगदी शेवटचा मनुष्य आहे.

"आता आम्ही भारतीय लोकांनी स्थापन केलेल्या 'हंगामी सरकार'बद्दल मी आपणाला सांगू इच्छितो, की स्वतंत्र भारताच्या हंगामी सरकारचा म्हणजेच आझाद

हिंद सरकारचा एकच एक उद्देश व हेतू आहे, की शस्त्रबळाने भारताची ब्रिटिश जोखडाखालून मुक्तता करणे. एकदा का भारतातून आमच्या शत्रूला हाकलून लावले आणि कायदा व सुव्यवस्था निर्माण केली, की या हंगामी सरकारचे इच्छित कार्य संपले. आमच्या या प्रयत्नांचे, हालअपेष्टांचे व त्यागाचे पारितोषिक आम्ही मागत आहोत, ते आमच्या मातृभूमीचे स्वातंत्र्य. भारत स्वतंत्र झाला, की आमच्यापैकी बरेच पुढारी राजकीय क्षेत्रातून निवृत्त होणार आहेत. जर भारतात असलेल्या देश-बांधवांना त्यांच्या स्वतःच्या प्रयत्नाने स्वातंत्र्य मिळाले, किंवा कोणत्यातरी संधींनी ब्रिटिश सरकारने तुमच्या 'चलेजाव'च्या ठरावाप्रमाणे करण्याचे ठरविले, तर आमच्या इतके कोणीही संतोष पावणार नाहीत. तथापि आम्ही वरीलप्रमाणे काही निर्माण होण्याची शक्यता आहे यावर विश्वास न ठेवता अपरिहार्यपणे शस्त्राने लढा चालवत आहोत व अखेरपर्यंत आम्ही तो चालवत ठेवू. भारताच्या स्वातंत्र्याकरिता हे शेवटचे युद्ध चालू झाले आहे. भारताच्या भूमीवर आझाद हिंद फौज शूरपणाने लढत आहे.

" राष्ट्राचे पितामह ! भारतमुक्तीच्या या पवित्र युद्धाला आम्ही तुमची सदिच्छा व आशीर्वाद मागत आहोत. "

इंडो–जपानी लष्कर भारताच्या सरहद्दीवर निरनिराळ्या आघाडीवर लढत होते. इंफाळ ही एकच युद्धभूमी नव्हती, की ज्याठिकाणी इंडो–जपानी लष्कर फार काळ लढत होते. जपानच्या ३३ व्या विभागीय फौजेने शत्रूचा भारतीय रस्ते उद्ध्वस्त करण्याचा प्रयत्न हाणून पाडला होता. तथापि जपानची युद्धपरिस्थिती सर्वसामान्यपणे कमजोर होऊन बिघडत चालली होती. १८ जुलै रोजी इंपीरियल जनरल हेडक्वार्टर्सनी घोषित केले, की सायपान बेटावर असलेल्या जपानी फौजा संपूर्णपणे उद्ध्वस्त झाल्या आहेत. आणि या घोषणेच्या पाठोपाठच 'टोजो मंत्रीमंडळाने' राजीनामा दिल्याची घोषणा होती.

युरोपच्या आघाडीवर जूनच्या सुरुवातीस अँग्लो–अमेरिकन सैन्य फ्रान्सच्या किनाऱ्यावर उतरवण्यात यश मिळाले. रशिया दुसरी आघाडी उघडण्यासंबंधी बोलत होता; ती उघडली गेली आणि रशियन फौजा पूर्वेकडील आघाडीवर जोरदार चाल करू लागल्या.

याही परिस्थितीस न जुमानता नेताजी आपली लढावू वृत्ती जागृत ठेवत होते. जेव्हा 'जपान आर्मी हेडक्वार्टर्स' यांनी टोजो मंत्रीमंडळाने राजिनामा दिला असल्याचे त्यांना कळविले तेव्हासुद्धा नेताजींनी जपानसरकारवर आपला विश्वास व्यक्त करताना म्हटले, " निश्चित केलेल्या उद्देशाने हे युद्ध चालू ठेवण्यासाठी नवी कारकीर्द पूर्वीपेक्षाही जोरदार समर्थन करील, हे कळायला काहीच अवघड नाही." तथापि जपान सरकारात झालेल्या बदलाचा शत्रू प्रचारासाठी फारच उपयोग करून घेईल, असे त्यांनी विधान केले.

२२ एप्रिल रोजी नेताजींनी नवे मुख्य प्रधान कोइसो यांना संदेश पाठविला; त्यात त्यांनी जपान बरोबरच्या सहकार्याच्या योजनेत कोणताही बदल केला नसल्याचे सांगितले. नेताजींच्या वागण्याचा कल ब्रह्मदेशचे मुख्य प्रधान बा मॉ यांच्यापेक्षा किंचित विरोधी वाटत होता.

३० ऑक्टोबर रोजी जनरल क्वॉबे यांनी राजीनामा सादर केल्यानंतर त्यांना टोकिओला बोलावण्यात आले. ह्या वेळेपावेतो इंफाळ वरील चढाई रद्द करण्यात आली होती. नेताजी सुभाषचंद्र बोस आजारी असतानाही सरहद्दीवरील परिस्थिती काबूत राहावी म्हणून प्रयत्नांची शिकस्त करीत होते. जपानला जाण्यापूर्वी क्वॉबे यांनी निरोप घेण्यासाठी नेताजींना बोलावून घेतले. नेताजींनी टोकिओ सरकारला युद्धाच्या प्रतिकूल परिस्थितीबद्दल सांगण्याची क्वॉबे यांना विनंती करून म्हटले, की आपल्या ज्या काही योजना आहेत त्यामध्ये काहीही बदल न करता त्या पूर्ण व्हावयाच्या झाल्यास ' हिकारी किकान ' रद्द करण्यात यावे आणि यामुळे त्यांना जपानी लष्कराबरोबर प्रत्यक्ष संबंध प्रस्थापित करता यावेत.

जरी नेताजी सुभाषचंद्र बोस यांनी जपानला इंफाळच्या चढाईत ओढले नव्हते तरी नेताजींनी भारताच्या स्वातंत्र्याच्या उत्कट इच्छेमुळे लष्कराच्या धाडसाला प्रोत्साहन दिले, हे सत्य नाकारण्यात अर्थ नाही. मला आशा आहे, की जपानने भारताच्या या स्वातंत्र्य नेत्यास जी आश्वासने दिली, ती पूर्ण करण्याकरिता कोणत्याही बिकट आणि महत्त्वाच्या प्रसंगी साथ दिली आहे. यामुळे जपान व भारत या दोन देशांच्या मैत्रीची गाठ अधिकच दृढ होईल आणि ही गोष्ट भारतीय आणि जपानी जनतेच्या स्मरणात चिरकालीन राहील. मला खात्री आहे, की ही गोष्ट ज्या भारतीय आणि जपानी सैनिकांनी स्वातंत्र्याकरिता प्राणत्याग केला त्यांना व स्व. नेताजी यांच्या आत्म्याला समाधान वाटणारी आहे.

## टोकिओला तिसरी भेट

सप्टेंबर १९४४ मध्ये जनरल किम्युरा यांना बर्मा रिजनल आर्मी कमांडर या जागेवर नेमण्यात आले. इंडो-जपान फौजेला तर शत्रूने पुनर्रचना करण्यास वेळच दिला नाही. त्यांच्या शक्तिमान हवाई दलाने व यांत्रिक सुसज्ज फौजांनी तुफानी हल्ला चढविला आणि त्यांच्या तुफानी हल्ल्याने इरावती नदीपर्यंत माघार घ्यावी लागली.

या सर्व अवमानित परिस्थितीला न जुमानता नेताजी घोटाळून थांबले नाहीत. कोईसो यांच्या मंत्रीमंडळाच्या पहिल्या बैठकीच्या उद्घाटन प्रसंगी नेताजींनी आपला संदेश पाठविला : " मी असे जाहीर करतो, की आमच्या संयुक्त शत्रूबरोबर आम्ही जपानच्या बरोबरीने व आमच्या दुसऱ्या मित्रांच्या बरोबरीने आम्हास आमचे स्वातंत्र्य मिळेतो युद्ध करीत राहू. " मुख्य प्रधान कोईसो यांनी आपल्या उत्तराच्या भाषणात

ब्रिटिश व अमेरिकन साम्राज्यशाही निपटून काढण्याचा आपला निर्धार व्यक्त केला व स्वतंत्र भारताच्या हंगामी सरकारची व आझाद हिंद फौजेची प्रशंसा केली. भारताच्या स्वातंत्र्य लढ्यासाठी शक्य असेल ती सर्व मदत देण्याचे आश्वासन दिले.

जपानचे रिअर ॲडमिरल नाकाडो, नौदल ॲट्याची यांनी ब्रह्मदेशात तळ ठेवला. त्यांनी नेताजींना असे सुचविले, की पूर्वेकडून भारताच्या स्वातंत्र्याकरिता अनेक दुसऱ्या योजना कार्यान्वित करता येतील; पण या योजना तडीस नेण्यासाठी उत्तरेकडून रशियाच्या बरोबर हातमिळवणी केली पाहिजे. ॲडमिरल नाकाडोनी या संदर्भात नेताजींच्याबरोबर रशियाकडे येण्याचे मान्य केले. ही कल्पना नेताजींनीही पसंत केली. नेताजींच्या अनुमतीने ॲडमिरल नाकाडो यांनी ती ताबडतोब सुप्रिम हेडक्वार्टर्स टोकिओ यांच्याकडे मान्यतेसाठी पाठविली. टोकिओकडून ही संपूर्ण योजना नाकारण्यात आल्यामुळे नेताजींचा व नाकाडो यांचा फारच हिरमोड झाला. तथापि रशियाबद्दल फार दिवसांपासून असलेली नेताजींची आपुलकी अधिकच वाढली.

जुलैच्या सुरुवातीला कर्नल यामामोटो आणि त्यांचे 'हिकारी किकान' यांनी नेताजींना सूचित केले, की इंफाळवरील आपली चढाई कोलमडून पडली असून, आता त्यांनी आपली कल्पना बदलून नव्या कल्पनेस चालना द्यावी आणि म्हणून प्रत्यक्ष दिल्लीवरच वायव्येकडून हल्ला चढवावा. या कल्पनेवर स्तब्ध होऊन खूप विचार केल्यानंतर त्यांनी आपली संमतिदर्शक मान डोलावली आणि ते म्हणाले, की जर जपान सरकारने या योजनेला मान्यता दिली तर ती राबविण्यास हरकत नाही. तथापि याही योजनेस जपान सरकारने आंगठा दाखविल्यामुळे ती बारगळली. भारताचे स्वातंत्र्य कोणत्याही परिस्थितीत मिळविण्यासाठी नेताजी फारच उत्सुक होते. त्यांनी कोणताही प्रयत्न करण्याचे सोडले नाही व कोणत्याही सूचना विचार न करता सोडल्या नाहीत. स्वातंत्र्याची त्यांना इतकी आस लागली होती, की जपानने शरणागती पत्करली तेव्हा रशियाला हवाईमार्गे जाण्याचा त्यांचा प्रयत्न होता. यावरून त्यांना स्वातंत्र्याची किती जबरदस्त आकांक्षा होती हे दिसून येते.

या सुमाराला भारतात काय परिस्थिती चालू होती हे पाहताना आपल्याला दिसून येते, की 'इंडियन नॅशनल कॉंग्रेस'चे पुढारी ब्रिटनबरोबर समझोता करण्याच्या विचारात होते; परंतु या निर्णयाप्रत जाण्यास मुस्लिम लीगबरोबर करार मदार करणे जरूर होते. मुस्लिम लीगची मान्यता मिळवण्यासाठी कॉंग्रेस पक्षाला पाकिस्तानच्या सार्वभौमत्वाला मान्यता देणे भाग होते. तसे करणे म्हणजे हिंदु-मुस्लिम समाजात दुही पाडण्यासारखे होते आणि यामुळे ब्रिटिश सत्ताधिकाऱ्यांना डावपेच खेळत राहणे सोईचे होणार होते. याचा शेवट भारताबरोबर राजकारण सतत खेळवत राहण्यास ब्रिटिशांना सोपे होणार होते.

नेताजी ब्रिटनबरोबर समझोता करण्याच्या कोणत्याही विचारात नव्हते किंवा

ब्रिटनबरोबर कोणत्याही समझोत्यास तयार नव्हते. १२ सप्टेंबर १९४४ साली नेताजींनी रंगून रेडिओवरून आपल्या भारतवासी देशबांधवांना समज दिली की ब्रिटिशांच्या हातातील खेळणे होऊ नका, याची परिणती भारताचे तुकडे होण्यात होणार आहे. भारतवासीयांनी आपल्या स्वातंत्र्यलढ्यात सहभागी व्हावे, अशी आग्रहाची विनंती केली.

ऑक्टोबरच्या शेवटी टोकिओतून कळवण्यात आले, की जपान सरकार त्यांना अत्युच्च सन्मान बहाल करणार आहे. नेताजींनी विनम्रपणे त्याला नकार दर्शविला. त्यामुळे जपान सरकार आश्चर्यचकित झाले. त्यावेळी नेताजी म्हणाले, "ज्यावेळी आम्ही स्वातंत्र्य मिळवू त्यावेळी मी माझ्या सर्व सहकाऱ्यांसह त्याचा स्वीकार करीन."

१ नोव्हेंबर रोजी हवाईमार्गे नेताजी नव्या कॅबिनेट सदस्यांबरोबर व लष्करी प्रमुखांबरोबर संगनमत करण्यासाठी टोकिओला गेले. त्यांना स्वतंत्र भारताच्या हंगामी सरकारचे व टोकिओ सरकारचे संबंध दृढ करावयाचे होते. त्यांच्या या तिसऱ्या जपान भेटीचे वृत्त जपानी वृत्तपत्रांनी दिले. त्यातील काही ठळक वृत्त खाली दिल्याप्रमाणे प्रसिद्ध झाले.

"आझाद हिंद सरकारचे अध्यक्ष मि. सुभाषचंद्र बोस यांचे टोकिओत आगमन: इंडो-जपान सहकार्य दृढ होणार—"

"मि. सुभाषचंद्र बोस कर्नल किआनी, चतर्जी आणि रेहमान यांच्या समवेत दीड वर्षानंतर प्रथमच टोकिओत आगमन होत आहे. ह्या भेटीचा हेतू मुख्यप्रधान कोईसो, परराष्ट्रमंत्री शिग्यामिटस् आणि इतर सरकारी आणि लष्करी प्रमुखाच्या सल्लामसलतीची व भारत आणि जपान यांच्यापुढील सहकार्याबद्दल बोलणी करण्याचा आहे. इंडो–जपान संबंध यापुढे अधिक सुधारणे शक्य आहे."

"मि. सुभाषचंद्र बोस आझाद हिंद सरकारचे प्रेसिडेंट झाल्यापासून त्यांनी आझाद हिंद फौजेची गुणवत्ता आणि विस्तार फारच चांगल्या प्रकारे केला असून, त्यांनी जपानी फौजेच्या सहकार्याने ब्रिटिश फौजांना प्रतिकूल परिस्थिती निर्माण केली. आझाद हिंद फौज जपानी लष्कराच्या बरोबरीने पिछाडीला शिबंदी नसताना भारत-ब्रह्मदेशाच्या सरहद्दीवर लढली व भारताच्या स्वातंत्र्यलढ्याच्या इतिहासात वैभवशाली नवे पर्व निर्माण केले. आझाद हिंद सरकार व आझाद हिंद फौज यांना सहकार्य करण्याचे जपानचे धोरण होते. हेच सहकार्य देण्याचे धोरण मि. बोस आणि मुख्य प्रधान कोईसो यांच्या पहिल्याच भेटीने दृढ होणार आहे."

६ नोव्हेंबर रोजी नेताजींनी 'स्पेशल गेस्ट हौस' या ठिकाणी प्रेस कॉन्फरन्सची सभा बोलावून 'आझाद हिंद सरकार या कठीण प्रसंगी काय करू इच्छिते' याबद्दल आपला दृष्टीकोण सांगितला. एका वृत्तपत्राने स्वयंस्फूर्तीने 'प्रेसिडेंट बोस यांचा आपल्या कर्तृत्वावर पूर्ण विश्वास असून, भारतातील ब्रिटिश शक्तीबरोबर झुंझ घेणार."

अशा मुख्य मथळयाचा लेख प्रसिद्ध केला.

जपानच्या या तिसऱ्या भेटीचे वेळी नेताजींनी जपान सरकार बरोबर ' जपान–भारत देवाण घेवाण करार ' करून टाकता. यापूर्वी आझाद हिंद सरकार आझाद हिंद फौजेचा खर्च प्रत्येक वेळी जपान सरकारकडून रक्कम आणून भागवीत असे. ही रक्कम आय. ओ. यू. म्हणून लिहिली जावयाची परंतु ही व्यवस्था करण्यासाठी कार्यालयीन करार–मदार करणे अवश्यक वाटले; व त्या योगे ज्यावेळी भारत स्वतंत्र होईल त्यावेळी जपानची भरपाई करणे शक्य होईल; अन्यथा जपानचे उतराई होण्याच्या बंधनापासून भारताला अलिप्त राहण्यासाठी अशा प्रकारची व्यवस्था करणे त्यांना जरूर वाटले. जपान सरकारने या सूचनेला मान्यता दिली व तत्काळ एक करार तात्पुरता म्हणून करून टाकला. राजकारणी मुत्सद्यांच्या दृष्टीने आणि जगाच्या डोळयांत मांचुरीया प्रमाणे आझाद हिंद सरकार हे जपानचे बाहुले बनले आहे असे भासू नये, म्हणून नेताजींनी त्या करारावर परराष्ट्रीय वकिलांच्या व्यवस्थापनेसमोर सह्या केल्या.

खरी गोष्ट म्हणजे सर्वत्र युद्ध परिस्थिती ऱ्हास होणारी निर्माण झाली होती. नेताजींनी अशाही परिस्थितीत कोणताही निरुत्साहीपणा दाखवला नाही. ते नेहमी दृढ विश्वासाने व उत्साहीपणाने वागत. जपानची बाजू मांडताना ते आपला अचल दृढ विश्वास प्रगट करीत. लहान सहान शंकेपासून ते फार दूर असत. एकदा जपानच्या लष्करी अधिकाऱ्यांच्याबरोबर टोकिओत असता एक मीटिंग चालू होती, त्याच वेळी शत्रूच्या बॉंबर विमानांकडून सत्तर–बी–एकोणतीस जातीच्या बॉंबचा वर्षाव झाला, त्या वेळी नेताजी मीटिंग पूर्ण होईपर्यंत अत्यंत शांत व स्वस्थ राहिले. त्यांच्या या धीरोदात्त वृत्तीमुळे सर्व अधिकाऱ्यांवर त्यांची छाप पडे.

नेताजी नेहमी उत्साही असत. तथापि त्यांना अनेक आत्मक्लेश सहन करावे लागत. दीड वर्षानंतर माजी प्रधान टोजो नेताजींना भेटले त्या वेळी त्यांना नेताजींच्या तब्बेतीबद्दल फारच काळजी वाटली. टोकिओतील आपले काम संपवून नेताजी परत जात असता नेताजींना जपानच्या व भारताच्या पाहुणे मंडळींनी इंपीरिअल हॉटेल मध्ये पार्टी दिली, तेव्हा ते फारच दमलेले होते व त्यांना फार वेळ बोलणेही शक्य झाले नाही.

ठरलेल्या गर्दीच्या कार्यक्रमाव्यतिरिक्त टोकिओत शिक्षणासाठी राहिलेल्या भारतीय विद्यार्थ्यांच्यापुढे त्यांना बोलावे लागले. त्याचप्रमाणे इंडो-जपान सोसायटीमध्ये भारतीय रहिवाशांसमोरही त्यांना भाषण करावे लागले. यावेळी आजारी असलेले रासबिहारी बोस यांची पण त्यांनी भेट घेतली. ही भेट अत्यंत भावपूर्ण झाली. दोघांच्याही नेत्रांत अश्रू जमा झाले.

टोकिओत वास्तव्य असतानाच त्यांना नानकिंग सरकारचे अध्यक्ष ओसाई हे

निधन पावल्याचे समजले. निधनापूर्वी ओसाई हे उपचाराकरिता काही दिवस नागोया ( जपान ) येथे होते. त्यांच्या निधनाच्या वृत्तामुळे नेताजींना धक्का बसला व त्यांना फार दुःख झाले.

परिणामी जपानच्या या भेटीमुळे नेताजींना काही पूर्ण समाधान असे झाले नाही. भारतीय स्वातंत्र्यलढ्याला जपानकडून निश्चितपणे प्रतिसाद मिळत राहील आणि त्याबरोबर त्यांनी जपानला आश्वासन दिले होते, की त्यांनी मांडलेल्या सर्व मुलभूत योजना कार्यान्वित होत राहतीलच.

# अकरा / संध्याकाळ

नेताजी सुभाषचंद्र बोस हे नोव्हेंबरच्या शेवटी टोकिओहून ब्रह्मदेशाच्या सरहद्दीवर परतले. युद्धपरिस्थिती आता तर फारच बिघडून गेली होती. आकाशातून विमानाने बाँब वर्षाव करून व जमिनीवरून टँकरच्या साहाय्याने शत्रुसैन्याने इंडो-जपान सेनेचा पार धुव्वा उडवून दिला होता. आघाडीवरील भोवतालचा सर्व परिसर पूर्ण कोरडा झाला असल्यामुळे शत्रूला आपल्या टँकर व विमानाने सैन्याचा बीमोड करणे फारच सोपे होऊन गेले होते. बंगालच्या उपसागरातूनही असंख्य ब्रिटिश युद्धनौका वावरू लागल्या व असंख्य सैन्य त्या बोटींतून युद्धासाठी किनाऱ्यावर उतरू लागले. ही भावी युद्धाची प्रचंड व अफाट तयारीच होती.

विमानांतून शत्रूचा भारी बॉम्बवर्षाव चालू असताही नेताजी आझाद हिंद सरकारचे भरपूर कामकाज पाहत होते. त्याचप्रमाणे रंगून येथील आपल्या ठाण्यावरून ते आझाद हिंद फौजेचे नेतृत्व करीत होते.

परिस्थिती अधिकच वाईट होत असता मेजर जनरल यामामोटो ( पूर्वीचे जनरल ) यांची दुसऱ्या ठिकाणी बदली झाली. नेताजींना हाही एक प्रकारचा ठोसा बसल्यासारखे झाले. जनरल यामामोटो हे नेताजी बर्लिनमध्ये असल्यापासूनचे यांचे मित्र होते. नेताजी पूर्व आशियात परत आल्यापासून यामामोटो हे ' हिकारी किकान 'चे डायरेक्टर म्हणून काम करीत असल्याने ते नेहमी नेताजींच्या बाजूला असत. नेताजींना त्यांचा फारच उपयोग झाला होता. यामामोटो व बोस हे एकमेकांजवळ इतके आले होते, की त्यांना विभक्त करण्याचे काम फारच कठीण होते.

३१ डिसेंबर १९४४ हा शेवटचा दिवस नेताजींना फारच दुर्दैवाचा गेला. शेवटी ब्रिटिश फौजा ॲक्ये या ठिकाणी उतरल्या. ॲक्ये–चितगाव या मार्गाने दिल्लीवर धडक देण्याची नेताजींची फार दिवसांपासूनची इच्छा होती. सर्व सामान्य परिस्थितीत बदल झाल्यामुळे नेताजींना अनेक वेळा ठरलेल्या योजनेत बदल करावा लागत असे.

नेताजींनी ॲक्वे हे आपल्या पुढील लष्करी हालचाली करण्याच्या दृष्टीने नेहमी दृष्टिपथात ठेवले होते. ॲक्वेबद्दल त्यांच्या हृदयात खास स्थान निर्माण झाले होते.

अशा प्रकारे नव्या वर्षाची सुरूवात झाली. जपानला हे वर्ष फारच घातकी झाले, आणि नेताजींनाही दुर्दैवी झाले. खरी गोष्ट म्हणजे दिवसेंदिवस युद्धपरिस्थिती अत्यंत प्रतिकूल व वाईट होत होती. तरीपण नेताजी नेहमी आशावादी राहून, चांगले होईल या सदिच्छेने वागत. भारताच्या स्वातंत्र्याचा लढा ते नेटाने, धैर्याने व स्वयंपूर्ण हुशारीने चालवीत. त्यांना हे नवे वर्ष नव्या आकांक्षेने भरलेले वाटे. त्यांनी आपला देह आणि आत्मा मातृभूमीच्या चरणी समर्पण केला होता. आपल्या देशाकरिता आपल्या सर्वस्वाचा त्याग करण्यास इतकेच नव्हे तर आपले प्राणार्पणही करण्यास ते तयार होते.

२३ जानेवारी हा नेताजींचा वाढदिवस. रंगूनमधील भारतीय रहिवाश्यांनी नेताजींचा वाढदिवस साजरा करण्यासाठी एक सभा भरवली. या प्रसंगी त्यांनी नेताजींच्या वजनाच्या दीडपट सोने व जवाहीर अर्पण केले.

युद्ध परिस्थिती दिवसेंदिवस बिघडत चालली होती. जानेवारी १२ रोजी इंडो–ब्रिटिशांच्या पंचविसाव्या डिव्हिजनने समुद्रातून आणि आकाशातून भयंकर अग्निवर्षाव सुरू केला व ते मेबोर्न पेनीन्‍श्युलावर उतरू लागले. तरी पण जपानी फौजांनी त्यांचा प्रतिकार करण्यासाठी समोरच्याच बाजूने प्रतिहल्ला सुरू केला. त्या वेळी शत्रूने आपली सव्विसावी विभागीय फौज रॅमले इजलॅंडवर २६ जानेवारी रोजी उतरवली व आपले सर्वच्या सर्व सैन्य युद्धभूमीवर आणले.

जपानच्या पंधराव्या विभागीय सैन्याने इरावती नदी उतरून येणाऱ्या शत्रूच्या सैन्यावर हल्ला केला. मंडालेच्या उत्तरेस जानेवारीमध्ये समोरासमोर युद्धाचा हा पहिलाच प्रसंग होता. जानेवारीच्या मध्यावर व त्यानंतर जपानी फौजेने मौनुगू आघाडीवर जोरदार हल्ले चढविले. त्याप्रमाणे सगानी व नुगाङ्गुन या विभागात हालचाल करणाऱ्या शत्रूवरही हल्ला चढविला. रीजनल आर्मीचे कमांडंट जनरल किम्युरा हे नुगाङ्गुन विभागातील चढाईवर प्रत्यक्ष देखरेख करीत होते. आझाद हिंद फौज़ जपानच्या पंधराव्या विभागीय फौजेच्या पश्चिम बाजूनें लढत होती. अनेक लढाया लढून ही फौज फारच निरुत्साही होऊन गेली होती. नेताजींना आघाडीवर जाण्यास एवढे कारण पुरे झाले. सैनिकांच्यात धैर्य व चैतन्य आणण्यासाठी नेताजी ' हिकारी किकान 'चे प्रमुख जनरल आयसोडा यांच्या समवेत प्रत्यक्ष आघाडीवर गेले. आघाडीवरील सैनिकांच्या पाहणीच्या वेळी नेताजींची सैनिकांच्या बरोबर वागण्याची पद्धत वाखाणण्यासारखी होती. मेजर ताकाहाथी हे या प्रवासात त्यांच्याबरोबर होते. त्यांनी नेताजींची फारच प्रशंसा केली. ते लिहितात,

" जानेवारीच्या शेवटी शेवटी आम्ही रंगून येथून निघालो. आमच्याबरोबर

असणाऱ्या सर्व सभासदांना नेताजींनी वैयक्तिक सूचना दिल्या व त्यांची कामे त्यांना सांगून टाकली. बहुतेक सर्व प्रवास मोटारीतून शत्रूच्या विमानांच्या नजरेस पडू नये म्हणून रात्रीचाच केला. दुसऱ्या दिवशी संध्याकाळी आम्ही पायनेमॅना येथे पोहोचलो. सकाळीच नेताजींनी त्या भागातील प्रमुख गावकऱ्यांची भेट घेतली व तेथील त्यांच्या राहणीविषयी व इतर गोष्टींबद्दल माहिती करून घेतली. आपल्याबरोबर असलेल्या सदस्यांना योजनेप्रमाणे स्थानिक लोकांना मदत करण्याबद्दल सूचना दिल्या. पुढे एके दिवशी त्यांनी आघाडीवरील आझाद हिंद सेनेच्या सतत लढणाऱ्या महिला तुकडीची पाहणी केली व महिला सैनिकांच्या बरोबर अल्पोपहार घेतला. जनरल किनी यांच्या अधिपत्याखाली असणाऱ्या पहिल्या विभागीय फौजेची पाहणी करण्याकरिता ते गेले. जनरल किनींची वृत्ती घरसोडीची दिसून आली. तथापि नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्याबद्दल सैनिकांच्या मनात अत्यंत आदरभाव होता. हे प्रत्यक्ष पहाणीच्या वेळी दिसून आले. त्यांनी या आघाडीवरील सैनिकांना मागे घेऊन नव्या दमाच्या सैनिकांना पुढे आणून आघाडी बळकट केली व जनरल किनी यांना योग्य ती वैयक्तिक समज दिली. या कामासाठी ते स्वतः संपूर्ण दिवसभर राबत होते.

"पायनेमॅना सोडल्यानंतर आम्ही तसेच पुढे निघालो. विश्रांती घेण्यासाठी आम्ही भारतीय वसाहतीत थांबत असू. शत्रूच्या विमानांचा हल्ला होण्याची शक्यता असल्यामुळे आम्ही शक्यतो रस्त्यावर थांबत नसू, दिवसा दाट झाडीत विश्रांती घेत असू. नेताजी कधीही कोणाच्या घरी विश्रांती घेण्यासाठी न जाता झाडांना लोंबत्या दोऱ्यांचा पाळणा ( Hammock ) बांधून त्यावर आयरिश स्वातंत्र्याचा इतिहास हे पुस्तक वाचत विश्रांती घेत.

"फेब्रुवारीच्या सुरुवातीला आम्ही मैकटीला येथे येऊन पोहोचलो व तेथून पुढे भारतीय लहान खेड्यात आलो. हे खेडे मैकटीला पासून ६० कि. मि. दूर होते त्या ठिकाणी आम्हास समजले, की आझाद हिंद सेनेच्या दोन कंपन्या शत्रूला शरण गेल्या आहेत व त्या ठिकाणच्या युद्ध क्षेत्रांवर त्याचा विपरीत परिणाम झाला आहे. हे ऐकून नेताजी फारच अस्वस्थ झाले. ही परिस्थिती तशीच सोडून ते पुढे जाण्याऐवजी त्या ठिकाणी गेले व त्यांनी सैन्याला उल्हसित करण्याचा विचार सुरू केला. त्या विभागात असलेल्या शत्रूच्या रणगाड्यांना आपण सापडण्याची शक्यता असल्यामुळे तिकडे जाण्यात फार धोका आहे असा सल्ला आम्ही दिला. हा आमचा सल्ला त्यांनी झुगारून लावला व ते म्हणाले, 'ब्रिटिशांचे रणगाडे हे प्रमुख रस्त्यानेच फिरणार. तेंव्हा काळजी करण्याचे काही कारण नाही.'

"आपल्या विचारांपासून ते परावृत्त होऊ शकत नाहीत असे त्यांनी सूचित केले. आझाद हिंद सेनेचे कमांडर इन चीफ यांनी त्या ठिकाणी जाऊन सैन्याला प्रोत्साहन देण्याचे मान्य केल्यानंतर नेताजींनी पुढे जाण्याचे स्थगित केले. पुनर्रचनेचे काम आता

संपविले असल्याने सध्याच्या धोकादायक परिस्थितीत त्यांनी आघाडीवर जाऊ नये असे त्यांना आम्ही सुचविले. तथापि नेताजींनी आपला हेका सोडला नाही. सरतेशेवटी मेजर ताकाहाथी यांनी असे सुचविले, की सदरचा परिसर शत्रूच्या रणगाड्यांनी व्यापलेला आहे किंवा नाही याची पूर्ण खात्री करून घेऊन मगच नेताजींनी तिकडे जावे. नेताजींनी किनी यांची फर्स्ट डिव्हिजन कमांडरच्या जागेवरून बदली केली. सैन्याधिकाऱ्यांच्यात बदली किंवा बडतर्फी करण्याची नेताजींची हीच पहिली वेळ होती.

" तीन आठवडे पाहणी पर्यटनानंतर नेताजींनी तीन सेनाधिकारी बदलून टाकले. ते सर्व पूर्णपणे थकून गेले होते. नेताजी सर्व दिवसभर स्थानिक लोकांच्या सभा घेण्यात, लष्कराच्या सोई-गैरसोई पहाण्यात आणि सैन्याच्या तुकड्यांची पाहणी करण्यात सर्व वेळ घालवीत. चोवीस तासांच्या दिवसांतून त्याना चार तास तरी झोप मिळत होती की नाही, हे मला माहीत नाही. नेताजींनी आझाद हिंद सेनेच्या पायनेमॅना येथील महिला सैनिक कॅंप हालवून तो रंगूनला नेण्याचे ठरविले व त्याप्रमाणे सर्व ट्रक्स भरगच्च भरून रंगूनकडे पाठवण्यास सुरुवात झाली. वाटेत एक ट्रक मोडून पडला तेव्हा त्या ठिकाणी नेताजींनी आपल्या गाडीतून उतरून त्यांच्या वाहतुकीची सर्व व्यवस्था जातीने पाहिली. महिला सैनिकांच्या बद्दल नेताजींना फार आस्था वाटे. अंधाऱ्या रात्री आडवळणी वाटेवर होणारे अपघात टाळावेत या विचाराने ते स्वतः त्रास घेत. कोणत्याही प्रसंगी ते इतके मनाला लावून वागत, की पाहणाऱ्यांचे मन हेलावून जावे. अशा प्रसंगी एखादा जपानी सैन्याधिकारीही तसा वागला नसता."

मेजर ताकाहाथीच्या निवेदनात म्हटल्याप्रमाणे नेताजी फौजेच्या किंवा लष्कराच्या हालचालीचा निर्णय इतक्या त्वरित व परिणामकारक घेत, की एखाद्या मुरलेल्या लष्करी शिक्षण घेतलेल्या वरिष्ठ अधिकाऱ्यालाही ते शक्य होणार नाही. त्यांनी सैनिकी शिक्षण घेतले नाही; पण स्वतः लष्करी तंत्राचे ज्ञान अवगत करून आपली लायकी वाढवून ते आझाद हिंद सेनेचे कमांडर इन चीफ आणि आझाद हिंद सरकारचे प्रमुख बनले. उत्कृष्ट लष्करी अधिकाऱ्याचे सर्व गुण त्यांच्या ठिकाणी होते.

इरावती नदीच्या डाव्या बाजूस असलेल्या आझाद हिंद फौजेची पाहणी करून परत आल्यानंतर आणि नेताजींनी ज्या भागात दौरा केला नाही त्या भागांतून आयसोडा यांच्या रिपोर्टावरून आझाद हिंद सेनेपैकी काही सैनिक शरण जात आहेत ही वार्ता ऐकून नेताजींनी फेब्रुवारीच्या मध्यावर एक जाहीरनामा काढला व आझाद हिंद सेनेला ताकीद दिली, की "जे माघार घेण्याचा किंवा शरण जाण्याचा प्रयत्न करतील त्यांना गोळ्या घालण्यात येतील." यामुळे आझाद हिंद सैन्याचे नीतिधैर्य वाढून पुढे शरणागताचे एकही उदाहरण घडले नाही. आझाद हिंद सेनेवरील नेताजींच्या प्रभुत्वामुळे जपानी लष्करावरही त्यांची चांगली छाप पडली.

मध्यंतरी शत्रूने इरावती नदी ओलांडून मैनगू आणि पाकोक येथे खिंड निर्माण

केली. दक्षिण मंडालेच्या बाजूला शत्रू नदी पार करीत आहे तोच त्याच्यावर हल्ला करून नाश करण्यासाठी जपानच्या रीजनल आर्मीने एक सर्वसामान्य हल्ल्याची योजना तयार केली; परंतु हा प्रयत्न फसला व मैकटीला २३ फेब्रुवारी रोजी शत्रूच्या यंत्रसज्ज लष्कराच्या हातात पडले. परिस्थिती अधिकच खराब होण्याचे आणखी एक कारण म्हणजे, जपानी लष्कराची एक डिव्हिजन ब्रह्मदेशातून काढून घेऊन ती फिलिपाइन्समध्ये पाठविण्यत आली. इकडे शत्रू तर समुद्रकिनारा व्यापून राहिला होता आणि म्हणून ब्रह्मदेशाची राजधानी रंगून हिच्या संरक्षणाची भीती निर्माण झाली होती. यावर अशी तोड काढण्यात आली, की 'ब्रह्मीज नॅशनल डिफेन्स आर्मी'ने स्वतः रणांगणांत उतरावे. ब्रह्मदेशाचे लष्कर तयार झाल्यापासून त्यांच्यावर हा पहिलाच प्रसंग आला होता.

जपानी लष्कराच्या मार्गदर्शनाखाली ब्रह्मीज नॅशनल डिफेन्स आर्मी गेल्या काही वर्षांत शिकून तयार झाली होती. हे लष्कर आझाद हिंद सेनेपेक्षा किती परिणामकारकपणे आघाडीवर लढू शकते, हे आता पाहावयाचे होते.

रंगूनमध्ये १५ मार्च रोजी पॅगोडाच्या पुढील पटांगणात पहिल्या युद्धमोहिमेच्या स्मरणोत्सवानिमित्त सैन्याची कवायत घेण्यात आली. लगेच दुसऱ्या दिवशी जनरल ऑन्सा यांच्या आधिपत्याखाली पुरालच्या उत्तरेच्या बाजूस सैनिक कूच करू लागले. तथापि ते आघाडीवर जाण्यापूर्वीच जपानी लष्कराविरुद्ध लढण्यास सज्ज झाले आणि त्यांनी हल्ले चढवले. ज्या ब्रह्मी लष्कराला जपानने सर्व शिक्षण देऊन सुसज्ज केले होते, त्या ब्रह्मी लष्कराच्या बंडामुळे जपानी लष्कराला मोठाच आश्चर्ययुक्त धक्का बसला.

याच वेळी लष्करी शिक्षण घेत असलेले ब्रह्मी विद्यार्थी कॅंपमधून निसटून बाहेर पडले आणि त्यांनी रंगूनमधील जपानी लष्करी पुरवठासाठ्याच्या केंद्रावर हल्ले चढवले. तत्काळ रंगून कॅपिटल डिव्हिजनने त्यांना थोपवून धरले. तथापि सर्व बंड लगेच मोडून काढण्यात आले. यामध्ये विशेष असे काही नुकसान झाले नाही. या बंडातील काही सैनिक पळून जाऊन ते गनिम झाले व त्यांनी रेल्वेरस्त्यावर हल्ला करून किरकोळ नुकसान केले. हे बंड पूर्वनियोजित होते असे दिसून येते. जनरल ऑन्सा हे ब्र. नॅ. डि. आर्मीचे आघाडीवर निघण्याच्या दिवसापर्यंत ब्रह्मदेशाचे संरक्षण मंत्री होते. ब्रह्मदेशात जपानी लष्कर आल्या वेळेपासून त्यांचे व जपानी लष्कराचे कामकाजानिमित्त फार जवळचे संबंध आले होते व त्यांना अंतर्गत परिस्थितीची पूर्ण कल्पना होती. आणि म्हणूनच त्यांना जपानविरुद्ध बंड करावे असे वाटले असावे. काहीही असो, ते जपानबरोबर खोटेपणाने वागले खरे. अशा प्रकारच्या त्यांच्या वागण्यामुळे ब्रह्मी लोकांच्या मनावर त्याचा प्रतिकूल परिणाम झाला. आझाद हिंद फौजेचे प्रमुख नेताजी सुभाषचंद्र बोस व जपानी लष्कर नेते यांचे घनिष्ट संबंध होते. यामुळेही ब्रह्मीज डिफेन्स आर्मी त्यांना प्रतिकूल होती. मला तर असे वाटते, की

नेताजींचा जपानबद्दल असलेला प्रामाणिकपणा व जिव्हाळा यांमुळे भारतीय लोकांच्याबद्दल त्यांच्या मनात आकस निर्माण झाला असल्यास व त्यांनी तसा संबंध जोडला असल्यास न कळे.

२० एप्रिल रोजी जनरल किम्युरा यांनी नेताजींनी रंगूनमधून निघून जावे हे बरे, असा आपला हेतू प्रदर्शित केला. नेताजींनी प्रथमतः या कल्पनेला नकार दर्शविला, परंतु काही कालावधीनंतर नेताजींनी ते मान्य केले. प्रथम त्यांनी आपल्या ८० महिला पलटणींच्या सर्वांना सुरक्षित बाहेर पाठवले व नंतर २३ एप्रिल रोजी रात्री ते स्वतः रंगून सोडून मोटारीतून मैलमिन येथे निघून गेले. रंगून सोडण्यापूर्वी त्यांनी एक बैठक घेतली होती. या बैठकीत ठरल्याप्रमाणे आझाद हिंद सरकारचे काही वरिष्ठ अधिकारी व मेजर जनरल लोगंधना यांनी रंगूनमधील पलटणींचा चार्ज घेण्यासाठी व सर्व सुविधा करण्यासाठी थांबावयाचे ठरविले होते.

१९४३ च्या डिसेंबरमध्ये नेताजींच्या मातोश्री निधन पावल्या. त्यांच्या मृत्यूमुळे नेताजींना अपार दुःख झाले व असह्य धक्का बसला.

नेताजी आणि त्यांच्या साहाय्यकांनी रंगून मधून आपला मुक्काम हालवून ते मैलमिन येथे आपल्या दहा जुन्या मोटारगाड्यांतून निघून आले. शत्रूचे रात्रंदिवस चाललेले बॉंबहल्ले टाळून आपल्या मुक्कामास येईपर्यंत त्यांना एक आठवडा लागला. आघाडीवरील सैनिक काढून घेतल्यामुळे माघार घेतलेल्या सैनिकांनी सर्व रस्ते भरून गेले होते आणि एप्रिल अखेर ते सर्व मैलमिन येथे येऊन पोहोचले. या सर्व प्रकरणामुळे नेताजींचे मन उद्विग्न झाले. चिंतेच्या ज्वाला भडकून उठू लागल्या. भविष्य निबिड अंधःकाराने भरून गेले होते. या सर्व दिवसांत सहकाऱ्यांवर त्यांनी अत्यंत प्रेम केले व आदर करून घेतला, त्या सहकाऱ्यांच्या भवितव्याचे काय, याच विचारांनी त्यांचे मन भरून जात असे.

मैलमिन येथे आल्यानंतर जनरल किमुरा यांना बोलावून त्यांचा जपानचे आर्मी जनरल म्हणून सन्मान करावा; असे नेताजींनी ठरविले होते; परंतु या ना त्या कारणामुळे हा बेत तडीस गेला नाही. आझाद हिंद फौज अडथळा न येता माघार घेऊन आल्यानंतर ९ मे रोजी ते ब्रह्मदेशाहून बँकॉककडे रवाना झाले. मैलमिन ते बँकॉक हा प्रवास त्यांनी मोटारीने केला. त्यांच्या समवेत कॅबिनेटचे काही सदस्य, मिनिटानी व हिकारी किकानचे लेफ्टनंट जनरल आयसोडा हे होते. त्यांच्या संरक्षणासाठी भारतीय सैनिकांची एक लहान तुकडी व पाच जपानी लष्करी पोलीस होते. रस्ते अत्यंत खराब होते व मान्सूनचा पाऊस सुरू होता. बॉंबहल्ल्यापासून संरक्षण व्हावे म्हणून ते शक्यतो रात्री प्रवास करीत.

बँकॉक येथे येऊन पोहोचल्यावर, साऊदर्न आर्मी हेडक्वार्टर्सच्या स्टाफ ऑफिसर्सनी नेताजींचे हार्दिक स्वागत केले. या अधिकाऱ्यांना फिल्ड मार्शल तेराऊछी यांनी

नेताजींना उतरून घेण्यासाठी पाठविले होते. तेराऊछी यांच्या स्नेहपूर्ण वागणुकीमुळे नेताजींना गहिवरून आले. या स्टाफ ऑफिसर्समध्ये ॲडमिरल नाकाडो हे होते. एके-काळी त्यांनी नेताजींना रशियाशी संबंध जोडण्याचा सल्ला दिला होता. नेताजींना ते पुन्हा भेटल्यामुळे फार आनंद झाला.

बँकॉकमध्ये येऊन स्थिरस्थावर झाल्यावर नेताजींनी पुढील हालचाली संघटित करण्यासाठी रात्रंदिवस डोके खाजविले. दक्षिणेकडून भारतात शिरकाव करून घेण्याच्या त्यांच्या मूळ योजना बदलाव्यात, मूळ असे त्यांना वाटू लागले. या योजनेस जपानचे अत्यंत साहाय्य झाले होतेच. नेताजींच्या आधिपत्याखाली ब्रह्मदेशाच्या सर-हद्दीवरून काढून घेतलेले सर्व सैन्य व सिंगापूराहून येणारे सैन्य या सर्व परिस्थितीवर मात करण्यासाठी पुन्हा संघटित करण्याचे त्यांनी ठरविले व आपल्या पुढील योजना त्यांनी आखून तयार ठेवल्या.

# बारा / सूर्यास्त

१० ऑगस्ट रोजी जनरल आयसोडा यांनी त्यावेळी सिंगापूर येथे वास्तव्य करीत असलेल्या नेताजींना चालू परिस्थितीचा विचार-विनिमय करण्यासाठी बोलावणे पाठवले होते; पण नेताजींनी येण्याचे टाळले होते. तरी पण त्यानंतर त्यांना तारा करून विनंती केल्यावरून नेताजी परत सायगावला आले. त्यांनी जपानी अधिकाऱ्यांना स्पष्ट सांगितले, की "माझ्या काही कॅबिनेट सभासदांसह मी रशियाला जाऊ इच्छितो. जर मला एकट्यालाच जावे लागले, तर मी जाईन व या गोष्टीला माझ्या कॅबिनेटची संपूर्ण संमती आहे हे आपण जरूर पाहावे."

नेताजींच्या विनंतीला मान्यता देण्यासाठी दक्षिण विभागीय लष्करी ठाण्याने हे सर्व प्रकरण इंपीरियल जनरल हेडक्वार्टर्स यांच्याकडे पुढील कारवाईसाठी सुपूर्त केले. नेताजींच्या या कल्पनेला टोकिओकडून सपशेल नकार देण्यात आला. उलट नेताजींना कळवण्यात आले, की "मि. बोस, आपणास जपानकडून मनःपूर्वक सहकार्य व मदत मिळत असता आपण रशियाला जाऊ इच्छित आहात. त्यापूर्वी जपानबरोबर आपले असलेले संबंध आपण तोडून टाकणार आहात काय? आपल्या निर्णयामुळे अधिकच राजकीय गुंतागुंत व्हावी अशी आपली इच्छा आहे का?"

फिल्ड मार्शल तेराऊछी हे नेताजींच्या मताशी संपूर्ण सहमत होते व त्यांनी स्वतःच्या जबाबदारीवर नेताजींची विनंती मान्य करून रशियाच्या जवळच्या व सुरक्षित प्रदेशात जाण्यासाठी एक खास विमान देण्याचे मान्य केले. तेराऊछी यांनी नेताजींनी हवाईमार्गे सिंक्यो मांचूरियाला जावे व तेथील वाटाघाटीनंतर इच्छित स्थळी जावे अशी योजना तयार केली. त्यांच्या समवेत क्वाटींग आर्मीचे चीफ ऑफ द स्टाफ, ले. ज. सिडये हे जाणार होते. ते सायगाव येथे मांचूरियाला जाण्यासाठी येणाऱ्या विमानाची वाट पाहत थांबले होते. नेताजींचे हे विमान सिंक्यो मांचूरियाला गेल्यावर रशियन लष्कराला शरणागती देऊन मग त्यांचे साहाय्य कोणत्या प्रकारचे व कसे

होणार हे ठरवावयाचे होते, तेथून ते लगेच १७ ऑगस्ट रोजी परत फिरणार होते.

मध्यंतरीच्या काळात ' हिकारी किकान ' यांनी नेताजी हे आझाद हिंद सरकारचे प्रमुख असल्याने त्यांना एकट्यालाच मांचूरियाला पाठवण्यास विरोध दर्शविला. नेताजींही कॅबिनेटचे सदस्य बरोबर असावेत या कल्पनेला चिकटून होते. अखेर त्यांच्याबरोबर एकतरी कॅबिनेट सभासद असावा असे ठरले. त्याबरोबरच विमानातील ठराविक जागेमुळे ते फक्त एकच जादा सीट रिझर्व्ह करू शकत होते.

विमान निघण्याची वेळ संपली होती, तरी नेताजी आपल्या कॅबिनेटची मीटिंग घेतच होते. या मीटिंगमध्ये ' तूर्त कॅबिनेट सदस्य मागे राहून नेताजींनीच जावे व पुढे जपान सरकारला विनंती करून योग्य वाटले, तर मांचूरियाला त्यांना पाठवण्यात यावे, यातूनही हे घडू शकले नाही तर त्यांना जपानमध्ये आश्रय द्यावा' असे ठरवण्यात आले. यानंतर नेताजी अत्यंत घाईने विमान तळावर गेले. नेताजींना आपले स्वतःचे सर्व व्यवस्थित करून घेण्यासाठी वेळ लागला व त्यामुळे विमान उड्डाणास आणखी एक तास उशीर झाला. त्यानंतर विमान निघण्याच्या बेतात असतानाच काही भारतीय ओरडून नेताजींना म्हणाले, की "नेताजी, आपण जात आहात यावेळी आम्ही पूर्व आशियामध्ये राहणारे तीन लाख भारतीय आपणाला देणगी म्हणून मोठी मौल्यवान भेट देत आहोत आणि ती भेट काही मिनिटातच इथे येईल तेव्हा कृपा करून ती येईपर्यंत आपले उड्डाण थांबवावे." आणि पंधरा मिनिटांतच त्यांनी वजनदार अशा दोन सूट केसीस आणून ठेवल्या. त्या तशाच विमानात घेण्यात आल्या.

नेताजींना निरोप देण्यासाठी विमानतळावर साऊदर्न आर्मी हेडक्वार्टर्सचे प्रमुख ऑफिसर्स, हिकारी किकानचे सदस्य व त्यांच्यावर संपूर्ण भरवसा टाकणारे आणि त्यांना शक्य असेल त्या सर्व प्रकारची मदत करणारे त्यांचे कॅबिनेटचे सदस्य आणि नेताजींना आपले वडील किंवा भाऊ समजत होते असे असंख्य भारतीय विमान-तळावर नेताजींच्या दर्शनासाठी हजर होते. त्या सर्वांच्याकडे पाहून व त्यांना अभिवादन करून नेताजी जड अंतःकरणाने विमानात बसले. विमान अंतराळात निघून गेले. सूर्यास्त होणार होता.

# तेरा / कभिन्न अंधार

## विमान अपघात कसा घडला ?

नेताजींना घेऊन जे हवाई जहाज निघाले ते जपानच्या तिसऱ्या हवाई दलाचे जड बॉम्बर होते. (Model–9-2 Sally) १७ ऑगस्ट १९४५ रोजी अंदाजे संध्याकाळी ५–३० वाजता सायगाव विमानतळावरून या हवाई जहाजाने उड्डान केले आणि ते तौरान एन् रुट येथे उतरले. तेथे श्री. बोस आणि त्यांची पार्टी तेथील मॉरिम हॉटेलमध्ये एक रात्र राहिले. सायगाव विमान तळावरून हे विमान धावपट्टीवरून पळू लागले त्या वेळी ते धावपट्टी संपण्याच्या सुमारास 'हवा जड' झालेले दिसून आले. असे होण्याचे कारण म्हणजे विमान ओव्हर लोड झाले होते. तथापि तशाच स्थितीत ते तौरान येथे आले आणि म्हणून आता तौरान सोडण्यापूर्वी साहाय्यक वैमानिक मेजर ताकीझ्वा, मेजर कोनो आणि इतर अधिकाऱ्यांनी विमानात असलेले बारा मशिनगन्स व काही दारूगोळा उतरून ठेवला. यामुळे ६०० किलोग्रॅम वजन कमी झाले. त्यानंतर पहाटे पाचच्या सुमारास पुढील प्रवासासाठी विमान आकाशात झेपावले.

तैफीला पोहोचण्यापूर्वीच रेडिओवरून त्यांना बातमी मिळाली, की रशियाने पोर्ट ऑर्थर ताब्यात घेतले आणि ते दैरानमध्ये यापूर्वीच येऊन टेपले असतील, अशी भीती व्यक्त करण्यात येत होती. यामुळे इच्छित ठिकाणी लौकरात लौकर जाऊन पोहोचणे अगत्याचे होते. हवामान पाहिजे तसे होते. दोन प्रहरच्या सुमारास ते तैफीच्या विमानतळावर येऊन पोहोचले. आज जपानचे राजपुत्र कानिन हे बादशहाच्या जपानी लष्कराला शरण जाण्याचा हुकूम घेऊन त्याच्या अम्मलबजावणीसाठी या विमान तळावरून पुढे जाणार होते. त्यांच्यासाठी विमान तळावर तंबू ठोकण्यात आला होता व त्यांच्या व्यवस्थेसाठी बरेच अधिकारी गुंतले होते. उत्तर बेटावरील जपानी लष्कर

हे शरणागती घेण्याच्या विरुद्ध होते व त्यांचे मन वळवून बादशहाचा हुकूम त्यांना सांगण्यासाठी राजपुत्र जात होते.

तैफी येथे नेताजींनी व त्यांच्या इतर सहकाऱ्यांनी अंदाजे दोन तास विश्रांती घेतली व त्या मुदतीत विमानात तेल भरले गेले. विमानाच्या यंत्राची तपासणी केली. ही तपासणी विमानाचे व्यवस्थापकीय अधिकारी, वैमानिक मेजर कोनो आणि कॅप्टन नाकामुरा यांनी केली. मेजर कोनो यांना डाव्या बाजूकडील इंजिन सदोष वाटले. त्यामुळे वैमानिक मेजर ताकिझवा यांनी ते दोन वेळा तपासून पाहिले. त्यानंतर त्यांनी ते उड्डाण करू शकेल याची खात्री करून घेतली. त्यानंतर सर्वांचा अल्पोपहार व विश्रांती झाली. अल्पोपहारासाठी त्याना सॅंडविचेस व केळी मिळाली होती. त्यानंतर सर्व लोक त्यांच्या त्यांच्या जागी म्हणजे पूर्वी ज्या जागी बसले होते त्याच जागी जाऊन बसले. सर्व व्यवस्थित झाल्यानंतर विमान धावपट्टीवरून पुढे सरकू लागले व ते दुसऱ्या टोका-पर्यंत गेले. इंजिनला जास्तीत जास्त वेग दिला गेला आणि मग ते समतोल आणण्यात आले. अशा तऱ्हेने उड्डाण करण्याची जपानी विमानांची नेहमीचीच पद्धत होती, त्यामुळे इंजिन सुस्थितीत असल्याचे दिसून येत असे. या विमानाने इंजिन्स सुस्थिती असल्याची तपासणी करून मगच ते धावपट्टीवर पळण्यासाठी सोडले होते. या धाव-पट्टयाची लांबी ८९० मीटर्स होती. अवजड विमानाच्या बाबतीत सर्वसाधारणपणे अर्धे अंतर पळून जाईपर्यंत पार्श्वभाग जमिनीवरून उचललेला नसतो; परंतु या प्रकरणात विमान धावपट्टयावरून जास्तीत जास्त तीन चतुर्थांश भाग पळून गेले तरी पार्श्वभाग उचलला गेला नाही, असे कॅप्टन नाकामुरा यांचे म्हणणे आहे. विमानाने जमीन सोडली आणि ते एका बाजूवर खडे झाले. त्याच वेळी मोठा आवाज झाला आणि विमान डाव्या बाजूला कोलमडले. विमानाचा पंखा आणि डाव्या बाजूचे इंजिन निखळले गेले आणि विमान हवेतून जमिनीवर कोसळले.

## विमानातील उतारू

| | |
|---|---|
| १. वैमानिक | W/O ऐयागी ( ३ ऱ्या हवाई दलातले ) |
| २. साहाय्यक वैमानिक | मेजर ताकिझवा ( मेनलॅंड, जपानला बदली झालेले ) |
| ३. सुकाणू धारक ( Navigator ) | सार्जंट ओक्टा. |
| ४. रेडिओ ऑपरेटर | N.C.O. तोमिनागा. |
| ५. गन् ऑपरेटर | एक N.C.O. |
| ६. लेफ्टनंट जनरल-सिडये | चीफ ऑफ दी स्टाफ ब्रह्मीज आर्मीकमांड. |
| ७. लेफ्टनंट कर्नल—सकाई | स्टाफ ऑफिसर |
| ८. लेफ्टनंट कर्नल—शिरो नोनो गाकी | स्टाफ ऑफिसर, जपान एअरफोर्स |

| | |
|---|---|
| ९. मेजर तारोकोनो | स्टाफ ऑफिसर, जपान एअरफोर्स |
| १०. मेजर आयो ताकाहॉसि | स्टाफ ऑफिसर. |
| ११. कॅप्टन केईकेची आरी | एअर फोर्स इंजिनिअर |
| १२. नेताजी सुभाषचंद्र बोस | – |
| १३. कर्नल रेहमान ( A.D.C.) | – |

## विमान अपघाताचे कारण

जपान हा समुद्राने वेढलेला देश असल्याने निसर्गतः त्याचे समुद्रामुळे भौगोलिक संरक्षण झाले आहे आणि म्हणून त्याचा कोणत्याही शत्रूने गेल्या २६०० वर्षांच्या इतिहासात पराभव केला नाही. फक्त मंगोलियन दर्यावर्दी संशोधकांनी मात्र एकदा जपानला भयचकित केले होते इतकेच. अशी पार्श्वभूमी असलेल्या जपानची १५ ऑगस्ट १९४५ रोजी संयुक्त राष्ट्रांसमोर बिनशर्त शरणागती झाली. तिचा परामर्श घ्यावयाचा आहे. यापूर्वी जपानच्या इतिहासात त्यांच्या राष्ट्रावर असा प्रसंग आलाच नव्हता. या पहिल्याच प्रसंगाने त्यांना जबरदस्त तडाखा बसला. मानसिक दृष्ट्या त्यांच्यावर इतका भयंकर परिणाम झाला, की तो इतर देशियांना केव्हाही समजू शकणार नाही. जपानी जनतेला बसलेला हा फटका वर्णनातीत आहे. काही जपानी तर प्राणांतिक विरोध करण्याच्या तयारीत होते. काही लोक तर भ्रमिष्ट होऊन समाज विध्वंसक झाले. काहींना तर आपण कशासाठी जगावयाचे हेच समजेना. अमेरिकेचे, ताबा घेणारे लष्कर जपानवर येत आहे हेच त्यांना खरे वाटेना. वस्तुतः १५ ऑगस्ट १९४५ नंतर जपानची सर्व लष्करी सत्ता कोलमडून पडली होती. भयाच्या संवेदनांमुळे व पराभवाच्या तडाख्यामुळे काही वरिष्ठ दर्जाचे लष्करी अधिकारी लपून राहिले तर काहींनी आत्महत्या करून घेतली. फोर्मोसाचे लष्करी प्रमुख, कमांडर रिकिछी अॅण्डो यांनी व गव्हर्नर जनरल म्हणून काम करणारे यांनी आत्महत्या करून घेतली. सर्व देश गडबड, गोंधळ आणि घोटाळ्यात बुडून गेला होता.

अशा गोंधळलेल्या अवस्थेत देश असता नेताजींचे विमान तैफी विमानतळावर उतरले. सर्वसाधारण असा संकेत आहे की नेताजींच्या सारखे, चीफ ऑफ दी स्टेट येणार असतात, त्यावेळी विमानतळावर त्यांचे आगत–स्वागत करण्यासाठी कमांडर किंवा चीफ ऑफ दी स्टाफ यांनी हजर राहावयाचे असते; परंतु या परिस्थितीत हा संकेत पाळला गेला नाही. कारण आकस्मिक संकटांची व गोंधळाची परिस्थिती निर्माण झाली होती. त्यामुळे फोर्मोसा लष्कराचे अधिकारी विमानतळावर हजर राहू शकले नाहीत. पुढे १९५६ मध्ये भारत सरकारने नेताजींच्या मृत्यूची चौकशी करण्यासाठी ऑफिसर्स कमिटी नेमली होती, त्या कमिटीने वरील संकेत पाळला गेला नाही म्हणून ठपका ठेवला. पण त्यावेळी जपानची एकंदर परिस्थिती व त्यावेळचे वातावरण फारच

विस्कळीत व चिंताजनक होते. अशावेळी औपचारिकता पाळता येणे शक्य झाले नाही.

नेताजी ज्या विमानात बसले होते त्या विमानाच्या इंजिनची चाचणी झाली होती व (मास्टूयामा) तैफी विमानतळावर त्यात इंधनही भरले गेले होते. हा विमानतळ आकाराने लहान होता व सभोवार विटांच्या भट्टयांची धुराडी वरपर्यंत आलेली होती. शिवाय, या विमानाची नऊ उतारू वाहून नेण्याची क्रयशक्ती असताना त्यात तेरा उतारू बसले होते. कोणत्याही वैमानिकाला या विमानळावरून विमानउड्डाण करून नेणे फारच धोक्याचे वाटे. या विमानाची एक टन वजन वाहून नेण्याची धारकशक्ती असता त्यांत जवळजवळ दोन टन वजन होते. वजन वाढण्याचे आणखी एक कारण म्हणजे उतारूंचे वैयक्तिक साहित्य हे आहे. जास्त झालेल्या वजनाचा दाब साहजिकच विमानास पुढे ढकलणाऱ्या पंख्यावर होऊन त्याचा परिणाम त्याने पेट घेण्यात झाला आणि त्यामुळे विमान कोसळले गेले. प्रत्यक्ष अशी ही घटना घडली. ही घटना मि. हिडो मान्स्यू यांच्या निवेदनावर आधारलेली आहे. मि. हिडो सध्या टोकिओ एअर ट्रान्स्पोर्ट कं. ३१, यागुरामॉन, फुवुओका सिटी या कंपनीत मॅनेजर म्हणून काम करीत आहेत. या अपघातातील नॅव्हिगेटर सार्जंट ओक्टा आणि सार्जंट योशो ओक्टा त्यांचे जवळचे स्नेही आहेत. या अपघातांत त्यांच्या पाठीच्या कण्यास इजा पोहोचली होती व ते तैफीच्या लष्करी हॉस्पिटलमध्ये उपचार घेत होते. नंतर १९४७ मध्ये त्यांना जपानमध्ये मायदेशी परत पाठवण्यात आले.

या विमान अपघाताच्या सुमारास जपानच्या अभूतपूर्व शरणागतीचे वर्णन करताना व सामाजिक मानसिक स्थिती सांगताना मी (टाट्सो ह्यासिद) वाहवत गेलो याबद्दल दिलगिरी व्यक्त करतो.

## विमान अपघाताच्या प्रकरणाचा एकंदर गोषवारा असा—

(१) विमानाची वजन उचलण्याची शक्ती जास्तीत जास्त नऊ माणसांची असताना त्यात तेरा माणसे व त्यांचे साहित्य यामुळे प्रमाणाबाहेर जादा वजन झाले.

(२) तैफी विमानतळ हे आकाराने फारच लहान असून, त्याच्या भोवतालच्या परिसरात विटांच्या भट्टयांची धुराडी आकाशात उंच गेली होती त्यामुळे विमान उड्डाण करण्यास अवघड गेले.

(३) रशियामध्ये आश्रयाला जाण्याची योजना जेव्हा त्यांनी आखली तेव्हा रशियाने पोर्ट ऑर्थरवर चढाई केल्याचे वृत्त मिळाले त्यावेळी त्यांनी आकस्मिक मूळ योजना बदलून टाकली. यामुळे मानसिक गोंधळ निर्माण झाला आणि त्यामुळे इतर कोणत्याच गोष्टींचा विचार न करता मुक्कामाला जाण्याची घाई करण्यात आली.

(४) सायगावहून उड्डाण करताना जरी काही इंजिन सदोष असले, तरी विमान सुरक्षितपणे सायगावहून तैरणपासून तैफीला पोहोचले यावरून ती सदोष असतील

असे तपासणीअधिकाऱ्यांना वाटले नाही. त्यानंतरच्या तपासणीतसुद्धा ती सुस्थितीत दिसून आली.

( ५ ) जरी वैमानिकाने तर्फी विमान तळाचा, ते अपुरे व लहान होते म्हणून, उपयोग केला नसता तरी धावपट्ट्यावरून ते धावत दोन तृतियांश अंतर गेले. तथापि विमानाने जमिनीवरून वर उचल घेतली नाही. आणि परिणामी ते कलले गेले. कारण त्याच्यामध्ये अधिक बोजा असल्यामुळे इंजिन व पुढे नेणाऱ्या पंखाला ते असमतोल झाले.

( ६ ) विमानतळावर फोर्मोसाचे आर्मी कमांडंट हे आले नव्हते व त्यांनी स्नेहभाव व सहकार्य देण्यात दुर्लक्ष केले. या विमान अपघाताचे संपूर्ण संशोधन करणे त्यांचे कागदपत्र किंवा इतर पुरावे न मिळाल्याने फारच अवघड झाले. त्याचप्रमाणे अपघाता-नंतर इंजिनची व इतर तपासणी न झाल्याने त्याबद्दल काही रेकॉर्ड मिळत नाही.

जेव्हा विमान कलंडले तेव्हा त्यांचे पंखे व डाव्या बाजूचे इंजिन बंद पडले आणि ते विमानतळाच्या सिमारेषेपासून अंदाजे दहा ते वीस मीटर लांब जमिनीवर आदळले आणि त्यातून ज्वाला येऊ लागल्या. विमान हवेतून एकदम नाकावर खाली आले आणि त्याचा डावा पंखा जमिनीत घुसला व पुढील बाजूने त्याने पेट घेतला.

( १ ) ले. ज. सिडये आणि वैमानिक मेजर ताकिझवा विमानात त्याच क्षणी ठार झाले. नेताजी, पायलट W/O ऐयागी आणि दुसरे दोन पर्यटक हॉस्पिटलमध्ये उपचार घेत असतानाच निधन पावले.

( २ ) खालील सात लोक अखेरीस अपघातातून वाचले. ले. ज. नो. नोगाकी हे शिरोगृहात बसले होते ते सुदैवी ठरले. ज्यावेळी विमान जमिनीवर आदळले त्या वेळी ते विमानाबाहेर फेकले गेले व त्यांना विशेष काहीच दुखापत न होता ते जमिनीवर पडले. ते उठले व जळत असलेल्या विमानापासून दूर पळाले आणि त्यांनी दगडाच्या ढिगाऱ्याचा आश्रय घेतला. ले. क. साकी, मे. ताकाहासी आणि कॅ. आरी हे विमान जमिनीवर आदळताच बेशुद्ध झाले; पण लगेच शुद्धीवर आले व पेटलेल्या विमाना-बाहेर निघाले. त्या सर्वांना मुका मार बसला होता व ते थोडे पोळलेही होते.

( ३ ) मेजर कोनो हे व्यवस्थित हुशारीत होते. ते एकटेच हा सर्व प्रकार पाहिलेली व्यक्ती होय. ते या प्रसंगाने गांगरून गेले नाहीत. पूर्ण सावध होऊन दुसरे काय करीत आहेत याकडे त्यांचे लक्ष होते. ज्यावेळी विमान जमिनीवर कोसळले होते त्या वेळी विमानात असलेली पेट्रोलची टाकी उखडली व ती बोस व त्यांच्यामध्ये पडली. त्यांनी मागे पाहिले; पण टाकी आडवी पडल्याने त्यांना बोस दिसू शकले नाहीत. विमान पडल्यानंतर मात्र त्यांना ले. ज. सिडये दिसले. पाठीमागून त्यांचे डोके कापले गेले होते.

( ४ ) मेजर ताकिझवा विमान चालवत होते. त्यांच्या समोरचा स्टेरींग गियर येत

निसटून त्यांच्या तोंडावर व कपाळावर चांगलाच मार बसला होता व त्यातून रक्त येत होते. ते पुढे कळले होते. वॉरंट ऑफिसर ऐयागी यांना छातीत मार लागला होता व त्यातून रक्त येत होते.

या वेळेपर्यंत ज्वाला फारच भडकल्या होत्या व असह्य उष्णता निर्माण झाली होती. त्यांनी विमानाच्या वरच्या बाजूस असलेले प्लॅस्टीकचे कव्हर मोडून काढले आणि त्यामधून आपली सुटका करून घेतली. आग इतकी भयंकर होती, की त्यामुळे त्यांचे हात व पाय भाजून गेले, ते विमानातून आपली सुटका करून घेत आहेत तोपर्यंत पेट्रोल टँक व इंजिन यांना जोडणाऱ्या एका नळीमधून त्यांच्या अंगावर खालच्या बाजूने तुषार उडाले. यामुळे फवाऱ्याबरोबर ज्वाला येऊन भिडल्या. तसेच ते पळत तीस मीटर अंतर गेले आणि जमिनीवर लोळण घेऊन आग विझविण्याचा त्यांनी प्रयत्न केला. बाहेरचे अंगावरील कपडे त्यांनी काढून टाकले.

मेजर कोनो हे अठरा महिने उपचार घेत होते. त्यांचे हात कायमचे अधू झाले.

( ९ ) कर्नल हबीबूर रेहमान नेताजींचे मदतनीस होते. पूर्वीच सांगितल्याप्रमाणे विमान जमिनीवर आदळले. पुढचा भाग निखळला व त्याला आग लागली. नेताजी क. रेहमानकडे वळले; पण त्यांना कर्नल रेहमान म्हणाले, " कृपया आपण जलदीने पुढील बाजूने बाहेर पडा. मागील बाजूने वाट नाही." ते प्रवेशद्वारातून बाहेर पडू शकत नव्हते, कारण ते जाम घट्ट झाले होते व त्यावर साहित्याच्या बॅगा वगैरे पडल्या होत्या. अशाही स्थितीत नेताजींना बाहेर पडणे आवश्यक होते व त्या प्रमाणे पुढील बाजूने ते बाहेर पडले व त्यांच्या पाठोपाठ कर्नल रेहमानही बाहेर पडले. नेताजींच्या कपड्यांनी केव्हाच पेट घेतला होता. ते खाकी ड्रील कपड्यामध्ये होते. त्यांच्या पँटने पेट घेतला. रेहमानने त्यांना जमिनीवर झोपविले व ते आग विझवू लागले. नेताजींच्या डोक्याला डाव्या बाजूवर खोल जखम झालेली दिसली. त्यांच्या कपाळावरही बरेचसे खरचटले होते व त्यांचे केस होरपळले होते. त्यांच्या डोक्याला झालेली जखम चार इंच लांबीची होती. क. रेहमान यांनी हातरुमालाने रक्तस्राव थांबविण्याचा प्रयत्न केला. क. रेहमानचेही दोन्ही हात अतिशय पोळले होते, त्यांच्याही कपाळावर जखम झाली होती व त्यातून रक्त येत होते. डाव्या बाजूच्या उजव्या घोट्यावर काही तरी कठीण पदार्थ लागून जखम झाली होती व त्यातून रक्त वाहत होते. विमान जमिनीवर कलंडले त्यावेळीच मार बसून त्यांच्या कपाळावर जखम झाली होती. नेताजींचे जळत असलेले कपडे काढताना त्यांचे हात भयानक पोळत होते व त्यांना आत्यंतिक वेदना होत होत्या. ते पार दमून गेले होते. नेताजींना त्यांनी जमिनीवर झोपवून कपडे विझवल्यानंतर लगेच त्यांनी पण जमिनीवर लोळण घेतली. त्यावेळी नेताजी हिंदीमधून त्यांना म्हणाले, " आपको जादा चोट तो नही लगी ? "

कर्नल रेहमान म्हणाले, " मला वाटते मी ठीक आहे. " नेताजी स्वतःबद्दल

म्हणाले, “ मी यातून वाचू शकणार नाही. ”

क. रेहमान म्हणाले, “ तसे आपण बोलू नका सर, ईश्वर तुमच्यावर दया करील. व माझी खात्री आहे की तुम्ही बरे व्हाल. ”

“ नाही, मला तसे वाटत नाही. ” नेताजी पुढे म्हणाले,

“ तुम्ही ज्या वेळी भारतात जाल त्यावेळी जनतेला सांगा, की स्वातंत्र्याकरिता मी अखेरपर्यंत लढत होतो. त्यांनीही हा लढा पुढे चालू ठेवावा. माझी खात्री आहे, की भारत लवकरच स्वतंत्र होईल. आता भारताला कोणीही बंधनात ठेवू शकत नाही. ” नेताजींनी अत्यंत शारीरिक क्लेश होत असताही कण्हत कण्हत हे उद्‌गार काढले आहेत. हे त्यांचे शेवटचे उद्‌गार होत !

२ ऑक्टोबर १९४३ रोजी आझाद हिंद सरकार स्थापनेच्या वेळी त्यांनी घेतलेली ‘ भारताच्या स्वातंत्र्याकरिता अखेरच्या श्वासापर्यंत लढण्याची ’ त्यांची शपथ त्यांनी पूर्णत्वाला नेली. मृत्युशय्येवर असताही भारतीय जनतेने संघटित होऊन भारताच्या स्वातंत्र्याकरिता लढावे, अशी नेताजींची तीव्र इच्छा होती. क. रेहमान स्वतःचे दोन्ही हात भाजलेले असता व डोळयांच्या जखमेतून रक्तस्राव होत असताही नेताजींची व्यवस्था पाहत होते. मला असे वाटते, की नेताजी व रेहमान यांना आपल्या देशा-बद्दल प्रेम आणि कर्तव्यनिष्ठा वाटत होती आणि त्यामुळेच भारताचे स्वातंत्र्य जवळ आले.

( ६ ) नॅव्हिगेटर ओक्टा–ज्यावेळी विमान जमिनीवर कोसळले त्याचवेळी त्यांच्या मणक्यास इजा पोहोचली. त्यांच्या पाठीवर ४० सें. मी. लांबीची जखम झाली होती. हॉस्पिटलमध्ये बरेच दिवस त्यांच्यावर उपचार चालू होते. अखेर त्यांना १९४७ च्या हिवाळयात त्यांच्या मायदेशी परत पाठविण्यात आले.

जनरल सिडये आणि नेताजी यांना विमानात चांगल्या जागा मिळाल्या होत्या. त्यांना मरण प्राप्त झाले. ज्यूनिअर ऑफिसर्स यांच्या जागा इतक्या सुरक्षित नव्हत्या. ते लोक वाचू शकले हा दैवदुर्विलासच होय.

## नेताजी सुभाषचंद्र बोस यांचा मृत्यू

तैफीच्या नॉनमॉन लष्करी इस्पितळात नेताजींना व इतर जखमी लोकांना नेण्यात आले. या इस्पितळाला, ‘ विमानतळावरून फोन करून, विमान अपघातातील जखमी झालेल्या व्यक्तींना पाठवण्यात येत असून त्यांच्या उपचारार्थ सज्ज राहावे, असा संदेश पाठविण्यात आला होता. विमान हल्ल्यापासून संरक्षण व्हावे म्हणून मुख्य इस्पितळ व त्याच्या अनेक शाखा बाहेरच्या बाजूस हलविण्यात आल्या होत्या. तैफी शहरात फक्त नॉनमॉन शाखा राहिली होती. या शाखेच्या इस्पितळाचे मेडिकल ऑफिसर इन्चार्ज कॅ. योशिमी हे होते. ते १९३८ मध्ये पदवीधर झाले होते व त्यांनी १९४०

मध्ये कमिशन मिळविले होते. तेथे दुसरे एक डॉक्टर होते त्यांचे नाव टी. टेस्युरुटा. ते नुकतेच १९४४ मध्ये पदवीधर झाले होते. त्या ठिकाणी तिसरेही एक डॉक्टर होते. त्या इस्पितळात सहा जपानी व फोर्मोसाच्या नर्सेस होत्या. तीस वैद्यकीय नोकर होते. कॅ. योशिमी हे भरगच्च बांध्याचे असून, एखाद्या भारतीय पुढाऱ्यासारखे दिसत.

नेताजींना ज्यावेळी इस्पितळात आणण्यात आले त्यावेळी त्यांची स्थिती फारच गंभीर होती, तरीपण नेताजींनी प्रथम इतरांच्याकडे लक्ष देण्याबद्दल व शेवटी आपल्यावर उपचार करण्याबद्दल डॉक्टरांना सांगितले. केवढ्या मोठ्या दिलदार मनाचा मनुष्य! त्यांचीच परिस्थिती गंभीर असल्यामुळे डॉक्टरनी प्रथम त्यांच्यावरच उपचार करण्याचे ठरविले. कॅ. योशिमी म्हणाले, "नेताजींचे सर्वांग पोळले आहे व त्यांची कातडी काळी पडली आहे. त्यांची छाती पण भाजली आहे. त्यांचा चेहरा सुजला आहे. ते अत्यंत चिंताजनक पोळले गेले आहेत. आता त्यांच्या अंगावरील जखमेतून रक्तस्राव होत नव्हता. त्यांचे डोळेही सुजले होते. त्यांना पाहता येत होते; पण तसे करताना त्यांना फार त्रास होत होता. त्यांना खोलीत आणण्यात आले त्यावेळी ते शुद्धीवर होते; पण त्यांना खूप ताप भरला होता आणि त्यांच्या हृदयाची स्थिती खूप नाजूक झाली होती." डॉ. योशिमी यांनी नेताजींना पूर्ण तपासल्यानंतर त्यांचा ग्रह असा झाला, की त्यांची परिस्थिती इतकी गंभीर झाली आहे, की ते दुसरे दिवशी सकाळपर्यंत राहतील असे त्यांना वाटले नाही. डॉ. योशिमी यांनी नेताजींना तत्काळ दिलेली वैद्यकीय उपचाराची संपूर्ण माहिती दिली आहे. नेताजींच्या पोळलेल्या भागावर डॉ. टेस्युरुटा यांनी ड्रेसिंग केले. प्रथम त्यांनी पांढरे ऑइंटमेंट लावले व मग सर्वत्र बॅंडेज बांधले. डॉ. योशिमी यांनी त्यांच्या हृदयाच्या स्थितीसाठी व्हीटा कॉम्फरची चार इंजेक्शन्स दिली. दोन इंजेक्शन्स डिगिटामीनची दिली. रिंजर सोल्युशनची (प्रत्येक वेळी ५०० सी. सी. थोड्या थोड्या वेळानंतर द्यावयाची) इंजेक्शन्स दिली. प्रथम ड्रेसिंगरूममध्येच उपचार दिले. नंतर नेताजींना लगतच्या वॉर्ड नं. २ मध्ये नेऊन ठेवण्यात आले व पुढील उपचार चालू झाले. नेताजींना व कर्नल रेहमान यांना एकाच वॉर्डमध्ये ठेवण्यात आले होते. डॉ. योशिमी म्हणतात, की प्रखर पोळल्याने रक्त घट्ट होते व हृदयावर असह्य ताण पडतो. हा ताण नाहीसा होण्यासाठी रक्त वाहू दिले जाते व त्या जागी नवे रक्त देण्यात येते. नेताजींचे अंदाजे २०० सी. सी. रक्त वाहू दिले गेले व ४०० सी. सी. नवे रक्त त्यांना देण्यात आले. डॉ. योशिमी म्हणाले, की "हे रक्त नॉनमॉन आर्मी हॉस्पिटलमध्ये असलेल्या जपानी सैनिकांचे होते. हे रक्त त्यांना संध्याकाळी ४ ते ५ च्या दरम्यान देण्यात आले. या उपचाराची प्रतिक्रिया चांगली झाली. क. रेहमान यांना पण त्याचप्रमाणे उपचार केले गेले. त्यानंतर डॉ. योशिमी यांनी दुखापत झालेल्या जपानी अधिकाऱ्यांना उपचारार्थ घेतले. डॉ टेस्युरुटा यांना नेताजींच्यावर लक्ष ठेवण्यास व प्रत्येकी तीस मिनिटांनंतर व्हीटा-कॉम्फरचे

इंजेक्शन देण्यास त्यांनी सांगितले.

नेताजी प्रथम पूर्ण शुद्धीवर राहिले, वारंवार ते पाणी मागत व प्रत्येकवेळी त्यांना थोडे थोडे पाणी पिण्यास देण्यास येत होते. नेताजींना जर जपानी अधिकाऱ्याबरोबर बोलण्याची इच्छा झाली तर अडचण येऊ नये म्हणून दुभाषाला बोलावून त्यांच्याजवळ ठेवण्यात आले. डॉक्टरांच्या समवेत काही नर्सेसही त्यांची देखभाल करण्याकरिता ठेवण्यात आल्या होत्या. दुभाषी मि. ज्यूइची नाकामुरा हे होते. सध्या ते अश्याहि गाओका, हौसिंग एरिया, ४४–७, ताजीमा फुकुओखा सिटी (जपान) या ठिकाणी राहतात. मि. ज्यू. नाकामुरा यांनी त्यावेळी काय घडले ते सांगितले. ते म्हणाले, "त्यावेळी उन्हाळा चालू होता. मी घरातल्या कपड्यांतच घरी वावरत होतो. तोपर्यंत माझ्याकडे लष्करी शिपाई पाठवून नॉनमॉन हॉस्पिटलात काही जखमी लोक आले असून त्यांना मदत करण्याकरिता बोलावल्याचे सांगण्यात आले. मी ताबडतोब नॉनमॉन हॉस्पिटलमध्ये दाखल झालो. मला नेताजी सुभाषचंद्र बोस व त्यांचे ए. डी. सी. क. रेहमान यांची तत्काळ ओळख पटली. कारण पूर्वी अनेकवेळा मी त्यांचा दुभाषा म्हणून काम केले होते. दक्षिण पूर्व आशिया व जपान हा प्रवास करीत असताना नेताजी तैफीला थांबत."

नेताजींना दुभाष्या आला आहे असे सांगितल्यानंतर ते चार वेळा बोलले, पहिल्या वेळी ते म्हणाले, "माझे काही लोक पाठोपाठ येत आहेत. ते जेव्हा फोर्मोसात येतील त्यावेळी त्यांची चांगली काळजी घ्या." दुसऱ्या वेळी त्यांनी विचारले, "जनरल सिड्यांना काय झाले?" तिसऱ्या वेळी ते म्हणाले, "माझे रक्त डोक्यात निघाले आहे. त्याकरिता मला उपचार द्या." चौथ्या वेळी ते म्हणाले, "मला झोपी जायचं आहे. ते इंग्रजीमधून बोलले व हिंदीमधूनही बोलले. या सर्व वेळी त्यांना असह्य वेदना होत असाव्यात; परंतु त्यांच्या तोंडातून विव्हळण्याचा किंवा तक्रारीचा एकही शब्द बाहेर पडला नाही. त्यांच्याभोवती असलेल्या त्यांच्या धैर्याचे लोकांना कौतुक वाटले. त्याच हॉलमध्ये असलेले जपानी अधिकारी वेदनेने विव्हळत होते व या असह्य वेदना सहन करण्यापेक्षा मारून टाका असे म्हणत होते. नेताजींची शांतता पाहून आम्हा सर्वांना आश्चर्य वाटले.

डॉ. योशिमी यांनी सांगितले, की सायंकाळी ७ किंवा ७–३० वाजता डॉ. टेस्युरुटा यांनी त्यांना सांगितले, की नेताजींची परिस्थिती फारच चिंताजनक झाली आहे आणि त्यांची नाडी अत्यंत मंद होत आहे. त्यांनी तत्काळ जाऊन गडबडीने नेताजींना व्हीटा–कॉम्फर व डिजिटामिन इंजेक्शन दिले. कारण त्यांचे हृदय व नाडी ठीक चालावीत म्हणून. पण त्यात काहीही सुधारणा होऊ शकली नाही. हळू हळू त्यांचे जीवित त्यांना सोडून निघाले आणि अखेर ८ वाजता त्यांनी अखेरचा श्वास घेतला.

डॉ. योशिमी यांनी त्यांच्या मृत्यूचा दाखला तयार केला. त्यावर जपानीत

( Kata Kana ) म्हणजे " चंद्र बोस " असे लिहिले आणि मृत्यूचे कारण "अत्यंत होरपळल्यामुळे " ( Burns of third degree ) असे नमूद केले. नेताजींच्या मृत्युसमयी खालील मंडळी हजर होती.

( १ ) डॉ. योशिमी
( २ ) डॉ. टेस्युरुटा.
( ३ ) दोन नर्सेस.
( ४ ) कर्नल हबीबूर रेहमान
( ५ ) एक मेडिकल ऑर्डर्ली ( मि. काझोमिटस्यू )

## मृत्यूच्या बातमीस विलंब

नेताजींच्या मृत्यूबद्दल शंका घेण्याचे एक कारण म्हणजे त्यांच्या मृत्यूची बातमी योग्य पद्धतीने व तत्काळ प्रसिद्ध झाली नाही. मि. नाकामुरा म्हणतात, की नेताजींचा मृत्यू गुप्त ठेवण्यात आला. फक्त वरिष्ठ लष्करी प्रमुखांनाच त्यांच्या मृत्यूची बातमी देण्यात आली. फोर्मोसा लष्कराचे चीफ ऑफ दी स्टाफ हे नेताजींच्या मृत्यूची बातमी दाबून ठेवण्याच्या धोरणाबद्दल म्हणतात, की नेताजींसारख्या भारताच्या स्वातंत्र्यासाठी ब्रिटिशांच्या विरुद्ध लढा देत असलेल्या महत्त्वाच्या व्यक्तींच्या मृत्यूची बातमी प्रसिद्ध होणे योग्य ठरणार नाही असे त्यांना वाटते. जपान्यांनी प्रथमतः त्या बद्दल गुप्तता पाळली व नेताजींच्या मृत्यूची बातमी निश्चित करण्यासाठी योग्य ती पावले टाकली नाहीत. या सर्वांवरून असे दिसून येते, की १५ ऑगस्ट १९४५ ला शरणागतीमुळे जपान अतिशय गोंधळलेल्या अवस्थेत होते. हे सर्व युद्ध व शत्रुत्व संपल्यानंतर भारतातील ब्रिटिश सरकारने नेताजी सुभाषचंद्र बोस कोठे आहेत हे पाहून शक्य तर त्यांना अटक करण्यासाठी मेसर्स फिन्ने आणि डाव्हीन यांच्या आधिपत्याखाली मि. एच. के. रॉय व मि. के. पी. डे यांना संशोधनार्थ पाठविले होते. तसेच या भागात असलेले दोन भारतीय पोलिस अधिकारीही त्यांच्या समवेत होते. त्यांनी अनेक लष्करी अधिकारी व डॉक्टर्स यांच्या मुलाखती घेऊन नेताजी विमान अपघातात मृत्यू पावल्याची खात्री करून घेतली. या चौकशीच्या आधारे त्यांनी नेताजींच्यावर असलेले पकडवॉरंट रद्द करण्याच्या उद्देशाने भारतातील ब्रिटिश सरकारकडे एक रिपोर्ट सादर केला.

## नेताजींच्या पार्थिव देहावर अंत्यसंस्कार

नेताजींची प्राणज्योत विझून जाताच जपानी लष्करी प्रमुख उभे राहिले आणि त्यांनी त्यांना अखेरची मानवंदना दिली. कर्नल रेहमान हे नेताजींच्या नेहमी जवळ असणारे विश्वासातील अधिकारी होते व प्रवासाला निघताना नेताजींनी त्यांच्याबरोबर

येण्यासाठी त्यांची निवड केली होती. हबीबूर रेहमान यांना नेताजींच्या निधनामुळे फारच दुःख झाले होते. नेताजींच्या मृत्युशय्येजवळ दुभाष्या मि. ज्यू. नाकामुरा हे होते. त्यांनी पाहिलेल्या त्या वेळच्या दृश्याचे वर्णन ते करतात, 'क. रेहमान यांनी नेताजींच्या आत्म्याला शांती मिळावी म्हणून प्रार्थना केली. त्यांनी नेताजींच्या शय्येजवळ गुडघ्यावर बसून पाच ते सहा मिनिटे प्रार्थना केली. नंतर त्यांनी खिडकी उघडली व आकाशाकडे पहात बराच वेळ प्रार्थना केली आणि ते हळूहळू नेताजींच्या शय्येजवळ येऊन खाली पडले. त्या खोलीत असलेल्यांना दुःखाने भरून आले.' डॉ. योशिमी यांनी क. रेहमान यांच्या गालांवरून अश्रू ओघळत होते असे पाहून त्यांचे सांत्वन केले. नर्सेस तर मोठ्याने रडत होत्या. आणि त्या खोलीत हजर असलेले सर्वच लोक रडत होते. नंतर डॉ. योशिमी यांनी घडलेला प्रसंग मिलीटरी हेडक्वार्टरला कळविला. लगेच हेडक्वार्टरमधून मेजर नागामोटो यांना पाठवून देण्यात आले. त्यांनी हॉस्पिटलमध्ये येऊन नेताजींचा बँडेज बांधलेल्या अवस्थेत बिछान्यावर पडलेला देह पाहिला. मग त्यांचा देह हॉलच्या एका बाजूला नेऊन ठेवण्यात आला व त्यांच्याभोवती पडदे टाकण्यात आले. जपानी रीतिरिवाजाप्रमाणे त्यांच्या मृत्यु-शय्येशेजारी फुले ठेवण्यात आली व मेणबत्त्या पेटवण्यात आल्या.

दुसरे दिवशी म्हणजे १९ ऑगस्ट रोजी फोर्मोसा आर्मी हेडक्वार्टरला इंपीरिअल जनरल हेडक्वार्टर्स ( जपान ) यांचेकडून तार आली, की नेताजींचा देह विमानाने टोकिओस आणावा. त्या तारेच्या पाठोपाठ दुसरी तार त्यांच्याकडून आली की 'टोकिओला नेताजींचा देह पाठवू नका. तैफीतच अंत्यसंस्कार उरका.' हुकूम बदलण्याबाबत काहीही कारण देण्यात आले नव्हते. जपानकडे असलेल्या लहान विमानातून एवढी मोठी शवपेटिका वाहून नेणे शक्य नव्हते. या शिवाय फोर्मोसामध्ये उन्हाळा चालू होता व त्यांचा मृत्यू होऊन तीन दिवस झाले होते. आता काहीच मार्ग न उरल्याने तैफीमध्येच अंत्यसंस्कार उरकण्याचे त्यांनी ठरविले.

तैफी शहराच्या स्मशानभूमीतच प्रेतदहनाचा कार्यक्रम उरकण्यात आला. या कार्यक्रमास खालील मंडळी हजर होती.

( १ ) कर्नल हबीबूर रेहमान ( नेताजींचे ए. डी. सी. )

( २ ) मेजर नागामोटो, फोर्मोसा आर्मी हेडक्वार्टर्स कमांडंट

( ३ ) मिस्टर ज्यूछी नाकामुरा ( दुभाषा )

( ४ ) बुद्ध धर्मगुरू व स्मशानभूमीचे मॅनेजर.

दुसरे दिवशी ते स्मशानभूमीत रक्षा गोळा करण्याकरिता गेले. त्यांनी फर्नेसचे कुलूप काढून ते उघडले व रक्षा गोळा करून एका लहानशा आठ इंची घनाकार मापाच्या लाकडी पेटीत ठेवली. नंतर ती पेटी क. रेहमान यांनी गळ्याभोवती गुंडाळून आणलेल्या श्वेत कापडात गुंडाळून घेतली व ते मोटारीने निशी ( पश्चिम )

हंगाजी मंदिराकडे गेले. त्या दिवशी त्या मंदिरात एक खास कार्यक्रम चालू होता.

फोर्मोसा आर्मीचे चीफ ऑफ दी स्टाफ जनरल इश्यायामा म्हणाले, " नेताजींची रक्षा विसर्जित करण्याचे कार्य मी माझे स्टाफ ऑफिसर मेजर नागाटोमो यांच्याकडे सुपूर्त केले आहे." फोर्मोसा आर्मीचे कमांडर जनरल अँडो यांनी जपानच्या शरणागतीच्या वेळेपासून आपल्याला स्वतःच्या घरात कोंडून घेतले आहे आणि म्हणून मला असे वाटते, की ते नेताजींच्या प्रेतयात्रेला हजर राहू शकले नाहीत. सर्वजण गोंधळलेल्या अवस्थेत असतानाच हे सर्व घडून गेले. तथापि मला असे प्रामाणिकपणे वाटते, की फोर्मोसा आर्मीचे कमांडर ज. अँडो यांनी नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्यासारख्या एका राष्ट्रप्रमुखाला, ज्यांनी अखेरच्या क्षणापर्यंत जपानी लष्कराला सर्वतोपरी साहाय्य केले, त्यांना योग्य ती मानवंदना दिली पाहिजे होती.

५ सप्टेंबर १९४५ रोजी मी ( टाटसो ह्यासिद ) तैफीच्या दक्षिण विमानतळावर दुपारी दोन नंतर उतरलो माझ्याकडे नेताजींची रक्षा व रत्नभांडार यांचे संरक्षण करण्याचे काम सोपविण्यात आले होते. नेताजींची रक्षा निशी ( पश्चिम ) हंगाजी मंदिरात लष्कराच्या संरक्षणाखाली ठेवण्यात आली होती. मी ज्या विमानतळावर उतरलो त्या जवळच्याच विमानतळावर अपघात घडला होता. मी विमानतळावर उतरताच ले. क. सकाई यांची भेट झाली. त्यांच्या हाताचे व चेहऱ्याचे बँडेज अद्याप काढले नव्हते व त्यांना काहीही वजन उचलता येत नव्हते. त्यांच्या पाठीचा कणाही फार भाजला होता. क. रेहमान यांनाही खूपच मुका मार बसला होता आणि त्यांच्या अर्ध्या-अधिक शरीरावर बँडेज बांधले होते. त्यांचा एक हात गळयातून पट्टी घेऊन त्यात अडकवला होता आणि त्यांचे डोळे सुजले होते. अपघाताच्या वेळी क्षणभरातच असे काही विपरीत व भयंकर घडून गेले होते, की त्यामुळे त्यांना शारीरिक व मानसिक धक्का बसला होता.

हंगाजी मंदिरात लष्कराच्या संरक्षणाखाली दोन पेट्या ठेवण्यात आल्या होत्या. एकामध्ये नेताजींची रक्षा होती व दुसरी पेटी खूपच वजनदार असून ती एका माणसाला वाहून नेता येण्यासारखी नव्हती. त्यामध्ये सोने व जवाहीर भरलेले होते. पहिली पेटी सुमारे एक फूट घनाकार होती आणि दुसरी ३′ × २½′ × २′ अशी होती व दोन्हीही पेट्या खिळयांनी बंदिस्त केल्या होत्या. या पेट्या विमानातून जपानला न्यावयाच्या होत्या. फोर्मोसामधून जपानला जाणारे बहुतेक हे शेवटचेच लष्करी विमान असावे. त्या विमानावर पांढऱ्या रंगाने ' क्रॉस ' काढला होता. आता सर्व जपानी लष्करी मालमत्ता १५ ऑगस्टपासून संयुक्त राष्ट्र लष्कराच्या ताब्यात द्यावयाची होती. म्हणून ती कडक बंदोबस्तात होती. मी इथे आलो त्याच दिवशी म्हणजे ५ सप्टेंबर रोजी आम्ही हे विमान घेऊन उड्डाण केले. हे विमान अमेरिकन सैन्याने अटीतटीची लढाई करून आपल्या ताब्यात घेतलेल्या ओकिन्वावरून

जावयाचे होते व ते पार करून आम्ही फुकुवोका शहराजवळील जन्नाअस विमानतळावर आलो. विमानतळावरून आम्ही वेस्टर्न आर्मी हेडक्वार्टर्स यांना तार करून आमच्या पुढील प्रवासाची व्यवस्था काय, याबद्दल विचारले. नंतर आम्ही नेताजींची रक्षा व रत्नभांडार घेऊन संरक्षण नसताही वेस्टर्न आर्मी हेडक्वार्टर्समध्ये गेलो व तेथील ‘ कैकोशा ’ म्हणून समजल्या जाणाऱ्या ऑफिसर्स क्लबमध्ये रात्रभर राहिलो. हे ठिकाण फुकुवोका शहराच्या ईस्ट पार्कमध्ये आहे. यावेळी आम्ही जपानमध्ये झालेल्या घडामोडी प्रथमच ऐकल्या. त्यावेळी जपान पूर्णपणे उद्ध्वस्त होण्याच्या बेतात होते. पुढे काय वाढून ठेवले आहे या भवितव्याच्या भग्न चिंतेत नागरिक भयंकर भयभीत झाले होते. ताबा घेणारे अमेरिकन लष्कर त्यांना कसे वागवील व आपल्या जीविताचे काय होणार या चिंतेत ते होते. जपानचे लष्कर व सरकार जवळजवळ मोडून पडले होते. ताबा घेणाऱ्या अमेरिकन लष्कराने वेस्टर्न आर्मी हेडक्वार्टर्सना युद्ध गुन्हेगारीचा आरोप ठेवून दोषी ठरविले होते. त्यांच्यावर असा आरोप होता, की त्यांनी अमेरिकेच्या युद्धकैद्यांना वैद्यकीय प्रयोगासाठी डुकरांचा उपयोग करतात त्याप्रमाणे या कैद्यांचा उपयोग केला होता. यामुळे जपानी लष्करावर अमेरिकन लष्कर क्रुद्ध होते.

गेल्या २६०० वर्षांत जपानने केव्हाही पराभव स्वीकारला नव्हता. तेव्हा त्यांना हा पराजय स्वीकारताना अत्यंत कठीण जात होते. त्यांच्या भवितव्याचा मार्ग काट्या-कुट्यांनी व भयंकर संकटांनी भरलेला होता व त्याच मार्गाने त्यांना जाणे भाग होते. हिरोशिमा व नागासाकीवर पडलेल्या अणुबॉम्बची भयानक धडकी अद्यापही त्यांचा थरकाप उडवीत होती.

६ सप्टेंबर रोजी आम्ही दुपारी ३ वाजता आगगाडीने टोकिओला जाण्यासाठी फुकुवोका स्टेशनवरून निघालो. संरक्षित असण्याच्या दृष्टीने आम्ही आम्हाला दोन गटांत विभागून घेतले. कर्नल रेहमान व मेजर नाकामिया यांनी विमानाने जाण्याचे ठरले. ले. क. सकाई आणि मी आगगाडीने निघालो. वेस्टर्न आर्मी हेडक्वार्टर्समधून संरक्षणासाठी तीन सैनिक घेतले. त्यांचे प्रमुख कार्पोरल वॅटन्बी हे होते. आम्हाला अशी भीती वाटत होती, की मि. बोस हे जपानी लष्कराला सहकार्य करीत होते, हे त्यांना माहीत असल्यामुळे ताबा घेणाऱ्या लष्कराकडून आमचा छळ होण्याची शक्यता होती. म्हणून आम्ही सर्वांनी नागरी पोषाख केले. आम्ही अशी बतावणी करण्याचे ठरवून ठेवले होते, की मी या युद्धात माझा भाऊ अगर जवळचा नातेवाईक मारला गेला असून त्याची रक्षा घरी घेऊन चाललो आहे. आमच्याकडे असलेल्या खजिन्याची पेटी आम्ही आगगाडीत बसण्याच्या बाकाखाली सहजपणे सरकावून दिली. ले. क. सकाई हे पहिल्या वर्गातून व आम्ही चौघे दुसऱ्या वर्गातून प्रवास करीत होतो.

आगगाडीच्या खिडकीतून मी बाहेरील सृष्टिसौंदर्य पाहत होतो. त्यात नेहमीपेक्षा

काहीही बदल झालेला नव्हता; पण डब्यातील समोरचे प्रवासी एकमेकांशी धक्काबुक्की करीत होते. प्रत्येक स्टेशनवर आगगाडी थांबताच जागा मिळवण्यासाठी अगदी मेटाकुटीने ते चढत होते. मला हे सर्व किळसवाणे वाटले. एके काळी सर्व पौर्वात्य देशाचे पुढारीपण करणारे किंवा जागतिक पुढारीपण इच्छिणारे हेच ते जपानी लोक यावर माझा विश्वासच बसेना. दुःखद युद्धाच्या या दीर्घ काळात केवळ आपल्या देशासाठी त्यांनी आपले जीवित उपासमार करून कष्टाने काढले होते.

रक्षा व खजिना यांची या गोंधळात मोडतोड होईल किंवा ते पळवून नेले जाईल या भीतीने मी ती रक्षेची पेटी गळ्यात दोरीने बांधून घेतली व खजिना माझ्या बैटकीच्या खाली ठेवला. मी कार्पोरल वॉटेन्बे यांना व सैनिकांना सदा सर्वकाळ लक्ष ठेऊन दक्ष राहण्याबद्दल सांगितले. रात्री झोपेची एकही डुलकी न घेता दुसऱ्या दिवशी सायंकाळी सहाच्या सुमारास आम्ही टोकिओत आलो. ईस्टर्न आर्मी हेडक्वार्टर्स यांनी पाठविलेल्या ट्रकमधून आम्ही त्यांच्या कॅंपवर गेलो. ले. क. सकाई यांच्या समवेत आम्ही काही वरिष्ठ अधिकाऱ्यांना भेटलो. सर्व जपानचे एक प्रातिनिधिक चित्र म्हणजे टोकिओ. या वेळी अभूतपूर्व शरणागती देताना सर्वत्र संभ्रम आणि अनिश्चितपणा दिसून येत होता. हे शहर पुन्हा पुन्हा झालेल्या बॉंबहल्ल्याने संपूर्ण उद्ध्वस्त झाले होते. असे शोकांतिक दिवस जपानच्या इतिहासात केव्हाच आले नव्हते.

७ सप्टेंबर रोजी रात्री अकरा वाजता मी व जनरल सकाई यांनी रक्षा व खजिना इंपीरिअल जनरल हेडक्वार्टर्स यांच्या ताब्यात दिला. कार्यालयीन वेळेच्या व्यतिरिक्त ही वेळ असल्याने मेजर किनोस्टा या दिवसाच्या ड्यूटी ऑफिसरना बोलावून घेऊन त्यांच्याकडे आम्ही त्या सुपूर्त केल्या. त्यांनी आम्हास वचनपूर्वक सांगितले, की ‘ सकाळी कामावर आल्यावर मी प्रथम ही रक्षापेटी व हा खजिना ऑफिसर इन-चार्ज यांच्याकडे सुपूर्त करीन.’ त्यांना मी, लहान पेटीत नेताजींची रक्षा असून मोठ्या पेटीत खजिना आहे, असे सांगितले.

माझ्यावर सोपविलेल्या महत्त्वाच्या कामाचे तीन दिवस संपले. माझे सैन्यातले काही सहकारी मित्र अद्यापही फोर्मोसामध्ये होते व माझे वैयक्तिक साहित्यही मी फोर्मोसामध्येच सोडून आलो होतो; परंतु आता फोर्मोसामध्ये परत जाण्यासाठी काही मार्ग नव्हता म्हणून मी खुद्द जपानमध्येच राहिलो.

## इंपीरिअल जनरल हेडक्वार्टर्स यांनी केलेली कारवाई.

नेताजींची रक्षापेटी व खजिन्याची पेटी बऱ्याच उशिरा मिळाल्याने मेजर किनोस्टा यांनी त्या आपल्याच खोलीत वैयक्तिक संरक्षणाखाली ले. क. ताकाकुरा यांचेकडे सोपविल्या. दुसऱ्या सकाळी ले. क. सकाई हे इंपीरिअल जनरल हेडक्वार्टर्स यांच्याकडे गेले, आणि त्यांनी ले. क. ताकाकुरा, चीफ ऑफ दी मिलिटरी अफेअर्स सेक्शन,

यांच्याकडे रक्षापेटी व खजिन्याची पेटी मिळाली अगर कसे, याबद्दल विचारले. कामावर असलेल्या अधिकाऱ्यांनी या दोन पेट्यांबद्दल काही पावती घेतली नव्हती किंवा दिली पण नव्हती; किंवा त्याबद्दल कुठेही नोंद करून ठेवलेली नव्हती. ले. क. ताकाकुरा यांनी रक्षापेटी ताब्यात घेतल्यावर हेडक्वार्टर्समध्ये असलेल्या इतर ऑफिसर्सना बोलावून नेताजींच्या रक्षेला मानवंदना दिली. सर्वांनी विचार करून या परिस्थितीत विशेष गाजावाजा न करता किंवा ताबा घेणाऱ्या अमेरिकन अधिकाऱ्यांना याबाबत काहीही न सांगता ती आझाद हिंद सरकारच्या प्रमुख व्यक्तींकडे सुपूर्त करणे आवश्यक होते, म्हणून त्यांनी फोनवरून टोकिओत राहत असलेल्या आय. आय. एल. चे अध्यक्ष मिस्टर मूर्ती यांना रक्षापेटीचा ताबा घेण्यास कळवले. मि. मूर्ती यांनी आपल्या बरोबर मि. अय्यर यांना घेऊन अर्ध्या तासातच त्या ठिकाणी हजर झाले.

८ सप्टेंबर रोजी इंपीरिअल जनरल हेडक्वार्टर्सच्या मुख्य केंद्रावर सकाळी मि. मूर्ती व मि. अय्यर यांच्याकडे ले. क. ताकाकुरा यांनी अत्यंत साध्या व शांत समारंभाने रक्षापेटी स्वाधीन केली. मि. मूर्ती त्याबद्दल म्हणतात की, "या समारंभाच्या वेळी ले. क. ताकाकुरा आणि इतर दोन-तीन अधिकारी हजर होते. ले. क. ताकाकुरा यांनी आम्हाला सांगितले, की जनरल उमेझु, आर्मी चीफ ऑफ दी स्टाफ यांनी त्यांना असे सांगितले आहे, की रक्षापेटी आमच्या स्वाधीन करून आपले सांत्वन सांगावे. रक्षापेटी पांढऱ्याशुभ्र कपड्यात गुंडाळली होती. सेफ्टी लॉकरमधून काढून त्यांनी ती आम्हाला दिली. पेटी अंदाजे एक फूट व्यासाची लाकडी होती. तिला कापड गुंडाळलेले होते व कापडाचीच एक लांब पट्टी गळयात बांधण्यासाठी तिचा उपयोग व्हावा म्हणून तिला जोडली होती. त्या ठिकाणी हजर असलेल्या अनेक लोकांनी रक्षापेटीला मान झुकवून मानवंदना दिली. रक्षापेटी मि. अय्यर यांनी आपल्याकडे घेतली त्यावेळी दुःखाने ते गदगदून घेले. आमच्याकरिता एक जीप मोटार देण्यात आली. मी व मि. अय्यर रक्षापेटी घेऊन थेट माझ्या निवासस्थानी आलो."

त्या वेळी मि. मूर्ती यांचे घर आय. आय. एल. चे हेडक्वार्टर म्हणूनच वापरण्यात येत होते.

## मि. मूर्ती यांच्याकडे रक्षा आल्यानंतरची कारवाई

आय. आय. एल. चे अध्यक्ष मि. मूर्ती यांच्या घरी नेताजींची रक्षापेटी आणण्यात आली. त्यांचे घर हे आझाद हिंद सेनेचे टोकिओतील हेडक्वार्टर समजण्यात येत असे. इथे रक्षापात्र एका चबुतऱ्यावर ठेवून त्याला त्यांनी फुले वाहिली व सुगंधी धूप घातला. या रक्षापात्रावर आतापर्यंत कसलीही खूण नव्हती म्हणून मि. अय्यर यांनी त्या रक्षापात्रावर इंग्रजी अक्षरात —

" NETAJI SUBHAS CHANDRA BOSE "
असे लिहिले. टोकिओत जे भारतीय विद्यार्थी सैनिक होते ते नेताजींच्या रक्षेला मानवंदना देण्यासाठी आले. ( त्यांना टोकिओ–बॉईज म्हणत. ) त्यांनी त्यावर पहारा सुरू केला.

त्याच रात्री क. हबीबुर रेहमान प्रथमच मि. मूर्ती यांच्या घरी आले व तेथून ते मिसेस सह्या यांच्या घरी मि. आय्यर यांना भेटण्यासाठी गेले.

क. रेहमान यांचेकडून मि. अय्यर यांनी सर्व हकीगत ऐकून घेतली व आपल्या शंकांचे निरसनही करून घेतले. त्यानंतर त्या रक्षेचे पावित्र्य लक्षात घेऊन त्यांनी पुढील हालचाली करण्याचे ठरविले.

मि. मूर्ती आपल्या एका निवेदनात म्हणतात, " मि. अय्यर यांनी क. रेहमान यांना अनेक प्रश्न व शंका विचारल्या. त्या सर्व प्रश्नांची उत्तरे व शंकांचे निरसन त्यांनी स्पष्ट व सत्यघटनेस धरून अत्यंत गंभीरपणे व शांतपणे केले. त्यामुळे मि. अय्यर यांना रक्षेबद्दल निश्चित खात्री पटली व एक थोर नेता, पूर्व आशियाचा एक लढाऊ खंबीर आधार आणि भारताचा सर्वश्रेष्ठ नेता मृत्यू पावल्याबद्दल त्यांना अतोनात दुःख झाले. प्रथम मि. अय्यर हे नेताजींच्या मृत्यूबद्दल शंका घेत आहेत हे पाहून त्यांना आश्चर्य वाटले. जे घडले होते त्याचे सत्य निवेदन त्यांनी केलेच; पण त्याबद्दलचा दृश्य पुरावा म्हणून त्यांनी स्वतःचे भाजलेले हात व मुजलेला चेहरा दाखवला. त्यांच्या प्रामाणिकपणावर संशय घेतल्यामुळे त्यांचे डोळे मात्र भडकले होते व त्यांत पाणी जमा झाले होते. क. रेहमान यांनी त्यांना जे जे भेटतील त्यांची खात्री पटवली होती आणि अखेरीस आमच्या मनात कोणताही संदेह न राहता आम्ही हे सत्य मनःपूर्वक स्वीकारले. "

ताबा घेणाऱ्या अमेरिकन लष्कराकडून ते पकडले जाण्याची भीती असली, तरी दुसरे दिवशी जमलेल्या अनेक मंडळींना त्यांनी पुन्हा घडलेला सर्व प्रसंग सांगितला व एक रेहमान यांनी नेताजींचा मृत्यू कसा घडला, यासंबंधीची थोडक्यात लेखी निवेदनाची प्रत मि. मूर्ती यांना सादर केली.

जपानचा ताबा घेण्याचे अमेरिकेचे काम जोरात चालू होते. मि. मूर्ती यांना व त्यांच्या सहकाऱ्यांना आणि मित्रांना असे वाटले, की रक्षाविसर्जनाचा समारंभ जर जाहीरपणे केला, तर ताबा घेणाऱ्या अमेरिकन फौजेचे लक्ष आपल्याकडे जाईल व त्यांचा ग्रह असा होईल, की त्यांच्या विरुद्धच हे निदर्शने करीत आहेत. म्हणून असा समारंभ न करता अत्यंत साध्या, नेहमीच्या पद्धतीने हा कार्यक्रम पार पाडावा असे ठरले. हा कार्यक्रम टोकिओतील सुगीनामी वॉर्डमध्ये असलेल्या रंकोजीमंदिरात करण्याचे ठरविले. आझाद हिंद फौजेचे काही अधिकारी व टोकिओत असलेले कॅडेट, मि. मूर्ती आणि त्यांचे बंधू, मिसेस सह्या व त्यांचे कुटुंबिय, आणि आझाद हिंद फौजेचे नभो-

वाणी युनिट (सध्या त्यांचे कार्य स्थगितच होते.) इतकी मंडळी हजर होती. क. रेह-मान हे हजर राहू शकले नाहीत कारण त्यांना अमेरिकन लष्करी पोलिसांनी 'जाब-जबाब देण्यासाठी हजर राहण्यास फर्माविले होते. इंपीरिअल जनरल हेडक्वार्टर्स यांचे तर्फे ले. क. ताकाकुरा हे या रक्षाविसर्जनाच्या समारंभास हजर राहिले होते. एकूण अंदाजे शंभराच्या वर लोक हजर होते. हा समारंभ संपल्यावर सर्वसाधारणपणे रिवाज असा आहे, की ही रक्षा लोक घरी घेऊन जातात; परंतु या प्रकरणात रे. मोचिझुकी यांनी मि. मूर्ती व मिसेस सह्या आणि जपानी स्टाफऑफिसर्सना सुचविले, की ही रक्षा नेताजी सुभाषचंद्र बोस या जागतिक महान व्यक्तीची असल्याने ती मोठ्या सन्मानाने जतन करून ठेवली जावी. सर्वांनी ते मान्य केले त्यावेळी असे सुचविण्यात आले, की भारत स्वतंत्र झाल्यावर ती स्वतंत्र भारताच्या सरकारकडे सुपूर्त करण्यात यावी.

प्रत्येक वर्षी १८ ऑगस्टच्या दिवशी रे. मोचिझुकी त्यांचे स्मरण करून प्रार्थना म्हणतात. १९४५ ते १९५० या कालावधीत या रक्षेचे दर्शन घेण्यास मि. मूर्तीशिवाय कोणीही आले नाहीत. १८ ऑगस्ट १९५५ रोजी पुण्यतिथीचा एक मोठा सोहळा साजरा करण्यात आला आणि आज जवळजवळ तीस वर्षे ती रक्षा स्वतंत्र भारतात येण्यासाठी तिथेच अनाथपणे तिष्ठत आहे. वास्तविक पाहता भारतास स्वातंत्र्य मिळताच म्हणजे १९४७-४८ सालीच ती रक्षा मोठ्या सन्मानाने मायदेशास परत यावयास पाहिजे होती.

पण—??

# चौदा / खजिना प्रकरण

जपानला राजकीय, आर्थिक आणि धार्मिक स्वातंत्र्य न घेता अपमानित शरणागती स्वीकारावी लागली. त्यातून अत्यंत दुःखची गोष्ट ही, की वृत्तपत्रांचे स्वातंत्र्यही हिरावून घेण्यात आले व त्यावर कडक नियंत्रण बसविले गेले. जपानमध्ये जर काही विपरीत गोष्टी घडल्या, तर मात्र त्यास प्रसिद्धी देण्यात येत असे. यामुळे सर्वसामान्य जनतेचा ग्रह असा होत होता, की जपानमध्ये अशा गोष्टी नेहमीच घडत असाव्यात. जपानचा लष्करी पराभव तर झालाच होता; पण आता नैतिक पराभवही होण्याच्या मार्गात होता. दुसरे म्हणजे, ताबा घेणाऱ्या प्रमुखांनी सर्व धर्मस्थाने व धार्मिक संस्था बंद करून टाकल्या. जपानचा जोष काढून टाकण्यासाठी आणि जपानमध्ये पारंपरिक काही चांगल्या चालीरीती होत्या त्या नष्ट करून टाकण्यासाठी, त्यांचा प्रयत्न आता चालू होता.

आणि या परिस्थितीत जपानने नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्याबरोबर असलेल्या खजिन्याबद्दल चौकशी केली.

भौतिक आणि नैसर्गिक विज्ञानाची प्रगती केव्हाही स्वागतार्ह आहे; परंतु मानवी जीवनाची ती परिपूर्ती होऊ शकत नाही. यामुळे आपण आध्यात्मिक संस्कृतीचा विकास साधतोच असे नाही. या दृष्टीने पाहता ज्या ठिकाणी विज्ञानाच्या प्रगतीने अत्युच्च शिखर गाठले आहे त्या ठिकाणी आध्यात्मिक संस्कृतीचा फार कसून शोध करावा लागेल. माझा असा विश्वास आहे, की ज्या ठिकाणी भौतिक आणि आध्यात्मिक संस्कृतीचा समतोल विकसित झाला आहे, त्याच ठिकाणी मानवजातीची शांतता टिकू शकेल.

पूर्वीच सांगितल्याप्रमाणे नेताजी सुभाषचंद्र बोस यांचा मृत्यू संशोधनातीत निर्विवाद सत्य आहे आणि म्हणून मी या ठिकाणी माझ्या सदसद्विवेकबुद्धीला स्मरून नेताजींनी स्वातंत्र्याच्या लढ्यासाठी जो खजिना जमा केला होता त्याबद्दल ऊहापोह

करणार आहे. मी हे करू इच्छितो कारण काही संस्कृतीने अधःपतित झालेल्या आणि नीतिधैर्य गमावलेल्या दुर्गुणी जपानी लोकांनी नेताजींच्या खजिन्याबद्दल फारच उत्सुकता दर्शविली आहे.

## स्वातंत्र्याच्या लढ्यासाठी फंड

नेताजी सुभाषचंद्र बोस यांचे धोरण असे होते, की जपानच्या सहकार्यावर शक्य तितक्या कमी प्रमाणात विसंबून राहावयाचे. आझाद हिंद फौजेचा खर्च भागविण्यासाठी दक्षिणपूर्व आशियामध्ये राहणाऱ्या भारतीय रहिवाश्यांकडून रक्कम जमा करावयाची. नियमित रक्कम वसूल होण्यासाठी नेताजींनी आणि सैन्यातील अधिकाऱ्यांनी आपल्याकडे ओघ निर्माण करून मोठी रक्कम जमा केली. महसूल खाते सुरू करून महसूलमंत्र्यांच्या आधिपत्याखाली एक 'नेताजी फंड कमिटी' स्थापन करण्यात आली. दक्षिणपूर्व आशियामध्ये राहणारे भारतीय हे सोने आणि मौल्यवान वस्तू नेताजींना सदिच्छा भेट म्हणून देत असत. जानेवारी १९४५ च्या नेताजींच्या वाढदिवसाच्या समारंभात नेताजींचे सोन्यामध्ये वजन केले होते. त्यांना रोख पैसे किंवा मौल्यवान वस्तू तर भेट म्हणून मिळतच; पण स्थावर-जंगमही त्यांना भेट म्हणून दिली जाई. रंगूनचे हबीबसाहेब यांनी आपली सर्व इस्टेट, जमीन, रोख रक्कम आणि त्यांचे रत्नभांडार हे सर्व त्यांना देणगी म्हणून दिली. या सर्वांची किंमत एक कोटी तीन लक्ष रुपये झाली आणि त्याच्या बदल्यात हबीबसाहेबांनी खाकी शर्ट व हाफ पँट मागितली. यामुळे त्यांना भारतीय स्वातंत्र्यलढ्यात भाग घेता आला.

जमा झालेला सर्व फंड व अन्य रक्कम आझाद हिंद सरकारच्या ताब्यात दिला जात होता व आझाद हिंद बँकेमार्फत त्याचा व्यवहार चालत असे. रंगूनहून माघार घेताना नेताजींनी बँकेत जमा झालेली किती रक्कम बरोबर घेतली हे समजणे शक्य नव्हते.

## खजिन्याचा ताबा

सोने आणि इतर मौल्यवान वस्तूंनी भरलेल्या दोन सूट-केसीसचे पुढे काय झाले ते आपण पाहू या. पूर्वीच सांगितल्याप्रमाणे १८ ऑगस्टला तैफो येथे विमान कोसळले. दुसऱ्या दिवशी क. रेहमान यांनी 'ज्या सूटकेसमध्ये रत्ने वगैरे होती त्याचे काय झाले' म्हणून चौकशी केली असता त्यांना सांगण्यात आले, 'की विमान पूर्णपणे जळून गेले त्याबरोबर लगेजही जळून गेले; पण आगीतून वाचलेला माल म्हणून कोणीतरी कर्मचाऱ्यांनी ते रत्नभांडार मिलिटरी हेडक्वार्टर्सच्या ताब्यात दिले. त्यांनी ते होते तसेच सुरक्षित ठेवून दिले.'

## रत्नभांडाराचे संकलन

जपानी अधिकाऱ्यांच्या देखरेखीखाली या खजिन्याचे संकलन आले. त्यामध्ये मे. सकाई, विमानतळ संरक्षण अधिकारी आणि कॅ. नाकामुरा ( ऊर्फ यामामोटो ), विमानतळाचे ऑफिस इनचार्ज हे होते. मे. सकाई यांच्या म्हणण्याप्रमाणे अपघात झाल्यानंतर दोन तासांतच ते त्या ठिकाणी आले. कॅ. नाकामुरा आणि त्यांचे कर्मचारी जमिनीवर पडलेल्या वस्तू गोळा करीत असताना त्यांनी पाहिले. हे कर्मचारी पुरेसे नसल्याने त्यांनी आणखी तीस कर्मचारी या कामासाठी दिले. कॅ. नाकामुरा यांनी ले. क. नोनोगाकी यांच्याकडे मदतीची मागणी केली होतीच. दुसऱ्या दिवशी जे काही राहिले होते ते गोळा करण्यासाठी लष्कराने तैफी येथील गर्लस् हायस्कूलमधून १०० विद्यार्थिनींना आणले. त्यांना एका ओळीत उभे करण्यात आले व त्यांना शारीरिक व्यायाम करताना जे कपडे असतात ते घालण्यास त्यांनी सांगितले. विद्यार्थिनींना त्यांच्या ब्लॉमर्सना लावलेले रबर बेल्टस काढून ठेवण्यास सांगण्यात आले. काही मौल्यवान वस्तू त्यांनी त्या रबर बेल्टमध्ये लपवून ठेवू नयेत म्हणून ही सावधगिरी घेण्यात आली. विमान अपघात ज्या जागेवर झाला होता तेथील परिसराची १० सें. मि. जमीन खणून काढण्यास सांगण्यात आले. बिचाऱ्या निष्पाप मुलींना असे करण्यास का सांगण्यात आले याबद्दल आश्चर्य वाटले असेल ! उकरलेली रेती जमा करून ती पाण्यात धुण्यात आली. त्यानंतर सर्व मौल्यवान वस्तू एकत्रित करून त्या एका मजबूत पेटीत ठेवण्यात आल्या व ती पेटी खिळयांनी बंद करून टाकल्यावर फोर्मोसा आर्मीचे ले. क. शिंबुया यांच्या स्वाधीन करण्यात आली.

## जमा झालेल्या मौल्यवान वस्तूंचे संरक्षण

५ सप्टेंबर रोजी नेताजींची रक्षा व मौल्यवान वस्तूंची पेटी तैफीच्या मिनामी ( दक्षिण ) विमानतळावर संरक्षणाखाली टोकिओतील इंपीरिअल जनरल हेडक्वार्टर्स यांच्याकडे सुपूर्त करण्यासाठी आणून ठेवली. या पेटीबरोबर व रक्षेबरोबर संरक्षक व जबाबदार म्हणून क. रेहमान, ले. क सकाई, मे. नाकामिया आणि मी ( टाट्सो ह्यासिद ) व आमच्याबरोबर असलेले तीन लष्करी शिपाई यांच्यासह आम्ही तैफीवरून निघून फुकुवोका शहराजवळील जन्नाअस विमानतळावर आलो. पूर्वीच सांगितल्या-प्रमाणे ह्या मौल्यवान वस्तू म्हणजे सोने व रत्ने यांनी भरलेली पेटी टोकिओतील इंपीरिअल जनरल हेडक्वार्टर्स यांच्याकडे सुरक्षितपणे स्वाधीन केली.

## इं. ज. हे. यांच्याकडे सुपूर्त केलेल्या खजिन्याचा ताबा

७ सप्टेंबर रोजी सायंकाळी टोकिओचा इं. ज. हे. यांच्या स्वाधीन या मौल्यवान पेट्या केल्या. त्यावेळी ड्यूटी ऑफिसर मेजर किनोस्टा यांनी प्रथम त्या आपल्या

ताब्यात घेतल्या आणि दुसऱ्या दिवशी त्या पेट्या ले. क. ताकाकुरा यांच्याकडे दिल्या. दोघांनीही 'त्या लाकडी पेट्या असून खिळयांनी बंद केल्या होत्या' असे सांगितले व 'त्यास कोणत्याही प्रकारे सील नव्हते' असेही ते म्हणाले. ८ सप्टेंबरच्या सकाळी ले. क. ताकाकुरा यांनी मि. मूर्ती यांना फोन करून बोलावून घेऊन त्यांच्याकडे त्या सुपूर्त केल्या. त्यावेळी मि. मूर्ती यांच्याबरोबर मि. अय्यर होते.

खजिन्याची पेटी स्वच्छ करून त्याचे मूल्यमापन करण्यासाठी मि. मूर्ती यांनी ती उघडली. त्यामध्ये असलेल्या वस्तूंत सोन्याचे व हिऱ्याचे अलंकार होते आणि ते धातूच्या तारेने गुंतविले होते. त्यांची बरीच फूटतूट झाली होती. त्यात सोने किती आहे व इतर धातू किती आहेत, हे पाहून त्यांची साधारणपणे तीन गटांत निवड करून विभागणी केली. त्यानंतर पुन्हा ते सर्व त्या पेटीत भरून ती खिळे ठोकून बंद करण्यात आली. या सर्वांचे वजन अकरा किलो होते. या सर्वांची नोंद करून एक यादी तयार केली. त्यावर क. रेहमान यांनी सही केली. नेताजींची चळवळ पुढे चालू ठेवण्यासाठी ती पेटी भारतात नेण्यासाठी मि. मूर्ती यांच्याकडे ठेवण्यात आली.

मि. मूर्ती यांनी हे मौल्यवान भांडार १९४५ ते १९५१ पर्यंत आपल्याकडेच ठेवले. मि. मूर्तींनी ही रक्कम बँकेत वगैरे ठेवली नाही. याबद्दल विचारता ते म्हणाले, की ताबा घेणाऱ्या अमेरिकन अधिकाऱ्यांना जपानी बँकेत असलेली रक्कम व मौल्यवान वस्तू समजू शकतील व ते त्या सर्व जप्त करून टाकतील; या भीतीने त्यांनी आपल्याकडेच सर्व काही ठेवून दिले. या सर्व वर्षांत कोणत्याही भारतीय अधिकाऱ्याला त्यांनी याबद्दलची माहिती कळविली नाही. त्यांच्या सांगण्यावर विश्वास बसण्यास खरी हकीगत अशी, की त्यांनी टोकिओत असलेल्या इंडियन मिशनला ही गोष्ट कळविली नाही. ते म्हणतात, 'मी मि. अय्यर यांच्याबरोबर पत्रव्यवहार करीत होतो. त्यांनी मला नंतर असा सल्ला दिला, 'की जोपर्यंत नेताजींच्या रक्षेचा प्रश्न समाधानकारक सुटत नाही तोपर्यंत तुम्ही काहीही करू नका.' मि. अय्यर हे पुन्हा जपानमध्ये १९५१ साली आले होते. त्यावेळी मि. मूर्ती यांनी खजिना आपल्याकडे असल्याबद्दल सांगितले व हा खजिना टोकिओतील इंडियन मिशनकडे सुपूर्त करण्याची त्यांनी इच्छा दर्शविली. मि. अय्यर परत भारतात आल्यानंतर ते पंतप्रधान नेहरूंना भेटले आणि 'भारत सरकारने टोकिओत असलेला हा खजिना इंडियन मिशनकडून आणवावा' असे सुचविले. पंतप्रधान पं. जवाहरलाल नेहरू यांनी त्यास सम्मती दिली व त्यांच्या सूचनेप्रमाणे २४ सप्टेंबर १९५१ रोजी इंडियन मिशनने तो ताब्यात घेतला. ह्या मिशनचे पहिले सेक्रेटरी श्री. व्ही. सी. त्रिवेदी हे होते. त्यांनी, क. रेहमान यांनी १९४५ साली जी यादी केली होती त्याप्रमाणे खजिना पोहोचल्याबद्दल पावती म्हणून त्यावर सही घेतली. त्याच दिवशी मि. अय्यर यांनी दिलेले ३०० ग्रॅम सोने व २०,००० येन त्यांच्याकडे सुपूर्त केले. इंडियन मिशनकडून पुन्हा तो खजिना तपासून वजन करून

घेतले. ते वजन क. रेहमान यांनी यादीत नमूद केल्यापेक्षाही थोडे अधिकच भरले.

थोड्या दिवसांतच तो खजिना भारतात आणला गेला व तो राष्ट्रपतिभवनात असलेल्या "नॅशनल म्युझियम "मध्ये ठेवण्यात आला. त्याची त्यावेळी केलेली किंमत एक लक्ष रुपये इतकी झाली. ह्या मौल्यवान वस्तू नेताजींच्या आहेत असे दर्शविले जाई. म्युझियम-मध्ये ठेवण्यात आलेल्या या वस्तू रत्ने व लहान दागिने या स्वरूपात आहेत. हे सर्व दक्षिण आशियात असलेल्या भारतीयांच्याकडून नेताजींना देणगीदाखल देण्यात आले आहेत. आणि हे सर्व ते आपल्या प्रवासात घेऊन निघाले होते. १९५१ साली मूर्तींनी इंडियन मिशनकडे जे सुपूर्त केले ते सर्व क. रेहमान यांनी १९४५ मध्ये केलेल्या यादीप्रमाणेच होते हे खरे; पण नेताजींनी आपल्याबरोबर किती खजिना घेतला होता हे समजणे कठीण आहे व त्यापैकी किती नाहीसा झाला व किती मिळाला हे समजू शकत नाही. याबाबतीत अनेक शंका व्यक्त करण्यात आल्या; पण त्या सर्वांचे समाधान करणे अशक्य आहे. आपण असे म्हणूया की, सर्वांनी आपले कर्तव्य उत्तम तऱ्हेने बजावले. जपानच्या शरणागतीच्या गोंधळात देश गुंतला असता त्याच वेळी ही गोष्ट घडून गेली. सर्व जपानी लष्कर, समाजपुढारी आणि जनता गोंधळलेल्या स्थितीत होते. दुष्ट प्रवृत्तींना ऊत आला होता. आता त्या सर्व मौल्यवान वस्तू भारतात परत आल्या आहेत आणि चांगल्या कारणासाठी त्यांचा विनियोग झाला आहे. त्यामुळे इंडोजपानचे स्नेहसंबंध चांगले राहिले आहेत. यामुळे नेताजींच्या आत्म्याला शांती मिळेल. जपानी लोकांनी आपल्या कर्तव्याची जाणीव ठेवली एवढेतरी जगातील लोक नक्कीच म्हणतील.

# पंधरा / आझाद हिंद फौजेची कथा

जपानच्या शरणागतीनंतर नेताजी सुभाषचंद्र बोस यांनी केलेल्या मार्गदर्शनावरून आणि त्यांच्या संदेशाप्रमाणे आझाद हिंद फौजेचे स्वतःचे कार्य व्यवस्थितपणे चालू होते. जनरल भोसले यांचे मुख्य ठाणे बँकॉकला ठेवण्यात आले होते.

एके दिवशी एक ब्रिटिश अधिकारी आला आणि त्याने आझाद हिंद फौजेची टाइपरायटर्स आपल्या कँपकडे घेऊन जाण्यासाठी हुकूम दिला. त्याची तत्काळ अंमलबजावणी तो करू लागला. आझाद हिंद सेनाधिकाऱ्यांनी तसे करण्याचे नाकारले. ते त्यांना म्हणाले, " जपानी फौजांनी शरणागती पत्करली आहे. आम्ही ती अद्याप तरी पत्करली नाही. " आझाद हिंद फौजेची मालमत्ता पाहिजे असल्यास त्यांनी योग्य त्या मार्गाने मागणी करावी असे त्यांना सांगण्यात आले. मग ब्रिटिश अधिकारी टाइपरायटर्स न घेताच बाहेर पडले.

क्रमशः तीन दिवस अनेक वेळा मध्यस्थी केल्यानंतर ज. भोसले यांनी शेवटी शरणागती पत्करण्याचे मान्य केले. या सर्व काळात आझाद हिंद फौजेने आपली प्रतिष्ठा सोडली नाही. आय्. एन्. ए.च्या सर्व अधिकाऱ्यांना युद्धबंदी म्हणून बंदीवासात ठेवण्यात आले त्यावेळी त्यांनी आपणास युद्धकैद्याप्रमाणे चांगली वागणूक दिली पाहिजे अशी मागणी केली. आय्. एन्. ए. च्या संपूर्ण चौकशीच्या वेळी सर्व अधिकाऱ्यांनी " आपण पहिल्यापासून आय्. एन्. ए. म्हणून स्वतंत्र असून जपानच्या लष्कराबरोबर सहकार्य केले असले, तरी त्यावर जपानचे कोणतेच नियंत्रण नव्हते; आम्ही स्वतः सर्व कृती करीत होतो व निर्णय घेत होतो. भारतीय जनतेची परकीय सत्तेपासून मुक्तता व्हावी व त्यांना संपूर्ण स्वातंत्र्य मिळावे म्हणून आम्ही कार्य करीत होतो आणि यासाठी आम्हास मृत्युमुखी जावे लागले असते तरी ते आम्ही आनंदाने स्वीकारले असते. " असे सांगितले.

आझाद हिंद सरकारला सर्व गोष्टी स्वयंपूर्णपणे व तत्काळ हाताळता याव्यात म्हणून

नेताजींनी आपले परराष्ट्रीय कार्यालय रंगून येथे ठेवले होते. मिस्टर सवाटा हे त्यावेळी परराष्ट्र खात्याचे व्हाईस मिनिस्टर होते. त्यांनी आपली जबानी देताना सांगितले, की ' आझाद हिंद सरकारचे जपानबरोबर स्वतंत्र राष्ट्राप्रमाणेच, पण स्नेहाचे संबंध होते. तथापि जपान्यांपासून ते संपूर्णतः स्वतंत्र होते हे निश्चित. ' ब्रिटिश सरकारला, काही खोट्या जबान्या घेऊन आझाद हिंद सरकार हे जपानचे बाहुले बनले होते, असे सिद्ध करून दाखवावयाचे होते.

मि. सवाटानंतरचे आझाद हिंद फौजेचे मे. जनरल काटाकुरा यांची चाचणी घेण्यात आली. मि. काटाकुरा हे आझाद हिंद फौजेचे ' प्लॅनिंग अँड निगोशिएशन्स ' खात्याचे प्रमुख होते. त्यांच्या साक्षीच्या वेळी, आझाद हिंद फौज व जपानी लष्कर यांच्यामध्ये लष्करी व्यवस्था कशी होती, याबद्दल त्यांनी अनेक अधिकृत कागदपत्रांचे पुरावे उपलब्ध करून दाखविले. या सर्वांवरून असे स्पष्ट दिसत होते, की भारतीय स्वातंत्र्याचा लढा सुभाषचंद्र बोस यांच्या नेतृत्वाखाली चालला होता, तो काही जपान्यांच्या आज्ञेवरून चालू झालेला नव्हता. आझाद हिंद फौज ही सुभाषचंद्र बोस यांच्या संपूर्ण हुकमतीखाली होती आणि त्यामध्ये बाहेरील कोणाचीही मध्यस्थी किंवा ढवळाढवळ नव्हती. आझाद हिंद फौजेवर नेताजींचे निर्विवाद व निश्चित असे आधिपत्य होते. त्यांनी ग्रेटर ईस्ट आशियातील लोकांना दास्यमुक्त करण्यासाठी जपानी लष्कराला सहकार्य केले होते. इंफाळवर चढाई करण्यामागील जपानची भूमिका ब्रह्मदेशाचे संरक्षण करण्याची होता. सुभाषचंद्र बोस यांनी या संधीचा फायदा घेऊन आपल्या स्वातंत्र्याचा लढा पुढे चालू ठेवला. जरी ते दोघे एकत्र लढत होते तरी सुभाषचंद्र बोस व जपान या दोघांचे हेतू भिन्न भिन्न असल्याचे दिसून येते. इंफाळवरील चढाई यशस्वी झाल्यानंतर किंवा निकोबार व अंदमान ही बेटे मुक्त झाल्यानंतर भारताच्या कोणत्याही मुक्त भू प्रदेशावर मुलकी प्रशासन आझाद हिंद सरकारचेच असेल असेच पूर्वी ठरवण्यात आले होते. त्याप्रमाणे जपान सरकार वागत आले होते. यावरून हे सत्य दिसून येते, की आझाद हिंद सरकार किंवा आझाद हिंद फौज यांनी आपले राजकीय स्वातंत्र्य सदासर्वकाळ स्वतंत्रपणे ठेवले होते. जनरल काटाकुरा यांनी आपल्या जबानीत अनेक पुरावे सादर केले. त्यांनी पुढे असे सांगितले, की चिनी व ब्रह्मी लष्करावर संपूर्णपणे जपानी लष्कराचा ताबा होता; पण सत्य परिस्थिती अशी होती, की प्रशासन आणि लष्करी गोष्टींत आझाद हिंद फौज आणि आझाद हिंद सरकार हे दोन्ही भिन्न भिन्न स्वरूपाचे काम करीत होते व याबद्दल अनेक जपानी लष्करी प्रमुखांनी साक्षी दिल्या आहेत. या सत्य परिस्थितीवरून सुस्पष्ट होते, की आझाद हिंद फौजेचे अधिकारी अपराधी होऊ शकत नाहीत. आझाद हिंद फौज व इतर अनेक भारतीय देशभक्त यांचा सद्हेतू असा होता की लक्षावधी भारतीय लोकांना ब्रिटिशांच्या गुलामगिरीतून मुक्त करणे व भारताला स्वतंत्र करणे.

आझाद हिंद फौजेच्या तीन अधिकाऱ्यांवर सर्वत्र 'कोर्टमार्शल' करणार आहेत असे समजताच तत्काळ सार्वजनिक हितसंबंधाचा प्रश्न निर्माण झाला व अखेर त्यांची मुक्तता व्हावी म्हणून भारतात चळवळ उभारण्यात आली. एक 'संरक्षण कमिटी' निर्माण करण्यात आली व ती कार्यान्वित झाली. या कमिटीत भारतीय कोर्टातील नामवंत वकील मेंबर होते व त्यांनी कोर्टात लढा देण्याची तयारी केली. श्री. भुलाभाई देसाई यांच्या नेतृत्वाखाली 'बचाव समिती' निर्माण करण्यात आली. महात्मा गांधी यांनी ही चौकशी गुप्तपणे होऊ नये-याबद्दल आवाज उठविला. पं. जवाहरलाल नेहरू यांनी बंदिवासातील आझाद हिंद सैनिकांना व अधिकाऱ्यांना भेटून त्यांच्या बचावा-करिता कार्य चालू असून आझाद हिंद फौजेने जे काही केले आहे ते वैयक्तिक कार्य नसून ते भारताच्या स्वातंत्र्याकरिता कार्य केले आहे अशी भूमिका घेतल्याचे स्पष्ट करून सांगितले.

अखेर या चौकशीच्या शेवटी असे स्पष्ट झाले, की आझाद हिंद फौज ही नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या नेतृत्वाखाली भारत स्वतंत्र व्हावा म्हणून कार्य करीत होती व यासाठी त्यांना जपानचे सहकार्य होते. जपानला कोणत्याही प्रकारची भूभागाची अभि-लाषा नव्हती. याबाबत भारतीय वृत्तपत्रांनी असा अभिप्राय व्यक्त केला, की भारताला स्वातंत्र्य मिळण्याचे कामी जपान सहकार्य व मदत करीत होता. लाल किल्ल्यातील चौकशीच्या वेळी साक्षीदार म्हणून जे जपानी भारतात राहिले होते त्यांना भेटण्या-साठी एकही भारतीय गेला नाही व मित्रत्वाची भावनाही व्यक्त केली नाही. नेताजी सुभाषचंद्र बोस जपानी सैनिकांना किंवा अधिकाऱ्यांना अत्यंत आदराने व पूज्य भावनेने वागवीत असत.

दोन वर्षांनंतर भारताला स्वातंत्र्य मिळाले. भारत परकीयांच्या सत्तेतून मुक्त झालेला पाहून नेताजी सुभाषचंद्र बोस हे स्वर्गात आनंदित झाले असतील, तथापि अद्यापही त्यांची रक्षा टोकिओतील एका लहान देवळात तिष्ठत ठेवण्यात आली आहे. या महापुरुषाची रक्षा मी ( टाटसो ह्यासिद ) तैफीपासून टोकिओपर्यंत घेऊन गेलो आहे. अशा तऱ्हेचा दुर्दैवी सहवास मला घडेल असे वाटले नव्हते; पण माझ्याजवळ असलेली रक्षापेटी मला बरेच काही सांगून गेली. भारताच्या स्वातंत्र्याकरिता लढणाऱ्या या पूज्य नेत्याच्या महान कार्याने मी प्रभावित होऊन हे पुस्तक लिहिण्यास घेतले. यामुळे या महान पुढाऱ्याचे एक स्मारक या ठिकाणी होत आहे. त्यांस माझी ही अल्पशी मदत होईल. आणि माझी खात्री आहे, की भारत आणि जपान यांच्यामध्ये स्नेहभाव वृद्धिंगत होण्यास मदत होईल.

# सोळा / आदरांजली

भारतातील ब्रिटिशांच्या वाढत्या दडपशाहीमुळे नेताजी सुभाषचंद्र बोस हे फारच अस्वस्थ झाले. काँग्रेस व म. गांधी यांच्या 'सनदशिर' व 'अहिंसक' चळवळीचा ब्रिटिशांच्यावर काहीही परिणाम होणार नाही व भारताला या मार्गाने स्वातंत्र्य मिळणार नाही असे वाटल्यावरून त्यांनी भारताबाहेर जाण्याचे ठरविले आणि गुप्त-पणे अत्यंत कष्टप्रद व दुर्गम प्रवास करून ते भारतातून निसटून जर्मनीला गेले.

जर्मनीत राहून भारताच्या स्वातंत्र्यासाठी प्रयत्न करण्याचे त्यांनी ठरविले; पण भौगोलिक अडचणी फार होत्या. ते जर्मनीत असताना बर्लिनमध्ये असलेल्या जपानी दूतावासातील मि. हिगूछी व कर्नल विन यामामोटो या दोघांचा त्यांच्याशी परिचय झाला व नेताजींनी 'साऊथ ईस्ट एशिया' मधून भारतस्वातंत्र्याचा लढा उभा करावा, या संबंधी योजना तयार करण्यात आली व ती जपान सरकारकडे पाठवण्यात आली. जपानी दुतावासाच्या मदतीने जर्मन सरकारतर्फे त्यांना पाणबुडीतून जपानला पाठविण्यास आले.

जपानला गेल्यानंतर त्यांनी आझाद हिंद सरकार व आझाद हिंद फौज स्वतंत्रपणे, पण जपानच्या मदतीने उभी केली. त्यावेळेपासून पुढे आझाद हिंद फौजेचे अधिपती म्हणून शूरपणे, साहसीपणे आणि मर्दपणे ते ब्रिटिश लष्कराविरुद्ध लढले. भारताला स्वातंत्र्य मिळावे म्हणून ब्रह्मदेश, इंफाळ आणि इतर भागांत त्यांनी झुंज दिली. या देशकार्यासाठी दक्षिणपूर्व आशियातील भारतीय लोकांनी आणि भारतातील अनेक नागरिकांनी स्वार्थत्याग केला आणि अंतिम समर्पणही केले.

नेताजींनी स्वतःच्या वैयक्तिक संरक्षणाकडे कधीही लक्ष दिले नाही. त्यांच्यासमोर सतत भारताच्या स्वातंत्र्याचा प्रश्न होता. ते प्रामाणिक राष्ट्रवादाने प्रेरित झालेले होते. त्यांचे सर्व कार्य साम्राज्यवादाच्या विरोधीच होते. पॅसिफिक युद्धात जपानचे अनेक हेतू असले, तरी 'विश्वसदिच्छा' हेतूस त्यांनी प्राधान्य दिले हो. विश्वसदिच्छा

म्हणजे सर्व आशियामधील लोकांची जुलमी पाश्चिमात्यांच्या साम्राज्यवादापासून मुक्ती. आणि या विश्वसदिच्छेस अनुसरून नेताजींनी भारत स्वातंत्र्याची मोहीम हाती घेतली होती आणि याच कारणासाठी ते जपानला आले होते व त्यांनी परस्पर कार्य करण्याचे ठरविले होते. ही विश्वसदिच्छा केवळ नेताजींनीच मान्य केली असे नव्हे तर फिलिपाईन्सचे प्रेसिडेंट लॉरेल, ब्रह्मदेशाचे डॉ. बा मॉ, नानकिंग गव्हर्नमेंटचे मि. वेन वेग-ई यांनीही ती मान्य केली होती.

अखेर पॅसिफिक युद्ध हे जपानचा पराभव करूनच संपले. त्यातील नेत्यांच्या काही चुका झाल्या असतील किंवा चुकीची अम्मलबजावणी झाली असेल. पण काहीही असो, जपानबरोबर सर्वांनाच पराभव पत्करावा लागला.

या पराभवानंतर नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्यावर कृष्णमेघांची घनदाट छाया पसरली. विफल मनःस्थितीत भारत स्वातंत्र्याच्या लढ्याचा काही मार्ग निघाला, तर पहावे म्हणून ते रशियाच्या आश्रयाला जाऊ इच्छित होते आणि मांचूरियाला जात असता वाटेत तैफी येथील मास्टयामा विमानतळावर अपघात होऊन ते मृत्यू पावले.

नेताजींनी स्वातंत्र्याची ज्योत भारताबाहेरून प्रज्वलित केली व ती जगातल्या असंख्य भारतवासी व भारताच्या सहानुभूतीदारांनी अधिकच प्रभावित झाली. लवकरच तिची परिपूर्ती होऊन दोन वर्षातच भारत स्वतंत्र झाला.

भारत ही गौतमबुद्धांची जन्मभूमी असल्याने ज्यांना भारताबद्दल आदर आहे अशा असंख्य लोकांपैकी मी एक आहे. गौतमबुद्ध फार प्राचीनकाळी होऊन गेले व त्यांचा प्रभाव दीर्घ काळाच्या उदरात निस्तेज व म्लान होऊन गेला. त्याचबरोबर भारतासारख्या उष्ण हवामानाच्या देशात खूप अन्न, कपडे आणि निवारा मिळाल्यामुळे लोक सुस्त व आळशी बनून त्यांचे देशप्रेम व देशाभिमानही नष्ट होऊन गेला. पाश्चिमात्यांची जुलमी सत्ता अनेक वर्षे टिकण्याचे हेही एक कारण असू शकेल.

भारत ही बुद्धिवादी लोकांची ही जन्मभूमी आहे. या लोकांनी ब्रिटिशांच्या जुलमी सत्तेखाली अनंत काळ राहण्याचे अमान्य केले. नेताजी हे या धैर्यवान लोकांचे प्रतीक म्हणून उभे राहिले. सर्वसामान्य जनतेला त्यांनी सुस्ती सोडून देण्यास व आत्मसंतुष्ट व स्वार्थीपणा टाकून देऊन राष्ट्रासाठी उभे राहण्यास आवाहन केले. जनतेने त्यास उत्स्फूर्त साथ दिली. लोकांनी नेताजींच्या लढाऊ वृत्तीचे व देशाभिमानाचे स्वागत केले व त्यासाठी आत्मसमर्पणाची तयारी दर्शविली. आणि हेच स्वातंत्र्याचे पायाभूत अस्तित्व होय.

भारत एक स्वतंत्र राष्ट्र बनल्यावर पं. जवाहरलाल नेहरूंसारखा दृढविश्वासू व बुद्धिमान नेता आणि इतर पुढारी राष्ट्राला संकटातून पुढे नेत आहेत. भारत जगाच्या राजकारणातही महत्त्वाची भूमिका बजावत आहे. भारताच्या स्वातंत्र्यासाठी अनेक देशभक्तांचे रक्त, घाम आणि अश्रू खर्ची पडले आहेत आणि त्याचे फळ स्वतंत्र

भारताचे वैभव होय. या देशभक्तांत म. गांधी, सुभाषचंद्र बोस, पं. जवाहरलाल नेहरू वगैरे देशभक्तांबरोबर अनेक लहान-मोठ्या, ज्ञात-अज्ञात भारतीयांनी निस्सीम स्वार्थ-त्याग करून गुलामगिरी नष्ट होण्यासाठी महान लढा दिला.

आता सर्व जगभर अंतराळयुगाची सुरवात झाली आहे. लोक शक्तिमान विज्ञानाची व भौतिक संस्कृतीची पूजा करीत आहेत. विज्ञानाचा उपयोग एक हत्यार म्हणून केला जात आहे आणि हे पाहून मी व माझ्यासारख्या निष्पाप जीवांचा थरकाप होत आहे. मानवजातीला शांततेच्या मार्गाने नव्या अभ्युदयाप्रत नेणारा नवा पुढारी हवा आहे.

या सर्व परिस्थितीत आणि वातावरणात पूज्य नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या निधनाने मी फारच शोकाकुल होतो. जर ते जिवंत असते तर त्यांनी परमसुखाचे कायदे, आणि मानवहितवादी, शांततामय, सुखी, संपन्न असे नवे राष्ट्र निर्माण केले असते. अत्यंत प्रामाणिक, सर्व सचोटीस उतरलेले शूर आणि निस्वार्थी असे जीवन ते जगत होते. त्यांच्या अकाली निधनाने जगाचे फार मोठे नुकसान झाले आहे. आपल्या मातृभूमीला स्वातंत्र्य प्राप्त करून देण्याकरिता त्यांना दुःखद व शोचनीय मृत्यू प्राप्त झाला. भारतीय लोक त्यांच्याच मार्गाने पुढे जातील असे मला वाटते. त्यांच्या स्मृतीस माझे शतशः प्रणाम.

जर नेताजी सुभाषचंद्र बोस जगात कुठेही जिवंत असते तर त्यावेळच्या ब्रिटिश व अमेरिकन सरकारने त्यांना पकडून युद्धकैदी म्हणून उभे केले असते, याबद्दल मला काहीही शंका नाही. अखेरचे मनुष्याचे दैव हे आपल्या आकलनशक्तीबाहेरचे आहे. तथापि आता भारत व जपान ही दोन राष्ट्रे अत्यंत कष्टप्रद यातना सोसून स्वयंपूर्ण झाली आहेत आणि दोन्ही राष्ट्रांनी आपले मित्रत्वाचे संबंध राखले आहेत. आज जे काही मिळवले आहे त्याचा पायाच नेताजी सुभाषचंद्र बोस यांनी घातला आहे, त्या थोर नेत्यास आपण सर्व जण आदरांजली वाहू या.

# सतरा / निकटवर्तीयांच्या काही आठवणी

१

## श्यून हिग्गुछी

### भारताबाहेरून चळवळ

नेताजी सुभाषचंद्र बोस यांनी भारतातील ब्रिटिशांच्या कडक बंदोबस्तातून सुटका करून घेऊन १९४१ च्या वसंतऋतूत बर्लिनमध्ये प्रवेश केला. त्यांनी जर्मनी व इटली-मधून ब्रिटिशांच्या विरुद्ध संघटनात्मक हालचाली सुरू केल्या. १९४१ च्या अखेरीस त्यांची व जपानचे राजदूत ओशिमा यांची भेट झाली. त्या भेटीत त्यांच्या भारत स्वातंत्र्य लढ्याच्या योजनेबद्दल प्रदीर्घ चर्चा झाली. त्या नंतर थोड्यांच दिवसांत ग्रेटर ईस्ट एशियाच्या युद्धाला सुरुवात झाली आणि या युद्धामुळे नेताजींच्या चळवळीला अधिक प्रोत्साहन मिळाले. युरोपमधून ब्रिटिशांच्या विरुद्ध केवळ प्रचार केल्याने त्यांचे समाधान होत नव्हते. त्यांची योजना ईस्ट एशियामध्ये जाऊन प्रत्यक्षपणे भारतातील ब्रिटिश साम्राज्यशक्तीवर कारवाई करावयाची होती. 'त्यांनी जर्मनीत असलेले जपानचे राजदूत ओशिमा यांना जपानी सरकारचे सहाय्य मिळवून द्यावे अशी विनंती केली. ओशिमा यांनी त्यांच्या विनंतीस मान देऊन बर्लिन व टोकिओ असा तारायंत्री संपर्क साधला व नेताजींचे उद्देश तिकडे कळवले. तरीपण प्रथम काही दिवस या योजने बद्दल टोकिओ थंडच होते. नंतर टोकिओला उत्सुकता निर्माण होऊन त्यांनी बर्लिनचे राजदूत ओशिमा यांना कळवून सुभाषचंद्र बोस यांना अत्यंत संरक्षितपणे पाठवून देता आले तर पाठवावे अशा सूचना दिल्या. त्या वेळी सुभाषचंद्र बोस अत्यंत महत्त्वाची व्यक्ती होती. अशा महत्त्वाच्या व्यक्तीला 'अत्यंत संरक्षित' म्हणजे शत्रूला त्यांच्या हालचालीबद्दल काहीही न समजता व त्या व्यक्तीच्या जीवितास कोणत्याही प्रकारचा

धोका न होता पाठवले जावे अशा सूचना होत्या. १९४२ च्या शेवटी शेवटी मि. विन यामामोटो हे जपानला गेले व मला ( श्यून हिग्गुछी ) मि. बोस यांचेकडे लक्ष देण्यास त्यांनी सांगितले. १९४३ मध्ये जर्मनीचे सर्वाधिकारी हेर हिटलर यांनी आमच्या योजनेस मान्यता दिली व आम्हास जर्मन पाणबुडीतून खबरदारीने जाण्यास परवानगी मिळाली. त्याप्रमाणे योग्य त्या अधिकाऱ्यांना सूचना देण्यात आल्या. त्या वेळी मि. बोस यांना पूर्वी कधीही झाला नव्हता एवढा आनंद झाला.

फेब्रुवारी १९४३ च्या मध्यावर निघण्याचे टरले. बर्लिन सोडून पाणबुडीच्या स्थानापर्यंत जाण्याच्या आदले दिवशी मि. बोस यानी आपल्या चार, पाच जर्मन मित्रांना बोलावले. त्यामध्ये सिरियाचे आर्च बिशप, इराकचे हद्दपार केलेले मुख्य प्रधान, अफगाणिस्थानचे एक मंत्री आणि मी होतो. आम्हाला अल्पोपहारासाठी बोलावले होते. मि. सुभापचंद्र बोस यांचे सहाय्यक मि. रेहमान यांना व मला ते जर्मनीमधून लवकरच जाणार आहेत हे माहीत होते, इतर कोणासही त्याबद्दल मुळीच कल्पना नव्हती. वेळोवेळी देण्यात येणाऱ्या अल्पोपहारापेक्षा निराळे असे आता काहीच नव्हते. मि. बोस आपल्या नेहमीच्या बोलण्याच्या ओघात स्वातंत्र्याच्या चळवळीबद्दल बोलता बोलता म्हणाले "आमची चळवळ जोरदार व कार्यक्षम होऊन तिचा अधिक विकास कसा होईल हे मला पाहावयाचे आहे. व्हिएन्नामध्ये माझे अनेक वजनदार भारतीय मित्र आहेत, त्यांना मला भेटावयाचे आहे व त्यांच्याबरोबर चळवळीची चर्चा करावयाची आहे. त्यासाठी मी एक महिना बर्लिन सोडून जाणार आहे." अल्पोपहार संपण्यापूर्वी सर्वांनी या विषयावर आपापसात थोडी चर्चा केली. पाहुणे निघून गेल्यानंतर मि. बोस यांनी मला बोलावून घेतले व पुढील योजनेबद्दल ते माझ्या एकट्याशीच एक तास बोलले. ते म्हणाले, "ही सफर काही मोठी आनंददायक होईल असे मला वाटत नाही. तथापि मला त्याबद्दल अवघडल्यासारखे किंवा त्यामध्ये काही धोका होईल अशी शंका येत नाही. माझी अशी मनोमन खात्री आहे, की मी पूर्णपणे सुरक्षित व व्यवस्थित ईस्ट एशियामध्ये पोहोचू शकेन. माझी इच्छा होती, की मी माझे सहकारी व भारतीय फौज यांना बरोबर घेऊन जावे ( जर्मन लष्कराने ३००० भारतीयांची लष्करामध्ये भरती केली होती. ); पण वाहतुक करण्याचा काहीच मार्ग नाही. तथापि मी ईस्ट एशियाकडे तेथील मानवतावादी लोकांचा एक प्रतिनिधी म्हणून जात आहे. ईस्ट एशियामध्ये मि. रास बिहारी बोस आणि इतर मित्र खूप काम करीत आहेत. आम्ही जरी तेथे जाऊन त्यांना मिळू शकलो नाही, तरी ते कोणाच्याही मदतीशिवाय त्यांचा हेतू साध्य करू शकतील. मला जाताना जर काही धोका घडला तर कृपा करून मि. रास बिहारी बोस यांना सांगा, की या लढ्याला मी सर्वस्व वाहून घेतले होते व ते यशस्वी व्हावे म्हणून प्रामाणिकपणे प्रयत्न करीत होतो. माझा मि. नानबिया यांच्यावर पूर्ण विश्वास असून, मी येथून गेल्यानंतर ते युरोपमधील चळवळ संपूर्ण

जबाबदारीने चालवतील. जर काही जरूर लागली, तर कृपया तुम्ही मि. नानूबिया यांना भेटा. मि. रासबिहारी बोस यांचे सहकार्य कसे राहील याबद्दल मी विचार करतो आहे."

मी त्यांना सांगितले, "गेल्या वर्षीच मि. यामामोटो हे जपानला परत गेले आहेत आणि ते टोकिओमध्ये तुमच्या आगमनाची तयारी करीत आहेत. तुम्ही ज्या बंदरात जाऊन उतरणार आहात त्याच ठिकाणी ते तुमची भेट घेतील. मि. रासबिहारी बोस यांना तुमचा निरोप कळवण्याची फारशी आवश्यकता नाही. कारण तुम्ही त्यांना लवकरच भेटणार आहात." त्यांना सदिच्छा चिंतून मी निघून गेलो. त्यानंतर तीन महिन्यांनी सुभाषचंद्र बोस सुखरूपपणे जपानला पोहोचले.

२

## हबीब अर-रेहमान खान

## नेताजी सुभाषचंद्र बोस यांचे अखेरचे दिवस

चालू शतकात भरतखंडाने नेताजी सुभाषचंद्र बोस ह्या एका महान क्रांतिकारक आणि स्वातंत्र्यसंग्रामलढवय्याला निर्माण केले. १९४२ ते १९४५ या दरम्यान साऊथ ईस्ट एशियामध्ये जोरदार सुरू केलेल्या लढ्याचा निर्णय त्यांनी स्वतः पाहण्या-पूर्वीच दुर्दैवाने १८ ऑगस्ट १९४५ रोजी क्रूर मृत्यूने त्यांना आमच्यातून उचलून नेले. भारतामधल्या परकी सत्तेला या लढ्याने प्रत्यक्षपणे जोरदार ठोसा दिला आणि यामुळेच ब्रिटिश सरकारची आणीबाणीची परिस्थिती निर्माण झाली. अखेर त्याना १५ ऑगस्ट १९४७ रोजी भारताला स्वातंत्र्य द्यावे लागले. जाता जाता ब्रिटिशांनी भारत व पाकिस्तान अशी दोन स्वतंत्र राष्ट्रे निर्माण केली.

नेताजी सुभाषचंद्र बोस यांची देशाच्या स्वातंत्र्याकरिता कार्य करावे अशी त्यांची आत्यंतिक इच्छा होती. त्यांना ब्रिटिशांनी देऊ केलेली 'इंडियन सिव्हिल सर्व्हिस' मधील उच्च नोकरी सोडून ते प्रत्यक्ष राजकारणात उतरले. त्या वेळच्या अग्रगण्य पुढाऱ्यांमध्ये लवकरच त्यांनी पहिल्या रांगेत प्रवेश मिळवून घेतला. ते इतिहासाचे व लष्करी इतिहासाचे एक चिकित्सक अभ्यासू होते. विशेषतः पहिल्या महायुद्धानंतर पारतंत्र्यांत असलेल्या राष्ट्रांनी आपले स्वातंत्र्य कसे मिळविले, याचा त्यांनी अभ्यास केला होता आणि या करिता त्यांनी युरोपमधील काही देशांचा दौरा करून अगदी मूलभूत ज्ञान प्राप्त करून घेतले. ते भारतीय पुढारी पं. जवाहरलाल नेहरू व म. गांधी यांच्या 'सबुरीच्या' धोरणाविरुद्ध होते. त्यांची मनोमन अशी खात्री होती की दुसऱ्या महायुद्धात ब्रिटिश साम्राज्य नाहीसे होईल. तेव्हा या युद्धामुळे चालून आलेली संधी

भारताने गमावू नये. आणि याच उद्देशाने त्यांनी १९४० मध्ये ब्रिटिश सरकारच्या सक्त नजरेतून आपली सुटका करून घेऊन काबूलमार्गे जर्मनीत प्रयाण केले, त्या नंतर १९४३ च्या एप्रिलमध्ये ६३ दिवसांचा समुद्राच्या तळातून भयानक प्रवास करून ते टोकिओला गेले.

त्यांची अशी पुरेपूर खात्री होती, की स्वातंत्र्यलढा हा बाहेरून चालवावयाचा असेल तर त्याला दोन गोष्टींची जरुरी आहे, एक म्हणजे राष्ट्रीय सरकार व दुसरी म्हणजे राष्ट्रीय सैन्य. जपान सरकारने पूर्ण मदतीचे भरीव आश्वासन दिल्यानंतरच त्यांनी 'इंडियन इंडिपेंडन्स लिग' या राजकीय पक्षाची संघटना केली. त्याचे ईस्ट एशियामध्ये राहणारे २ लक्ष सभासद होते. त्यानंतर त्यांनी (प्रोव्हिजनल गव्हर्मेंट ऑफ फ्री इंडिया) आझाद हिंद सरकारची स्थापना केली व त्याच्या आश्रयाखाली (इंडियन नॅशनल आर्मी) आझाद हिंद फौजेची निर्मिती केली. या फौजेत माजी सैनिक आणि भारताबाहेर राहणारे भारतीय तरुण नागरिक यांची भरती केली होती. नेताजींची इच्छाशक्ती प्रबळ होती. त्याचबरोबर त्यांच्याकडे संघटना चातुर्यही होते. भारत स्वातंत्र्याच्या चाललेल्या लढ्यासाठी साऊथ ईस्ट एशियामध्ये राहणाऱ्या भारतीयांच्याकडून त्यांना पूर्ण पाठिंबा मिळाला होता व त्याबरोबर पैसा व साहित्याचा पुरवठाही होत होता. त्यांचे धोरण असे होते, की स्वातंत्र्याच्या लढ्यासाठी भारतीय लोकांच्याकडून पाहिजे तेवढी मदत मिळाली तर जपान सरकारकडून कोणत्याही मदतीची अपेक्षा करू नये.

नेताजींचे व्यक्तिमत्त्व असे होते, की त्यांना पाहताच लाखो सैनिक आणि नागरिक भारावून जात. त्यावेळी ते ईस्ट एशियामध्ये होते. तेथील प्रत्येकजण देशाच्या स्वातंत्र्यासाठी त्यांच्या नेतृत्वाखाली प्राणार्पण करण्यास तयार असत. देशाच्या स्वातंत्र्यासाठी आझाद हिंद फौज नेहमीच पहिल्या आघाडीवर असे. त्यांच्या वरील निष्टेचा हा दाखलाच होय.

त्यांची काम करण्याची जिद्द खूपच मोठी होती. पूर्व आशियातील राष्ट्रांमध्ये त्यांची फारच प्रशंसा होत होती व त्या वेळच्या तेथील सरकारांत त्यांच्या दृष्टिकोणाला बरेच महत्त्व दिले जात होते. १९४४ मध्ये आम्ही जपानला भेट दिली त्यावेळचा एक प्रसंग सांगण्यासारखा आहे. नेताजींच्या समवेत मुख्य मंत्र्यांच्याबरोबर वरिष्ठ जपानी पुढाऱ्यांच्या चर्चेच्या वेळी मी उपस्थित होतो. या चर्चेच्या वेळी नेताजींच्या प्रत्येक मताचा आस्थापूर्वक विचार विनिमय होत असे.

अग्नेय आशियातील स्वातंत्र्याच्या लढ्यातील अनेक वीरकथा मला या छोट्याशा निवेदनात देता येणे शक्य वाटत नाही. ऑगस्ट १९४५ च्या कालखंडातील शेवटचे प्रसंग निवेदन करण्यासही मर्यादा पडली आहे. १४ ऑगस्ट १९४५ ला जपानी शरणांगतीची बातमी येण्याच्या वेळेपर्यंत मी डेप्युटी चीफ ऑफ दी स्टाफ असून

सिंगापूर येथील हेडक्वार्टरच्या मलायातील फौजेचा अधिकारी होतो. पुढील कार्याची योजना ठरविण्यासाठी आझाद हिंद सरकारच्या मंत्रीमंडळाची बैठक भरली होती. त्या बैठकीस मी हजर होतो. त्यावेळी नेताजी सर्वांना उद्देशून म्हणाले, " मित्रांनो ! या अभूतपूर्व संकटप्रसंगी मी एकच गोष्ट सांगतो, की आत्ताच्या या तात्पुरत्या पराभवाने दबून जाऊ नका. तुम्ही चांगले उत्साही राहा व जिद्द सोडू नका. या व्यक्तिरिक्त म्हणजे भारत स्वातंत्र झाला पाहिजे ध्येयावर विश्वास ठेवण्यात यत्किंचितही डळमळू नका. आपल्या पुढे वाढून ठेवलेल्या न्यायसभेपुढे किंवा चौकशी समितीपुढे चौकशी होत असता आपल्या व देशाच्या प्रतिष्ठेला बाध येईल असे कोणतेही कृत्य करू नका की ज्यामुळे अतिपूर्वेकडील आपल्या लढ्याचा दृष्टिकोण आपल्या देशातील लोकांच्या पुढे विपरीत स्वरूपात उभा राहील. तुम्ही जर हे पवित्र कार्य निष्ठेने पार पाडले तर सर्व देश उत्साहाने भरून जाईल आणि त्यामुळे भारतातील परकीय सत्तेचा पाया डळमळीत होईल. माझा विश्वास आहे, की तुम्ही या मार्गानेच जाल. आता जगात अशी कोणतीही शक्ती राहिली नाही, की जी भारताला पारतंत्र्यात ठेवू शकेल. मी कोणत्याही सत्त्वपरीक्षेच्या वेळी तुमच्याबरोबर असेन. "

या बैठकीत अशीही चर्चा झाली, की त्यांनी लगेच दुसऱ्या दिवशी सकाळी टोकिओला जावे व जपान सरकारबरोबर सल्लामसलत करावी. त्याप्रमाणे १५ ऑगस्ट १९४५ रोजी नेताजी काही अधिकाऱ्यांच्या समवेत, त्यांमध्ये एस. ए. अय्यर व मी होतो, लगेच सकाळी विमानाने टोकिओस जाण्यास निघालो. वाटेत आम्ही बँकॉक येथे थांबलो. त्यानंतर पुन्हा सायगाव येथे थांबलो व तेथे आम्ही विमान बदलले. ते जपानी हेवी बॉम्बर ( Sally ) होते. त्यामधून काही जपानी लष्करी अधिकारी टोकिओला जाणार होते. त्या विमानात फक्त नेताजींना व मला जागा होती. आम्ही १७ ऑगस्टला टैरुनी येथे दुपारी १–३० पर्यंत थांबलो आणि १८ ऑगस्ट रोजी तैपी ( फोर्मोसा ) येथे थोडा वेळ थांबून पेट्रोल वगैरे भरल्यानंतर विमानाने टोकिओला जाण्यासाठी जमिनीवरचा शेवटचा पाय उचलला. आम्ही फार तर दहा मिनिटे हवेत असू. त्याच वेळी आम्हाला फार मोठा स्फोटाचा आवाज ऐकू आला आणि त्याबरोबरच विमान कलंडले व ते जमिनीवर कोसळले. प्रथम ते आपल्या नाकावर आदळले. त्यामुळे तत्काळ पेट्रोलची टाकी उद्ध्वस्त झाली आणि विमानाला आग लागली. नेताजी सुभाषचंद्र बोस व मी दोघांनी जळत्या विमानाच्या आगीतून बाहेर उड्या टाकल्या. मी विमानातून बाहेर पडताक्षणी नेताजी आपल्या कपड्याला लागलेली आग विझविण्याचा प्रयत्न करीत असताना मला दिसले. कारण त्यांच्या अंगावर पेट्रोलचे खूप शिंतोडे उडले होते व त्यांना आग लागली होती. मी त्यांच्याजवळ धावत आलो व आग विझविण्याचा प्रयत्न केला. त्यांना मी जमिनीवर लोळण घ्यावयास लावली. त्यांच्या डोक्याला मोठी जखम होऊन त्यातून रक्त वहात असल्याचे मी पाहिले. त्यांचे सर्वांग

भाजले होते. मी जखमी होऊनही वाचलो, मात्र माझे दोन्ही हात फारच भाजले होते.

या वेळी माझ्यात व नेताजींच्यात खालीलप्रमाणे संभाषण झाले.

नेताजी : मला वाटते तुम्ही गंभीर रीतीने जखमी झाला नाही ना ?

मी : नाही सर, साधारण जखमी होऊन मी बचावलो.

नेताजी : मी या अपघातातून वाचू शकेन असे मला वाटत नाही. तुम्ही जेव्हा परत आपल्या देशात जाल तेव्हा माझ्या देशबांधवाना सांगा, की मी अखेरपर्यंत देशाच्या स्वातंत्र्यासाठी लढलो. यापुढे आपल्या देशाला कोणीही पारतंत्र्यात ठेवणार नाही. जनतेने लढा देत राहिले पाहिजे. लवकरच भारत स्वतंत्र होईल.

नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्यासारखा स्वातंत्र्य लढ्याचा योद्धा आपले इच्छित ध्येय साध्य केल्याशिवाय त्यांच्या नशिबी असे दुर्दैव येईल यावर माझा विश्वास नव्हता.

अपघातानंतर लगेच आम्हाला जवळच्या आणीबाणीप्रसंगी उपयोगी पडणाऱ्या लष्करी हॉस्पिटलमध्ये अॅम्ब्युलन्समधून नेण्यात आले. तेथे जपानी लष्कराच्या डॉक्टरनी आमच्यावर उपचार केले. सुदैवाने मी शेवटपर्यंत शुद्धीवर होतो व हॉस्पिटलमध्ये माझा बिछाना नेताजींच्या बिछान्याजवळच होता. ते फारच थोडे बोलले. खरे तर ते बराच वेळ बेशुद्ध अवस्थेतच होते. जपानी डॉक्टरनी शक्य असलेले जास्तीत जास्त उपचार केले, परंतु दुर्दैवाने ते रात्री ८–३० वाजता मृत्यू पावले. त्यांच्या आकस्मिक मृत्यूमुळे मला जबरदस्त धक्का बसला व माझी मती कुंठित झाली. त्यानंतर त्यांचा देह परत सिंगापूरला आणता येणे शक्यच नव्हते. माझ्या उपस्थितीत त्यांच्यावर लष्करी मानमरातबाप्रमाणे अग्निसंस्कार केले गेले.

१२ प्रवाशांपैकी ले. ज. शिडये तर त्याच क्षणी मृत्यू पावले. आमच्या पैकी ले. क. नोनोगाकी, पायलट ऐय्यागी, मेजर कोनो, ले. क. सकाई आणि मी स्वतः असे आम्ही सुदैवाने वाचलो.

मी ५ सप्टेंबर १९४५ रोजी सकाई, नाकामिया आणि ह्यासिद यांच्यासह रक्षा घेऊन जपानमध्ये गेलो. नेताजींची रक्षा मि. एस. ए. अय्यर यांच्या समक्ष तेथील रंकोजी मंदिरात ठेवली गेली. मि. एस. ए. अय्यर सायगावहून आमच्या पूर्वीच जपानला पोहोचले होते. त्यावेळी मि. राममूर्ती आणि इतर काही भारतीय लोक जपानमध्ये राहत होते. मी १९ नोव्हेंबर १९४५ पर्यंत जपानमध्ये राहिलो. १९ नोव्हेंबर रोजी अमेरिकन विमानातून काही जपानी मंडळींसह मी दिल्लीला आलो. मी ज्या विमानातून आलो, त्या विमानात काही जपानी जनरल्स, ले. ज. फुजीवारा, ज. आयसोडा आणि जपानचे परराष्ट्रमंत्री होते. आम्ही सर्व दिल्लीमध्ये चालू झालेल्या लष्करी चौकशीच्या जबाबासाठी आलो होतो. आझाद हिंद फौजेची चौकशी दिल्लीच्या लाल किल्ल्यात चालू होती. या लष्करी चौकशीत लोकांना माहीत नसलेली आझाद हिंद फौजेची शौर्यगाथा सर्वांना माहीत झाली. या ऐतिहासिक घटनेचा सर्व तपशील

समजताच भारतातील सर्व लोक स्वाभिमानाने प्रज्वलित झाले. या चौकशीत असे सिद्ध करण्यात आले, की आमच्या स्वातंत्र्याकरिता लढणे हा आमचा नैतिक अधिकार आहे. शेवटी जनमनाचा कौल ओळखून ब्रिटिश सत्ताधिकाऱ्यांनी आपल्या देशाच्या स्वातंत्र्यासाठी लढणाऱ्या हजारो लष्करी अधिकाऱ्यांना व इतर सर्वांना मुक्त केले. ब्रिटिश सरकार लोकांच्या देशभक्तीच्या भावनेने दबले गेले.

भारतावरील आपली अधिष्ठित सत्ता खिळखिळी झाली असून, ब्रिटिश सत्ताधिकारी परत आपल्या देशी जावेत या भावनेने जागृत झालेला समाज पाहून ब्रिटिश सरकारने १४ ऑगस्ट १९४५ रोजी सत्तात्याग करण्याचे ठरविले आणि याच अंतिम ध्येयाचे आझाद हिंद फौजेला आणि त्यांच्या महान पुढाऱ्यांना समर्थन करावयाचे होते. देशाच्या स्वातंत्र्याकरिता अविरत परिश्रम करून अखेर त्याला लाभलेले यश पाहाण्यास स्वतः नेताजी हजर नाहीत हे केवढे दुर्भाग्य! भारतामधल्या कित्येक लोकांना अद्यापही असे वाटते, की नेताजी जिवंत असून एक ना एक दिवस ते परत येतील. आम्हास हे खरे कसे वाटेल ? आणि खरेच तसे घडले असते, तर भारताच्या राजकारणात त्यांना अग्रस्थान मिळाले असते. भारत व पाकिस्तानचे संबंध आज जे दुरावले गेले आहेत ते सलोख्याचे राहिले असते किंबहुना भारताची फाळणी झाली नसती. नेताजी अत्यंत न्यायप्रिय व उदार अंतःकरणाचे पुढारी म्हणून ओळखले जात होते. तथापि स्वातंत्र्याची ज्योत त्यांनी प्रज्वलित केली ती सतत तशीच प्रज्वलित राहून जगातल्या सर्व स्वातंत्र्यवीरांना सदासर्वकाळ स्फूर्ती देत राहील.

मला या ठिकाणी असे नमूद करावयाचे आहे, की ईस्ट एशियातील ब्रह्मदेश, इंडोनेशिया; मलाया, व्हीएतनाम, फिलिपाईन्स या देशांनी आपल्यावरील वसाहतीचे बंधन झुगारून देऊन संपूर्ण स्वतंत्र झाले पाहिजे. या स्वातंत्र्याची ज्योत नेपॉन यांनी प्रज्वलित केली. या कार्यासाठी जपानचे जे सहकार्य मिळाले त्याबद्दल ते जपानचे ऋणी आहेत.

३

## तारो कोनो

### नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या काही स्मृती

नुकत्याच संपलेल्या दुसऱ्या जागतिक महायुद्धानंतर मला नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या मोठेपणाचा प्रत्यय आला. त्यांचे थोरले बंधू व भारतीय पार्लमेंटचे काही सदस्य यांनी जपानला भेट दिली, तेव्हा नेताजींच्या मृत्यूबद्दल त्यांनी चौकशी केली. मि. बोस मृत्यू पावले यावर त्यांचा विश्वास नव्हता.

नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्याबद्दल मी अनेक लोकांकडून व लहानथोर व्यक्तीं-

कडून जिव्हाळ्याचे प्रशंसोद्गार ऐकले व त्यामुळे माझ्या मनावर त्यांचा मोठेपणा बिंबला. ते जर मृत्यू पावले नसते तर भारताच्या इतिहासाला नवे वळण लागले असते. 'नेहरू युगा' ऐवजी 'बोस युग' निर्माण झाले असते; पण आता बोस मृत्यू पावलेले आहेत.

नेताजी या युगपुरुषाची सर्व माहिती मी घेत होतोच. तथापि त्यांचा प्रत्यक्ष सहवास मी त्यांच्याबरोबर सायगांव ते तैफीपर्यंतच्या लहानशा प्रवासात घेतला. आता नेताजींच्या आत्म्यास शांती मिळावी म्हणून प्रार्थना करून, मी काही जुन्या आठवणीचे पुन्हा स्मरण करीत आहे.

३० जुलै १९४५ रोजी मी जावामधील मलंग या ठिकाणी होतो. तेथे माझ्या वरिष्ठाकडून मला हुकूम मिळाला, की माझी बदली टोकिओच्या एअर फोर्स हेड-क्वार्टर्सकडे केली आहे. सर्वसाधारण परिस्थिती इतकी बिघडली होती, की मे मध्ये काढलेला हुकूम मला जुलैमध्ये मिळाला. मला कामावर हजर होण्यासाठी टोकिओला जाण्याचा काहीच वाहतुकीचा मार्ग नव्हता. तसा अर्जही मी केला आणि परिस्थितीचे स्पष्टीकरण करून व्हाया सायगाव मार्गे जपानला जाण्याचे ठरविले. ४ ऑगस्टला मी सायगाव येथे आलो. तेथे असलेल्या ऑफिसर्स क्वार्टर्स पूर्ण भरून गेल्या होत्या. त्यामुळे मी मि. योशीनोरी यांना त्यांच्या क्वार्टरमधील एखादी खोली मिळेल काय, असे विचारले. मि. योशीनोरी हे त्यावेळी सायगावमधील 'आसाई शिंबून' न्यूज पेपर ब्युरोचे मॅनेजर होते. सध्या ते एन्. एच. के. चे (जपान ब्रॉडकास्टिंग कार्पोरेशन) प्रेसिडेंट आहेत. अखेर त्यांनीच माझी व्यवस्था केली. याच दरम्यान जपानने शरणागती पत्करली. संमिश्र भावनेने मी पुढे जपानला जाण्यासाठी वाहतुकीची काय व्यवस्था होईल, हे पाहत होतो. साऊदर्न जनरल आर्मीमधील क. शिशकावा यांनी मला कळविले, की मि. सुभाषचंद्र बोस हे टोकिओला जात असून, तुम्ही त्यांच्या विमानातून जात असला तर पाहा. १८ ऑगस्ट रोजी दुपारीच मी तेथून निघण्याचे निश्चित केले; परंतु आमच्या निघण्याच्या वेळेत काही अपरिहार्य कारणासाठी विलंब होत होता व आम्हास वाट पाहत विमानतळावर थांबणे भाग होते. आम्ही वाट पाहत बसलो असता ले. ज. शिड्ये सहज म्हणाले, "या विमानातून प्रवास करणे सुरक्षित आहे. कारण कर्नल नोनोगाकी आणि मे. कोनो हे आपल्याबरोबर आहेत, समजलं ना?" त्यांचे शब्द माझ्या पूर्णपणे लक्षात राहिले.

ले. ज. शिड्ये व मि. बोस यांच्या मागे पेट्रोलची लांबट टाकी होती. क. रेहमान व मि. बोस यांच्या बाजूला जाण्यासाठी अरुंद वाट होती. हे विमान ९७–११ या प्रकारचे मॉडेल होते. विमानात प्रमाणापेक्षा अधिक प्रवासी झाल्यामुळे फक्त एका सुटकेस व्यतिरिक्त कोणासही इतर साहित्य घेऊ देण्यात आले नाही. आम्हाला आमचे सर्व साहित्य मागे ठेवावे लागले. विमानाची वजन वाहून नेण्याची शक्ती

१,५०० के. जी. इतकी होती. आम्हा तेरा प्रवाशांचे वजन अंदाजे ९८० के. जी. इतके होते. या वेळेपावेतो मि. बोस आणि त्यांचे सहकारी विमानतळावर येऊन दाखल झाले. त्यांना निरोप देण्यासाठी असंख्य लोक विमानतळावर आले होते. सायगाव विमानतळावरून अंदाजे सायंकाळी ४ वाजता विमानाने आकाशात झेप घेतली. आमच्या प्रवासाचा मार्ग सायगावहून टैरन, हौटो, तैफी, दैरन आणि टोकिओ असा होता. सायगावच्या विमानतळावरील धावपट्ट्यावरून पुढे जाताच विमान हवा-जड झाले. विमानाच्या पुढील पंखाचा चक्री वेग एका मिनिटास ३१०० फेर इतका होता; तथापि जास्तीत जास्त या वेगाची मर्यादा एका मिनिटास २८०० फेर इतकी असते. मला व मे. ताकिझ्वा यांना विमान ओव्हरलोड झाले आहे असे वाटले. अखेर आम्ही टैरन विमानतळावर सायंकाळी ७ च्या सुमारास येऊन पोहोचलो.

क. रेहमान हे मि. बोस यांच्याबरोबर समोर नकाशा ठेवून विमान जाण्याच्या मार्गाबद्दल चर्चा करीत होते. त्यांचा निरोप घेण्याकरिता आलेल्या मंडळींबरोबर ते कारणपरत्वेच बोलत होते. दैरन येथे गेल्यानंतर आपल्यावर काय प्रसंग येईल या बद्दल ते विचारात होते. ब्रिटिशांच्या तावडीत जाण्यापेक्षा रशियात जावे असा त्यांनी विचार केला होता. या सर्व विचारांनी त्यांच्या मनात गोधळ उडून गेला होता. टैरन विमानतळावर उतरल्यावर एका मिलिटरी पोलिस मेजरने आम्हास विमान तळावरून जवळच्या समुद्रकाठांवर असलेल्या एका हॉटेलमध्ये जाण्यास सांगितले. नंतर मी व ताकिझ्वा आमच्या विमानाजवळ यांत्रिक तपासणी करण्यासाठी आलो. विमानात असलेल्या जादा वजनाबद्दल काय करता येईल म्हणून आम्ही विचारविनिमय केला. वाटेत जरी शत्रूच्या विमानांनी आम्हास गाठले, तरी प्रतिकार करण्यासाठी आमच्या-जवळ काहीही न ठेवता आम्ही विमानात असलेल्या १२ मशिनगन्स व २००० गोळ्या काढून ठेवण्याचा विचार केला. त्याचबरोबर अनावश्यक असलेल्या लगेजचा एक तुकडाही आम्ही ठेवला नाही. याप्रमाणे अंदाजे ५०० के. जी. वजन कमी केले. आम्ही सर्व तपासणी करून हॉटेलकडे परत येईपर्यंत रात्रीचे ८–२० होऊन गेले होते. सर्वांची जेवणे आटोपली होती. मि. बोस एकटेच खोलीत विश्रांती घेत होते. दुसरे दिवशी सकाळी ५ वाजता निघण्याचे ठरविले, कारण रात्री शत्रूची विमाने आम्हाला चुकवावयाची होती. त्या दिवशी रात्री मी व मे. ताकिझ्वा जपानची पुनर्रचना कशी होईल व पुढील भवितव्य काय असेल याबद्दल बराच वेळ बोलत बसलो होतो. रात्रीच्या प्रशांत वेळी नारळीच्या झाडाआडून आकाशात अनंत चांदण्या लुक-लुकत होत्या.

१८ ऑगस्टच्या सकाळी ५ वाजता विमानातील काही वजन काढून ठेवून चांगले हवामान असल्याने आमचे विमान व्यवस्थितपणे हैटोकडे प्रयाण करते झाले. सकाळी ११ वाजता हैटो आमच्या दृष्टीपथात आले. तोपर्यंत रेडिओवर

रशियन फौजा पोर्ट ऑर्थरवर चालून गेल्याची बातमी येऊन थडकली. आम्ही लगेच आपसात चर्चा केली व थेट तैफी पर्यंत जाण्याचे ठरविले. त्याच दिवशी दैरनकडे प्रयाण करण्याचे निश्चित केले. दुपारी आम्ही तैफीला पोहोचलो. मि. बोस येथे येणार असल्याचे पूर्वी येथे कळवण्यात आले नव्हते. विमानतळावरील एका अधिकाऱ्या-बरोबर विचारविनिमय करून आम्ही दुपारी २ वाजता दैरनकडे रवाना होण्याचे ठरविले. तेथील एका तंबूतच आम्ही दुपारचे जेवण घेतले. नकळत आमच्या मनात आले, की कदाचित आमचे सर्वांचे मिळून हे शेवटचे तर जेवण नसेल ना? मि. बोसनी वूलन स्वेटर अंगावर चढविला. त्यांनी फिकट निळा पोषाख केला होता. पायांत काळे बूट व डोक्याला फिल्ड सर्व्हिस कॅप होती. मि. ताकिझ्वा यांनी विमानाच्या इंजिन्सची तपासणी केली. मी विमानाच्या बाहेर उभा राहून इंजिनची तपासणी पाहत होतो. विमानाच्या डाव्या पंख्यात आवाज येत असल्याचा मला संशय येत होता. इंजिनची तपासणी करण्यासाठी मी पुन्हा विमानाच्या भोवती फिरलो, यावेळी मात्र मला त्यात काहीही बिघाड आहे. असे वाटले नाही. मागील अनुभवावरून आपण थोडे काळजीपूर्वक असावे असे वाटले. आम्ही जावयास निघालो, त्यावेळी दुपारचे २ वाजले होते. आमचे विमान धावपट्टयावरून २० मीटर पुढे गेले असेल नसेल, इतक्यात पुढच्या बाजूने स्फोटाचे मोठे आवाज झाले आणि क्षणार्धात डाव्या बाजूचे इंजिन उखडले आणि विमान बाजूस झुकले. आम्ही फार भयानक संकटात सापडलो असल्याची जाणीव झाली. आता विमान आगीपासून कसे वाचवावयाचे याचा आम्ही निकराने प्रयत्न केला. मी जोराने किंचाळलो, "स्विचेस बंद करा" आणि मी उभे राहण्याचा प्रयत्न सुरू केला; पण विमान कलते होऊन कोसळत असल्याने मी उठू शकलो नाही. मे. ताकिझ्वा कललेले विमान सरळ करण्याचा प्रयत्न करीत होते; परंतु विमानाचा वेग संपला होता व ते हुकमतीच्या बाहेर गेले होते. क्षणार्धातच ते जमिनीवर कोसळले व त्याने पेट घेतला. जमिनीवर त्याचे तुकडे झाले. बाजूच्या लहान खिडकीतून थडकत थडकत बॅगा बाहेर फेकल्या जात होत्या. थोड्याच मिनिटांत विमानाचे तुकडे झालेले मी पाहिले. विमानाचा मागील भाग पार मोडून तुटून गेला होता. मी सभोवार पाहिले. ज. शिडेय जागच्या जागीच ठार झाले होते. त्यांचे मागील बाजूने डोके तुटले होते. मे. ताकिझ्वा यांना तोंडावर हँडलचा मार बसून ते तत्काळ ठार झाले होते. वॉरंट ऑफिसर ऐयागी मरून पालथे पडले होते नॉन कमिशन्ड ऑफिसर इन्चार्ज ऑफ दी मशिन मला कोठेच दिसले नाहीत. ज्वाला इतक्या धगधगत होत्या, की मी फार काळ उभा राहू शकलो नाही. संपूर्ण विमान आगीच्या भक्ष्यस्थानी पडले होते. मी धाडसाने छताकडील भाग मोडून काढून विमानाच्या बाहेर उडी ठोकली. मी उडी टाकली त्या ठिकाणी पेट्रोल सांडले होते. त्यामुळे माझे कपडेही पेटले. घाईघाईने मी अंगातील कोट काढून फेकून दिला व

आग विझावी म्हणून जमिनीवर गडबडा लोळण घेतली. माझा चेहरा, हात व पाय पोळले गेले. मी अर्धवट बेशुद्ध अवस्थेत जमिनीवर पडून होतो. ले. क. नोनोगाकी मला हाक मारीत असलेले मी ऐकले. मी त्यांना उत्तर दिले नाही असे मला वाटते. अशा अवस्थेत असतानाच मला एक सशक्त माणूस आगीतून बाहेर पडताना दिसला. त्याच्या डोक्यातून रक्त गळत होते. ते मि. सुभाषचंद्र बोस होते. मी त्यांना हे अखेर-चेच पाहत होतो. नंतर थोड्याच वेळात आम्हाला हॉस्पिटलमध्ये नेण्यात आले. मी माझी दृष्टी गमावली. त्यानंतर मला बऱ्याच वेळाने मि. बोस मृत्यू पावल्याचे कळव-ण्यात आले. त्यांनी शेवटी असे सांगितले म्हणे, की "सायगावमध्ये असणाऱ्या माझ्या सहकाऱ्यांना प्रणाम सांगा."

४

## तानेयोछी योशिमी

### 'नेताजींच्या आत्म्यास शांती लाभो.'

अपघात झालेल्या विमानतळावरून ज्यावेळी नेताजी सुभाषचंद्र बोस यांना घाईने हॉस्पिटलमध्ये आणण्यात आले त्यावेळी अक्षरशः त्यांचे सर्वांग भाजून गेले होते आणि त्यांच्या कातडीचा रंग ऑक्साइट सिल्व्हरसारखा झाला होता. त्यांना तत्काळ शस्त्र-क्रिया उपचारासाठी ऑपरेशन थिएटरमध्ये नेण्यात आले. या सर्व वेळात त्यांच्या तोंडून एकही दुःखद उद्‌गार किंवा कण्हणे बाहेर पडले नाही. ते उंच व बांध्याने बळकट शरीरयष्टीचे होते आणि त्यांची इच्छाशक्तीही त्यांच्या शरीराइतकीच बळकट होती. भारताच्या स्वातंत्र्याकरिता शरीराने आणि मनाने वाहून घेतलेल्या माणसाला अशा प्रकारची शरीरसंपदा शोभून दिसणारी होती.

त्यांचे जीवित वाचविण्यासाठी आम्ही शिकस्तीचा प्रयत्न केला. रिंजर्स सोल्यूशन सारखी त्यांना इंजेक्शन्स देण्यात आली होती, रक्त देण्यात आले होते आणि हृदय उत्तेजित करणारी औषधेही देण्यात आली होती. तथापि त्याच रात्री त्यांनी अखेरचा श्वास सोडला. मी माझ्या अंतःकरणापासून प्रार्थना करतो, की त्यांच्या आत्म्याला शांती लाभो.

५

## टाटसो हयासिद

### ज्युछी नाकामुरा यांची मुलाखत

१९६४ मधल्या उन्हाळ्यात एके दिवशी माझी व ज्युछी नाकामुरा यांची भेट झाली. या पुस्तकात मि. नाकामुरा यांचे नाव येऊन गेले आहे. फोर्मोसा गव्हर्नमेंटच्या परराष्ट्रखात्यामध्ये त्यांची दुभाष्या म्हणून नेमणूक झाली होती. मि. नाकामुरा हे तर्फी

येथील विमानतळावरील हॉस्पिटलमध्ये नेताजींच्या मृत्युसमयी त्यांच्या शय्येशेजारी होते. त्यांनी त्यांचे शेवटचे शब्द ऐकले आहेत. युद्ध संपल्यानंतर स्वतंत्र भारत सरकारने जी 'सत्यसंशोधन कमिटी' नेताजींच्या मृत्यूच्या चौकशीसाठी जपानला पाठवली होती, त्या कमिटीपुढे मला व ज्युछी नाकामुरा यांना साक्षीसाठी बोलावण्यात आले होते. मि. नाकामुरा हे फुकुओका या ठिकाणी राहतात. त्यानंतर मात्र आम्ही क्वचित भेटलो असू. ते आता ७९ वर्षांचे वृद्ध झाले असून पेन्शनरचे आयुष्य कंठीत आहेत.

फार दिवसांनी मि. नाकामुरा यांची भेट होत होती. आमची जी मुलाखत झाली ती खालीलप्रमाणे—

मी त्यांना म्हणालो, "तुम्ही उत्साही व प्रफुल्लित दिसता हे पाहून मला फार आनंद होतो. मला असे कळले आहे, की नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या निधनाची चौकशी करण्यासाठी काही भारतीय तुम्हाला फुकुओका येथे येऊन भेटले." "होय, तसाच त्यांचा हेतू होता. मी त्यांना मि. बोस कसे निधन पावले ते सांगितले. त्यांनी मला निश्चित व तपशिलवार माहिती विचारली. मी त्यांना म्हणालो, की मी त्या वेळच्या नोटस् घेऊन ठेवल्या आहेत. त्या मी भारत सरकारने जपानला पाठविलेल्या 'सत्यसंशोधन कमिटी'कडे दिल्या होत्या. त्यांनी त्या नोटस् नक्कल करून घेण्यासाठी माझ्याकडे मागितल्या. त्या मी माझ्या घराकडून आणून त्यांना दिल्या. त्यांनी त्या हाँगकाँगला नेऊन तेथून ते भारतात घेऊन गेले. नंतर त्यांनी त्या आभारपूर्वक माझ्याकडे परत पाठवून दिल्या."

हयासिद : ह्यावरून नेताजींचा मृत्यू घडलेल्या परिस्थितीबद्दल भारतीय जनतेला किती उत्सुकता आहे हे दिसून येते.

नाकामुरा : होय, भारतातील बुद्धिमंतांनाही त्यांच्या मृत्यूच्या परिस्थितीबद्दल फारच थोडी माहिती आहे आणि म्हणून तुम्ही आपल्या पुस्तकात सर्व सत्य परिस्थिती तपशिलवार निवेदन केल्यामुळे त्याला फार महत्त्व आले आहे. आता दिवसेंदिवस माझी स्मरणशक्ती खूपच कमी होत आहे. आणखी थोड्याच वर्षांत नेताजींच्याबद्दल सत्य परिस्थिती सांगणे अशक्य होत जाईल. आमच्या स्मृती नाहीशा होत जातील आणि या प्रसंगातून गेलेली माणसे मृत्यू पावल्यामुळे काहीच कळू शकणार नाही. इंडो–जपानच्या मित्रत्वासाठी आणि माझा त्या अपघातप्रसंगाशी थोडा संबंध आल्यामुळे मलाही थोडीफार उत्सुकता आहेच. तुमच्या या उत्कृष्ट कामगिरीबद्दल मी फार आभारी आहे.

हयासिद : आपण म्हणता त्याप्रमाणे सर्व परिस्थिती असल्याने मी फार पेचात पडलो आहे. ज्या वेळी 'सत्यसंशोधन कमिटी'ने जपानला श्री. सुरेशचंद्र बोस (नेताजींचे वडील बंधू) आणि कमिटीचे इतर सदस्य यांनी भेट दिली त्या वेळी

तुम्हाला भारतास भेट देण्याबद्दल आमंत्रण दिले होते की नाही ?

नाकामुरा : होय, दिले होते, पण माझे वय आता एकोणऐंशी वर्षांचे आहे. आता या वृद्धापकाळात मी तिकडे कसा जाऊ शकेन ? आणि खरोखरच माझ्याऐवजी तुम्हीच जर भारतात गेलात तर बरे होईल. तुमचा रिपोर्ट तयार झाल्यानंतर तुम्ही जाऊन भारतीय जनतेला त्यांच्या मृत्यूची सत्य परिस्थिती सांगू शकाल.

हयासिद : ठीक आहे. मी तुमच्या भावना जाणतो. तुमच्या सदिच्छेला उतरण्याचा मी प्रयत्न करीन. सहज म्हणून विचारतो, की तुम्ही फोर्मोसामध्ये गव्हर्नर जनरलकडे किती वर्षे नोकरीला होता ?

नाकामुरा : साधारण पाहा, जपानच्या शरणागतीपूर्वी दोन वर्षांपासून मी तेथे काम करीत होतो. मी अमेरिकेमध्ये जवळजवळ वीस वर्षे मोत्यांचा व्यापारी म्हणून राहत होतो आणि म्हणून माझी संपर्क अधिकारी या नात्याने फॉरेजिन अफेअर्स डिपार्टमेंटमध्ये निवड झाली.

हयासिद : त्या जागेवर असताना दक्षिणपूर्व आशियामधून येणाऱ्या व जपानला जाण्यासाठी तैफीत राहणाऱ्या बड्या ऑफिसरांची व्यवस्था पाहण्याचे काम तुमच्याकडेच असेल नाही ?

नाकामुरा : फुशारकी म्हणून मी तुम्हाला सांगत नाही; पण खरी गोष्ट अशी, की मी त्यांना सर्वतोपरी मदत करीत होतो. फिलिपाईन्सचे भूतपूर्व प्रेसिडेंट, ब्रह्मदेशाचे भूतपूर्व मुख्य प्रधान आणि नेताजी हे प्रवासात या ठिकाणी थांबत त्यावेळी त्या सर्वांच्याबरोबर माझा परिचय झाला होता. त्यांना अगदी घरच्यासारखे वाटावे म्हणून मी प्रयत्न करीत असे व ते फोर्मोसा सोडताना त्यांचे मत चांगले व्हावे याकडे लक्ष देत असे.

हयासिद : तुमची व नेताजींची किती वेळा भेट झाली होती ?

नाकामुरा : तसं म्हणाल तर, मला वाटतं त्यांच्या मृत्यूच्या वेळी धरून तीन किंवा चार वेळा तरी भेट झाली असेल. अपघाताच्या वेळी मला तावडतोब बोलावण्यात आले होते.

हयासिद : इतर वेळी नेताजी तैफीमधील 'रेल्वे हॉटेल' मध्ये उतरत असत नाही का ?

नाकामुरा : होय, तसे ते तेथे उतरत. भारतात पाठवण्यासाठी वीस शिलिंगची सोन्याची नाणी एक्सचेंज करून आणण्यासाठी मला सांगत व ते मला योग्य तितके पैसे देत. ज्यांना रक्कम पाठवावयाची त्यांची सर्व माहिती देत. वय, लिंग, आणि किती रक्कम पाठवावयाची याची माहिती सांगत व त्याप्रमाणे त्याची विल्हेवाट लावण्यासाठी सांगत. मी तावडतोब डिपार्टमेंटल स्टोअर्समध्ये ते खरेदी करून आणण्यासाठी जात असे व त्यांनी सांगितल्याप्रमाणे पुढील तजवीज करीत असे. मी त्यांच्यासाठी विकत

आणलेल्या प्रत्येक वस्तूंची पावती त्यांना देत असे. मी ज्या पद्धतीने त्यांच्याशी वागणूक ठेवली होती ती त्यांना आवडे व ते माझ्यावर संपूर्ण विश्वास ठेवीत.

हयासिद : ते एक गंभीर प्रकृतीची व्यक्ती होते असे तुम्हाला म्हणावयाचे आहे काय?

नाकामुरा : छे ! छे ! मला तसं काही म्हणावयाचे नाही. ते नेहमी हसतमुख असत व विनोदही करीत. त्यांना ' सुकीयाकी ' फार आवडे. मला आठवते, की ते आणि मी एकदा एकत्र जेवण केले होते. आमचे जेवण पूर्ण झाल्यानंतर मी सहज विनोदाने म्हणालो, की ' तुम्ही ते पुरे होईपर्यंत घेतले ना ? ' ते म्हणाले, मला सुकीयाकी हवी आहे. ' मी आश्चर्याने विचारले, ' सुकीयाकी ? ' ते म्हणाले, ' मी काही तुमच्यासारखा किरकोळ मनुष्य नाही " आणि ते मोठ्याने हसले. मीही त्यात सहभागी झालो.

हयासिद : सहज म्हणून विचारतो, नेताजींच्या मृत्युशय्येजवळ तुम्ही होता असे मी माझ्या पुस्तकात नमूद केले आहे. परंतु त्यांच्या शेवटच्या क्षणी तुमच्या मनावर काय परिणाम झाला हे तुम्ही सांगू शकाल का ?

नाकामुरा : आश्चर्य वाटेल, काय सांगू तुम्हाला ! त्यांचे अंग इतके भयानकपणे भाजले असताही त्यांच्या तोंडून एकही दुःखोद्गार बाहेर पडला नाही. त्याच खोलीत असलेले जपानी लष्करी अधिकारी मात्र दुःखाने विव्हळत होते, आणि या दुःखद वेदना सहन करण्यापेक्षा मृत्यू आलेला बरा असे त्यांना वाटून ते ' आम्हाला ठार करा ' असे ओरडत होते. नेताजींच्या धैर्याचा व शांततेचा माझ्या मनावर फार परिणाम झाला. आणि तुम्हाला आश्चर्य वाटेल, की शेवटच्या क्षणापर्यंत ते शुद्धीत होते.

हयासिद : खरेच हं ! निश्चितपणे ! मला असं कळतं, की ते चार वेळा बोललेले तुम्ही ऐकले आहे.

नाकामुरा : होय. डॉ. योशिमी यांनी नेताजींना त्यांची शेवटची इच्छा, मृत्युपत्र वगैरे काही करून ठेवावयाचे आहे की काय, असे विचारण्याबद्दल सांगितले होते; पण त्यांच्या शेवटच्या इच्छेबद्दल मी विचारण्याचे धाडस कसे करू ? तथापि मी लगेच विचारले, की मी त्यांच्यासाठी खास काही करावे का ? त्याला उत्तर देताना ते म्हणाले, ' माझ्या मागोमाग काही लोक येत आहेत, त्यांची काळजी घ्या. ' पुढे त्यांनी विचारले, की ' ले. ज. शिडये कसे आहेत ?' नंतर त्यांनी सांगितले, ' मला वाटते की माझ्या डोक्यात रक्त चढत आहे. ' आणि ' मला झोप येत आहे. ' त्यानंतर डॉ. योशिमी यांनी त्यांना इंजेक्शन दिले. ते झोपी गेले आणि थोड्याच वेळात त्यांनी अखेरचा श्वास सोडला.

हयासिद : जेव्हा ' सत्यसंशोधन कमिटीने ' १९५६ मध्ये जपानला भेट दिली तेव्हा तुम्ही नेताजींच्या वडील बंधूंना भेटून काही बोललात का ?

नाकामुरा : होय. नेताजींच्याबद्दल मला जे जे माहीत होते ते ते मी त्यांना

सांगितले. जपान आणि भारत यांच्या मागील व पुढील संबंधावर मी थोडीफार चर्चा केली. मी त्यांना म्हणालो, ' जपानी संस्कृती ही मूळ भारतातीलच आहे या बद्दल मी तुम्हाला पुरावा दाखवतो. '

मी त्यांना घराच्या छपरावर घेऊन गेलो आणि त्यांना जवळच्याच एका देवळाचे छप्पर दाखविले. त्यांना खूप आनंद झाला. ते म्हणाले, ' खरेच की, माझ्या देशातील देवळासारखेच हे दिसते. ' आणि नंतर मी माझ्या आंतरराष्ट्रीय विवाहाच्या विषयाकडे वळलो. मी म्हणालो, ' दोन्ही देशाचे संबंध दृढ करावयाचे झाल्यास दोन्ही देशांतील तरुण रक्त मिसळले गेले पाहिजे. ' ते म्हणाले, ' मी तुमच्या मताशी सहमत होत नाही. तथापि माझा अद्यापही असा विश्वास आहे, की जगात कायमची शांती निर्माण व्हावयाची झाली, तर आंतरराष्ट्रीय विवाहानेच ते शक्य होईल.'

६

## इवॅछी फुजीवारा

### सुभाषचंद्र बोस-स्मरण गाथा

मार्च १९४७ च्या अखेरीस कौलालंपूर येथील डिटेक्टीव्ह डिपार्टमेंट यांच्याकडून माझी तीन दिवस कसून चौकशी करण्यात येत होती. त्यांच्या गतवर्षी ३ नोव्हेंबर रोजी माझी सिंगापूर येथील तुरुंगातून कौलालंपूर येथील तुरुंगात बदली करण्यात आली होती व युद्ध गुन्ह्याबद्दल माझ्यावर आरोप ठेवण्यात आला होता. मार्च १९४७ मध्ये माझ्यावर ठेवलेल्या सर्व आरोपांचे निरसन केले होते. तथापि सतत तीन दिवस माझी कसून चौकशी करण्यामध्ये मी त्या आरोपामध्ये अडकला जावा असा हेतू नसून, माझ्याकडून ' सिटा किकान 'च्या कार्यासंबंधी संपूर्ण माहिती मिळावी हा हेतू होता. ' सिटा किकान ' यशस्वीपणे चालण्यात मलाया व चीन या राष्ट्रांकडून व भारतीयांकडून सहकार्य घेण्यात येत होते. या सहकार्याबद्दल मला काय वाटते, हे पाहून डिटेक्टिव्ह डिपार्टमेंट स्वकार्याकरिता त्याचा उपयोग करून घेणार होते. या सर्व प्रकारची फारच गंभीरपणे कसून चौकशी करण्यात येत होती. तथापि डायरेक्टरने मला चांगुलपणाने वागविले. मी बोलत असलेला शब्द अन् शब्द ते फार काळजी पूर्वक ऐकून घेत होते आणि ' सिटा किकान 'च्या कार्याबद्दल ' वैभवशाली यश ' असे वारंवार म्हणत. सुभाषचंद्र बोस यांच्याबद्दलच्या माझ्या निवेदनाकडे त्यांनी खास लक्ष दिले. मी त्यांना सांगितले, " नेताजी बोस हे देशातील मोठ्या क्रांतिकारकांपैकी एक होते. ते फार मोठे देशभक्त होते आणि त्यांच्या अंगी पुढारीपणाची गुणवत्ता होती. दुर्दम्य इच्छाशक्ती, अंतिम त्याग, राजकारणपटुत्व आणि लष्करी दूरदृष्टी, त्याच बरोबर ते सहृदय मानवतावादी होते. आशियातील ते एक महान पुढारी होते."

डायरेक्टर महाशयांनी मी ज्यांच्याबरोबर काम करीत होतो त्यांच्याबद्दल निवेदन करताना त्यांनी मला अनेकवेळा अडथळा केला; पण ज्या वेळी मी नेताजींच्याबद्दल सांगत होतो त्या वेळी त्यांनी काहीही प्रश्न न विचारता शांतपणे मी जे सांगत होतो, ते सर्व ऐकून घेतले.

नेताजी मृत्यू पावून आता एकोणीस वर्षे झाली. तथापि आशियातील १५०० लक्ष लोकांच्या आणि ४०० लक्ष भारतीयांच्या हृदयात ते जिवंत आहेत. अनेक 'संशोधन कमिट्यां'च्या संपूर्ण चौकशी व संशोधनानंतर नेताजी मृत्यू पावले, हे निर्विवाद सत्य असता अनेक भारतीय त्यांच्या मृत्यूवर विश्वास ठेवीत नाहीत. त्यांचा विश्वास आहे, की नेताजी अद्याप कोठेतरी जिवंत असून एक ना एक दिवस अकस्मात प्रगट होतील. त्यांच्या या अज्ञानी भोळया कल्पना कोणीही घालवू शकणार नाही. कारण नेताजींच्या-बद्दल धर्मश्रद्धेसारख्या भावना आहेत व नेताजी हे एक कोणी देवकोटीतील व्यक्ती आहेत असे त्यांना वाटते. नेताजींच्याबद्दल त्यांच्या मनामध्ये अत्यंत आदर, कौतुक आणि नवल अशा भावना आहेत.

१५ ऑगस्ट १९४७ रोजी भारताने स्वातंत्र्य मिळविले. त्यासाठी प्रितमसिंग आणि जनरल मोहन सिंग यांनी आझाद हिंद सेना उभी केली. नेताजींनी त्याचे धुरीणत्व पत्करले आणि भारताच्या स्वातंत्र्याकरिता लढा दिला, असेच म्हणणे जास्त चांगुलपणाचे आहे. जर यदाकदाचित नेताजी युद्धानंतर हयात असते, तर त्यांनी पुढारीपण पत्करून भारताला आपल्या स्वतःच्या पायावर उभे केले असते आणि भारत आणि पाकिस्तान असा झगडा होऊ दिला नसता. युद्धकाळात नेताजींनी या झगड्याच्या शक्यतेचे भविष्य वर्तवलेच होते आणि म्हणून स्वातंत्र्यानंतर भारताचे ऐक्य अबाधित राहाण्यासाठी किमान दहा वर्षे तरी 'एकतंत्री राज्यकारभार' चालू ठेवण्याबद्दल समर्थन केले होते. ते जिवंत असते तर कम्युनिस्ट चीनने सरहद्दीवर कधीही आक्रमण केले नसते आणि ते आशियाचे एक महान पुढारी झाले असते. युद्धोत्तर आशियाच्या आणि जगाच्या इतिहासाला नवे वळण लागले असते.

भारतीय स्वातंत्र्याच्या या पितामहाची रक्षा जपानमधील टोकियोतील सुगीनामी वॉर्डमधील एका लहानशा देवळात ठेवली गेली आहे, ही एक मोठी दयनीय व दुर्दैवी गोष्ट आहे. नेताजींसारख्या महान नेत्यांची रक्षा आत्तापर्यंत भारतात आणून जपून ठेवणे जरूर होते; पण ती तशीच जपानमध्ये मानहानीत राहिली आहे. भारतातील दुर्दैवी व गुंतागुंतीच्या राजकारणामुळे याकडे दुर्लक्ष केले जात आहे, यावर मला विश्वास ठेवावा लागत आहे. तथापि भारतीय लोकांनी नेताजी किती महान होते हे समजून घेतले पाहिजे. त्यांच्या महान कार्याबद्दल मला या ठिकाणी चार शब्द सांगावे असे वाटते.

गतकाळात घडलेल्या गोष्टी पाहता मला प्रत्येक वेळी कशाचे दुःख होत असेल,

तर ते म्हणजे भारताच्या चढाईच्या वेळी आय. एन्. ए. व जपानी लष्कर यांच्या मध्ये संघर्ष निर्माण झाला (इवॅक्युरो किकान प्रतिनिधित्व असल्यावेळी) आणि त्याचा परिणाम म्हणून जनरल मोहनसिंघ यांना अटक करण्यात आली व आय. एन्. ए. चे विलीनीकरण करण्यात आले. त्यानंतर दुसरी आय. एन् ए. जनरल जे. के भोसले यांच्या नेतृत्वाखाली उभी करण्यात आली. या प्रकरणाचा त्रास १९४२ पर्यंत होता व त्याच वर्षाच्या फेब्रुवारीत तो संपुष्टात आला.

भारतीय लोकांच्याबरोबर काम करताना ही एक अत्यंत दुःखदायक घटना घडून गेली. या प्रकारामुळे मला फार मोठा धक्का बसला, कारण मी जनरल मोहनसिंघ यांच्या अगदी निकटवर्ती काम करीत होतो. आय. एन्. ए. निर्माण होण्यासाठी मी शक्यतो संघर्ष होऊ नये आणि त्याची जबाबदारी कोणावरही असू नये म्हणून वाद-विवाद टाळीत असे. आय. एन्. ए. ची वाढ होण्यास व स्वातंत्र्यलढ्याचा विस्तार होण्याच्या कामी अडथळा निर्माण होणार अशी माझी खात्री होती आणि परिणामी यामुळे ब्रह्मदेशात चढाई करण्याच्या कामी एक वर्ष उशीर झाला. जरी इंफाळची चढाई एक वर्ष अगोदर होऊन ती पूर्ण यशस्वी झाली तरी भारत मुक्तीसाठी या पूर्वीच ही योजना तयार केली होती. आणि हीच चढाई भारत मुक्तीसाठी यशस्वी होऊ शकली असती; पण या सर्व प्रकरणामुळे त्यानंतर हीच चढाई संरक्षित नसलेली व अपूर्ण तयारी असलेली अशी झाली. ही गोष्ट 'ॲक्सेस पावर्स' यांनी मान्य केली आहे.

याबद्दल विचार करता, आक्टोबर १९४१ मध्ये पॅसिफिक युद्ध सुरू होण्याच्या दोन महिन्यांपूर्वी मी बँकॉकला एक गुप्त प्रवास करून मि. प्रितमसिंघ व भूतपूर्व आय. आय्. एल. चे सेक्रेटरी जनरल यांच्याशी संपर्क साधला होता. त्यांनी नेताजींच्या चांगल्या कार्याबद्दल फारच वाखाणणी केली आणि भारतीय जनतेचा त्यांना संपूर्ण पाठिंबा असल्याचे खात्रीपूर्वक सांगितले. त्यांनी असेही सांगितले, की भारताच्या स्वातंत्र्यलढ्यात सर्व भारतीय जनतेने सहभागी व्हावे असा नेताजी बर्लिन रेडिओ-वरून संदेश देत असून, ते आपल्या प्रयत्नांची शिकस्त करीत आहेत. मि. प्रितमसिंग यांनी आग्रहपूर्वक मला विनंती केली, की जपानच्या इंपीरिअल जनरल हेडक्वार्टर्स यांच्या मार्फत नेताजींशी संपर्क साधून देण्याच्या कामी त्यांना साहाय्य करावे व त्याच-बरोबर जगाच्या इकडील भागात—ईस्ट एशियामध्ये नेताजींना आणण्याची व्यवस्था करून त्यांच्याकडे भारताच्या स्वातंत्र्य मोहिमेची सर्व सूत्रे सुपूर्त करावीत. मिळेल त्या संधीचे वेळी त्यांनी आपली ही विनंती पुन्हा पुन्हा सांगितली. त्यांनी या प्रकरणी जनरल भोसले यांच्याशी संपर्क साधला. पुन्हा निर्माण केलेल्या आझाद हिंद फौजेची जोरदार शिफारस करून त्यांची योजना मी इंपीरिअल जनरल हेडक्वार्टर्स यांच्याकडे पाठविली.

तथापि इंपीरिअल जनरल हेडक्वार्टर्स या योजनेवर फारच थंडपणे विचार करीत

होते. जर्मन लष्कर विजयाच्या शिखरावर होते व अशा प्रकारच्या योजनेस ते सम्मती देणार नाहीत अशी सबब पुढे करण्यात येत होती. इंपीरिअल जनरल हेडक्वार्टर्समध्ये हा एक वादाचाच मुद्दा झाला होता ही गोष्ट खरीच आहे. परंतु या योजनेला नकार देण्याचे मुख्य कारण नेताजींच्या बद्दल फारच थोडी माहिती त्यांना होती व भारतावर चढाई करण्याचे कारण कारणपरत्वेच असून त्याबद्दलची संपूर्ण माहिती व विचारही केला गेला नव्हता हे आहे. इकडे तर युद्ध सुरू होण्याच्या सुरुवातीस व प्राथमिक अवस्थेत मि. रासबिहारी बोस व इतर जपानमध्ये राहणारे भारतीय पुढारी यांच्याबद्दल पूर्ण विश्वास वाटत नव्हता.

आझाद हिंद फौज व आय्. आय्. एल यांच्या विनंतीप्रमाणे नेताजी सुभाषचंद्र बोस यांना ईस्ट एशियात आणण्यात जपानने पूर्वीच सात महिने प्रयत्न केला असता आणि जर मोहनसिंघ प्रकरण टळले असते, तर आमची भारतावरील चाल प्रगतिकारक, अधिक जलद व दूरगामी झाली असती.

मि. उत्तमचंद यांच्या 'हिंदुस्तान टाईम्स' मधील युद्धसमाप्तीनंतर तावडतोब प्रसिद्ध झालेल्या Record of Exile of Nataji in Berlin या लेखाप्रमाणे नेताजींनी प्रगटपणे जपानमध्ये आश्रय घेतला असता तर फारच बरे झाले असते; पण नेताजी बर्लिनमध्ये गेले. तेथे असताना आय्. आय्. एल. व आय्. एन्. ए. ची प्रगती पाहून ते आनंदित झाले. तथापि पूर्व अशियामध्ये जाण्याची त्यांची फार प्रबळ इच्छा होती. पूर्व अशियामध्ये येण्यास त्यांना विलंब लागण्याची अनेक कारणे आहेत, पण ही मोठी खेदाचीच गोष्ट झाली.

१९४३ च्या २६ ऑगस्ट रोजी सिंगापूर येथील उपनगरात असलेल्या कार्न या त्यांच्या निवासस्थानी मी प्रथम त्यांना भेटलो, त्यावेळी मला मिठी मारून त्यांनी माझा सन्मान केला. माझी त्यांच्याबरोबर झालेली नाट्यमय बैठक मला स्पष्टपणे आठवते. त्या प्रसंगाची आठवण येताच मी आतामुद्धा सद्‌गदित होतो. एका कार्यालयीन कामासाठी माझ्याबरोबर मेजर जनरल मोमोयो कुनोमुरा (१५ व्या आर्मीचे चीफ ऑफ दी स्टाफ) होते. 'हिकारी किकान'चे सल्लागार मि. सेन्डा यांनी दुभाष्याचे काम केले. या बैठकीपूर्वीच माझी साऊदर्न आर्मी हेडक्वार्टर्समधून ब्रह्मदेशात नव्यानेच स्थापित केलेल्या १५ व्या आर्मीवर आर्मीकमांडर म्हणून बदली झाली होती.

१५ व्या आर्मीचे कमांडर ले. ज. केन्या मुटागुछी यांच्या शिफारसीप्रमाणे इंपीरिअल जनरल हेडक्वार्टर्स टोकिओ यांनी 'भारतावर चाल करून पुढे जाण्याचा (इंफाळवर)' फार दिवसांपासून लोंबकळत राहिलेला हुकूम सोडला. हा हुकूम मिळताच इंफाळवर चाल करून जाण्याची जोरदार मोहीम सुरू झाली. मध्यंतरीच्या काळात १८ ऑगस्ट रोजी क्युबामध्ये 'अलाइड पावर्स'च्या ब्रिटन व अमेरिका यांच्या उच्च अधिकाऱ्यांची बैठक, ब्रह्मदेश पुन्हा हस्तगत करण्यासंबंधी विचारविनीमय

करण्यासाठी भरली.

या परिस्थितीमुळे ब्रह्मदेश-चीनच्या सरहद्दीवर युद्धाचे जोरदार ढग उठू लागले. ब्रिटिश-भारतीय सैन्य पश्चिमेकडून, अमेरिका-चीन फौजा उत्तरेकडून, आणि चुंकींगचे सैन्य पूर्वेकडून अशा सर्व फौजा एकाचवेळी ब्रह्मदेश पुन्हा जिंकून घेण्यासाठी सुसज्ज झाल्या. अशा जलद गतीने बदलत्या युद्ध परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर ६ मे रोजी सुमात्राच्या साबांग बेटावर नेताजी यशस्वीपणे उतरले आणि तेथून ते टोकिओला गेले. तेथे त्यांनी मुख्य प्रधान टोजो, इतर सरकारी प्रमुख आणि लष्करी प्रमुख यांची भेट घेऊन त्यांच्याबरोबर पुढील योजनेवर चर्चा केली. तेथून ते ७ जुलै रोजी सिंगापूरला परत आले आणि भारताच्या स्वातंत्र्याकरिता पुढे लढण्याचा त्यांनी निर्धार केला. यामुळे एक चैतन्यमय वातावरण निर्माण झाले. आझाद हिंद सैन्याच्या ३०,००० सैनिकांचे आणि सेनाधिकाऱ्यांचे मनोधैर्य उत्स्फूर्त झाले. मोहन-सिंघ घटनेपासून या सैन्यात एक विषण्णतेची लाट निर्माण झाली होती ती पार नाहीशी झाली. जणू काही या लढ्याला पाठिंबा देण्यासाठीच नेमक्या यावेळी भारतात ब्रिटिश विरोधी जोरदार चळवळ सुरू झाली. ८ व ९ ऑगस्ट रोजी मुंबईत भरलेल्या काँग्रेसच्या अधिवेशनात ब्रिटिशांनी भारतातून निघून जावे ( Quit India ) ‘ चले जाव ’ असा ठराव पास करून ताबडतोब असहकाराची व सत्याग्रहाची चळवळ सुरू झाली. अशा या वादळी वातावरणात फिल्ड मार्शल तेराऊछी साऊदर्न आर्मी हेडक्वार्टर्स यांनी ऑगस्ट महिन्याच्या शेवटी सर्वांची मिटिंग घेऊन सांगितले, की साऊदर्न आर्मीच्या अधिकाराखाली असलेल्या सर्व फौजा सुसज्ज करून ब्रिटिश भारतावर चाल करून जाण्यासाठी तयारीत राहावे. यासाठी सर्व फौजा साऊदर्न आर्मीच्या आधिपत्याखाली एकत्र कराव्यात.

जनरल कुनोमुरा व मी या मीटिंगला हजर होतो. त्या प्रसंगी नेताजींना भेटण्याचे ठरविले. नेताजींच्या निवासस्थानासमोरील हिरवळीवर सूर्यप्रकाश पडला होता. ती एक ब्रिटिश पद्धतीची अलिशान इमारत होती. आम्ही मोटारीने थेट त्यांच्या निवास-स्थानावर जाऊन पोहोचलो. माझ्या मनात न कळत विचार आला, की मी ज्यावेळी याच इमारतीत राहणाऱ्या मोहनसिंघ यांना भेटण्यासाठी जात असे त्यावेळी ते हसतमुखाने बाहेर येऊन मला आत घेऊन जात असत. आम्ही मग मुख्य दिवाण-खान्यात जाऊन बसत असू. आता आम्ही पोर्चमधून आत जाताच माझे जुने मित्र ले. क. रेहमान मला भेटले. त्यांच्यासह आम्ही दिवाणखान्यात आलो. आझाद हिंद फौजेच्या अधिकाऱ्याचा गणवेष परिधान केलेली एक उंच व्यक्ती आमच्याकडे येत होती आणि हेच ते नेताजी होत. एखाद्या जुन्या मित्राप्रमाणे त्यांनी आमचे स्वागत केले. ते एक मोठे प्रतिष्ठित गृहस्थ होते आणि एखाद्या निस्सीम देशभक्ताला व क्रांतिकारकाला लागणारे सर्व गुण त्यांच्या ठिकाणी होते. सुसंस्कृत, सुशिक्षित, प्रचुर

विद्वत्ता, आत्मनिर्धार, ठाम विचार आणि मानवता असलेले असे ते आम्हाला वाटले. त्यांच्या चेहऱ्यावरून मला असे वाटले, की त्यांचा माझ्यावर विश्वास आहे. जनरल कुनोमुरा यांच्याशी हस्तांदोलन करून माझ्याकडे वळले, त्यांनी माझ्या खांद्यावर हात ठेवला व माझे हात हातात घेऊन ते हलवले. ते माझ्याशी मित्रत्वाने व आत्मीयतेने वागले. इतके की मला गहिवरून आल्यासारखे झाले. आणि त्यानंतर त्यांनी आम्हाला बसण्याची विनंती केली. सहा महिन्यांनंतर मी प्रथमच येथे येत होतो. माझ्याशी हस्तांदोलन करण्यासाठी स्टाफ ऑफिसर्स माझ्या भोवती जमा झाले. सर्व जण आपआपल्या जागेवर बसल्यावर नेताजींनी आझाद हिंद फौजेकरिता जे काही मी केले त्याबद्दल माझे आभार प्रदर्शित केले. ते मला म्हणाले, "मी तुमच्या भेटीची फार दिवसापासून वाट पाहत होतो मेजर फुजीवारा ! तुमच्या भेटीमुळे मला फार आनंद होत आहे. जनरल मोहनसिंग, आझाद हिंद फौजेचे ऑफिसर्स, आय. आय. एल. चे मेंबर्स, त्याचप्रमाणे मि. सिडये यांच्याकडून तुमच्याबद्दल मी खूप ऐकले आहे. मी तुमचे मनःपूर्वक आभार मानतो. आझाद हिंद सेनेला तुम्ही आणि जनरल मोहनसिंघ यांनी जन्म दिला आहे. भारतीय जनता ज्या एका क्रांतिकारक फौजेची वाट पाहत होती, ती फौज तुम्ही दोघांनी निर्माण केली आणि माझ्याकडे सुपूर्त केली. एकाच गोष्टीचे मला दुःख होते, की जनरल मोहनसिंघ हे माझ्याबरोबर तुमचे अभिनंदन करण्यासाठी आता या ठिकाणी नाहीत. यदाकदाचित जर आझाद हिंद फौजेचे अधिकारी त्या दिवाणखान्यात नसते तर नेताजींनी मला विश्वासात घेऊन जनरल मोहनसिंगाच्याबद्दल किती महत्त्वपूर्ण विचार केला होता ते सांगितले असते. मी त्यांचे मन ओळखू शकतो. कारण ले. कुनिट्स्यूका यांनी मला सांगितले होते, की ते येण्याच्या दुसरे दिवशी त्यांची व जनरल मोहनसिंघ यांची तुरुंगातच भेट घडवून आणण्यास त्यांनी संमती दिली होती. जनरल मोहनसिंघांचे व्यक्तिमत्त्व व वागणूक मोठ्या प्रतिष्ठेची होती.

माझ्या ठिकाणी वसत असलेला त्याच्याबद्दलचा मोठा आदरभाव मी व्यक्त केल्या-नंतर मी नेताजींना म्हणालो, की त्यांना पूर्व आशियात पुन्हा कार्य करण्याची संधी प्राप्त झाल्यास मला फारच आनंद होईल. मी त्यांना सुचविले, की प्रितमसिंघ व जनरल मोहनसिंघ आणि मी यांची अशी इच्छा होती, की आपण पूर्व आशियामध्ये यावे. तेथील विभागीय कार्यासाठी आणिबाणीच्या प्रसंगी फारच फारच उपयोग होणार होता व सर्व सूत्रे आपल्याकडे सोपवून आम्ही आमचा लढा आपल्या मार्गदर्शनाखाली चालू ठेवला असता. त्यांनी आझाद हिंद फौजेचे नेतृत्व स्वीकारल्यामुळे मला फारच आनंद झाल्याचेही मी त्यांना सांगितले. त्या दिवाणखान्यात आझाद हिंद फौजेचे बरेचसे अधिकारी असल्यामुळे मी त्यांना जनरल मोहनसिंघ यांना बंदिवासातून मुक्त करण्या-साठी साहाय्य करावे म्हणून विनंती करणार होतो; पण मी ते मोठ्या संयमाने टाळले.

ते मुक्त झालेले पाहून मला फार आनंद झाला असता. मला असे वाटत होते, की नेताजी त्यांची मुक्तता केल्याशिवाय राहणार नाहीत. तथापि या गोष्टीस फारसे महत्त्व नव्हते आणि अखेरपर्यंत, युद्ध संपले तरी जनरल मोहनसिंग बंदिवासातच होते. मला असे वाटते, की जनरल मोहनसिंघांची मुक्तता करण्याचे धैर्य नेताजींना झाले नसेल. यामुळे त्यांच्यापुढे पेचप्रसंग निर्माण झाला असता. विशेषतः हिकारी किकान ( जपानी लष्कराचे संपर्क साधन अधिकारी ) यांच्याबरोबर मतभेद होण्याची शक्यता होती. जनरल मोहनसिंघांच्याबद्दल अधिक बोलण्याचे मी टाळले आणि मे. ज. कुनोमुरा यांना आपण भेटीस येण्याचा मुख्य उद्देश सांगण्याबद्दल सुचविले. मे. ज. कुनोमुरा यांना उत्तम जर्मन भाषा येत होती; कारण ते एके वेळी जर्मनीत राहत होते. नेताजींनाही ही भाषा समजत होती. मे. ज. कुनोमुरा यांनी नेताजींना सांगितले, की १५ व्या लष्कराला त्यांच्या हेडक्वार्टर्सकडून इंफाळ चढाईसाठी सज्ज व्हावे असा हुकूम आला आहे आणि १५ व्या लष्कराचे प्रमुख जनरल मुटागुछी यांचा ही चढाई यशस्वी करण्यासाठी व भारतमुक्तीसाठी आझाद हिंद फौजेला संपूर्ण सहकार्य करण्याचा मानस असल्याचे त्यांनी सांगितले. नेताजींनी ज. कुनोमुरा यांचे बोलणे शांतपणे ऐकून घेतले व स्मितहास्य केले. नंतर त्यांनी ज. कुनोमुरा यांच्याशी हस्तांदोलन केले व आपले समाधान व सदिच्छा व्यक्त केल्या. नेताजींनी बर्लिनमध्ये असताना रात्रंदिवस ज्या गोष्टीचा विचार केला होता तीच ही गोष्ट असावी. नेताजी टोकिओत असताना मुख्य प्रधान टोजो यांच्याकडे व सरकारी आणि लष्करी अधिकाऱ्यांकडे अशा प्रकारचे साहाय्य करण्याबद्दल व सहकार्य देण्याबद्दल त्यांनी बोलणी केली होती. आणि याच विनंतीची जपान्यांवर प्रामुख्याने छाप पडली असावी.

नेताजींनी जनरल कुनोमुरा यांना विनंती केली, की आझाद हिंद फौजेचा, चढाईमध्ये योग्य त्या ठिकाणी पुढे जाण्यासाठी उपयोग करण्यात यावा आणि त्यांच्या पितृभूमीवर ते प्रथम पाऊल टाकतील अशी संधी त्यांना देण्यात यावी. जनरल कुनोमुरा यांनी माझ्याकडे पाहिले. मग त्यांनी नेताजींच्याकडे वळून त्यांना शक्य तेवढे त्यांच्या विनंतीप्रमाणे करण्याचे, आश्वासन दिले. आम्ही या योजनेवर खुलासापूर्ण विचार विनिमय करण्यासाठी पुन्हा भेटण्याचे आश्वासन दिले. नेताजींना खात्री होती, की आझाद हिंद फौज आसामवर चाल करून गेली, तर तेथील भारतीय जनता उठाव केल्याशिवाय राहणार नाही. मला असे दिसून आले, की त्यांचे मन इंडो-बर्मा सरहद्दीवर घुटमळत होते. मुख्य चर्चा संपल्यानंतरही नेताजी एकच प्रश्न पुन्हा पुन्हा विचारीत राहिले, की आझाद हिंद फौजेबद्दल जपानी लष्कराची काय योजना आहे? बर्मा चढाईबद्दल नेताजी, आझाद हिंद फौजेला जणू काही 'आगे चलो'चा हुकूम देण्यात आला असून ती प्रत्यक्षात पुढे जात आहे, अशा आविर्भावात बोलत होते. नंतर आम्ही निघण्यापूर्वी बर्लिन व टोकिओच्या काही गप्पा मारल्या.

नेताजींच्याकडून मीटिंग संपवून येताना, वाटेत माझ्या मनावर नेताजींनी जो प्रभाव पाडला होता त्याचा व माझ्या मनात जी खळबळ निर्माण झाली होती त्याचा कैफ टिकून होता. मला एक स्वप्न पडत होते, की भारताच्या मुक्तीसाठी आझाद हिंद फौजे-बरोबर मी संचलन करीत होतो. हेच स्वप्न खरे ठरण्यासाठी मि. प्रितमसिंघ व मि. मोहनसिंघ व प्रयत्न करीत होतो.

इंफाळवर चढाई करण्याचा १० जानेवारी १९४४ रोजी अखेरचा निर्णय घेण्यात आला. फेब्रुवारीच्या सुरुवातीस १५ व्या लष्कराचे प्रमुख जनरल मुटागुछी यांची नव्या हेडक्वार्टर्सवर नेताजींनी आपल्या अधिकारी लोकांसह भेट घेतली. ते एकमेकांना प्रथमच भेटत होते. त्यांनी जपान–हिंद यांच्या बरोबरीच्या चालीबद्दल चर्चा केली. नेताजींच्या आगमनाबद्दल स्वागत समारंभ आयोजित केला गेला व त्यांना अल्पोपहार देण्यात आला. त्या नंतर मला नेताजींनी ते राहत असलेल्या अतिथिगृहात बोलावून घेतले व या योजनेस संपूर्ण सहकार्य देण्याची विनंती केली. त्याबरोबरच आझाद हिंद फौजेने व्यापलेल्या भागावर मुलकी देखरेख करण्यास सांगितले. नंतर ते आणि मी पहाटेपर्यंत चर्चा करीत बसलो होतो. मला त्यांच्या भावनोत्कटतेबद्दल व दक्ष योजने बद्दल आश्चर्य वाटले. मी त्यांच्या म्हणण्याप्रमाणे शक्यतो सर्व काही करण्याचा प्रयत्न केला. मी या बैठकीत जे काही झाले त्याबद्दल व ‘ इंफाळच्या चढाई ’बद्दल अधिक काही सांगणार होतो; पण ही संधी मी पुन्हा केव्हातरी घेईन.

७

## नेताजींचे व्यक्तिमत्त्व

## ताडामोटो निगीबी

( नेताजींचा दुभाष्या–हिकारी किकान संबंधित )

थायलंडमधील राजदूत टिस्यू बोगामी यांनी माझ्याकडे आझाद हिंद सरकारचे मुख्य अधिकारी नेताजी यांना निरोप पोहोचविण्याची कामगिरी सोपविली. १५ ऑगस्ट १९४५ रोजी पत्राने त्यांना कळविण्यात आले होते, की “ बादशहाचे सार्वभौमत्व अबाधित ठेवण्याची अट घालून जपान सरकारने अंतिम ‘ पॉट्स् डॅम ’ जाहीरनामा स्वीकारला आहे.” त्यावेळी मी हिकारी किकानच्या सिंगापूर विभागाचे काम करीत होतो व माझी बदली थोड्या काळापुरती नेताजींच्या कार्यालयाकडे झाली होती. मी नेत असलेल्या पत्राच्या गंभीर स्वरूपाने मी थोडा भ्यालेलाच होतो. त्यावेळी नेताजी आझाद हिंद सेनेच्या ‘ सेरिंबान ’ कॅंपवर देखरेखीसाठी होते. सिंगापूर ते सेरिंबान येथे जात असता गेल्या तीस वर्षांतील गतस्मृती माझ्या मनात एका पाठोपाठ येत होत्या. ज्यावेळी मी तेथे जाऊन पोहोचलो त्यावेळी मी माझे मन शांत ठेवण्याचा प्रयत्न केला.

मी नेताजींना सांगितले, की टिस्यू बोगामी या राजदूताकडून मी एक पत्र घेऊन आलो आहे. माझ्याकडील पत्र घेऊन ते फोडून पाहत असता ते म्हणाले. "......त्यांनी दुसरा ॲटमबॉम्ब टाकला की काय ?..." नंतर त्यांनी पाकीट खोलून ते पत्र वाचले. पण त्यांच्या डोळ्यांची पापणीही हालली नाही. ८० लक्ष लोकांनी विनशर्त शरणांगतीचा अनुभव घेतला. जपानी जनतेपैकी मीही एक होतो. त्यामुळे मलाही धक्का बसला होता व मी दिङ्मूढ झालो होतो. नेताजी हे एका देशाचे प्रमुख होते व त्यांच्या हाताखाली शेकडो, हजारो सैन्य तुकड्या युद्ध करीत होत्या. त्यांच्यावर फारच मोठी जबाबदारी होती. ते कधीही दुःखी झाले नाहीत. त्यांच्या धैर्याचे मला फारच कौतुक वाटले. गेले नऊ महिने मी त्यांच्या सानिध्यात होतो. त्यांनी आलेली बातमी शांतपणे स्वीकारल्यामुळे मला त्यांच्याविषयी फारच आदर वाटला. जपानवर शरणागतीचे काय परिणाम झाले याची मला त्यावेळी कल्पना आली नाही. त्या ठिकाणी असा एकही जपानी नव्हता, की ज्याच्यावर विश्वासावे. जपानच्या भवितव्याबद्दल मी नेताजी बोसना विचारले. माझे समाधान व्हावे म्हणून ते म्हणाले, "जपानच्या बादशहाकडून शरणागती पत्करावी म्हणून हुकूम निघेल आणि तुम्ही त्यांचा हुकूम अवमानित करणार नाही. सार्वभौमत्व पद्धत अबाधित राहील आणि तात्पुरत्या राज्यप्रतिनिधीचा अम्मल चालू होण्याची शक्यता आहे. कालांतराने जपान पुन्हा आपल्या पायावर उभा राहू शकेल. तेव्हा तुम्ही सर्व संघटित व्हा." नेताजींनी युद्ध परिस्थितीच्या ज्या दुःखदायक घटना घडणार आहेत त्यांच्यापुढे निर्धाराने जायचे ठरविले व स्वतःच्या मनाची तयारी केली. ते या सर्व गडबड गोंधळात अत्यंत शांत होते, असे म्हणणे म्हणजे एक धाडसच होय; पण सत्य परिस्थिती तशी वाटत होती खरी. आणि त्यांनी जपानचे भविष्यही बरोबर ओळखले होते.

जपानची शरणागती ऐकताच नेताजींनी पहिली कार्यालयीन कामगिरी कोणती केली असेल, तर ती म्हणजे निरुपयोगी प्रतिकार बंद करण्याचा हुकूम काढला आणि जपानकडून घेतलेली व आता 'साऊदर्न डेव्हलपमेंट बँकेत' ठेवलेली सर्व रक्कम काढून घेतली. ( जपानकडून घेण्यात आलेले १०० लक्षांपैकी ८० लक्ष उपयोगात न येता शरणागतीचे वेळी शिल्लक होते ) नंतर ती सर्व रक्कम आझाद हिंद सरकारच्या अधिकाऱ्यांना व आझाद हिंद फौजेतील सर्वांना त्यांनी वाटून टाकली. पूर्व आशियामध्ये ज्या ज्या ठिकाणी आझाद हिंद सरकारचे प्रतिनिधी व अधिकारी होते त्या सर्वांनाही रकमा पोहोचत्या केल्या. नेताजींनी आपल्या अधिकारात एक ' महिला फौज ' निर्माण केली होती. ती एक महिन्यापूर्वीच विलीन करून टाकली होती. त्या फौजेपैकी दोन महिला तेथेच होत्या. त्यांना आपल्या पालकांकडे जाण्यास प्रवासाची काही सोय नसल्याने त्या तेथेच राहिल्या होत्या. नेताजींनी मला त्या महिलांना घेऊन स्टेशनवर जाण्यास व तेथून बँकॉकला जाणाऱ्या गाडीत बसवण्याची त्यांनी विनंती केली. अकस्मात आलेल्या संकटग्रस्त परिस्थितीत

सर्वांकडे लक्ष देणे शक्य नसताही नेताजींचे सर्वांकडे लक्ष होते. नेताजींचा स्वतःवर फार ताबा होता. ते आत्मसंयमी होते आणि अत्यंत कनवाळूही होते. दोन महिला सैनिकांच्या प्रवासाच्या अडचणीसुद्धा त्यांनी लक्षात घेऊन त्यांचे निराकरण केले. या प्रसंगा-पूर्वीचा एक प्रसंग म्हणजे, जेव्हा इंफाळ सरहद्दीवर त्यांचा पराभव होतो आहे असे दिसले, तेव्हा ब्रह्मदेशामधील जपानच्या लष्करी प्रमुखांनी नेताजींना माघार घेण्याबद्दल सुचविले व तो भाग सोडून जाण्यास सांगितले. त्यावेळी एका महिला तुकडीला नदी पार करून जावयाचे होते आणि वरून शत्रुसैन्याची विमाने हल्ला करीत होती. तेव्हा नेताजी स्वतः आपल्या वहानातून उतरले व ती संपूर्ण तुकडी नदी पार करीपर्यंत देखरेख करीत तेथेच थांबले. सर्वांच्या शेवटी ते नदी पार करून आले व ती तुकडी संपूर्ण संरक्षित जागेत जाईपर्यंत स्वतः मदत करीत राहिले. ही परिस्थिती त्यांनी कशी हाताळली यावरून त्यांची कुशलता व आत्मीयता दिसते. त्यांच्यापासून संचलन करणाऱ्या सैन्याबरोबर कसे वागावे हे अभ्यसनीय होते.

केंब्रिज युनिव्हर्सिटीतून पदवी संपादल्यानंतर ते आय्. सी. एस्. परीक्षाही उत्तम तऱ्हेने पास झाले होते. ते एक उच्च प्रतीचे बुद्धिवंत गृहस्थ होते. तथापि त्यांना लष्कराचा पूर्व अनुभव नव्हता. असे असताही एखाद्या निष्णात लष्करी अधिकाऱ्यापेक्षाही अधिक उत्तम तऱ्हेने त्यांनी आपल्या फौजांचे मार्गदर्शन केले. एकाच व्यक्तींत विद्वत्ता, धैर्य व दयाळूपणा असणे हे दुर्मिळच; पण ते असल्यामुळेच नेताजी फार भाग्यवान होते. निःशंकपणे ते एक जन्मजात लष्करी अधिकारी होते. हिटलर आणि मुसोलिनी यांच्यासारखे हुकूमशहा ते नव्हते, तर ते निराळ्याच पद्धतीचे नेते होते. उत्तम प्रतीच्या शैक्षणिक पात्रतेच्या पार्श्वभूमीवर त्यांची बुद्धिमत्ताही फार मोटी होती. युद्ध सुरू होण्यापूर्वी मी सहा वर्षे भारतात राहत होतो आणि मी सुदैवी असा की युद्धानंतर मी पुन्हा भारताच्या संबंधित झालो. पूर्वीच्या त्यावेळी मला अनेक भारतीय लोकांनी नेताजींच्याबद्दल माझे मत विचारले. मी यत्किंचितही न घुटमळता त्यांना सांगितले, की नेताजींच्या सारखा महान नेता शतकातून एखादेवेळीच जन्मास येतो. पाश्चिमात्य देशात यांपूर्वीच त्यांचा जन्म झाला असता, तर त्यांनी सर्वोच्च प्रेसिडेंट किंवा मुख्य प्रधान म्हणून इतिहासात आपले नाव अमर केले असते. किंवा नियतीचा असाही उद्देश असेल, की नेताजींसारखी महान व्यक्ती भारतात जन्म पावावी. भारत परकीयांच्या जुलमी सत्तेखाली निपचित पडला होता म्हणून त्याला अशा महान व्यक्तीची मोठीच गरज होती.

नेताजींचा मृत्यू ही एक शोकांतिका आहे. तथापि जगातील असंख्य लोकांच्या हृदयात नेताजींचे स्थान अमर आहे व त्यापासून त्यांना स्फूर्ती मिळते.

मला फारच आनंद होत आहे, की मिस्टर हयासिद यांनी अत्यंत काळजीपूर्वक व परिश्रमपूर्वक नेताजींच्या आकस्मिक मृत्यूच्या परिस्थितीचे संकलन केले आहे. त्यामुळे तरी त्यासंबंधीचे गैरसमज दूर होवोत.

८

## इसामू सकाई

( भूतपूर्व जपानीज इंपीरिअल आर्मीमध्ये मेजर )

## भारतीय स्वातंत्र्यलढ्याचे सिंहावलोकन

मि. टाटसो ह्यासिद हे नाकानो आर्मी स्कूल ( सध्या अस्तित्वात नाही ) मध्ये माझे ज्यूनिअर म्हणून होते. ज्या विमान अपघातात मि. सुभाषचंद्र बोस यांचा आकस्मिक मृत्यू घडला त्या विमान अपघाताचे वेळी ते हजर राहिले होते. त्याचप्रमाणे ते नेताजींची रक्षा व खजिना जपानला घेऊन गेलेले गृहस्थ आहेत. मि. ह्यासिद हेच नेताजींना प्रत्यक्ष काय घडले हे सांगू शकतील. त्यांच्यावर नेताजींच्या भव्य व्यक्तिमत्त्वाची छाप पडली होती. नेताजींनी इतिहासातले एक अत्यंत तेजस्वी पान उघडले होते. अशा या भारतीय महान नेत्याबद्दल परिपूर्ण माहिती संकलित करून ती विस्तृतपणे पुस्तकरूपाने प्रसिद्ध करण्याचा प्रयत्न मि. ह्यासिद करीत आहेत. यामुळे त्यांच्या दुःखद मृत्यूच्या प्रसंगाची साखळी कशी बनत गेली यावर प्रकाश पडेल. एक स्वतंत्र राष्ट्र म्हणून स्वातंत्र्य आणि शांतता उपभोगीत असलेल्या भारतातील जनतेला या पुस्तकप्रकाशनाचा फायदा होईल असे वाटते. कै. नेताजी सुभाषचंद्र बोस हे पूर्व आशियामध्ये असताना मी त्यांच्या सहवासात राहून त्यांचे कार्य फार जवळून पाहिले आहे, आणि माझ्या वैयक्तिक अनुभवावरून, माझ्याजवळ असलेल्या लहान संदर्भावरून मी भारताच्या स्वातंत्र्य चळवळीचा लोकांना माहीत नसलेला भाग सांगणार आहे. माझे विचार लिहिताना माझ्याजवळ साहित्यिक कला नाही याबद्दल मी दिलगीर आहे. तथापि पूर्व आशियामधील देशांच्या बरोबरीने व अत्यंत निकटवर्ती युद्धकाळात ज्या जपानी सैनिकांनी जगातील या भागात राहणाऱ्या लोकांच्या कल्याणासाठी जे कार्य केले त्या कार्याकडे या लेखामुळे लक्ष वेधले, तरी मी लिहिलेल्या लेखाचा उद्देश सफल झाला याबद्दल मला समाधान वाटेल.

१९४० च्या वसंतऋतूत ' कोकुगाकोन ' या ठिकाणी मी ' सुमो ' खेळांच्या स्पर्धा पाहत असता एक भारतीय माझ्या जवळ बसलेला मी प्रथमच पाहिला. सदरचे क्रीडांगण टोकिओतील रयोगोकु या विभागात आहे. त्यावेळी मी जी २ ( इंटलिजन्स) संबंधित आर्मी ऑफिसर होतो आणि माझ्याकडे ब्रिटिश-मलाया द्वीपकल्पाचे भौगोलिक लष्करी स्पष्टीकरण करून सांगण्याचे काम होते. ' सुमो ' त्यावेळी जपानमध्ये महत्त्वाचा खेळ समजला जात होता आणि या खेळाचा सर्वांत मोठा क्रीडापटू ' फुटाबायामा ' हा विजयाच्या शिखरावर होता. ' सुमो ' स्पर्धा त्यावेळी फारच लोकप्रिय होत्या आणि त्यावेळच्या सरकारने या खेळास राष्ट्रीय खेळ म्हणून मान्यता दिली होती. जवळच

मंडलाकार बसलेल्या लोकांच्या मध्ये माझी जागा होती. माझ्या जवळच्या उजव्या बाजूच्या पलीकडील सीटवर दोन व्यक्ती बसल्या होत्या. त्यांच्याकडे माझे लक्ष गेले. त्यांतील एक व्यक्ती वर्णाने काळसर असून ती परकीय वाटली. ही परकीय व्यक्ती म्हणजे मि. ए. एन्. निले असल्याचे पाहून मला आश्चर्य वाटले. या व्यक्तीस ब्रिटिश सरकारने स्वातंत्र्य चळवळीत भाग घेतल्यामुळे भारताबाहेर हाकलून दिले होते, व ते आणि त्यांच्यासारखे काही भारतीय तरुण जपानमध्ये आपला वेळ घालवीत होते. एखाद्या जुन्या मित्राप्रमाणे ते चांगल्या प्रकारे उत्तम जपानी भाषेत माझ्याबरोबर बोलले. मि. मिस्यूस तायशो या आंतरराष्ट्रीय जपानी देशभक्तांनी या थिएटरच्या गॅलरीतील आमच्या सीटम् जवळ जवळ असण्याची व्यवस्था केली होती. माझी व मि. निले यांची ओळख होऊन त्यांची माहिती झाल्यावर मला भारताबद्दल अधिक आकर्षण निर्माण झाले. भारताबद्दलची माझी उत्सुकता ब्रिटिशांनी भारतावर वसाहतवाद लादला त्या वेळीच झाली होती. माझ्या लष्करी कार्यालयीन कामात माझ्याकडे असलेल्या विभागाची मर्यादा वाढून भारतही माझ्या कार्याचा भाग म्हणून वाढवला गेला व मला सर्व ब्रिटिश वसाहतीचे संशोधन करणे आवश्यक झाले. त्याचप्रमाणे मला ब्रिटिशांच्या वसाहतवादी धोरणाचा भारतीय लोकांच्यावर होणाऱ्या परिणामाचेही संशोधन करणे जरूर झाले. मध्यंतरी ब्रिटिश सत्तेविरुद्ध चालू असलेल्या स्वातंत्र्याच्या लढ्याची माहिती मी मिळविली. त्यावेळी जपानमध्ये आपल्या हद्दपारीचा वेळ घालवत असलेले फारच थोडे भारतीय होते. त्यामध्ये भारतीय देशभक्त रासबिहारी बोस, सहाय्या, प्रताप आणि लिंघम हे होते. या भारतीयांच्या संबंधामुळे भारतात चाललेल्या स्वातंत्र्याच्या लढ्याच्या इतिहासाची माहिती मला मिळू शकली. सुभाषचंद्र बोस हे नॅशनल काँग्रेस पार्टीमध्ये अध्यक्ष असताना ते स्वातंत्र्याकरिता कसे झगडत होते, हे मी वारंवार ऐकले आहे. नंतर नेताजी सुभाषचंद्र बोस हे आपल्या प्रकृतीच्या कारणावरून तुरुंगातून घरी नजरकैदेत आले व तेथून ते ब्रिटिश सत्ताधिकाऱ्यांना चुकवून गुप्त कसे झाले याबद्दल मला फार औत्सुक्य वाटत असे. नंतर ते जर्मनीमध्ये गेले. त्यावेळी जर्मन फौजांनी भरीव विजय मिळविले होते. जपानमध्ये राहणाऱ्या भारतीयांना सुभाषचंद्र बोस जपानमध्ये यावेत याबद्दल सक्रिय सहानुभूती वाटत होती. भारतीय लोकांची अशी फार दिवसांची उत्कट इच्छा होती, की मि. बोस यांनी इकडे येऊन स्वातंत्र्याच्या लढ्यासाठी आपला नेता म्हणून कार्य करावे. मि. बोस हे बर्लिनमध्ये येण्याच्या सुमारास अशा प्रकारचा विचार सर्वत्र फैलावला होता.

मार्च १९४२ मध्ये इंडियन इंडिपेंडंट लीगच्या प्रतिनिधींसह भारताच्या मुक्तीसाठी कोणत्या मार्गाने व उद्देशाने कार्य करावे याबद्दल विचारविनिमय करण्यासाठी टोकिओ-मध्ये एक सभा भरवण्यात आली. त्यावेळी विशालपूर्व आशियाच्या युद्धास सुरुवात झाली होती व ब्रिटिश मलाया द्वीपकल्प आणि ब्रह्मदेश या ठिकाणी युद्ध पेटले होते.

१९४१ च्या उन्हाळ्यापासून ' आर्मी चीफ ऑफ दी स्टाफ ' यांच्या ऑफिसकडून ' लष्करी विभाग ' म्हणून समजल्या जाणाऱ्या भारतीयांच्या बरोबर संबंध जोडण्याचा प्रयत्न चालू होता. त्याकरिता प्राथमिक पायरी म्हणून पूर्व आशियामध्ये राहणाऱ्या भारतीयांच्या स्वातंत्र्याच्या लढ्यास मदत करणे जरूर होते. या काळातच मलायामधून चाललेल्या स्वातंत्र्याच्या लढ्याशी आम्ही संबंध प्रस्थापित करण्यात यश मिळविले. त्याचबरोबर मि. सुभाषचंद्र बोस व त्यांचे लष्करी संबंधित यांनी जर्मनीत चालवलेल्या भारताच्या स्वातंत्र्य लढ्याबरोबरही जपानच्या जर्मनीमधील राजदूताकरवी संबंध प्रस्थापित केले. टोकिओमधील भारतीयांच्या मीटिंगनंतर दक्षिणपूर्व आशियामध्ये जपानी लष्कराने भव्य प्रगती केली. ८ मार्च रोजी ब्रह्मदेशावर चालून गेलेल्या लष्कराने रंगूनचा ताबा घेतला. ९ मार्च रोजी आमच्या लष्कराने जावा बेटावर उतरून तेथील डच–भारतीय फौजांना शरणागती स्वीकारावयास लावली. टोकिओ-मधील ' क्यापिटॉल डिव्हिजन ' दि. १३ मार्च रोजी सुमात्रा बेटावर उतरली. २५ मार्चपर्यंत अंदमान, निकोबार बेटे जपानच्या हाती पडली.

मेच्या मध्यावर अतिपूर्वेकडे राहणाऱ्या २००० भारतीयांनी प्रथमच एकत्र येऊन बँकॉकमध्ये एक मेळावा घेतला व पूर्व आशियामध्ये राहणाऱ्या २ लक्ष भारतीयांच्या वतीने सर्वांचे एकच उद्दिष्ट असलेले भारताचे स्वातंत्र्य मिळविण्याची प्रतिज्ञा केली. थायलंडमधील जपानचे राजदूत टास्यू वोगामी आणि जर्मन व भारतीय मंत्रालयाचे प्रमुख हे मेळाव्यास मुख्य पाहुणे म्हणून हजर होते. मेळाव्यास आलेल्या सर्व प्रतिनिधींची उत्स्फूर्त भाषणे झाल्यावर जपान सरकारचे व लष्करी प्रमुखांचे अभिनंदनाचे संदेश वाचून दाखवण्यात आले आणि शेवटी मि. सुभाषचंद्र बोस यांचा बर्लिनहून आलेला संदेश वाचनात यावयाचा होता. जमलेल्या श्रोतृवर्गात या संदेशा-बद्दल फार औत्सुक्य होते. ते आपल्या संदेशात म्हणतात, " १८ महिने बाहेर राहून माझ्या असे प्रत्ययास आले आहे, की ब्रिटिशांच्या विरुद्ध आम्ही जपान, जर्मनी आणि इटली यांच्याशी ऐक्य करणे जरूर आहे. तथापि भारताचे स्वातंत्र्य आम्ही स्वतःहूनच मिळविले पाहिजे. स्वातंत्र्य मिळविण्याच्या अखेरच्या क्षणी आम्ही शस्त्र उचलू. भारताचे स्वातंत्र्य म्हणजे ब्रिटिश साम्राज्यशाहीचा अंत होय आणि हा एकच उद्देश जपानी लष्करी फौजांनी आपल्या लक्षात ठेवला आहे. मी त्यांना सुयश चिंतितो आणि आमच्या विजयाची मुहूर्तमेढ या सभेत रोवली जात आहे असा विश्वास व्यक्त करतो. "

या प्रमाणे इंडियन इंडिपेंडंट लीगने आपल्या विचारांशी सहमत असलेल्या पश्चिम युरोपमधील लोकांच्याबरोबर हातमिळवणी केली आणि ब्रिटिश–भारत फौजेमधील भारतीय युद्ध कैद्यांनाही आपल्या बाजूला घेतले. यामुळे साहजिकच आय. आय. एल.ची शक्ती वाढली.

मध्यंतरी दक्षिण आशियामध्ये युद्धाचे ढग जमत असून, ते आशियाकडे सरकत आहेत अशी माहिती मि. सुभाषचंद्र बोस यांना समजली होती. विशेषतः सिंगापूर जपान्यांच्या हाती गेल्यावर त्यांनी आशियात चढाईस प्रारंभ करावा म्हणून वारंवार जपानला कळविले होते.

मि. सुभाषचंद्र बोस यांनी जपानला यावे अशीही जपानची इच्छा होती. त्यांनी इकडे येऊन शक्य असेल, तर या भागातील भारतीयांच्या स्वातंत्र्यलढ्याचे नेतृत्व घ्यावे. या इच्छेला मूर्त स्वरूप येऊ लागून जपान सरकारात त्याचे पडसाद उठू लागले. जपानचा भारताबद्दलच्या धोरणात बदल घडू लागला. या प्रकरणाची सर्व सूत्रे कर्नल जनरल इव्ह्याक्युरो यांच्याकडे सुपूर्त केली गेली. क. ज. इव्ह्याकुरो हे त्यावेळी मलायाच्या चढाईत जखमी होऊन दवाखान्यात उपचार घेत होते. क. ज. इव्ह्याकुरो हे एक प्रतिष्ठित समजले जात होते आणि म्हणून टोकिओकडून अनेक महत्त्वाच्या लष्करी कामगिऱ्या त्यांच्यावर सोपविल्या जात होत्या. ते आपल्या जागेवर हजर होताच त्यांनी मि. सुभाषचंद्र बोस यांना पूर्व आशियामध्ये बोलावून घ्यावयाचे व त्यांच्याकडे भारताच्या स्वातंत्र्यासाठी चाललेल्या लढ्याची सर्व सूत्रे सुपूर्त करायची असे त्यांनी ठरविले. मि. बोस यांना भारताबद्दल जे कार्य करावयाचे आहे त्यावर कोणताही निर्बंध न घालता तत्काळ मदत करण्याचे धोरण त्यांनी आखले. पूर्व आशियामध्ये राहणाऱ्या सर्व भारतीयांना भारताच्या स्वातंत्र्याकरिता मि. सुभाषचंद्र बोस यांच्या नेतृत्वाखाली कोणत्याही प्रकारची मदत देण्याचे त्यांनी धोरण स्वीकारले. आणि यासाठी त्यांनी ‘ इव्ह्याकुरो किकान ’ तयार केले. त्यासंबंधीची सर्व माहिती मला या ठिकाणी पूर्णपणे सादर करावयाची आहे.

राजकीय विभाग– या विभागाला सर्वात जास्त अग्रहक्क देण्यात आला होता.

क. ज. इव्ह्याकुरो यांचे नाव जपानच्या प्रमुख राजकीय मुत्सद्यांमध्ये मोडत होते. त्यांना भारताबद्दल संपूर्ण ज्ञान होते आणि म्हणून त्यांना विभागप्रमुख करण्यात आले होते. या विभागाकडे इतर काही भारताची माहिती असलेले तज्ज्ञ देण्यात आले होते. या विभागाचा राजकीय हालचालीवर सर्व ताबा होता. या विभागाकडून ‘ इंडियन इंडिपेंडन्स लिग ’ला लागेल ती सर्व मदत देऊन व त्यांच्याशी सतत संबंध ठेवून राजकीय हितसंबंध व इं. इं. लिगची बळकटी करणे, त्यांच्याशी सतत संपर्क ठेवणे या कामाचा ताबा पण त्यांच्याकडेच होता.

खबर विभाग– आशियाच्या बाहेरील व आतील भारतीयांच्याबद्दल सर्व प्रकारची माहिती व खबर जमा करणे वगैरे कार्याबरोबरच पेनांग येथे फायटिंग ट्रेनिंग सेंटर सुरू करण्याचे कार्यही त्यांच्याकडेच होते. यासाठी त्यांनी मि. राघवन् या स्थानिक प्रतिष्ठित वकिलाची डायरेक्टर म्हणून नेमणूक केली होती. त्याचप्रमाणे ‘ स्पेशल ड्यूटीज ’ विभागाकडे जपानी राजकारण मुत्सद्यांपैकी एका सदस्याची या विभागावर

प्रमुख म्हणून नेमणूक करून, त्याच्या मदतीसाठी ' जपानी एक्सपर्ट 'ची नेमणूक केली होती. या विभागाकडे भारताच्या अंतर्गत भारतीयांना ब्रिटिश सरकारविरुद्ध एकत्र करणे आणि त्यांच्याकडून खबर आणणे, तसेच या कामासाठी भारतात एजंट म्हणून पाणबुडीतून किंवा विमानातून लोक पाठवणे हे काम नेमून दिले होते.

लष्करी हितसंबंध विभाग– या विभागाकडे क्षेत्रविभागाचे व्यवस्थापन करण्याचे काम होते. ब्रिटिश-इंडियन लष्करांतून शरण आलेल्या भारतीयांच्या तीन ' गुरीला ' रेजिमेंटस् होत्या. या फौजेचे उपयोग सरहद्दीवरील बातम्या आणणे किंवा शत्रू सैन्याच्या आघाडीमागे जाऊन घातपाती चळवळ करणे, दळणवळण मोडणे, वाहतूक बंद पाडणे अशी विध्वंसक कामे करण्याची व लढाईतील लूट जमा करून आणण्याची कामगिरी दिली होती.

प्रचार विभाग–या विभागाचे मुख्य काम म्हणजे शत्रूच्या प्रदेशात जोरदार प्रचार करणे. या काळात मी टोकिओमध्ये राहत होतो. जपानमध्ये राहणाऱ्या भारतवासीयांना एकत्र जमवून व त्यांच्यामध्ये स्नेहभाव निर्माण करून त्यांना संघटित करण्याचे कार्य मी करीत होतो. आर्मी चीफ ऑफ दी स्टाफ यांच्याकडून सर्व प्रकारची मदत होत होती. जपानची भारततज्ज्ञ मंडळी त्यांना शक्य असलेल्या सर्व प्रकाराने मदत करीत होती. कारण भारत मुक्तिलढ्याबद्दल त्यांना फार सहानुभूती वाटत होती. त्या सर्वांमध्ये प्रमुख मंडळी म्हणजे तैशो युनिव्हर्सिटीचे ' भारतीय तत्त्वज्ञान ' या विषयाचे प्राध्यापक डॉ. निक्किनी किम्युरा आणि डॉ. शुमी ओकावा. हे मानवजाती शास्त्रज्ञ असून कट्टर राष्ट्रवादी होते.

मध्यंतरी जपानमध्ये असलेल्या भारतीयांनी दक्षिणपूर्व आशियामध्ये भारताजवळच्या भागात हालचालीस प्रारंभ केला होता. यानंतर रासबिहारी बोस यांचे नेतृत्व असलेल्या भारतीयांचा बँकॉक येथे मेळावा भरवण्याचे ठरविण्यात आले. या आगामी मेळाव्याची पूर्वतयारी करण्याकरता एक भारतीय गट तिकडे एप्रिलमध्ये रवाना होणार होता. त्यांच्याबरोबर संरक्षक म्हणून जाण्याची कामगिरी माझ्याकडे आली. निघण्यापूर्वी त्यांचा एक निरोपसमारंभ ' सिन्नो हॉटेल 'मध्ये मी आयोजित केला. या गटाच्या प्रवासा-साठी वहानाची व्यवस्था केली व हॉटेलमध्येही रिझर्वेशन्स केली. टोकिओमध्ये यांपूर्वीच त्यांनी आपला स्वातंत्र्याचा लढा घोषित केल्यामुळे त्यांच्या प्रवासाची गुप्तता ठेवण्याचे कारण नव्हते. उलट आम्ही तिकडे जात असल्याबद्दलचा प्रचार केला. आम्ही ज्यावेळी टोकिओ स्टेशनवरून निघालो त्यावेळी आमच्या गटास शुभेच्छा व्यक्त करण्या-साठी व निरोप देण्यासाठी लष्करी व नागरी लोकांनी खूपच गर्दी केली होती. मि. रास बिहारी बोस यांच्या सूचनेप्रमाणे आम्ही जात असता वाटेत आमचा प्रवास खंडित करून ' इसार्शिनी ' यांना आदरांजली वाहिली व आम्ही निघालेल्या कार्याला यश मिळो, अशी प्रार्थना केली. लोकांच्या दृष्टीला भारतीय लोक या पवित्र स्थानाला पूज्य

मानतात ही थोडी विसंगती दिसली असेल; परंतु मला स्वतःला तसे काहीच वाटले नाही. कारण मि. रासबिहारी बोस हे जपानमध्ये गेली वीस वर्षे राहत होते आणि मि. मिस्युरू टॉयमा या अत्यंत उत्साही अशा देशभक्ताच्या कार्याने त्यांच्या मनात आदराची भावना होती आणि जपानच्या भावनाही ते जाणत होते.

'इसार्शिनी' यांच्या दर्शनानंतर आम्ही नागोयाला गेलो व तेथे नागोया हॉटेलमध्ये एक रात्र राहिलो. दुसरे दिवशी सकाळच्या रेल्वेने मौजीला पोहोचलो आणि तेथून आम्ही बँकॉकला समुद्रमार्गे गेलो. बँकॉकच्या सभेची सुरुवात चांगली होऊ शकली नाही. सर्व पूर्व आशियात विखुरलेल्या भारतीयांच्या स्वातंत्र्यासाठी चाललेल्या लढ्याचा विशिष्ट दर्जा नष्ट होण्यास ही सभा कारणीभूत झाली. या चळवळीचा जगावर झालेला विशिष्ट परिणाम नाहीसा झाला. अशा प्रकारे या सभेतून निष्पत्ती झाली. दुसरे म्हणजे सर्वत्र टीका होऊ लागली आणि गोंधळ व संशयीवृत्तीला आपआपसात ऊत आला. प्रथमतः मि. रासबिहारी बोस हे जपानचे हस्तक आहेत, या टीकेने सुरुवात झाली. नंतर कॅ. मोहनसिंघ, कमांडर इंडियन इंडिपेंडन्स व्हॉलंटरी आर्मी, यांनी ब्रिटिशांच्या बाजूने लढणाऱ्या ५०,००० पकडलेल्या भारतीय सैन्यावर गोळीबार केला होता, या प्रकरणाला विशेष महत्त्व देऊन एकमेकांवर आरोपप्रत्यारोप करण्यात आले. आणि शेवटी टोकिओ व बँकॉकच्या सभेत एकमेकांवर टीका करण्यात आल्यामुळे त्याचे परिणाम फारच गंभीर स्वरूपात झाले.

ले. कर्नल गिल हे ब्रिटिश-भारत सैन्याचे अधिकारी होते व त्यांनी शरणागती पत्करली होती. ते ब्रिटिश मिलिटरी कॉलेजचे पदवीधर असून अत्यंत कर्तृत्ववान होते. ते भारताच्या स्वातंत्र्य लढ्यात सहभागी होऊन टोकिओ व बँकॉक येथे भरलेल्या सभेला लष्कराचे प्रतिनिधी म्हणून हजर राहिले होते. या सभेमध्ये प्रत्येक वेळी त्यांनी कॅ. मोहनसिंघांच्या बद्दल अविश्वास प्रगट केला होता. एकाच लष्करात या दोन परस्पर विरोधी लष्करी प्रमुखांना एकत्र ठेवून सर्व फलटणीच्या तुकड्यांवर ताबा ठेवणे व शिस्त ठेवणे फारच कठीण होऊ लागले. बँकॉकमध्ये मी आल्याबरोबर माझ्याकडे पहिले नेमून दिलेले काम म्हणजे 'इव्ह्याकुरो किकान' मध्ये सामील होऊन कॅप्टन मोहनसिंघ यांच्यापासून ले. क. गिल आणि त्यांचे सहकारी यांना एकमेकापासून विभक्त करणे वप्रत्येकाला स्वतंत्रपणे काम नेमून देणे. ले. क. गिल यांच्या हाताखाली मेजर धिल्लन आणि इतर उच्च कर्तृत्ववान अधिकारी होते व हे सर्व लोक ब्रिटनमध्ये शिक्षण घेऊन आले होते. त्या प्रत्येकाला योग्य त्या तुकड्या व लष्करी साहित्य देण्यात आले. त्यांना कार्यक्षम लष्कर ताबडतोब तयार करण्यास सांगितले. जुलैमध्ये ले. क. गिल व त्यांचे सहकारी सिंगापूरहून निघून बँकॉकला रवाना झाले. त्यांना तेथील दोन बंगले भाड्याने घेऊन राहण्याची सोय करून घेण्यास सांगितले. भारताला स्वातंत्र्य मिळविण्याच्या निरनिराळ्या योजना तयार करून त्या कशा राबविता येतील याचा विचार करण्यात

त्यांनी आपला वेळ उपयोगात आणला. ते दररोज मला बोलावून घेत व आम्ही खूप गप्पा मारत असू. कित्येक वेळा आम्ही 'पार्टी' ही करीत असू. आम्ही सर्व व्यवस्थितपणे एकत्र येत असू. यामुळे आमची मैत्री अधिकच दृढ होत होती. ले. क. गिल हे चाळीशी उलटून गेलेले गृहस्थ होते आणि त्यांच्या कडक चेहऱ्यावर त्यांनी मिशा राखल्या होत्या. त्यांच्या चेहऱ्यावरील स्मित हास्यामुळे मला ते माझ्या वडलां-सारखे किंवा माझ्या थोरल्या भावासारखे भासत. मी त्यावेळी वीस वर्षांचा होतो व त्यांचे व माझे एक प्रकारचे नातेच जमले होते. दोन महिन्यानंतर सर्व संशोधन करून त्यांनी आपले हस्तक भारतात पाठवून दिले व तेथे काय घडत आहे याची संपूर्ण माहिती आणण्याचे ठरविले. ही योजना त्यांनी बँकॉकमध्ये असताना तयार केली. ही योजना जपानच्या व भारताच्या पुढाऱ्यांनी मान्य केली. या निर्णयाप्रमाणे ले. क. गिल व त्यांची पार्टी आणि मी सप्टेंबरच्या मध्यावर ब्रह्मदेशाला आलो. रंगून येथे विमानाने आल्यावर आम्ही ब्रह्मदेशातल्या 'इव्ह्याकुरो किकान' यांची भेट घेण्यासाठी गेलो. आम्ही त्यांची भेट घेण्यापूर्वीच त्यांनी आमच्या निवासाची सोय केली असणारच, असे आम्ही समजत होतो; परंतु आम्हाला आश्चर्याचा धक्काच बसला. आम्ही फार निराश झालो. आमच्याकरिता त्यांनी कोठेही रिझ-र्वेशनस् केलेली नव्हती. इतकेच नव्हे, तर आमच्या मनाला लागेल इतके त्यांनी आमच्याकडे दुर्लक्ष केले. ले. क. गिल व त्यांची पार्टी यांना हा मोठाच धक्का बसला. बँकॉकमध्ये असताना त्यांना सन्मानाने वागवण्यात येत होते आणि आता एका विशेष कामासाठी ब्रह्मदेशासारख्या अनोळखी मुलखात आल्यावर त्यांना तुच्छ लेखले गेले. ब्रह्मदेशातली 'इव्ह्याकुरो किकान'ची शाखा त्यांच्याकरिता थोडीदेखील सहानुभूती दाखवण्यास तयार झाली नाही. आमच्याबरोबर असलेल्या वीस सैनिकांच्या व आमच्या निवास व भोजनाची काहीच सोय करण्यास यांनी मदत केली नाही. हे प्रक-रण मोठे गुंतागुंतीचे झाल्यामुळे आम्हाला आमचा मार्ग गुप्तपणे काढणे जरूर होते. राजनैतिक पातळीवरून या प्रकरणाचा ऊहापोह करून ही बाब सार्वजनिक होणे बरोबर वाटले नाही. या प्रकरणामुळे मेजर धिल्लन व त्यांचे लोक यांना भारताबद्दल आपण केलेल्या त्यागात आणि कर्तव्यात काही तरी चूक घडल्यासारखे वाटले. नोव्हेंबरच्या शेवटी शेवटी कॅ. मोहनसिंग यांच्या अधिकाराखाली असलेल्या सिंगापूर येथील भारतीय लष्करात यादवी झाली व या यादवीत ले. क. गिल यांचा पाडाव झाला. कॅ. मोहनसिंग हे मुख्यतः आझाद हिंद फौजेचे जनक म्हणून समजले जात होते आणि जपानी लष्कराच्या साहाय्याने त्यांनी या फौजेचा विकास आणि विस्तारही केला होता. त्यांनी याकरिता केलेले महान कार्य आणि लोकोत्तर कृती यामुळे ते आझाद हिंद फौजेचे कमांडर इन् चीफ झाले होते. तथापि त्यांनी फौजेमध्ये जपानी लष्कराबद्दल अविश्वास निर्माण केला व आय्. आय्. एल.मध्ये फूट पाडण्याचा प्रयत्न केला. त्यांचा

उद्धटपणा इतक्या पराकोटीला गेला, की शेवटी जपानी लष्कराला त्यांना काढून टाकून नाखुषीने अटक करावी लागली. याच वेळी ले. क. गिल यांना आपल्या खालच्या लोकांना नीट वागणूक न दिल्याबद्दल अटक करण्यात आली. दोघांना निरनिराळ्या दूरच्या बेटावर हद्दपार करून, आझाद हिंद फौजेचे विलीनीकरण करण्यात आले. त्याचप्रमाणे जपानी लष्कराकडून आय्. आय्. एल्‌मध्ये काम करणारे दोन प्रमुख कार्यकर्ते गोहोबंधू व मेनन यांना कॅ. मोहनसिंग यांना साहाय्य करून रासबिहारी बोस व त्यांचे सहकारी राघवन् यांच्याशी उद्धटपणाची वर्तणूक केल्याबद्दल काढून टाकण्यात आले. याप्रमाणे आपल्या स्वातंत्र्याकरिता भारतीयांनी संघटित केलेली चळवळ जपानच्या लष्कराने वाढवून तिच्यात प्रशंसनीय प्रगती केली आणि टोकिओच्या सभेपासून त्यास हळूहळू गती देण्यात आली. तथापि वसाहतीतील त्यांच्या आपसातील भांडणामुळे त्यांनी केलेल्या कार्याला मोठाच हादरा बसला. अखेर दुसऱ्या काही निस्वार्थ देशभक्तांना एकत्र करून स्वातंत्र्य लढ्याची स्वच्छ पुनर्रचना करण्यात आली. नवीन निर्माण केलेल्या 'इंडिपेंडन्स लीग'ची नवी पुनर्रचना केलेली फौज या नव्या 'लिग'बरोबर सहकार्याने काम करण्यास तयार झाली. या नव्या संघटनेने आपल्या कार्याव्यतिरिक्त भारताच्या संबंधित असे नवे कामही हाती घेतले. त्यांनी नवी केंद्रे सिंगापूर, सायगाव आणि रंगून येथे सुरू करून नवे कार्यक्रम प्रसारित करण्यास सुरुवात केली.

१९४३ च्या सुरुवातीस इतर काही भारतीय बांधवांच्या बरोबर माझ्याकडे एक नवे काम सोपविण्यात आले. शत्रूने आपली चढाई तीव्र करण्यास सुरुवात केली होती आणि यामुळे आमचे 'एजंटस्' भारतात पाणबुडीच्या साहाय्याने पाठविण्यात आम्हाला नौदलावर विसंबून चालणार नव्हते. आता एकच मार्ग उरला होता आणि तो म्हणजे विमानातून त्यांना खाली सोडणे. जपानच्या हवाई दलाकडे त्यांचे पॅरॅशूट सैनिकपथक असल्यामुळे ते आमच्या योजनेस सहकार्य देईनात. आमचे 'एजंटस्' विमानातून शत्रू सैन्याच्या पिछाडीस उतरवण्याची योजना होती. या योजनेची अम्मलबजावणी करण्याकरिता मला ५ व्या एअरफोर्स डिव्हिजनच्या चीफ ऑफ दि स्टाफना भेटून विनंती करावी लागली; पण आघाडीवरील डावपेचात अधिकच मग्न असल्याने अशा प्रकारच्या कामासाठी मदतीचा हात देण्याचे त्यांनी नाकारले व विमानातून खाली उतरण्यासाठी काही व्यवस्था आपल्याकडे नसल्याचे कारण पुढे केले. मध्यंतरीच्या काळात 'इव्हाकुरो किकान' याना व आय. आय. एल.ला माझी कल्पना फार पसंत पडली आणि त्याप्रमाणे त्यांनी भारतीय देशभक्तांमधून काही सुयोग्य लोक निवडले. त्यांना माझ्याकडे शिक्षण घेण्यासाठी त्यांनी पाठवून दिले. आमच्याकडे कोणत्याही प्रकारची सोय किंवा योग्य ते साहित्य आणि वर्गाची जागा नसताना आम्ही शिक्षण देण्याचे काम सुरू केले. हा शिक्षणक्रम (पॅराट्रूप्स) थोडक्यात देण्याचे म्हटले तरी यास

कमीत कमी तीन महिने लागणार होते. पॅराट्रूप्सचा आमच्यापैकी कोणासही पूर्व अनुभव नव्हता. शिवाय, हे शिक्षण घेणारी मंडळी सतरा वयापासून पन्नास वयापर्यंतची होती. या सर्वांमुळे शिक्षण देण्याचे काम फारच अवघड झाले होते. या सर्व मुलभूत शिक्षणाबरोबरच त्यातून बाहेर पडण्याचेही शिक्षण देणे आवश्यक होते. त्या बरोबरच त्यांना रेडिओची साधने कशी वापरावयाची याचेही शिक्षण देणे फार जरुरीचे होते. मॉरसे सिग्नल साहित्य कसे वापरावयाचे, त्याचबरोबर शत्रूला फसवण्याची युक्ती व टेहेळणी करण्याचे आणि हेरगिरीचे शिक्षणपण त्यांना दिले जाणे आवश्यक होते. यामुळे आम्हाला रात्रंदिवस काम करणे जरूर होते. प्रथम आम्ही रंगून शहराच्या बाहेर गुप्तपणे या शिक्षणास सुरुवात केली. जसजसे आमचे शिक्षण वाढू लागले तसतसे आम्ही पॅराट्रूप्स शिक्षण तज्ज्ञाची मदत घेऊ लागलो व त्याबरोबर टोकिओमधील आर्मी चीफ ऑफ दि स्टाफ यांच्या कार्यालयाकडून आम्ही विमानांचीही मदत घेतली. आम्ही आमचे शिक्षणकेंद्र मलायात हलविले. आमच्या लोकांनी दोन महिन्यांतच सर्व शिक्षण घेऊन टाकले आणि पुढील शिक्षण टोकिओ शिक्षणतज्ज्ञाकडे सुपूर्त केले. तिकडून आलेल्या शिक्षणतज्ज्ञांना त्यांचे झालेले शिक्षण पाहून फार आश्चर्य वाटले व त्यांनी कौतुक केले. पुढील एका महिन्यातच त्यांनी संपूर्ण शिक्षण संपवले व पॅराट्रूप्सच्या योग्यतेइतकेच ते तयार झाले. सर्व शिक्षण संपवून आम्ही पुन्हा रंगूनला परत आलो. अगदी थोड्या वेळातच त्यांनी बहुव्यापक असे शिक्षण संपविले.

एका रात्री त्यांना विमानातून भारतात नव्या नेमून दिलेल्या कामासाठी पाठविण्यात आले. ठराविक मुदतीत त्यांनी पूर्ण केलेल्या शिक्षणाचा पडताळा आम्हाला आला. आम्ही त्यांना उच्च बनावटीचे रेडिओ साहित्य दिले होते. त्यापासून त्यांनी आम्हाला रेडिओ संकेत पाठविले. त्यांनी रेडिओ सिग्नलद्वारा पाठविलेली सर्व माहिती जपानी लष्कराला अत्यंत खरी व फारच महत्त्वाची वाटली. त्यानंतर अत्यंत ताजी व संपूर्ण खरी माहिती वारंवार जपानी लष्कराला मिळत राहिली अधिक महत्त्वाचे काम म्हणजे शत्रूच्या पिछाडीस पॅराट्रूप्स पाठवून हेरगिरी करण्याची लष्कराची ही पहिलीच वेळ असून ती अत्यंत यशस्वी झाल्यामुळे त्यांना खूपच उत्साह वाटला. त्याचबरोबर भारताच्या स्वातंत्र्य लढ्यासाठीही त्याचा खूपच उपयोग होणार होता. कारण भारतात पाय रोवून तेथील जनतेच्या चळवळीस उत्स्फूर्त करण्याची व त्याबाबतची माहिती देण्याची व घेण्याची चांगली सोय झाली आणि या दृष्टीने हा एक मोठाच विजय होता.

अनेक स्थित्यंतरानंतर स्वातंत्र्याची चळवळ भारताच्या जनतेने सुरू केली व त्याची हळू हळू प्रगती होत गेली. या मध्यंतरीच्या काळात भारतीय स्वातंत्र्य लढ्याचे नेते सुभाषचंद्र बोस यांची पूर्व आशियातील लोक उत्कंठतेने वाट पाहत होते. ते पूर्व आशियामध्ये जर्मनी ते जपान हा अत्यंत कष्टमय व भीतिदायक पाणबुडीचा पॅसिफिक महासागरी प्रवास करून येणार होते.

दुसऱ्या जागतिक युद्धाच्या सुरुवातीच्या वेळी सुभाषचंद्र बोस हे भारतातून सुटका करून घेऊन अफगाणिस्थान व रशियामार्गे जर्मनीत पोहोचले आणि शत्रूच्या ताब्यातून निसटून पुन्हा एकदा धाडस करून अटलांटिक महासागर व हिंदी महासागरातून ते पूर्व आशियात येऊन पोहोचले. यावरून असे दिसून येते, की ते भारताचे स्वातंत्र्य मिळविण्यास किती वचनबद्ध होते. कर्नल इव्ह्याकुरो यांच्या जागी आलेले कर्नल तोशी यामामोटो आणि मि. ताडामोटो निगिषि हे सुमात्राच्या सबांग बेटावर नेताजींना उतरून घेण्यासाठी आले होते. मी ज्यावेळी भारतीय पॅराट्रुप्सना शिक्षण देत होतो त्यावेळी त्यांनी दुभाषा म्हणून काम केले होते. १६ जून रोजी नेताजी जरी टोकिओला आले होते, तरी त्यांच्या आगमनाची वार्ता, त्यांच्याबद्दल उलटसुलट काही प्रतिक्रिया होऊ नये, म्हणून गुप्त ठेवण्यात आली होती. नेताजींनी दोन वेळा प्रिमियर टोजो यांची भेट घेतली. लष्करी आणि सरकारी प्रमुखांच्या बरोबर एकत्र विचारविनिमय केला. त्याचबरोबर जपानची लष्करी ठाणी वगैरेंची पाहणी केली. जपानच्या राष्ट्रीय ‘ डायेट ’ला ते हजर राहिले. त्यांच्या टोकिओतील अनेक आठवड्यांच्या वास्तव्यात त्यांना जपानच्या वरिष्ठांची व पुढाऱ्यांच्या विचारांची खात्री वाटल्यामुळे जपानच्या साहाय्याने स्वातंत्र्यढ्याच्या यशस्वितेची खात्री वाटू लागली. १९ जून रोजी त्यांनी प्रेस कॉन्फरन्स बोलावली आणि आपण आशियामध्ये आल्याचे पहिले निवेदन प्रसिद्ध केले. २१ जूनच्या रात्री त्यांनी भारताबद्दल अत्यंत भावनोत्कट असे भाषण नभोवाणीवरून केले आणि त्यानंतर पुन्हा एकदा दि. २४ रोजी त्यांनी आपल्या भारतीय देशबांधवांना उद्देशून भाषण केले. जपानचे प्रधानमंत्री टोजो यांनी जे भारताबद्दल ‘ इंपीरिअल डायेट ’मध्ये जे भाषण केले होते त्याबद्दलची माहितीही त्यांनी निवेदन केली. त्यानंतर त्यांनी जाहीर केलेली निवेदने भारतातील व भारताबाहेरील लोकांना स्फूर्तिदायक वाटली आणि त्याचवेळी ती ब्रिटिश व अमेरिकन राष्ट्रप्रमुखांना मोठी धक्कादायक वाटली. अशाप्रकारे नेताजींनी भारत स्वातंत्र्याची मुहूर्तमेढ पूर्व आशियात रोवली आणि दुसऱ्या जागतिक महायुद्धाअखेरपर्यंत त्यासाठी लढा दिला. यामुळे सर्व देशबांधवांना प्रेरणा व स्फूर्ती मिळाली.

सायगावमध्ये मला नेताजींना भेटण्याची संधी मिळाली होती. ते नुकतेच टोकिओहून परत येऊन पहिल्या सरहद्दीकडे रवाना होण्याच्या मार्गावर होते. त्यावेळी मी सायगाव आर्मी हॉस्पिटलमध्ये आजारी पडल्यामुळे उपचार घेत होतो. माझ्याकडे नेमून दिलेले पॅराट्रुपसचे शिक्षण संपवून सहा महिन्यांनंतर रंगूनहून बँकॉक मार्गे या ठिकाणी विमानातून मला आणण्यात आले होते. नेताजी आपल्या मार्गावर असतानाच मला भेटण्यासाठी हॉस्पिटलमध्ये आले. मला असे वाटते, की सायगाव ब्रँचमधील माझ्या काही सहकारी मित्रांनी त्यांना तसे सुचविले असावे. आपल्या नेहमीच्या गर्दीच्या कार्यक्रमातून त्यांनी मला भेटण्यासाठी वेळ काढला. याबद्दल त्यांच्या सहृदय

माणुसकीच्या वागणुकीने मी सद्‌गदित झालो. त्यांचा तो हसतमुख चेहरा मी कधीही विसरणार नाही. त्यांनी मला आपल्या मृदू आवाजात विचारले, " कसं काय वाटतंय तुम्हाला ? माझी खात्री आहे की तुम्ही लवकरच पूर्ण बरे व्हाल. " मग ते काही मिनिटे माझ्याजवळ थांबले, पण तेवढ्याच वेळात मला त्यांच्याबद्दल अतोनात आदर वाटू लागला. त्यांच्या भेटीमुळे मला शक्ती आल्यासारखे वाटले. मला स्वतःला आत्मविश्वास वाटून त्यामुळेच माझी प्रकृती लौकर सुधारली.

मला खात्रीने वाटते, की त्यांनी स्वतः लढ्याची सर्व सूत्रे आपल्या हाती घेतल्यामुळेच सर्व भारतीय त्यांच्या भोवती एकत्र जमा झाले. त्यांनी पहिली चढाई इंफाळवर केली आणि त्या ठिकाणी त्यांनी ' स्वातंत्र्याचा झेंडा ' फडकावला. तथापि ग्रेटर ईस्ट आशियाचे वाईट तऱ्हेने सुरुवात झालेले युद्ध अखेरीस जपानच्या पराभवाबरोबर त्यांचेही भवितव्य पराभूत करते झाले. त्यांच्या अकाली विमानअपघाती मृत्यूने त्यांच्या सर्व इच्छा आकांक्षा हिरावून नेल्या व त्यांच्या इच्छापूर्तीचे स्वप्न अपुरे राहिले. हा दुर्दैवी प्रसंग मोठा दुःखदायक वाटतो. कारण भारताला लवकरात लवकर स्वातंत्र्याची फळे मिळावीत म्हणून नेताजींना मदत करण्याचे आमचे मनःपूर्वक प्रयत्न तत्काळ फलद्रूप होऊ शकले नाहीत. आणि आम्ही एका महान नेत्यालाही कायमचे मुकलो.

आता भारताने संपूर्ण स्वातंत्र्य मिळविले आहे. भारतीय जनता नेताजी सुभाषचंद्र बोस त्यांच्या हृदयातील भारत स्वातंत्र्याचे स्वप्न साकार करण्याकरिता त्यांनी केलेल्या महान् कार्याची व समर्पणाची मुक्तपणे अभिमानपूर्वक प्रशंसा करीलच !

९

## माशिझ्यो फुजीवारा

( एक्स मेजर जनरल, चीफ ऑफ स्टाफ २९वी डिव्हिजन
जपानीज इंपीरिअल आर्मी फोर्सेस इन् मलाया. )

## मी टिपलेले मि. सुभाषचंद्र बोस

मी जर बरोबर स्मरत असेन, तर ऑक्टोबर १९४४ मधील ही घटना आहे. मि. सुभाषचंद्र बोस हे आपल्या खाजगी विमानातून मी काम करीत असलेल्या २९व्या डिव्हिजन हेड क्वार्टरला भेट देण्यासाठी आले होते. हा एक उंच व उमदा मनुष्य फारच भारदस्त वाटला. त्याच्या चेहऱ्यावर चिंतेची काहीही छटा नव्हती, जपानी लष्कर व आझाद हिंद फौज हे ब्रह्मदेशातून अत्यंत हालअपेष्टात स्वातंत्र्यासाठी लढण्यास सिद्ध होऊन राहिले होते.

परिस्थिती फारच गंभीर होती. अशाही परिस्थितीत मि. सुभाषचंद्र बोस यांच्या हाकेला ओ देऊन असंख्य भारतीय तरुण भारताच्या स्वातंत्र्य लढ्यासाठी पुढे येत

होते. भारतावरील ब्रिटिश सत्तेवर चाल करून जाण्यासाठी मलायामधील निरनिराळ्या छावण्यांतून त्यांना अत्यंत कटीण असा शिक्षणक्रम घ्यावा लागत असे. मि. बोस हे अशा शैक्षणिक छावण्यांची पाहणी करण्यासाठी आले होते व उभ्याउभ्याच त्यांनी आमच्याही कॅंपला भेट दिली. एकमेकांच्या सहकाऱ्यांबद्दल चौकशी केली. दुर्दैवाने आमचे कमांडर हजर नव्हते. त्यामुळे तेथील प्रमुख म्हणून मी त्यांना भेटलो.

त्या वेळी भारतीय स्वयंसैनिकांना आमच्याकडून वाहातूक व इतर सैनिकी शिक्षणाची मदत पाहिजे होती. तथापि मि. बोस यांनी नम्रपणे अर्ज विनंत्या करण्याची भूमिका घेतली नाही. संपूर्ण संभाषणात ते निश्चयी व ठाम असे बोलत होते. मला ते भारताच्या स्वातंत्र्याबद्दल फार उत्सुक असलेले दिसून आले. दुपारच्या जेवणानंतर खुर्चीवर बसून दिवाणखान्यात विश्रांती घेत असताना त्यांनी मला सांगितले, की ब्रह्मदेशाच्या मंडालेच्या तुरुंगात त्यांनी काही दिवस घालविले आहेत. १९४२ च्या ब्रह्मदेशावरील लष्करी कारवाईचा प्रमुख म्हणून मी काही आठवणी निवेदन करीत होतो. आम्ही एप्रिलच्या सुमारास रंगूनमध्ये उतरलो आणि त्या भयानक उन्हाळ्यात आम्ही उत्तरेकडे मंडाले ताब्यात घेण्यासाठी गेलो. तेथून पुढे लाशसो व लाशमोपर्यंतही गेलो. मंडाले ही ब्रह्मदेशाची जुनी राजधानी होती; पण अत्यंत उष्ण हवामान, रोगराई याने ती भरली होती. त्यांना मंडालेच्या तुरुंगात ठेवल्याबद्दल मी त्यांना सहानुभूती दर्शविली नाही; पण त्यांनी त्याकडे फारसे लक्ष दिले नाही व त्याबद्दल ते अधिक काही बोलले नाहीत. एखाद्या तरुण क्रांतिकारकाच्या आयुष्यात असे प्रसंग येणे म्हणजे काही विशेष महत्त्वाची गोष्ट नव्हे!

भारताच्या स्वातंत्र्याकरिता आयुष्यभर लढा देत राहिलेले मि. सुभाषचंद्र बोस यांना माझे मनापासून अभिवादन करून व पुन्हा भेटण्याची इच्छा व्यक्त करून आम्ही उठलो.

आणि आता—

त्यांचे स्वप्न खरे झाले असून जगामध्ये अत्यंत महत्त्वाची भूमिका नव्यानेच स्वतंत्र झालेला भारत वठवीत आहे. माझी खात्री आहे की नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या आत्म्याला शांती मिळत असेल.

जय–हिंद

# रूपांतर

| | |
|---|---|
| airborn | हवाजड |
| ' ashes ' | रक्षा, रक्षापात्र, रक्षापेटी |
| ' Hikary Kikan ' ( हिकारी किकान ) | जपानी लष्कराचे संपर्क साधन अधिकारी |
| I. N. A.–Indian National Army | आझाद हिंद फौज |
| I. I. L. Indianent Independ league | आझाद हिंद सरकार |
| occupation forces | ताबा घेणारे लष्कर |
| Operation | चढाई ( लष्करी ) |
| Provisional Government of | |
| free India | स्वतंत्र भारताचे हंगामी सरकार |
| Pow | युद्धकैदी |
| Taipeh ( तैहेकू ) | तैफी किंवा थंफी |
| Treasure | रत्नभांडार, मौल्यवान खजिना |